# ''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासः एक ऐतिहासिक अभ्यास''(इ.स.१९५० ते २०१०)

## "SOCIAL, ECONOMIC & POLITICAL HISTORY OF TASGAON CITY: A HISTORICAL STUDY" (A. D. 1950 TO 2010)

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच्. डी.) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध


**- संशोधक -**

**कु. पवार भारती शिवाजी**

**- मार्गदर्शक -**

**डॉ. अमर पांडे**

एम.ए., एम.फिल., पीएच्.डी.

**इतिहास विभाग,**

श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली.

**- संशोधन केंद्र -**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी, पुणे-३७**



**फेब्रुवारी - २०१४**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत ''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास : एक ऐतिहासिक अभ्यास'' (इ.स. १९५० ते २०१०) या विषयावर पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध सादर करीत आहे.

सदर संशोधन कार्य मी स्वत: केलेले असून त्यासाठी प्राथमिक आकडेवारी व दुय्यम आकडेवारी संकलित करून, त्याचे विश्लेषण करून, त्याच्या आधारे मी स्वतंत्रपणे निष्कर्ष व सूचना नोंदविलेल्या आहेत.

सदर प्रबंध मी किंवा इतर कोणीही यापूर्वी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला किंवा इतर विद्यापीठाला पीएच्.डी. पदवीसाठी किंवा अन्य पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : तासगाव **संशोधक,**

दिनांक : १/२/२०१४

कु. पवार भारती शिवाजी

कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, तासगाव.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. पवार भारती शिवाजी यांनी ''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास : एक ऐतिहासिक अभ्यास'' (इ.स. १९५० ते २०१०) या विषयावर पीएच्. डी. पदवीसाठी तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

सदर प्रबंधामध्ये समाविष्ट असलेली माहिती प्राथमिक आकडेवारी व दुय्यम आकडेवारीच्या आधारे संकलित केली असून ती वास्तव व योग्य आहे.

प्रस्तुत प्रबंध यापूर्वी इतर कुठल्याही विद्यापीठास पीएच्.डी. पदवीसाठी किंवा अन्य पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

**ठिकाण** : सांगली

**मार्गदर्शक,**

**दिनांक** : १/२/२०१४

**डॉ. अमर पांडे**

श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली.

# ऋणनिर्देश

या संशोधनासाठी अनेक व्यक्तींचे सहकार्य आणि योग्य मार्गदर्शन लाभल्यामुळे मी आज हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करीत आहे. या व्यक्तींची त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजते.

प्रथमत: माझे गुरूवर्य आदरणीय डॉ. अमर पांडे, श्री. विजय कारेकर व डॉ. श्रध्दा कुंभोजकर यांनी मला संशोधन करण्याची संधी दिली व योग्य मार्गदर्शन केले, याबद्दल त्यांचे सदैव ऋणी राहण्यात मला आनंद आहे. मला संशोधनासाठी प्रोत्साहित करणारे आदरणीय श्री. के. वाय. कोळेकर, श्री. मधुकर पागे, श्री. तु. पां. माळी, सौ. कमल कोळेकर, डॉ. बाबूराव गुरव, डॉ. अरूण भोसले, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. गौतम ढाले, ॲड. सु. ग. महामुनी, श्री. एल. डी. म्हेत्रे, श्री. नंदु (काका) कराडे, डॉ. संजय साठे, डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. पी. डी. गरूड, डॉ. भारती पाटील या सर्वांची मी ऋणी आहे.

हा प्रबंध लिहिण्यासाठी कु. स्मिता पाटील, श्री. नितीन शहा, श्री. नितीन कन्नुरे, तासगाव नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी मा. मनोजकुमार देसाई व त्यांचे सहकारी, तासगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व त्यांचे सहकारी, तहसिलदार श्री. आर. बी. पोटे, श्री. राजेद्र पटवर्धन, श्री. प्रताप घाडगे, श्री. संभाजी जाधव, शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मा. ए. बी. वाडकर, मा. सुखदेव पवार, कोळी, सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक, सौ. रजनीगंधा लंगडे, मा. अमोल (नाना) शिंदे, मा. सुनिल (भाऊ) पाटील, सौ. मिनल कुडाळकर, श्री. अवधूत शिंदे, सौ. लिलाताई जाधव, चंपाताई जाधव, जयश्री सावंत, शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथपाल व त्यांचे सहकारी, पद्म. वसंतरावदादा पाटील ग्रंथालयातील ग्रंथपाल, मा. आर. आर. पाटील ग्रंथालयाचे अध्यक्ष ॲड. तुकाराम कुंभार, ॲड. गजानन खुजट, श्री. मारूती गुरव, श्री. दिलीप थोरवत, श्री. हरिफ जमादार, संतोष अडसुळ, समाजकल्याण ऑफीस व त्यांचे सहकारी, तासगाव पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक व त्यांचे सहकारी या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

माझे सहकारी स्वप्नील म्हमाणे, संपूर्णा पाटील, शिवाजी जाधव, सुरेश माळी, प्रियांका सरवळकर, चांगदेव बंडगर, वर्षा देवकर, शुभांगी कदम, शिवानंद महाजन, गीता जोशी, संजय मांगलेकर, गणेश सिंहासने, राजकुमार तकडे, हेमंत कांबळे, संतोष लोढे, अर्चना पाटील, स्मिता कांबळे, शौकत आत्तार, लक्ष्मण शिंदे, शरद पाटील, हरिष वडे, गावडे, नंदकुमार शेटे या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

ज्यांच्या शुभर्शिवादाशिवाय व प्रेरणेशिवाय हा प्रबंध पूर्ण करणे मला शक्य झाले नसते ते माझे ति. आई-वडील, सासु-सासरे, भगिनी स्मिता साठे, भाऊजी संतोष साठे, सिंधु पाटील (मामी), संगीता पाटील, शैलेंद्र (दादा) पाटील, जाऊ-दीर, भाऊ मंगेश, आजी कलावती यादव, मामा-मामी, मावशी, अंजना जाधव, कमल आत्या, विश्वजीत यांची ही मी ऋणी आहे. माझे पती श्री. सतिश पाटील यांचा हा प्रबंध लेखनासाठी खूपच मोलाची मदत झाली, तसेच चि. पियुष, संकेत, सौरभ, हर्षल, सानवी या सर्वांची मी आभारी आहे.

**धन्यवाद !**

**कु. भारती शिवाजी पवार**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देश | |
| पहिले | प्रस्तावना | १ ते १८ |
| दुसरे | तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १९ ते ४७ |
| तिसरे | तासगाव नगरपालिका वाढः विस्तार | ४८ ते ८४ |
| चौथे | तासगाव शहरातील शैक्षणिक स्थिती | ८५ ते १२७ |
| पाचवे | तासगाव शहराची सामाजिक स्थिती | १२८ ते १६५ |
| सहावे | तासगाव शहराची आर्थिक स्थिती | १६६ ते २०१ |
| सातवे | तासगाव शहराची राजकीय स्थिती | २०२ ते २४२ |
| आठवे | उपसंहार | २४३ ते २५० |
| | संदर्भसूची | २५१ ते २५५ |
| | परिशिष्टे | २५६ ते २६३ |

**संक्षिप्त रूपे**

१. शेतमजूर : जो दुसऱ्याच्या जमिनीवर उपजीविकेचे साधन म्हणून काम करतो. त्याचा जमिनीवर मालकी अधिकार नसतो. त्याला मिळणारा मोबदला हा नफ्याच्या स्वरूपात नसून फक्त मजूरीच्या स्वरूपात असतो. अशा व्यक्तीस शेतमजूर असे म्हणतात.

२. जन्मदर : दर हजार लोकसंख्येमागे दरवर्षी किती बालके जन्माला येतात, या प्रमाणाला जन्मदर म्हणतात.

३. कुटीर उद्योग : कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने पूर्णकालीन किंवा अंशकालीन व्यवसाय म्हणून चालविण्यात येणाऱ्या उद्योगाला कुटीर उद्योग म्हणतात. हा उद्योग सामान्यत: शेती उत्पादनावर किंवा नैसर्गिक कच्च्या मालावर अधारित असतो.

४. टी. एम. सी. : दशलक्ष हजार घनफुट

५. इ. पि. को. : इंडियन पिनल कोड

६. क्युसेक : क्युसेक म्हणजे १ सेकंदाला २८ लिटर पाण्याचा प्रवाह वाहतो.

७. साक्षरता : साक्षरता म्हणजे कोणत्याही भाषेतील मजकूर जाणीवपूर्वक लिहिता व वाचता येणे होय.

८. उ. ना : उपलब्ध नाही.

९. UIDSSMT : महाराष्ट्र शासन जीवन प्राधिकरण योजना

१०. IHSDP : एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास

११. S.J.S.R.Y.: स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

**प्रकरण पहिले**

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन समस्या

१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये

१.४ संशोधनाची मर्यादा

१.५ स्थानिक इतिहास

१.६ संशोधनाचे महत्व

१.७ संशोधन साहित्याचा आढावा

 १.७.१ प्रकाशित साधने

 १.७.२ मुलाखती

१.८ सैध्दांतिक पार्श्वभूमि

१.९ गृहितके (Hypothesis)

१.१० संशोधन पद्धती (Methodology)

 १.१०.१ तथ्य संकलन व विश्लेषण

  अ) प्राथमिक साधने

  ब) दुय्यम साधने

१.११ प्रकरण नियोजन

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे : तासगाव नगरपालिका वाढः विस्तार...

प्रकरण चौथे : तासगाव शहरातील शैक्षणिक स्थिती

प्रकरण पाचवे : तासगाव शहराची सामाजिक स्थिती

प्रकरण सहावे : तासगाव शहराची आर्थिक स्थिती

प्रकरण सातवे : तासगाव शहरातील राजकीय स्थिती

प्रकरण आठवे : उपसंहार

१.१२ सांगली जिल्ह्याची निर्मिती

१.१२.१ सांगली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

१.१२.२ भूपृष्ठ व भूस्तरीय संरचना

१.१२.३ दळणवळण व प्रशासकीय विभाग

१.१३ हवामान व ऋतू

१. उन्हाळा २. पावसाळा ३. हिवाळा

१.१४ सांगली जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळे

१. जमीन २. पिके ३. उद्योगधंदे

**प्रकरण पहिले**

# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना

सांगली जिल्ह्यातील 'तासगाव' शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे. तासगाव हे शहर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. शहराला गेल्या अनेक वर्षापासून येथे सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासाची परंपरा आहे. तासगाव शहराबाबत यादवकालीन राजा कृष्णदेवराय यांचा 'तासगावच्या ताम्रपट'चा संदर्भ देता येईल.[१] पेशवाईत तासगावचे पटवर्धन संस्थान हे सुप्रसिद्ध होते. शिवाय येथील गणेश मंदिरही प्रसिध्द आहे. येथे गेल्या २५९ वर्षापासून गणेशोत्सवाची परंपरा असून तासगावचा सुप्रसिद्ध 'गणेश-उत्सव' सर्वज्ञात आहे. येथे दरवर्षी 'गणेश-उत्सवास' अनेक भागातून लाखो भाविक मोठ्या भक्तीभावाने आपली हजेरी लावतात. परशुराम माळीची सुप्रसिद्ध सर्कस, तमाशाचे तासगाव, द्राक्ष-बेदाण्याचे तासगाव अशा अनेक कारणांनी तासगावचा परिचय सर्वश्रुत आहे. कर्तव्यदक्ष सरदार परशुरामभाऊचे तासगाव, रोजगार हमी योजनेचे जनक वि. स. पागे यांचे तासगाव अशा अनेक गोष्टीबद्दल तासगावची ओळख देता येईल. ३ सप्टेंबर १९४२ चा तासगावमधील क्रांतीमोर्चा, सातारच्या प्रतिसरकारचे मूळ केंद्र तासगाव परिसरातील 'कुंडल' हेच आहे. अशा अनेक ऐतिहासिक संदर्भ खुणाही तासगाव नगरीने जपून ठेवल्या आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्ष बागायतीच्या इतिहासात 'तासगाव चमन' या द्राक्ष वाणाला महत्वाचे स्थान आहे. तासगावचे 'वैज्ञानिक द्राक्षेकुल' ही संस्था जगाच्या बाजारपेठेत आपला वेगळा ठसा उमटून आहे. येथील बेदाणा मार्केटही प्रसिद्ध आहे. अशा अनेक कारणांनी तासगावची ओळख आहे.

तासगावची शैक्षणिक व सामाजिक प्रगती झपाट्याने होत आहे. महाराष्ट्रातील पहिले पोलिस प्रशिक्षण केंद्र तासगाव (तुर्ची) येथे आहे. तसेच क्रीडा संकुल, व्यायामशाळा, औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. येथील कारखाने, शैक्षणिक संस्था, बँका अशा विविध बहुउद्देशीय संस्थामुळे लोकांना रोजगार मिळाला आहे. तसेच येथील विविध जाती धर्माचे लोक आप-आपल्या परीने सण-उत्सव साजरे करतात.

तसेच अनेक राजकीय नेतृत्वही याच परिसरात उदयास आली आहेत. मराठेशाही कालखंडातील पराक्रमी सरदार परशुरामभाऊ पटवर्धन, वसंतरावदादा पाटील, वि. स. पागे, गणपतराव कोळी व आर. आर. पाटील अशा अनेक नेत्यांनी महाराष्ट्राच्या राजकारण व समाजकारणात मोलाची भर टाकली आहे.

अशा तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास अभ्यासणे काळाच्या गरजेनुसार उचित आहे. म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

प्रस्तूत, प्रकरणात संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची मर्यादा, संशोधन विषयाचे महत्व, स्थानिक इतिहासाचे महत्त्व, संशोधन साहित्याचा आढावा, तासगावातील प्रकाशित व अप्रकाशित साधने, सैध्दांतिक पार्श्वभूमी, गृहितके, संशोधन पद्धती, प्रकरण नियोजन इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

**१.२ संशोधन समस्या**

अशा ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर असलेला तासगाव शहराचा विशेषतः अलिकडच्या काळात सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास होताना दिसत आहे. वरील विवेचनानंतर प्रत्यक्ष संशोधनात्मक अभ्यासासाठी घेतलेल्या समस्येचे शीर्षक पुढील प्रमाणे आहे. ''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास: एक ऐतिहासिक अभ्यास''(इ. स. १९५० ते २०१०)

**१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये** (Objectives of Research)

प्रस्तूत विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने संशोधनाकरिता काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे

१. ऐतिहासिक पार्श्वभूमी पहात असताना तासगावचा इतिहास अभ्यासणे.
२. तासगाव शहर व परिसरातील घडामोडीची माहिती घेणे.
३. स्वयंसेवी व बहुउद्देशीय संस्थांची माहिती घेणे.
४. नगरपालिका विकास, कायदे व नियमांचा अभ्यास करणे.
५. स्थानिक कार्यकर्त्याचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अभ्यासणे.
६. महाराष्ट्रातील सामाजिक बदलातून तासगावचा विकास अभ्यासणे.
७. ऐतिहासिक वास्तूंचे सांस्कृतिक व धार्मिक महत्व अभ्यासणे.
८. समाज-जीवन, चाली-रिती व रूढी-परंपरा यांची माहिती घेणे.
९. नगरपालिका प्रशासनाचा सामाजिक व आर्थिक विकासावरील परिणाम अभ्यासणे.
१०. शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.
११. तासगावच्या 'वैज्ञानिक द्राक्षेकुल' या संस्थेचे योगदान व द्राक्ष बेदाण्याचे महत्त्व अभ्यासणे.
१२. तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास या संबंधी माहिती घेणे.

अशा प्रकारे तासगाव शहराने महाराष्ट्राच्या इतिहासात राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. तेव्हा ही माहिती प्रकाशात आणण्याच्या मुख्य उद्देशाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## **१.४ संशोधनाची मर्यादा**

तासगावच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना या विषयाची मर्यादा स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. या प्रबंधामध्ये प्रदेशाच्या दृष्टीने 'तासगाव शहर' ही मर्यादा स्विकारलेली आहे. या शहराची व्याप्ती दर्शवणारा नकाशा या प्रबंधामध्ये देण्यात आलेला आहे. तासगावचा इतिहास हा प्रामुख्याने स्थानिक इतिहास (Local History) या दृष्टीने अभ्यासलेला आहे.

## **१.५ स्थानिक इतिहास** (Local History)

विसाव्या शतकात प्राचीन, मध्ययुगीन इतिहास लेखन करताना कागदपत्रे धुंडाळली गेली. त्यातून 'स्थानिक इतिहास' प्रकार उलगडला गेला.[२] प्राचीन इतिहास रेखाटताना महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या लेखनाला गती आली. यातून मुंबई, मद्रास, कलकत्ता, लंडन आणि पॅरिस इत्यादी शहराचे इतिहास लेखन केले गेले. 'स्थानिक इतिहासा'च्या लेखनासाठी शासकीय पातळीवर ब्रिटीश काळातील जिल्हा पातळीवरचे गॅझेटिअर्स अस्तित्वात आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात गॅझेटिअर्सचा उपयोग करून त्या-त्या प्रदेशाचे वैशिष्ट्ये दाखवणारा प्रादेशिक इतिहास २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात लिहिला गेला. 'स्थानिक इतिहास' हा प्रादेशिक इतिहासाचा सूक्ष्म प्रकार होय.[३] यामध्ये व. ना. काळे यांचा 'नागपूर प्रांताचा इतिहास', डॉ. रोमिला थापर यांचा 'पंजाबचा इतिहास', रा. गो. कोलालकर यांचा 'आधुनिक विदर्भाचा इतिहास' यांचा'स्थानिक इतिहास' प्रकार म्हणून उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल.[४]

## **१.६ संशोधनाचे महत्त्व** (Importance of Research)

प्रस्तूत संशोधनाचा विषय नाविन्यपूर्ण असून या विषयावर संशोधन झालेले नाही. या संशोधनामुळे तासगाव शहराचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. तासगाव शहराला सामाजिक, राजकीय व धार्मिक वारसा आहे. राजकीय नेतृत्वामुळे तासगाव शहराची प्रगती झाली आहे. तर सामाजिक व शैक्षणिक संस्थानी केलेल्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तनास चालना मिळाली आहे. या सर्वांची माहिती व्हावी यासाठी या विषयाची निवड केली आहे.[५]

१. संशोधनाद्वारे स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.
२. तासगावचे ऐतिहासिक पटवर्धन संस्थानाची माहिती घेतली आहे.

३. शहराच्या शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक प्रगतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.
४. ऐतिहासिक दृष्टीने समकालीन कर्तृत्त्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.
५. प्रस्तूत संशोधन वाचकाला, संशोधकाला प्रेरणादायी विद्यार्थी वर्गाला सहाय्यभूत ठरेल.
६. सर्वसामान्य लोकांनाही आपल्या गावाचा इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा वाढेल.
७. स्थानिक समाज सेवकांच्या कार्याची नोंद घेतली जावून त्यांच्या कर्तृत्वाला न्याय मिळेल.
८. तासगावमधील द्राक्ष-बेदाण्याला मोठी परदेशी बाजार पेठ मिळाल्यामुळे परदेशी गुंतवणुकीची उलाढाल होते. अर्थात जागतिकीकरणाचे सकारात्मक रूप येथे पहावयास मिळते.
९. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामुळे नविन पिढीतील तरूणांना कार्य करण्याची प्रेरणा मिळते.
१०. राष्ट्रीय इतिहास लेखनात स्थानिक इतिहास लेखनामुळे अधिक माहितीची भर पडते.
११. स्थानिक इतिहासामुळे स्थानिक परिस्थितीचे ज्ञान होते.
१२. नवोदितामध्ये इतिहास अभ्यासाची आवड निर्माण होते.

एकंदरीत तासगाव शहराच्या संपूर्ण 'स्थानिक इतिहास' लेखनाच्या अभ्यासातून राष्ट्रीय इतिहास लेखनात भर पडणार आहे. तासगाव शहराच्या विकासाच्या दृष्टीने अभ्यास करताना विकासासाठी हातभार लावण्याऱ्या गोष्टींची नोंद यामध्ये घेण्यात आली आहे. ज्यांनी विकासासाठी योगदान दिले आहे. त्यांचीदेखील दखल घेण्यात आली आहे. उपलब्ध माहितीचे निरिक्षण करून वस्तुनिष्ठ लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.७ संशोधन साहित्याचा आढावा

हा प्रबंध प्रामुख्याने अप्रकाशित साधनावर आधारलेला आहे. प्रबंधाच्या लेखनासाठी तासगाव नगरपालिकेची अप्रकाशित कागदपत्रे, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, यांच्याकडील अप्रकाशित साधने, पुणे येथील पेशवे दप्तरातील अप्रकाशित साधने आणि मुंबई शासकीय पुरातत्त्व विभागातील (अर्काईव्हज) अप्रकाशित साधने यांचा वापर करण्यात आलेला आहे.

तासगाव नगरपालिकेची १९३० पर्यत साधने मोडी लिपीत आहेत, जनरल सभांचे प्रोसिडींग, विभागीय समित्यांचे प्रोसिडींग, नोकरांचे हजेरीपत्रक, घरपट्टी, विविध कर आकारणीचे रजिस्टर, जकात आकारण्याचे रेकॉर्ड, डेडस्टॉक रजिस्टर, विविध विभागाच्या किर्द, खतावण्या, आवक-जावक रजिस्टर, बारनिशी, जमा-खर्च, ताळेबंद, सरकारी पत्रव्यवहाराच्या फायली, विविध वृत्तपत्रे, दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, हस्तलिखिते, चरित्रग्रंथ, पत्रे, फोटो, आत्मचरित्रे, दिवाळी अंक, स्मरणिका विविध बँका त्यांचे वार्षिक अहवाल इत्यादी कागदपत्रे अभ्यासून त्या साधनांचा उपयोग प्रस्तूत प्रबंधात केला आहे.

### १.७.१ प्रकाशित साधने

मराठेकालीन तासगावचा इतिहास लिहित असताना भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी प्रकाशित केलेले विविध संदर्भ ग्रंथ वापरण्यात आलेले आहेत. तसेच इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी संपादिलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालिकेतील काही ग्रथांचा अभ्यास केला आहे. इ. स. १८५६ नंतरच्या तासगावचा इतिहास अभ्यासताना फारच थोड्या प्रकाशित साधनांचा उपयोग झाला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेली गॅझेटिअर्स, विविध शासकीय अहवाल व जनगणना अहवाल, शहरातील सामाजिक राजकीय चळवळीचा अभ्यास केला आहे.

### १.७.२ मुलाखती

तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासाचा अभ्यास करीत असताना तत्कालीन अनुभवी नेत्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. यातून तासगावचा इतिहास लिहिताना फार उपयोग झाला.

### १.८ सैध्दांतिक पार्श्वभूमी

प्रस्तूत संशोधनासाठी उपलब्ध साधनांच्या आधारे संशोधनात्मक इतिहास लिहिताना 'स्थानिक इतिहासावर' प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तासगावचे पटवर्धन संस्थान, नगरपालिकेचा इतिहास, शिक्षण पद्धतीविषयक कायदे व तरतुदींच्या घटना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, शैक्षणिक, धार्मिक प्रगतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय घडामोडी व समकालीन कर्तृत्त्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात तासगाव शहराचा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

### १.९ गृहितके (Hypothesis)

प्रस्तूत संशोधनाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते. या विधानाच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येईल. या संशोधनामध्ये खालीलप्रमाणे गृहितके मांडण्यात आलेली आहेत. ती पुढील प्रमाणे -

१) स्वातंत्र्योत्तर काळात तासगावचा ऐतिहासिक मोर्चा अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झालेला होता.

२) सामाजिक व आर्थिक जीवनात बदल झालेला दिसून येतो.

३) लोकसंख्येच्या तुलनेत शैक्षणिक संस्थांचा विकास झालेला दिसून येतो.

४) लोकांच्या धार्मिक प्रवृत्तीमुळे येथील लोक श्रद्धाळू व समाज हा रूढीप्रिय असल्याचे दिसून येतो.

५) तासगाव शहराला मध्ययुगीन काळात परकीय इतिहासकारांनी भेटी दिल्या, त्यावेळी त्यांनी तासगाव शहराविषयी गौरवोद्‌गार काढले होते.

६) राजकीय क्षेत्रातील नेतृत्व बदलामुळे शहराच्या विकासात भर पडलेली दिसते.

७) तासगावमधील कार्यकर्त्यांनी समाज सुधारणेची कामगिरी केलेली दिसून येते.

८) ऐतिहासिक वास्तू व पर्यटन स्थळे यांचे महत्व इतिहासात असलेले दिसून येते.

९) द्राक्ष-बेदाणा उद्योगामुळे तासगावची आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

## **१.१० संशोधन पद्धती** (Research Methodology)

''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास: एक ऐतिहासिक अभ्यास'' (इ. स. १९५० ते २०१०) या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण व संदर्भ साधने या दोन पद्धतीचा वापर केला आहे. सर्वेक्षणामध्ये तासगाव शहर व परिसरात असणारी ऐतिहासिक स्थळे, त्यातील पुरातत्त्वीय साधने व लिखित साधने यावरून हा इतिहास लिहिण्यास मदत झाली आहे. मुख्यत: मध्ययुगीन काळातील राजवाडा, गोपूरयुक्त मंदिर, सर्कस व ताम्रपट यावरून विश्वसनीय माहिती मिळण्यास मदत झाली.

तसेच या विषयाचे संशोधन करत असताना प्रामुख्याने प्राथमिक साधनांचा वापर केलेला आहे. यांचा उपयोग संशोधन वृध्दिसाठी केला आहे. उपलब्ध कागदपत्रांचा अभ्यास करताना पूर्वगृहदूषितपणा न ठेवता तटस्थपणे विषयाची मांडणी केली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून तासगाव शहरातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी बाबतीत झालेल्या प्रगतीचे विवेचन केलेले आहे. सदरचे संशोधन इतर अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल.

### **१.१०.१ तथ्य संकलन व विश्लेषण**

प्रस्तूत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संग्रहीत करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. या दोन साधनांच्या आधारे तथ्यांचे संकलन करण्यात आलेले आहे. ते पुढीलप्रमाणे

### **अ) प्राथमिक साधने**

१. कोल्हापूर व मुंबई पुराभिलेखागार कार्यालयातून मिळालेली माहिती.
२. तासगावचे संस्थान, ताम्रपट, राजवाडा याद्वारे माहिती मिळविणे.
३. सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्थांच्या संचालकांचे हस्तलिखिते, वार्षिक अहवाल व पत्रे.
४. तासगावमधील शैक्षणिक संस्थांचे वार्षिक अहवाल.

५. मंदिरे व ऐतिहासिक वास्तू यांना संशोधकांने प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली आहे.

६. विविध छायाचित्रे, फोटो, नकाशे व आलेख इत्यादींचा वापर संशोधकाने केला आहे.

७. प्रश्नावली भरून घेणे.

८. मुलाखती घेणे, चर्चा व भेटीतून माहिती मिळविणे.

९. वर्तमान पत्रे, लेख, स्मरणिका कविता याद्वारे माहिती मिळविणे.

**ब) दुय्यम साधने**

१. विविध संदर्भ पुस्तके

२. एम. फिल व पीएच्. डी. चे प्रबंध

३. नकाशे, सिडी व कॅसेट

४. वर्तमानपत्रे, दैनिक, साप्ताहिके, मासिके, स्मरणिका, त्रैमासिक अंक

५. विविध कार्यालये व संस्थांचे रेकॉर्ड व नियतकालिके

६. आत्मचरित्रे, विश्वकोश व संस्कृती कोश खंड

वरील साधनांच्या सहाय्याने संशोधन अचूक करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे संशोधनाचे योग्य विश्लेषण व अचूक निदान करता आले.

**१.११ प्रकरण नियोजन**

''तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास: एक ऐतिहासिक अभ्यास'' (इ. स. १९५० ते २०१०) या संशोधन विषयाची विभागणी एकूण आठ प्रकरणात करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे -

**प्रकरण पहिले : प्रस्तावना**

पहिल्या प्रकरणामध्ये पुढील टप्प्यांची विस्तृतपणे मांडणी केली आहे. संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची मर्यादा, विषयाचे महत्व, संशोधन साहित्याचा आढावा, तासगावातील अप्रकाशित साधने, प्रकाशित साधने, सैध्दांतिक पार्श्वभूमी, गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य संकलन व विश्लेषण, प्रकरण नियोजन इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे : तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

तासगावचा पूर्व इतिहास अभ्यासताना उपलब्ध साधनाच्या आधारे खालील घटकांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये तासगावची भौगोलिक स्थिती, तालुक्याची भौगोलिक रचना, स्थान, लोकसंख्या, स्त्री-पुरूष प्रमाण, अनुसूचित जाती-जमाती प्रमाण, ऐतिहासिक तासगाव, तासगाव नावांची उत्पत्ती, प्राचीन कालखंड, राष्ट्रकुट कालखंड, तासगावचा ताम्रपट, मध्ययुगीन कालखंड, पटवर्धन घराण्याचा इतिहास, ऐतिहासिक स्थळे, राजवाडा, गोपूरयुक्त गणपती मंदिर, स्वातंत्र्य चळवळ इत्यादी घटकांचा उपलब्ध साधनांच्या आधारे मागोवा घेतला आहे.

**प्रकरण तिसरे : तासगाव नगरपालिका वाढ : विस्तार...**

प्रकरणात संशोधनाची मर्यादा 'तासगाव शहरा'पुरतीच मर्यादित आहे. तासगाव शहराचा कारभार नगरपालिकेचे प्रशासन पहाते. त्यामुळे या प्रशासनासंबंधी कायदे अभ्यासणे महत्त्वाचे आहे. यामध्ये नगरपालिकेचा विकास, तासगाव पार्श्वभूमी, कमिशनरचा कारभार, नगरपालिकेची स्थापना, रचना, सभासदांच्या संख्येतील फेरबदल, नगरपालिकाचे अध्यक्ष, १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम कायदा, प्रशासकीय कारकीर्द, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका जमा-खर्च, उत्पन्नाची साधने, शासकीय अनुदाने, कर्ज, जकात, राज्यशासनाचे नियंत्रण, पाणीपुरवठा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना (UIDSSMT), सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, सामाजिक सुविधा, नगरपालिका शिक्षण मंडळ, बालवाड्या इत्यादी घटकांचा समावेश केला आहे.

**प्रकरण चौथे : तासगाव शहरातील शैक्षणिक स्थिती**

तासगाव शहराची शैक्षणिक स्थिती या प्रकरणामध्ये शहरातील प्रमुख शिक्षण संस्था, पूर्व प्राथमिक शाळांची स्थिती, नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांची स्थिती, शिक्षण मंडळ, प्रशासन अधिकारी, सभापती, वस्तीशाळा, प्राथमिक शिक्षणातील विविध योजना, उपक्रम, पुस्तकपेढी योजना, लेखन-वाचन, हमी कार्यक्रम, दत्तक शाळा योजना, सर्व शिक्षा अभियान, शिष्यवृत्ती परीक्षा, खाजगी प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षणाची स्थिती, उच्च माध्यमिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय), उच्च शिक्षण, मुक्त विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्र, तंत्रनिकेतन इत्यादी शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण पाचवे : तासगाव शहराची सामाजिक स्थिती**

सामाजिक इतिहासामध्ये प्रामुख्याने समाज-रचना, व्यवसाय, पोशाख, अलंकार, भाषा, आहार, घरे, उपनयन, विवाह, लोकसंख्या, स्त्री-पुरूष प्रमाण, धर्म निहाय व जाती निहाय स्थिती, सरकारने वंचित घटकासाठी राबविलेल्या योजना, कुटुंबव्यवस्था, स्त्री-जीवन, सामाजिक चाली-रिती, सण-उत्सव, रूढी-परंपरा, धर्म, साहित्य, कला-क्रिडा, वृत्तपत्रे तसेच शासनाने अनुसूचित जाती-जमातीसाठी राबविलेल्या योजना, शासकीय महामंडळे, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, जवाहर योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, इत्यादी सामाजिक घटकांचा आढावा सदर प्रकरणात घेण्यात आला आहे.

**प्रकरण सहावे : तासगाव शहराची आर्थिक स्थिती**

आर्थिक व्यवहार हे माणसाच्या व समाजाच्या दैनंदिन जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. तासगाव शहराची आर्थिक स्थिती अभ्यासताना तासगावची व्यावसायिक स्थिती, विविध व्यवसाय, शेतकरी, शेतमजूर, बलुतेदारी, व्यापार, वाणिज्य, फळबागा, घरगुती, उद्योग, बांधकाम, पोल्ट्री व्यवसाय, द्राक्षशेती, 'वैज्ञानिक द्राक्षकुल' संस्थेचे योगदान, महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाचे योगदान, बेदाणा उद्योग, जमीन, पिके, कुटिर उद्योग, बाजार समिती, सावकारी व्यवसाय, सहकार चळवळ व सहकारी संस्था, दुग्ध व्यवसाय व सहकारी संघ, बँकिंग सुविधा, आयुर्विमा, साखर उद्योग, बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची स्थिती, धान्यपुरवठा संस्था, वाहतूक व दळणवळण इत्यादी आर्थिक घटकांचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

**प्रकरण सातवे : तासगाव शहरातील राजकीय स्थिती**

तासगाव शहराचा राजकीय इतिहास लिहिताना यामध्ये विविध राजकीय पक्षाची स्थिती, स्वातंत्र्य चळवळीतील तासगावचे योगदान, युथ लिगचा प्रभाव, झेंडा चळवळ, मिठाचा सत्याग्रह, वैयक्तिक सत्याग्रहे, आंदोलने, सूत कताईचा प्रचार, मानवेंद्रनाथ रॉयी यांची सभा, रॉयिस्टांची सभा, ३ सप्टेंबर १९४२, रोजी तासगावचा मोर्चा, व्यायामशाळा, महात्मा गांधी यांची हत्या, जयप्रकाश नारायण यांची सभा, रोजगार श्री. वि. स. पागे यांचे योगदान, स्वातंत्र्य सैनिक, भाई गणपतराव कोळी, मा. श्री. आर. आर. (आबा) पाटील यांचे तासगावातील कार्य इत्यादी राजकीय घटकांचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

**प्रकरण आठवे : उपसंहार**

या प्रकरणामध्ये संशोधन कार्यातून काढलेले निष्कर्ष देण्यात आले आहेत. शेवटी नकाशे, छायाचित्रे, संदर्भग्रंथ यादी व परिशिष्टे देण्यात आली आहेत.

## १.१२ सांगली जिल्ह्याची निर्मिती

महाराष्ट्राच्या दक्षिण भागात हा जिल्हा आहे. सध्या महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे व ६ प्रशासकीय विभागाचा समावेश होतो. यामध्ये पुणे ह्या प्रशासकीय विभागात सांगली जिल्हा येतो. तत्कालीन सातारा जिल्ह्यात तासगाव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके हस्तांतरीत केले. तसेच राज्याच्या इतर संलग्न भागातून मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करण्यात आले. सहा तालुक्याचा दक्षिण सातारा नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने औंध, जत, सांगली, कुरूंदवाड व मिरज या संस्थानांचा समावेश होता. जिल्ह्याचे दि. २१ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण सातारा हे नाव बदलून सांगली असे करण्यात आले.[६]

१९६५ मध्ये मिरज व खानापूर या तालुक्याचे विभाजन करून कवठेमहांकाळ व आटपाडी असे आणखी दोन तालुके नव्याने निर्माण करण्यात आले. दिनांक १ जुलै १९९९ रोजी खानापूर व तासगाव तालुक्याचे विभाजन करून पलूस हा नव्याने तालुका निर्माण करण्यात आला. यानंतर पलूस व खानापूर या तालुक्याचे विभाजन करून दि. २८/०३/२००२ रोजी कडेगाव हा दहावा तालुका निर्माण केला आहे. सध्या सांगली जिल्हा हा दहा तालुक्याचा असून ७०८ गावे आहेत. तासगाव, विटा, आष्टा, इस्लामपूर या चार नगरपालिका तसेच सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका कार्यरत आहेत.[७]

### १.१२.१ सांगली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८,५७२ चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने सांगली जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यामध्ये २१ वा क्रमांक आहे.[८] जिल्ह्याचा विस्तार १६°-४५° ते १७°-२२° उत्तर अक्षांश व ७३°-४२° ते ७५°-४०° पूर्व रेखांश असा आहे. सांगली जिल्ह्याची पूर्व पश्चिम लांबी सुमारे २०५ कि. मी. व दक्षिण उत्तर रूंदी सुमारे ९६ कि. मी. आहे. सांगली जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ५५३ मीटर आहे.[९]

सांगली जिल्ह्याची शेती भौगोलिकदृष्ट्या दोन भागात विभागली आहे. त्यामुळे कृष्णा, वारणाकाठ, पश्चिम आणि दुष्काळी पूर्व भाग, सांगली जिल्ह्यातील महत्त्वाच्या नद्या कृष्णा व येरळा

आहेत. कृष्णा व येरळा नद्यांच्या पाण्यामुळे वाळवा, तासगाव, पलूस, मिरज व खानापूर तालुक्याची काही भागातील जमीन सुपीक बनलेली आहे.[१०]

सांगली जिल्ह्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे.

१. जिल्ह्याच्या उत्तर पश्चिमेस सातारा व पूर्वेस सोलापूर जिल्हा आहे.
२. दक्षिणेस पश्चिमेकडील कोल्हापूर जिल्हा व कर्नाटक राज्यातील बेळगाव हे जिल्हे आहेत.
३. पूर्वेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा आहे.
४. पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा व सातारा जिल्हा आहे.[११]

### १.१२.२ भू-पृष्ठ व भूस्तरीय संरचना

भु-पृष्ठ, हवामान व पर्जन्यमान यानुसार जिल्ह्याचे खालीलप्रमाणे स्वाभाविक भाग पडतात.

अ. पश्चिमेकडील डोंगराळ व जास्त पावसाचा प्रदेश.

ब. नद्यांच्या सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट प्रदेश.

क. पुर्वेकडील पठारांचा व भरड मातीचा, कमी पावसाचा काहीसा दुष्काळी प्रदेश असे तीन स्वाभाविक विभाग पडतात.[१२]

पश्चिमेकडील सह्याद्रीच्या पूर्व उताराच्या डोंगराळ रांगा व त्यातून निघणाऱ्या भैरवगड डोंगररांगा यांनी मुख्यत: शिराळा व वाळवा तहसिलमधील पश्चिम भाग व्यापलेला आहे. कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या सान्निध्यातील मध्यम पावसाचा सपाट व सुपीक प्रदेश यामध्ये मिरज तालुक्याचा पश्चिम व उत्तर भाग पलूस तालुक्याचा पश्चिम तर वाळवा व शिराळा तालुक्याचा पूर्व भाग येतो. पूर्वेकडील प्रदेश कमी पावसाचा भरड मातीचा भाग असून, यात आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, खानापूर या तालुक्याचा समावेश होतो. त्याचबरोबर मिरज व तासगाव या तालुक्याच्या पूर्व भागाचाही समावेश होतो.[१३]

जिल्ह्यामध्ये विविध प्रकारची माती आढळून येते. कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या खोऱ्यात काळी, कसदार, उच्चप्रतीची ९० से. मी. पेक्षा जास्त खोलीची माती आढळते. यात वाळवा, तासगाव व मिरज तालुक्याचा समावेश होतो.

भूजल पातळी सर्वसाधारणपणे ६ मीटर खोलीवर आढळते. तथापि भूगर्भातील अंतर्गत खडकानुसार कमी अधिक खोलीवर भूजल पातळी आढळून येते. विशेषत: जिल्ह्याच्या पूर्व भागात पाण्याचे प्रमाण खूपच कमी आहे.[१४]

### १.१२.३ दळणवळण व प्रशासकीय विभाग

जिल्ह्याचे मुख्यालय सांगली येथे असून लोहमार्गाद्वारे थेट दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगलोर व कलकत्ता इ. शहरांना जोडलेला आहे. पुणे बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या जिल्ह्यातून जातो. पोस्ट, दूरध्वनी आकाशवाणी, दूरदर्शन आदी सर्व माध्यमांनी सदर जिल्हा संपूर्ण जगाशी जोडला आहे. प्रशासकीय सोईसाठी जिल्ह्यामध्ये वाळवा, मिरज व खानापूर असे तीन प्रशासकीय विभाग कार्यरत असून दहा तहसिल, दहा विकास गट, एक महानगरपालिका व चार नगरपालिका कार्यरत आहेत.[१५]

### १.१३ हवामान व ऋतू

सांगली जिल्ह्याचे हवामान पाहिले तर जिल्ह्याच्या पूर्वभागाचे हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे तर सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेकडील हवामान दमट आहे. या प्रदेशातील हवामान वर्षभरात मानवी जीवनास अनुकूल आहे. या भागातील डिसेंबर ते फेब्रुवारी काळातील हिवाळा आल्हाददायक असतो. फेब्रुवारी मध्यापासून उन्हाळा सुरू होतो. जून ते सप्टेंबरचा काळ पावसाचा समजला जातो. या काळात ढगाळ वातावरण असते. ऑगस्ट ते सप्टेंबरमध्ये सर्वाधिक पाऊस असतो. अंदाजित सरासरी ६२६ मि. मी. इतका पाऊस पडतो. शेतीसाठी हवामान व पाऊस हा महत्वाचा घटक आहे. हवामानाच्या आधारावर शेतीचा विकास अवलंबून आहे.

१९७३ साली महाराष्ट्र शासनाने दुष्काळाबाबत सुखटनकर समिती नेमली होती. या समितीने आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, मिरज(पूर्व), खानापूर(पूर्व) हे दुष्काळी प्रदेश म्हणून घोषित केले आहेत.[१६] सांगली जिल्हा हवामानाच्या बाबतीत तीन भागात विभागला आहे.

१. सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेकडील प्रदेश शिराळा या भागात पावसाचे प्रमाण अधिक असते.
२. शिराळा तालुक्याचा पूर्व भाग वाळवा, मिरज(पश्चिम), तासगाव(पश्चिम), खानापूर या भागात पावसाचे प्रमाण साधारण असते.
३. खानापूर तालुक्याचा पूर्वेकडील प्रदेश आटपाडी, कवठेमहांकाळ, जत, मिरज(पूर्व), तासगाव(पूर्व) या प्रदेशात पावसाचे प्रमाण बरेच कमी आहे.

तासगाव शहराचे हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे. तासगाव शहराचे तापमान उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात अनुक्रमे ४०° सें व २०° सें. असते. राज्यात सर्वत्र आढळणाऱ्या ऋतूचक्रास तासगाव शहर अपवाद नाही. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे तीन प्रमुख ऋतू आहेत.

**१. उन्हाळा**

फेब्रुवारी ते मे या दरम्यान उन्हाळा असतो. मार्च महिन्यापासून तापमान जलद गतीने वाढत जाते व एप्रिल महिन्यात ते कमाल मर्यादा गाठते. एप्रिल महिना हा वर्षातील सर्वात जास्त तापमानाचा असतो. उन्हाळ्यात एक ते दोन वेळा मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टी होते. येथे सरासरी तापमान ३०.१° से. ते ४०.६° सेल्सिअस इतके असते तर एप्रिल महिन्यात तापमान ३५° सें व ४०° सेल्सिअस इतके असते.[१७]

**२. पावसाळा**

तासगाव शहरापासून पूर्वेला साधारणता ८० कि.मी. लांब असलेल्या सह्याद्री पर्वतामुळे या शहरावर पर्जन्यवृष्टी कमी असते. नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून येथे पाऊस पडतो. येथे सरासरी वार्षिक पर्जन्यवृष्टी ६२६ मि. मी. इतकी आहे. येथे पावसाळ्याची सुरूवात जून मध्यापासून होते व सप्टेंबर शेवटी संपतो.

**३. हिवाळा**

ऑक्टोंबर ते जानेवारी या दरम्यान हिवाळा असतो. हिवाळ्यात सरासरी तापमान १०८°-०° ते २१८°-५° सेल्सिअसपर्यंत असते. कधी कधी ९° सेल्सिअसपर्यंत खाली येते. या भागातील डिसेंबर ते फेब्रुवारी काळातील हिवाळा आल्हाददायक असतो. या प्रदेशातील हवामान वर्षभरात मानवी जीवनावर परिणाम घडवून आणणारे असे नाही.[१८]

**१.१४ सांगली जिल्ह्यातील प्रमुख स्थळे**

**१. पर्यटन स्थळे**

सांगली जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध अशी पर्यटन स्थळे खालीलप्रमाणे -

१. सांगली : गणपती मंदिर, ऐतिहासिक प्राणी संग्रहालय, सर्पालय इ.
२. मिरज : भुईकोट किल्ला, मिरासाहेब दर्गा, रेल्वे जंक्शन व तसेच शेतीची अवजारे इत्यादी.
३. माधवनगर : कापड गिरणी, यंत्रमाग, हातमागावर कापड तयार करणे.
४. शिराळा : नागपंचमी सणासाठी प्रसिद्ध देवराष्ट्रे व सागरेश्वर अभयारण्य इत्यादी.
५. तासगाव : बेदाणे तयार करण्याचा उद्योग, प्रसिद्ध गणपती मंदिर आहे.
६. कडेगाव : मोहरम सणाला ताबूत बसवतात त्यांना डोले म्हणतात. हिंदू व मुस्लिम धर्माचे लोक मिळून हा सण साजरा करतात.[१९]

### १. जमीन

सांगली जिल्ह्यामध्ये कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांचा सुपीक प्रदेश व या नद्यावरून पाटबंधारे व उपसा सिंचन योजनेद्वारे जमिनी ओलिताखाली आणल्या आहेत. त्याशिवाय महत्त्वाकांक्षी कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प, टेंभू प्रकल्प व वाकुर्डे पाणी योजनेची कामे प्रगती पथावर आहेत.[२०] येथील लागवडीस उपयुक्त ठरणारी जमीन ६७.३६% इतके आहे. या जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण केवळ ५.५३% इतके आहे. तासगाव तालुक्यात लागवडीस योग्य अशा जमिनीचे प्रमाण ७६.५४% इतके आहे. जंगलाचे प्रमाण ४.४६% इतके आहे.

तासगाव शहराचे क्षेत्र ४,३४२ हेक्टर असून लागवडीखालील जमीन १६.४३ हेक्टर आहे. वन क्षेत्र ७९.८६ हेक्टर आहे. कुरण क्षेत्र ५४.८७ तर पोट खराब क्षेत्र ६२.६९ हेक्टर इतके आहे. एकूण खातेदार ४,५०० आहेत. या क्षेत्राचा एकूण जमीन महसूल १६,८१८.६९ मिळतो.[२१]

### ३. पिके

महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळे हवामान आहे. या हवामानाचा पीक लागवडीवर परिणाम होत असतो. महाराष्ट्रात जमिनीचे क्षेत्र ३०८ लाख हेक्टर्स इतके आहे. यापैकी १९८ लाख हेक्टर्स इतके लागवडीखालील आहे. पाटबंधाऱ्यांची योजना १४% इतकी आहे. येथील बहुसंख्य पिकांना पावसावर अवलंबून रहावे लागते. महाराष्ट्रात संकरीत ज्वारीचे उत्पादन घेण्यात दुसरा क्रमांक लागतो. त्याचबरोबर गहू, ज्वारी, बाजरी ही प्रमुख पिके आहेत. अन्न-धान्याच्या वाढीसाठी राज्य सरकार विविध प्रकारच्या योजना राबवित असल्याने अन्न-धान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे.[२२]

तासगाव परिसरात प्रामुख्याने ज्वारी, (हायब्रीड व शाळू) गहू, बाजरी, हरभरा, मका, तूर, मटकी, चवळी, राजगीरा इत्यादी तृणधान्ये आणि द्राक्षे, ऊस, कापूस, केळी इत्यादी नगदी पिके तर भुईमुग, सोयाबीन, सुर्यफूल, मोहरी, करडई, जवस, तीळ, कराळे, अंबाडी इत्यादी तेलबिया पिके घेतली जातात.

भाजीपाला बटाटे, रताळी, कांदे, लसूण, मिरची, वांगी, भेंडी, भोपळा, लाल टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, मेथी, कोथींबीर, शेपू, पालक, कारली, गवारी, पावटा, दोडका, पडवळ, ढबू मिरची, आळू, गोसावळी, बीट, शेवग्याची शेंग इत्यादी भाज्या मोठ्या प्रमाणात घेतल्या जातात. पण योग्य प्रशिक्षण व अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने परदेशी भाज्यांची लागवड येथे केलेली दिसून येत नाही.

फळांमध्ये डाळिंब, पेरू, केळी, लिंबू, मोसंबी, आंबे, नारळ, चिक्कू, फणस, आवळा इत्यादी उत्पादने काढली जातात.[२३]

## ४. उद्योगधंदे

द्राक्षापासून बेदाणे तयार करणे, घोंगडी विणणे, घायपातापासून दोरखंड तयार करणे, हातमाग व यंत्रमागावर कापड विणणे, तेल गाळणे सिमेंट पाईप बनविणे, यंत्राचे सुटे भाग तयार करणे इ. तसेच मोठे उद्योग सांगली जिल्ह्यात किर्लोस्करवाडी या ठिकाणी लोखंडी सामानाचा कारखाना आहे. तर इतर लोखंडी वस्तू तयार करण्याचा कारखाना सांगली येथे आहे.

**अ) साखर उद्योग**

**तक्ता क्र. १ सांगली जिल्ह्यात खालीलप्रमाणे साखर कारखाने आहेत.**[२४]

| अ.नं. | तालुक्याचे नांव | साखर कारखाना असलेल्या ठिकाणाचे नाव |
|---|---|---|
| १) | मिरज | सांगली, म्हैसाळ |
| २) | पलूस | तुरची, कुंडल |
| ३) | खानापूर | नागेवाडी |
| ४) | आटपाडी | आटपाडी व सोनार सिद्धनगर |
| ५) | कवठेमहांकाळ | राजारामबापू नगर |
| ६) | वाळवा | वाळवा (साखराळे) |
| ७) | शिराळा | यशवंतनगर, कोकरूड |
| ८) | कडेगांव | वांगी, रायगाव |

# संदर्भसूची


१. तुळपुळे शं. गो. प्राचीन मराठी कोरीव लेख, १९८०, सागर प्रकाशन, मुंबई पृष्ठ. १३५-३८.

२. सरदेसाई बी. एन., गायकवाड, हनमाने, 'इतिहास लेखन शास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००२, पृष्ठ ३५.

३. देव प्रभाकर, इतिहास शास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक, प्रकाशन गृह, नाशिक, ऑगस्ट २००७ पृष्ठ क्र. २७.

४. कोठेकर शांता, 'इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान,' श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १५ ऑगस्ट २००५. पृष्ठ. क्र. २२.

५. कोठेकर शांता,'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' साईनाथ प्रकाशन, नागपूर १५ ऑगस्ट २००५ पृ.२

६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ३५.

७. A socio-economic review abstract, Sangli district, 2010–11,Page 1.

८. Maharashtra State Gazetteers Sangli District, 1999, PP.12.

९. A socio-economic review abstract, Sangli district, 2010–11Page 1.

१०. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा, १९९९ पृष्ठ क्र. १४.

११. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963 PP.12.

१२. सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०-११ पृष्ठ १.

१३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १.

१४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १.

१५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २.

१६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा १९९९ पृष्ठ २२.

१७. उपरोक्त कित्ता, १९६० पृष्ठ २४.

१८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २५.

१९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २७.

२०. A socio-economic review abstract, Sangli district, 2010–11 Page 2.

२१. सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१०-११, पृष्ठ क्र. व तासगाव तलाठी कार्यालयातील बोर्डावरून घेतलेली माहिती.

२२. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा, मुबई १९६० पृष्ठ २४.

२३. तासगाव परिसरातील संबंधित शेतकरी यांच्याकडून मिळालेली माहिती.

२४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २३२.

**प्रकरण दुसरे**

# तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.१ प्रस्तावना

२.२ तासगाव शहराची भौगोलिक परिस्थिती

२.२.१ तासगाव तालुक्याची भौगोलिक रचना

२.२.२ स्थान

२.३ लोकसंख्या

२.३.१ स्त्री-पुरूष प्रमाण

२.३.२ अनुसूचित जाती-जमाती प्रमाण

२.४ ऐतिहासिक तासगाव

२.५ तासगाव नावाची उत्पत्ती

२.६ अश्मयुगीन कालखंड

२.७ प्राचीन कालखंड

२.८ राष्ट्रकुट कालखंड

२.९ तासगावचा ताम्रपट

२.१० मध्ययुगीन कालखंड

२.११ पटवर्धन घराण्याचा मूळ इतिहास

२.१२ तासगाव शहरातील प्रमुख ऐतिहासिक स्थळे

२.१२.१. राजवाडा

२.१२.२. गणपती मंदिर

२.१२.३ तासगावचा ऐतिहासिक रथोत्सव

२.१३ तासगावातील राजवट

२.१४.१ स्वातंत्र्य चळवळीतील तासगाव

अ) ३ सप्टेंबर १९४२ चा तासगावचा ऐतिहासिक मोर्चा

**प्रकरण दुसरे**

# तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## २.१ प्रस्तावना

महाराष्ट्राच्या इतिहासात तासगाव शहर व संस्थानाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. १२ व्या शतकात तासगाव प्रांत देवगिरीच्या 'यादव राजा कृष्णदेवराय' यांच्या साम्राज्यात समाविष्ट होता.[१] इ. स. १३४७ मध्ये 'हसन गंगू बहामनी' याने कर्नाटकातील 'गुलबर्गा' येथे बहामनी राजवट स्थापन केली. बहामनी सत्तेचा वजीर महंमद गवानच्या काळात बहामनी सत्तेची तासगाव विभागावर सत्ता होती. या बहामनी राजवटीनेही काही काळ महाराष्ट्रावर सत्ता गाजविली. इ. स. १५२६ मध्ये बहामनी राजवटीचा शेवट होवून त्याची पाच शकले पडली, तेव्हापासून तासगाव परिसर विजापूरच्या आदिलशाही राजवटीत होता.[२]

इ. स. १७३० मध्ये कोल्हापूरच्या संभाजी राजांनी सातारच्या शाहूराजांना जी गावे देणगी दिली होती त्यापैकी एक म्हणजे तासगाव.[३] इ. स. १७५८ एक फ्रेंच विद्वान 'अँनक्वेती द्यू पेरन' यांनी तासगावचे वर्णन 'एक तटबंदी असलेले नगर की, जे मोठ्या मनोऱ्यांनी व एका खंदकाने संरक्षित आहे', असे केलेले आहे. तसेच त्याने भोवतालच्या बहारदार निसर्गाचा देखील उल्लेख केलेला आहे.[४] मराठेशाही कालखंडातील अष्टपैलू व कर्तव्यदक्ष सरदार परशुरामभाऊ पटवर्धन, यांचे वास्तव्य व कर्तव्याने पावन झालेली अशा तासगाव शहराचा नावलौकीक सर्वश्रुत आहे.

प्रस्तुत प्रकरणात तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी पहात असताना येथील भौगोलिक परिस्थिती, रचना, स्थान, लोकसंख्या, तासगाव नावाची उत्पत्ती, अश्मयुगीन कालखंड, प्राचीन कालखंड, राष्ट्रकुट कालखंड, तासगावचा ताम्रपट, मध्ययुगीन कालखंड, पटवर्धन घराण्याचा इतिहास, ब्रिटीशकालीन तासगाव, इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

## २.२ भौगोलिक परिस्थिती

## २.२.१ तासगाव तालुक्याची भौगोलिक रचना

महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात तासगाव हा तालुका आहे. महाराष्ट्र हे भारतातील तिसरे मोठे घटक राज्य आहे. सांगली जिल्हा हे दक्षिण महाराष्ट्रातील असून या जिल्ह्याच्या पूर्वेस तासगाव तालुका आहे. तासगाव तालुका हा उत्तरेकडे १६°-४५° ते १७°-१५° अक्षांश व पूर्वेकडे ७४°-२२° ते ७४°-

५५° रेखांश यांच्यामध्ये वसलेला आहे. पूर्वेस कवठेमहांकाळ, पश्चिमेस वाळवा, दक्षिणेस मिरज आणि उत्तरेस खानापूर तालुका आहे.[५]

## २.२.२ स्थान

तासगाव शहर समुद्र सपाटीपासून ५७० मीटरवर समांतर रेषेत आहे. तासगाव शहर हे उत्तरेकडे १७°-२° ते १७°-५° अक्षांश व पूर्वेकडे ७४°-३५° ते ७४°-३७° रेखांश यांच्यामध्ये वसले आहे.[६]

पूर्वी तासगाव हे दक्षिण सातारा जिल्ह्यातील एक महत्वाचे तालुक्याचे ठिकाण होते. तासगाव हे मिरजेपासून २७ कि.मी. सांगलीपासून २३ कि.मी. अंतरावर आहे. सध्या ते सांगली जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे सरकारी कचेऱ्या तसेच तालुक्याचा कारभार येथून चालतो. सध्या तासगाव तालुक्यात गावांची संख्या ६९, मंडळाची संख्या ५, मंडळ अधिकारी ५, सजा ३४, ग्रामपंचायती ६८, नगरपालिका १ अशी आहे. एकूण क्षेत्रफळ ८५,६७१.५० चौ. कि. मी. इतके आहे. तासगाव शहराजवळून कृष्णा नदी १६ कि. मी तर येरळा नदी ५ कि. मी. अंतरावरून वाहतात. नैऋत्येकडे कापूर ओढा, पुर्वेकडे तासगाव विटा रोड असून, तिथे मुख्यत्त्वे सुपीक अशी काळी कसदार जमीन आहे.


## २.३ लोकसंख्या

भारतीय जनगणना १९९१ प्रमाणे सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५,८३,५२४ झाली असून पैकी १३,२०,०८८ पुरूष व १२,६३,४३६ इतक्या स्त्रिया आहेत. तर १९८१ जनगणनेनुसार सांगली जिल्ह्याची लोकसंख्या १८,२६,१७८ इतकी होती. यापैकी तासगाव शहरात १८,६३७ लोकसंख्या शहरात वास्तव्य करीत होती. यापैकी ८१.३७% लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती. लोकसंख्येची घनता ३०१ होती. लोकसंख्येची जिल्ह्याची घनता राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे.[७] लोकसंख्येच्या बाबतीत सांगली जिल्हा महाराष्ट्र राज्यात १५ वा आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्ये पैकी सर्वात जास्त लोकसंख्या मिरज तालुक्यात (२९%) व सर्वात कमी लोकसंख्या आटपाडी तालुक्यात (५%) आहे. लोकसंख्या वाढीचा दर १९८१-१९९१ या दशकामधील २०.४५% वरून १६.८५% इतका झाला आहे. ग्रामीण भागात १४% तर शहरी भागात २६% इतका आहे.

भारतीय जनगणना १९९१ प्रमाणे तासगाव तालुक्याची लोकसंख्या ३,३९,७१० इतकी आहे. यामध्ये ३,१०,३१८ ग्रामीण भागात तर २९,३९२ शहरी भागात वास्तव्य करीत होती. तासगाव शहराची २००१ जनगणनेनुसार लोकसंख्या ३३,४५७ या मधील स्त्रिया १६,०७० व पुरूष १७,३८७,

लोकसंख्येची घनता ७७१ आहे. लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वृद्धीदर सन १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१ या दशवर्षामध्ये अनुक्रमे १५.६०, १८.६४, २१.२८, २२.७३, २४.५१, इतका आहे. लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वृद्धीदर १३.८३% इतका आहे.[८] स्त्री-पुरूष प्रमाण दर हजार पुरूषामागे ९५८ स्त्रिया, साक्षरतेचे एकूण प्रमाण ८३.८०% पैकी स्त्रिया ७५.८०%, पुरूष ९१.३०% सांगली जिल्ह्यातील घराची संख्या ५,२०,५३५ तर तासगाव शहरातील घरे ६,५९० प्रभाग १९, नगरपालिका वर्ग '**क**' आहे. नगरपालिकेचे क्षेत्रफळ ४३.४१ चौ. कि. मी. आहे. सध्या १ मार्च २०११ च्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार ४०,२३८ आहे.[९]

**तक्ता क्र. १ तासगाव शहराची सन १९११ ते २०११ अखेर जनगणना** [१०]




तक्ता क्र. १ नुसार उपलब्ध आकडेवारीवरून १९२१ ते १९३१ या दशकात लोकसंख्या वाढली नाही. कारण या कालावधीमध्ये तासगाव शहरात दुष्काळ, रोगराई व स्थलांतर इत्यादी गोष्टी कारणीभूत ठरल्या. १९३१ मध्ये लोकसंख्या कमी झालेली दिसते. कारण १९३२, १९३४ व १९३५ मध्ये तासगाव शहरात देवी, इन्फ्ल्युएंझा व प्लेगच्या साथीने तीन वेळा थैमान घातले होते. लोक गाव सोडून गेली. प्लेगच्या साथीमुळे गावच ओस पडले. शाळा तीन महिने बंद होत्या व तर तासगाव हायस्कूल दत्तमाळावर झोपडीमध्ये ४ किंवा ५ मुलांसह भरत होते.[११.] १९५१ नंतर तासगावची लोकसंख्या सातत्याने वाढलेली दिसते. कारण रोगराईचे प्रमाण कमी झाले व दवाखान्याच्या व औषधोपचाराच्या सोयी उपलब्ध झाल्याने मृत्यूचे प्रमाण कमी झाले व शहराचा विकास होऊ लागला. त्यामुळे ही लोकसंख्या वाढत गेली.

## २.३.१ स्त्री-पुरूष प्रमाण

तासगाव शहराची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३३,४५७ असून यामधील स्त्रियांचे १६,०५४ व पुरूष १७,३८१ इतके होते. स्त्री-पुरूष प्रमाण दर हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण सन १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१ या दशवर्षामध्ये अनुक्रमे ९१२, ८९३, ९१९, ९३२, ९५८, इतके होते. तसेच शहरात २०१० च्या आकडेवारीवरून शहरात एका वर्षात १६५० बालके जन्माला आली. त्या पैकी ९०७ मुले व ७४३ मुली होत्या.[१२] यावरून शहरात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. यावेळी शहरात पुरूष मृत्यूदर ५३४, तर स्त्री मृत्यूदर ६३९ इतका होता. यावरून स्त्री मृत्यूदराचे प्रमाण पुरूषाच्या तुलनेत १६.४४% इतके जास्त होते. त्यात स्त्रिया प्रसूती काळात मृत्यू पावत असल्याने त्यांच्या मृत्यूदराचे प्रमाण अधिक दिसून येते. उपरोक्त जन्मदर व मृत्यूदर या दोन्ही कारणांमुळे पुरूषाच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. स्त्रियांची संख्या कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे वंशाला दिवा पाहिजे. यासाठी मुलगा होण्याचा अट्टाहास धरला जातो. तसेच गर्भलिंग निदान चाचणी करून मुलगी जन्माला येण्याअगोदरच तिची हत्या केली जात असे. त्यामुळे स्त्री-भ्रूण हत्यामध्ये वाढ झाली तसेच अनेक स्त्रिया प्रसूतीकाळात मृत्यू पावल्या. अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. परंतु सन २००२ नंतर स्त्री-भ्रूण हत्या कायदा कडक केल्यामुळे सन २००३ मध्ये स्त्री मृत्यूदरात कमालीची घट झाल्याचे दिसून येते.

## २.३.२ अनुसूचित जाती-जमाती प्रमाण

भारतीय जनगणना १९९१ प्रमाणे सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्येच्या १२.५६% लोक अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येपैकी ७४% ग्रामीण भागात व उर्वरीत २६% शहरी भागात राहत होती. तासगाव शहरातील ६,४३२ कुटुंबापैकी दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती १७७ कुटुंबे व अल्पसंख्यांक १६७ अशी एकूण १,३१७ कुटुंबे राहत होती. तर अनुसूचित जातीचे ६.५% अनुसूचित जमातीचे ०.९% प्रमाण इतके होते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी २५.८२% होती.[१३]

## २.४ ऐतिहासिक तासगाव

तासगाव शहराची भौगोलिक परिस्थिती आपण पाहिली व आजचे त्याचे स्वरूप व विकासही पाहिला पण त्यापूर्वी ऐतिहासिक तासगाव विचारात घेणे आवश्यक आहे.

जगविख्यात तासगावची सर्कस, तालमीचे तासगाव, तमाशाचे तासगाव, कर्तव्यदक्ष सरदार परशुरामभाऊचे तासगाव, रोजगार हमी योजनेचे जनक, श्री. वि. स. पागे यांचे तासगाव, ३ सप्टेंबर

१९४२ चा तासगावचा ऐतिहासिक मोर्चा, अलिकडे द्राक्ष-बेदाण्याचे तासगाव अशा अनेक कारणांनी तासगावचा परिचय आहे.

## २.५ तासगाव नावाची उत्पत्ती

तासगाव नाव कसे पडले या नावाविषयी काही कथा पूर्वीचे जुने लोक सांगतात त्या अशा की, पूर्वीचे लोक हे घोड्यावरून प्रवास करीत, घोड्यावरून सांगली ते विटा किंवा मिरज ते विटा असा प्रवास करीत असताना घोडेस्वार विश्रांतीसाठी साधारणपणे तासभर प्रवास झाला की थांबत व तासगाव हे बरोबर मध्यावर असल्यामुळे घोडेस्वार येथे तासभर थांबून निघून जात. या तासावरून शहराला तासगाव हे नाव मिळाले.

तसेच दुसऱ्या एका कथेनुसार भिलवडी माळवाडीहून भाऊसाहेब पटवर्धन तासगावला येण्यास निघाले होते, तेव्हा माळवाडीपासून त्यांच्या बरोबर 'तास' नावाचा पक्षी आणला होता, यावरून तासगाव नाव पडले. या दोन्ही कथा शहराचे नाव कसे पडले, हे सांगणाऱ्या रंजक कथा आहेत.[१४]

## २.६ अश्मयुगीन कालखंड

सातारा जिल्ह्यामध्ये झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनातून येथे पुराश्मयुगीन मानवाचे अस्तित्व दर्शविणारे काही पुरावे उपलब्ध झाले आहेत. तत्कालीन हत्यारे सातारा जिल्ह्यात लिंब, माहुली, सोनगाव, वाई, पाचवड, आसगाव येथे मिळाली तर मध्य पुराश्मयुगीन हत्यारे चिंचनेर, लिंब, सोनगाव, कराड, टेंभू, उंब्रज, कोरेगाव, तासगाव, वाई, पाचवड येथे मिळाली आहेत.[१५]

कोल्हापूरच्या आसपासच्या परिसराचा प्राचीन इतिहास हा ब्रम्हपुरीला केलेल्या संशोधनानुसार इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून मिळतो. तासगावपासून १०० कि. मी. अंतरावर कोल्हापूर आहे. याच परिसरात चक्रेश्वरवाडी येथे शिल्पकलेच्या अगदी प्राथमिक अवस्थेत असलेले मानवी विकासाच्या टप्प्यातील पाषाणाचे अवशेष मिळतात. या पाषाणावर चित्रे कोरलेली आहेत. त्या चित्रांमध्ये मानवी चेहरे, पशुचे आकार इत्यादी पाषाणातील कलाकृतीवरून हा कालखंड अश्मयुगीन कालखंड असावा असे दिसून येते.[१६]

## २.७ प्राचीन कालखंड

प्रत्येक संस्कृतीचा इतिहास असतो. ज्याप्रमाणे सिंधू संस्कृतीमध्ये हडप्पा व मोहेंजोदडो या शहराच्या उत्खनानंतर ज्या संस्कृतीचे स्वरूप लक्षात आले, त्यातील चांगल्या संस्कृती आजदेखील

समाजात रूढ आहेत. त्याप्रमाणे तासगाव शहराचा देखील इतिहास आहे. कोणत्याही शहराच्या संस्कृती अथवा वसाहत तत्काळ विकसित होत नाहीत तर त्याला बराच कालावधी लागतो. तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास पहात असताना प्रामुख्याने वसाहतकाळ पाहणे आवश्यक ठरते.

तासगावच्या वसाहतकाळाचा विचार करत असताना वसाहत काळामध्ये तासगाव शहराचा उल्लेख असणे शक्य नाही. मात्र महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो. वसाहतकाळामध्ये तासगावात कोण कोणत्या गोष्टी होत्या, याचा अभ्यास केल्याशिवाय सध्याचा विकास कसा झाला हे सांगता येणार नाही.

महाराष्ट्रात प्रथम द्रविड लोक आले त्यानंतर आर्यही आले. सुरूवातीच्या काळामध्ये त्यांच्यात भांडणे झाली मात्र कालांतराने त्यांच्यात समेट घडून आला. आर्य समाजातील लोकांच्यामध्ये तरूणांची संख्या जास्त होती. त्यांचे द्रविडीयन रोटी-बेटी व्यवहार झाले. नंतर आर्य व द्रविडीयन संस्कृती एकत्र येऊन चाली-रिती व रूढी-परंपरा बनल्या. त्यामध्ये नागपूजा, नागपंचमीचा सण, हातातील काचेच्या बांगड्या आणि कपाळाला कुंकू लावणे या चाली-रिती द्रविडीयन आहेत. तसेच आर्य स्त्रिया कपाळाला कुंकू न लावता भांगात शेंदूर किंवा कुंकू भरतात, या संस्कृती आजही तासगावात दिसून येतात. तासगाव शहरात स्त्रियांचा वर्ग या गोष्टीचे अनुकरण करताना दिसतो. तसेच द्रविडीयांचे दैवत महादेव वाहन बैल तर आर्यांचे दैवत विष्णू व वाहन घोडा यांचे वंशज आजही तासगाव शहरात आहेत.[१७] कारण महादेवाच्या पूजेला या ठिकाणी महत्त्व आहे. त्याचा प्रत्यय दरवर्षी जाणवतो. श्रावण महिन्यात दर सोमवारी तासगाव परिसरात कवठेएकंद या गावी मोठी यात्रा भरते व औदुंबर येथेही महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. तेथे अनेक ठिकाणचे भाविक मोठ्या भक्तीभावाने येऊन आपली हजेरी लावतात. तसेच शंकराचा पुत्र स्कंद-स्कंध-खंड खंडोबा हे दैवत द्रविडीयन होय.[१८] हा कुलदैवत असणारा समाज तासगाव शहरात आहे. तासगावचे ग्रामदैवत सिद्धेश्वर हे शंकराचेच रूप आहे.

म्हणजेच वसाहतकालीन काही वसाहती तासगाव शहरात असाव्यात यात काही शंका नाही. प्रत्यक्ष त्या काळातील पुरावे सापडले नसले तरी समाजातील काही रूढी-परंपरा यांच्या आधारे त्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे रामायणातील अहिल्याचा उद्धार ही कथा सर्वांनाच माहीत आहे. त्यामध्ये श्रीरामाने अहिल्याचा उद्धार केला. यामध्ये हल म्हणजे नांगर, हल्या म्हणजे नांगरलेली. अहल्या म्हणजे बिन नांगरलेली. थोडक्यात श्रीरामचंद्राने आहिल्येचा उद्धार केला म्हणजेच पडीक जमीन लागवडीखाली आणली व वसाहती निर्माण केल्या. डॉ. के. ल. दप्तरी यांच्या मते श्रीरामचंद्राचा जन्म इ. स. पूर्व १६०९ साली झाला. ते २५ व्या वर्षी वनवासाला गेले. यावरून महाराष्ट्राचा वसाहतकाळ इ.स. पूर्व दीड हजार वर्षाच्या अगोदरचा आढळतो.[१९]

गोदावरी, कृष्णा, नर्मदा या नद्यांची नावे पुराणातून अनेक ठिकाणी आलेली आहेत. यामध्ये रामायण महाभारतातील वनपर्वात गोदावरी, महाभारत सभापर्वात कृष्णेचा आणि शतपत ब्राम्हण, ब्रम्हपुराण, मत्स्यपुराण, सप्तशती व अमरकोश या ग्रंथात नर्मदेचा उल्लेख आढळतो.[२०] बौद्धवंशात महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो. वराहमिहीराच्या बृहत संहितेत महाराष्ट्रीय लोकांची माहिती आहे. कामशास्त्रात महाराष्ट्रीयन स्त्रियांची माहिती असून वरूचीच्या व्याकरणात महाराष्ट्रीय भाषेस प्राधान्य देण्यात आलेले आहे. ऐतदेशीय ब्राम्हणात आंध्र, पंडू, शबर ही दक्षिणात्यांची नावे आढळतात. 'बृहदारण्यकोष' निषदात आचार्य, विदर्भ, कौंडिण्य ऋषीची माहिती मिळते. यक्ष निरूक्तात मराठी भागास दक्षिणा पथ किंवा दक्षिण देश यात वऱ्हाड मध्य प्रांत व विशेषत: आजचा महाराष्ट्र असा अर्थ अभिप्रेत असावा.

इ. स. पूर्व ६३४ मध्ये तासगाव परिसराचा संदर्भ आढळतो. या शिलालेखात राष्ट्राचे तीन भाग दिलेले आहेत. त्यात कुंतल देश आहे. राजशेखर कवीच्या बाल रामायणात कुंतल देशात श्री रामचंद्र फिरल्याचे नमूद केले आहे.[२१] आता हा कुंतल हा देश म्हणजे कृष्णा नदीच्या परिसरातील भाग या कृष्णेच्या खोऱ्यात तासगावचा परिसर येतो. यावरून तासगाव शहराची वसाहत रामकाळात होती हे सिद्ध होते. रामायण काळात या भागाला अंबिका प्रांत असे नाव असावे. या अंबिका प्रांताचाच वेदोप निषत्काली म्हणजे इ. स. पूर्व १५०० साली शंकराने जालंदर नावाच्या राक्षसाचा वध केला. मरतेवेळी जालंदराने समुद्र स्नान घडावे असा वर मागितला होता. त्याप्रमाणे देवराष्ट्र येथील शंकराच्या पिंडीतून एक पाण्याचा प्रवाह निर्माण झाला. या शंकराच्या स्थानास समुद्रेश्वर म्हणजेच सागरेश्वर नाव पडले.[२२] याच पाण्याच्या प्रवाहाला निर्मल तीर्थ असे संबोधले जात. हे महादेवाचे जागृत देवस्थान मानले जाते. सांगली जिल्ह्यातील प्रसिद्ध अभयारण्य 'सागरेश्वर' या ठिकाणी मोठी यात्रा भरते. भाविक मोठ्या प्रमाणात त्याठिकाणी जातात. हे अभयारण्य प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे. आता हा भाग तासगाव परिसरातच येतो.

वैदिक संस्कृतीमध्ये वेदांचे व कर्मकांडाचे महत्त्व वाढल्याने जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला.[२३] सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्विकारला याबद्दल सांगण्यात येणारी कथा बिंदूसारच्या मृत्यूनंतर अशोकाच्या ताब्यात फार मोठे साम्राज्य आले. साम्राज्य विस्तार करत असताना गोदावरी आणि महानदी यांच्या दरम्यान कलिंग नावाचे एक स्वतंत्र राज्य होते.[२४] या ठिकाणचे लोक पराक्रमी व स्वातंत्र्यप्रेमी होते. त्यांनी आपल्या राज्यामध्ये कोणाचा शिरकाव होऊ दिला नाही. मात्र सम्राट अशोकाने इ. स. पूर्व २६१ मध्ये तयारीनिशी हल्ला केला. यामध्ये अशोकाचा विजय झाला. परंतु यामध्ये प्रचंड रक्तपात झाला. हे दृश्य पाहून अशोकाच्या मनात परिवर्तन घडून आले. त्याने बौद्ध धर्म स्विकारला. या बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी तो महाराष्ट्रात येऊन गेला. तो बौद्ध धर्माचा पुरस्कर्ता असला तरी तो मौर्यवंशी होता.[२५] त्याचे

राज्य म्हैसूर सोडून भारतात सर्वत्र पसरले होते. महाराष्ट्र देशही त्या राज्यात होता. महाराष्ट्राची राजधानी पैठण होती. कृष्णा-भीमा नदीच्या परिसरात अंबिका प्रांत होता. यामध्ये अशोकाचे राज्य होते. यावरून वेदकाळात असणारा तासगाव व देवराष्ट्राचा भाग हा सम्राट अशोकाच्या साम्राराज्याचा भाग होता असे दिसून येते.

अशोकानंतर दक्षिण भारतातील महाराष्ट्र स्वतंत्र झाला. इ. स. पहिल्या शतकात महाराष्ट्रात दीपकर्ण नावाचा राजा सातारा भागात शिकारीस गेल्यावर सात डोंगराच्या भागात त्याला सात नावाच्या एका सिंह पुरूषाने एक स्वत: जतन केलेला मुलगा दिला. हा मुलगा सात सिंहावर आरूढ होत असे. म्हणून त्याला ‘सातवाहन’ असे नाव पडले.[२६] या सातवाहन राजाला दीपकर्णीच्या सातारा भागातील राज्याचा वारसा मिळाला. त्याची राजधानी पैठण होती. नाशिकपासून बंगालच्या उपसागरापर्यंत त्यांच्या राज्याचा विस्तार होता. देवराष्ट्रे तासगाव भाग सातवाहनांच्या राज्यात मोडत असल्याने इ. स. ३०० पर्यंतच्या काळात ‘सातवाहन’ हे तासगाव व विटा शहराचे राजे होते.

## २.८ राष्ट्रकुट कालखंड (इ.स. ७५४ ते ९७३)

सातवाहनानंतर दोन शतके इ. स. ४ थ्या शतकापासून ते सहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मानूरच्या राष्ट्रकुट घराण्यांनी दक्षिण महाराष्ट्रावर राज्य केले. तसे पाहिले तर राष्ट्रकूट घराणे मूळचे माणदेशाचे. सातव्या शतकात कुंतल देशावर राष्ट्रकुटांची सत्ता होती. त्याची राजधानी मानूर होती. हे मानूर मध्य प्रदेशातील नसून महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील ‘माण’ हेच आहे. हे नवसंशोधनात सिद्ध झाले आहे.[२७] त्या ठिकाणी मानांक राजा राज्य करीत होता. मानपूरच्या मानांकाचा नातू देवराज याला अवंतीच्या विक्रमादित्याची मुलगी दिली होती. त्यामुळे विक्रमादित्याचा वकील म्हणून कविकुलगुरू कालिदास हा मान्यांचेकडे माणपूरला (म्हसवड) आला होता. आता म्हसवड हा भाग तासगावच्या पूर्वेस आहे.

यानंतर विष्णू कुंडण, बदामीचे चालुक्य यांनी येथे सत्ता गाजविली. कराड या ठिकाणी चालुक्य राजा विजयादित्या यांच्या सासऱ्याचे वास्तव्य होते, अशी नोंद अमनापूर प्रशस्तीतून मिळते. इ. स. ७०३ मध्ये कराडजवळील एका शाण्डिल्यगोत्री नाथेर नामक ब्राह्मणास दिलेल्या दानाची नोंद उपलब्ध आहे. राष्ट्रकूट घराण्यातील दंतिदुर्ग हा पराक्रमी राजा होता. त्यानंतर राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याने इ. स. ७६८ मध्ये सुर्यग्रहणाच्या निमित्ताने अनेक गावे दान दिल्याची नोंद उपलब्ध आहे. तसेच त्याने बदामी चालुक्याची राजधानी जिंकून घेतली व कर्नाटक, आंध्र प्रदेशाचा काही भाग राज्यात समाविष्ट केला.[२८] त्यानंतर आलेला तिसरा गोविंद याची कारकीर्द कनोजपासून रामेश्वर पर्यंत पसरली. त्याचा मुलगा अमोघ वर्ष याने सोलापूर जवळ मालखेड हे नवे नगर वसविले. सातवाहन कालीन नाणी व पोहाळे, तसेच

राष्ट्रकूट राजा तृतीय कृष्ण याचे कराड व सांगली येथील दोन ताम्रपटही उपलब्ध आहेत. येथे सापडलेल्या ताम्रपटावरून राष्ट्रकुटांची सत्ता तासगाव भागावर होती असे दिसते.[२९]

तसेच या भागाशी कल्याणचे चालुक्य, कलचुरी, शिलाहार, देवगिरीचे यादव कमी अधिक प्रमाणात संबंधित राहिले आहेत. अभिलेखीय नोंद तसेच बिल्हणच्या 'विक्रमांकदेव चरित्रातून' तत्कालीन माहिती मिळते. म्हणजेच त्याकाळात तासगाव शहराचे अस्तित्व नाकारता येत नाही.[३०]

## २.९ तासगावचा ताम्रपट

ताम्रपट हा आलेखाचा एक प्रकार आहे. मुळात ही दानपत्रे आहेत. प्राचीन काळी अनेक सम्राट, व्यक्ती व धर्म संस्था दानधर्म करीत. दिलेल्या दानाची माहिती तांब्याच्या पत्र्यावर कोरून प्रशस्तीरूपाने (सनद) देण्याची पद्धत होती, अशा दानपत्रांनाच ताम्रपट म्हणत. त्यावर अनेक प्रकारच्या मजकूराची नोंद ठेवत असत. तासगावमधील पुरातन इतिहास संशोधक श्री. वि. दि. लिमये, जोग वकील, श्री. बा. त्र्य. आपटे, श्री. ग. ह. खरे यांनी सन १९३४ मध्ये हा ताम्रपट शोधून काढला.

हा ताम्रपट नक्की कुठून आणि कसा शोधून काढला याचा पुरावा जरी उपलब्ध नसला तरी या ताम्रपटावर असलेल्या तासगावच्या काही भागाचा उल्लेख लक्षात घेता हा ताम्रपट तासगावचा असल्याचा दावा काही संशोधक करतात.[३१]

तासगावचा ताम्रपट हा देवनागरी लिपित असून अक्षरांचे वळण १२-१३ व्या शतकातील नागरी अक्षरांचे वळण आहे. या ताम्रपटावरील कलाविषयीच्या पहिल्या दोन ओळीवरून हा माघ वद्ध चतुदशी, शके ११७२ इ. स. १२५१ या दिवशी कोरला असल्याचा उल्लेख आहे. त्या काळी यादव कुलातील 'भिल्लम' यांनी बांधलेल्या सुरगिरी प्रांतात तासगावचा समावेश असल्याचा संदर्भ आहे. हा ताम्रपट 'चंद्रकेशवकृत' मंजरवाडे म्हणजे सध्याचे तासगाव तालुक्यातील 'मांजर्डे' या गावाच्या व्यवस्थापनाबद्दल उल्लेख नोंदविण्यासाठी कोरला गेला असल्याची माहिती आहे. या ताम्रपटामध्ये 'गोवरू' म्हणजे सध्याचे गौरगाव, 'बालगवाड' म्हणजे सध्याचे 'बलगवडे', हाधिनौर आणि पेढ म्हणजेच सध्याचे हातनूर आणि पेड अशा गावांचा उल्लेख आढळतो.[३२]

यादवांचा मांडलिक 'चंद्र आणि केशव' यांनी बांधलेल्या कलिदेवाच्या पूजेसाठी अष्टांग भोगासाठी मांजर्डे हे गाव दान दिल्याबद्दलचा आशय या ताम्रपटावर नमूद आहे. वरील आशयावरून 'मांजर्डे' हे गाव तत्कालीन अष्टांग भोगपूजक कांतबाहू, नरसिंगभट्ट, आण्णाभट्ट, गंगाधरभट्ट, महादेवभट्ट, गोविंदभट्ट, विष्णूभट्ट आणि लाखाणभट्ट अशा आठ ब्राह्मणांना दान दिले असल्याबद्दलचा उल्लेख आढळतो.[३३]

तासगावची प्रारंभीची नगर रचना किंवा लोकांचे राहणीमान कसे असावे या संदर्भात अधिकृत ताम्रपट किंवा शिलालेख उपलब्ध नसला तरी सुरूवातीपासून ते आत्तापर्यत बदलत्या सामाजिक प्रवृत्तीशी मात्र इथला समाज नेहमी बदलत राहिलेला आहे हे दिसून येते.

## २.१० मध्ययुगीन कालखंड

१२ व्या शतकात तासगाव देवगिरीच्या यादव साम्राज्यात समाविष्ट होते. इ. स. १२२४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी हा सुलतान दक्षिणेमध्ये आला. इ. स. १३३७ अल्लाउद्दीन खिलजीचा मुलगा 'मुबारक' याने देवगिरीचे साम्राज्य नष्ट केले. तिथून दक्षिण महाराष्ट्राचा भाग सुलतानी अधिपत्याखाली गेला. त्यानंतर इ. स. १३४७ मध्ये 'हसन गंगू बहामनी' याने कर्नाटकातील गुलबर्गा येथे बहामनी राजवट स्थापन केली. बहामनी सत्तेचा वजीर महंमद गवानच्या काळात बहामनी सत्तेची तासगाव विभागावर सत्ता होती. या बहामनी राजवटीनेही काही काळ महाराष्ट्रावर सत्ता गाजविली.[३४]

इ. स. १५२६ मध्ये बहामनी राजवटीचा शेवट होवून त्याची पाच शकले पडली. त्यामध्ये विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, अहमदनगरची निजामशाही, बिदरची बरीदशाही, आणि वऱ्हाडची इमादशाही या राजवटीने १९७ वर्षे राज्यकारभार केला. यामध्ये महाराष्ट्राचा बराच भाग विजापूरच्या आदिलशाहीच्या अधिपत्याखाली होता. इ. स. १६८६ मध्ये मोगलबादशाहा औरंगजेबने विजापूरची आदिलशाही ताब्यात घेतली. आदिलशाही नंतर तासगाव मोघल साम्राज्याच्या अधिपत्याखाली आले. कारण ऐतिहासिक संदर्भानुसार औरंगजेबाच्या छावणीचे तळ तासगाव पासून मिरजेपर्यत होते.[३५]

सुमारे ४००-४५० वर्षाच्या इस्लामी राजवटीमधून सुटका करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य पश्चिम महाराष्ट्रावर स्थापन केले. छत्रपती शिवाजी महाराजानंतर छत्रपती संभाजी, मराठ्यांचे राजा झाले. मोघल बादशहा औरंगजेबाने संभाजी राजेंना पकडून ठार मारले. त्यानंतर काही काळ राजाराम १६८९ ते १७०० मराठी राज्याचे प्रमुख झाले. राजारामाच्या निधनानंतर (१७००) स्वातंत्र्य लढा ताराबाईने चालू ठेवला. इ. स. १७०७ मध्ये मोघल बादशाहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजीपुत्र शाहूंची मोघलाच्या कैदेतून सुटका झाली व मराठ्यांची दोन राज्ये १) कोल्हापूर २) सातारा अस्तित्त्वात आली. पुढे शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्या संघर्षातून शाहू महाराज सातारच्या गादीवर छत्रपती झाल्यानंतर हा परगणा शाहू महाराजांकडे आला. इ.स. १७१० साली शाहूनी कराड प्रांत राजश्री परशुराम पंडीत प्रतिनिधी यांना दिला.[३६]

छत्रपती शाहूंनी १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांची पेशवापदी नेमणूक केली व मराठ्यांच्या इतिहासाला एक कलाटणी मिळणारी घटना घडली. कारण पेशवेपद हे येथून पुढे (१७१३) बाळाजी

विश्वनाथाच्या घराण्यात अनुवंशिकपणाने शेवटपर्यंत (१८१८) चालू राहिले. बाळाजी विश्वनाथानंतर त्याचा मुलगा पहिला बाजीराव (१७२०), नंतर बाळाजी बाजीराव (१७४०),माधवराव पेशवे (१७६१), नारायणराव (१७७२), सवाई माधवराव (१७७४), दुसरा बाजीराव (१७९५) असे पेशवे झाले.

छत्रपती शाहूंच्या निधनानंतर (१७४९) साताऱ्याचे महत्त्व कमी झाले व पेशव्यांचे मुख्य ठिकाण पुणे याचे महत्त्व वाढू लागले. १८ व्या शतकात पहिल्या बाजीरावाने, नानासाहेब व माधवरावाने उत्तरेत व दक्षिणेत मराठी सत्तेचा प्रसार केला. हा मराठी राज्यांचा जो विस्तार झाला, त्यात अनेक लहान मोठे सरदार उपयोगी पडले. उत्तरेत होळकर, शिंदे, गायकवाड व पवार यांनी मराठी राज्याचा विस्तार करून आपले वर्चस्व उत्तर भारतात निर्माण केले. तर दक्षिण भारतात मराठी राज्य विस्तार करण्यास जबाबदार म्हणजे घोरपडे, देसाई व पटवर्धन सरदार होते.

## २.११ पटवर्धन घराण्याचा मुळ इतिहास

पटवर्धन घराणे हे मुळचे कोकणातील असले तरी त्याने देशावर विशेषतः माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत अनेक पराक्रम गाजविले व पेशव्यांनी पटवर्धनांना अनेक जहागिरी दिल्या व पटवर्धन दक्षिण भारतात एक विश्वासू सरदार बनले. त्यांच्या पराक्रमाने उत्तरेकडे मराठेशाहीचा अंमल दिल्लीपर्यंत तर दक्षिणेकडे श्रीरंगपट्टणपर्यंत होता. त्याचे श्रेय पटवर्धन सरदार याना जाते.

वारणेचा तह १७३१ ला कोल्हापूरचे छत्रपती व सातारा छत्रपती यांच्यात झाला. दोन्ही राज्याच्या सीमा निश्चित झाल्या. कर्नाटकात पेशव्यानी ज्या मोहिमा केल्या, त्यात पटवर्धन सरदारांचा वाटा मोठा होता. तसेच शाहूंच्या कारकीर्दीत ज्या चित्पावनांनी पोटाकरिता देशसेवेचा मार्ग स्विकारला त्यापैकी पटवर्धन सरदार हे एक होते. पटवर्धन हे मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील 'कोतवडे' गावचे होते. 'कोतवडे' हे रत्नागिरीपासून सुमारे अडीच कोस आहे.[३७] त्या घराण्याचा मुळ पुरूष 'हरभट' पटवर्धन होता. हरभट पटवर्धन हे उत्तम वैदिक ब्राह्मण होते. हरभटजी आपल्या बालपनानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे येथे आले. तेथे बारा वर्षाच्या वास्तव्यानंतर त्यांना जीवनाचा व यशाचा ईश्वरी आत्मविश्वास मिळाला.[३८] तेथेच पुरोहीत शेंडेंच्या मुलीबरोबर ते विवाहबद्ध झाले. नंतर ते कोकण सोडून देशावर १७०० च्या आसपास आले असावेत.[३९] पुढे ते देशावर नारायण महादेव जोशी (इचलकरंजीचे घोरपडे) यांचे पुरोहित म्हणून राहिले. नारायण महादेव यांचा मुलगा व्यंकटेश घोरपडे हा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथांचा जावई झाला. तेथून पुढे पेशव्यांच्या दरबारात पटवर्धनांचा हस्तक्षेप सुरू झाला. नंतर ते पेशव्यांचे विश्वासू सरदार बनले. हरभटजींच्या सात मुलापैकी गोविंदपंत, रामचंद्रपंत व त्रिंबकपंत हे स्वकर्तृत्वाने प्रसिद्धीस आला.

या घराण्यात रामचंद्र हरीच्या पोटी पराक्रमी परशुरामभाऊचा जन्म झाला. हा पराक्रम १७५७ ते १७९९ गाजवून त्यांनी कोल्हापूरकरांविरूद्ध जसे युद्ध केले तसेच पेशव्यांच्या कर्नाटक मोहिमेत परशुरामभाऊनी हिरीरीने भाग घेऊन महत्त्वाची कामगिरी केली. परशुरामभाऊनी टिपू सुलतान विरूद्ध मोहिमेत भाग घेतला.[४०] तसेच १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत पेशव्यांचा एक बलाढ्य सरदार व सेनापती म्हणून हजर होता. परंतु पुढे कोल्हापूर आणि पटवर्धन सरदार यांचे संबध बिघडत जावून त्याची परिणीती पट्टणकुडीच्या (१७९९) लढाईत झाली. ही लढाई करवीर छत्रपती शिवाजी दुसरे (१७६२ ते १८१३) व परशुरामभाऊ यांच्यात लढली गेली व परशुरामभाऊंचा पराभव होऊन त्यात ते मारले गेले.[४१]

थोडक्यात उत्तर पेशवाईत जी पराक्रमी माणसे झाली त्यात परशुरामभाऊंची प्रामुख्याने गणना केली पाहिजे. महादजी शिंदे, नाना फडणीस, हरिपंत फडके हे चार थोर पुरूष उत्तर पेशवाईत मराठ्यांना लाभल्यामुळे पानिपतच्या अपयशानंतर मराठे पुन्हा प्रबळ झाले व इंग्रजासारख्या जहांबाज लोकांचेही मराठ्यांच्या पुढे काही चालले नाही. परशुरामभाऊ हे उपजत लढाऊ वृत्तीचे होते. शौर्य, धैर्य आणि साहस हे भाऊंचे प्रमुख गुण होते. वयाच्या १४ व्या वर्षी भाऊ रणांगणावर उभे राहिले ते वयाच्या साठ वर्षापर्यत सारखे रणांगणावरच वावरत होते.[४२]

खर्ड्याच्या लढाईत तर परशुरामभाऊ पेशव्याचे मुख्य सेनापती होते. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर जो पेशवाईत गोधळ माजला त्यात भाऊना राजकारणात लक्ष घालावे लागले. परशुरामभाऊचे व दुसऱ्या बाजीरावाचे संबंध चांगले नव्हते. परंतु नाना फडणीसांचा सर्वभार हा परशुरामभाऊंच्यावरच होता. नाना म्हणतील ती कामगिरी भाऊ वठवीत होते.

परशुरामभाऊ शुर योद्धा व मुत्सद्दी म्हणूनच परिचित नव्हते तर त्यांनी आपल्या जहागिरीत अनेक लोकोपयोगी कामे केलेली होती. परशुरामभाऊ हे धार्मिक वृत्तीचे होते. गणपतीपुळे व राजापूरची गंगा ह्या ठिकाणी भाऊ नेहमी जात असत. अतित, वेदिक, अभ्यागत, पुराणिक यांचे ते उपासक होते. विद्वान व पूज्य अशा शास्त्री पंडीतास व वैदिकास भाऊंनी इनामे व वर्षासने दिली होती. देवालय बांधणे त्यांना देणग्या देणे इ. कामे ते करीत. त्यापैकी श्रीकाशी क्षेत्री शिवालय बांधले व लक्ष ब्राम्हणास इच्छा भोजन घातले व तिथे भाऊंनी वाडाही बांधला.[४३]

पंढरपूर येथे भाऊंनी पांडुरंगाचा सभा मंडप, श्री मारूतीचे देवालय व नगारखान्याकरीता कमान बांधली. श्री अमृतेश्वर देवालयाचा जिर्णोद्धार केला. या क्षेत्रीही भाऊंनी श्री विठ्ठल मंदिराचा वाडा बांधला व तेथे आल्या गेलेल्यांची सोय करण्यासाठी अन्नछत्र सुरू केले. पुणे व तांबे येथे गोदावरीच्या काठी शिवालय, घाट व वाडा बांधला आणि गावकुस केले. परशुरामभाऊचा रहावयाचे गाव तासगाव शेजारी भिलवडी येथे श्री कृष्णा माईवर मोठा घाट बांधला. तासगाव मधील हटकेश्वर देवळाचा जिर्णोद्धार केला.

चिंचणी येथे भाऊंनी परशुरामेश्वराचे देवालय बांधले व चिंचणी गावाजवळ मोठे धरण बांधले आणि जमखंडी येथे मोठा किल्ला बांधला. असा हा शूर मराठा सरदार तासगाव संस्थानात होऊन गेला. परशुरामभाऊचा पराक्रम पाहून पेशव्याकडून त्यांना जहागिरी मिळाल्या. या जहागिरीची कालांतराने भावाभावात वाटण्या होऊन कुरूंदवाड, सांगली, मिरज, जमखंडी, तासगाव इत्यादी संस्थाने (शाखा) निर्माण झाली.

परशुरामभाऊच्या निधनानंतर तासगावची जहागिरी फार काळ टिकली नाही. कारण पुढे तेथे भाऊबंदकी व आर्थिक गोंधळ माजला. त्यामुळे ब्रिटीश साम्राज्याने १८४८ मध्ये दत्तक वारस नामंजूर म्हणून तासगाव संस्थान खालसा केले.[४४]

या सर्व शाखेत तासगाव शाखेस अनन्य साधारण महत्व होते. कारण तासगाव शाखेत मराठा इतिहासातील पराक्रमी पुरूष परशुरामभाऊ होऊन गेला. तासगाव जहागिरीचे प्रमुख ठिकाण असून सध्या ते सांगली जिल्ह्यातील तालुक्याचे प्रमुख ठिकाण आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात या शहराला अनन्य साधारण महत्त्व होते. कारण तासगावला परशुरामभाऊचे वास्तव्य असल्याने चंदनी राजवाडा बांधलेला होता व तासगावातच भाऊंचे वास्तव्य असे.[४५] पटवर्धनांच्या अगोदर तासगाव येथे आदिलशाहाचे नोकर धुळगावचे डुबल हे तासगावमधील राजवाड्यात राहात होते.

## २.१२ तासगाव शहरातील प्रमुख ऐतिहासिक व धामिक स्थळे

### २.१२.१ राजवाडा

मिरज येथील भुईकोट किल्ला पूर्वी आदिलशाहीतील एका सरदाराने बांधला होता. त्याप्रमाणे आदिलशाही कारकीर्दीतच म्हणजे इ. स. १४५० रोजी तासगाव येथील तटबंदी व वाडा बांधला होता.[४६] हा वाडा तासगाव शहराच्या बरोबर मध्यावर आहे. हा चौकोनी आकाराचा असून (लांबी ३६० मी. व रूंदी ३६० मी.) त्याच्या भोवतालचा तट, १० मीटर रूंदी, २० मीटर उंची आहे.[४७] सध्या तो नामशेष झाला आहे.

या वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार हे उत्तरेकडील तटाच्या मध्यभागी आहे. आजही या वाड्याचा वरचा भाग अगदी लांबून सहज दिसतो. वाड्याच्या भोवताली मातीचे बुरूजासह तट विशेष उंच बांधले आहेत. वाड्याच्या उत्तर दरवाजाला दिल्ली दरवाजा म्हणून ओळखले जाते. पूर्वीपासून भाऊंनी हा दरवाजा बंद करून, पूर्व दरवाजा बांधला. विद्यमान भाऊंचे वंशज श्रीमंत बाबासाहेब यांनी बंद असलेला उत्तर दरवाजा पुन्हा ता. ३१ डिसेंबर १९१५ रोजी सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी उघडून याच दरवाजाने जाण्या-

येण्याचा परिपाठ चालू केला.[४८] उत्तर दरवाजाची उंची २६ फूट व रूंदी ११ फूट आहे. पूर्व दरवाजाची उंची २६ फूट व रूंदी १० फूट आहे. उत्तर दरवाजाचे काम विशेष मजबूत व चिरेबंदी केलेले आहे. वाड्याची लांबी ४१२ व रूंदी ३५७ आहे.[४९] वाड्यातील विशेष महत्त्वाची जागा म्हणजे तिसऱ्या मजल्यावरील बारद्वारी होय. बारद्वारी म्हणजे प्रत्येक दिशेस तीन खिडक्या या प्रमाणे चारी दिशास खिडक्या आहेत. ही जागा भाऊंची खलबते (महत्त्वाची चर्चा) करण्याची होय. या बारद्वारीत बसले असता आसपासचा सर्व प्रदेश दृष्टीस पडतो. वाड्याच्या लगत पटवर्धनाचे आप्तस्वकीय व पदरचे लोक यांचे वाडे आहेत. वाड्याच्या पूर्व अंगास परशुरामभाऊनी आपले उपास्य दैवत श्री गजानन व त्याचे पंचायत यांचे बांधलेले विशाल देवालय आहे.

## २.१२.२ गणपती मंदिर

परशुरामभाऊनी तासगाव येथे धामधुमीच्या काळातही चिरस्मरणीय अशा गोष्टी केल्या आहेत. श्री गणपती पंचायतीचे दगडी देवालय, त्या समोरील गोपूर व त्या गोपूराची सात मजली इमारत बांधली आहे. ही तर फारच प्रेक्षणीय आहे. गणपती मंदिर हे तासगाव शहरातील प्रसिद्ध मंदीर आहे. या मंदिराच्या बांधकामाची सुरूवात सन १७७९ साली परशुरामभाऊ पटवर्धनांनी केली व त्याच साली 'श्री गणपतीची प्राणप्रतिष्ठापना' केली व ते १७९९ साली म्हणजे परशुरामभाऊ पटवर्धनाच्या मृत्यूनंतर ते पूर्ण झाले.[५०]

या मंदिराच्या गाभ्याची लांबी ३१ मीटर व रूंदी २९ मीटर असून सभा मंडपाची लांबी व रूंदी अनुक्रमे ४३ व ३४ मीटर आहे. मंदिराचे शिखर ३४ मीटर उंच आहे. भिंतीचा तट आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील प्रशस्त हॉलमध्ये नगारखाना आहे. या मंदिराच्या दुसऱ्या प्रवेशद्वाराजवळ 'भारतीय दाक्षिणात्य हेमाडपंथीय शिल्पकले'च्या पद्धतीने गोपूर बांधलेले असून वास्तूशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. या गोपूराला सात दगडांचे थर असून ते ९५.५ मीटर उंच आहे.[५१] त्यामुळे गोपूर हे शहरातील प्रमुख आकर्षण आहे. गोपूराच्या वरच्या टोकावरून संपूर्ण तासगाव शहर व त्याच्या आजूबाजूचा परिसर सहज दिसू शकतो. या मंदिराचे गोपूर हे महाराष्ट्रातील एकमेव गोपूर म्हणून ओळखले जाते. असेच एक बांधकाम त्यांनी कर्नाटकात 'गदग' येथे केले आहे. तसेच गणपती मंदिरात पंचायत आहे. ही पंचायत म्हणजे इतर पाच देवांच्या मूर्तीची केलेली प्राणप्रतिष्ठापना होय.

या बांधकामाला जवळजवळ आठ वर्षे लागली. त्यासाठी त्यांनी राजस्थानातून खास कारागीर (गवंडी) आणले होते.[५२] मंदिराचे बांधकाम इतके सुबक आणि सुरेख आहे की, मंदिरात पाऊल ठेवताच एकेक वस्तूकडे पाहिले असता धीरगंभीरपणा, शांतपणा, भव्यता दिसून येते. यावरून परशुरामभाऊचे व्यक्तिमत्त्व दिसून येते.

## २.१२.३ तासगावचा ऐतिहासिक रथोत्सव

तासगावचा ऐतिहासिक 'रथोत्सव' वर्षातून एकदा 'भाद्रपद शुद्ध पंचमीला' येतो. या उत्सवाने सामाजिक समतेचा वारसा व २३२ वर्षाची परंपरा आजही कायम टिकून ठेवली आहे. लोकमान्य टिळकांनी १८८५ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. त्यापूर्वी १०६ वर्षे अगोदर सर्वार्थाने सार्वजनिक असलेला असा हा 'तासगावचा गणेशोत्सव' होय.

थोरल्या माधवराव पेशव्याचे सरसेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तासगाव येथे फाल्गुन शुद्ध शके १७०१ या दिवशी सिद्धीविनायकाची प्राणप्रतिष्ठापना केली. त्यानंतर अनेक कलाकार व कारागिराच्या परिश्रमातून १७७९ मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले. या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी असून वास्तूशास्त्राचा उत्तम नमुना आहे. गणेश मंदिराच्यासमोर अर्धा किलोमीटर अंतरावर काशी विश्वेश्वराचे मंदिर आहे. सूर्य उत्तरायणातून दक्षिणायनात जाताना काशी विश्वेश्वर मंदिराच्या खिडकीतून त्याची किरणे मंदिरातील मुर्तीवर पडतात. यावरून तत्कालीन वास्तुशास्त्राच्या प्रचंड कल्पकतेची प्रचिती येते.[५३]

दक्षिण हिंदुस्थानात रूजलेली रथयात्रेची कल्पना परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तासगावला आणली. या उत्सवात भक्तांनी ओढण्याचा तीन मजली, तीस फूट उंचीचा रथ तयार करण्यात आला. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून श्रींच्या वार्षिक उत्सवास सुरूवात होते. रथोत्सवाच्यावेळी रथात पटवर्धन वाड्यातील पंचधातुची १२१ किलो वजनाची मूर्ती ठेवली जाते. रथावर श्रींचे पुजारी शागीर्द चौरीवाले, अब्दागिरीवाले असे बारा बलुतेदारी मानकरी बसतात. या रथोत्सवात गौरी हत्तीण सहभागी असते. मिरवणुकीने गणपती शंकरास काशी विश्वेश्वराचे मंदिरापर्यंत भेटण्यासाठी रथातून जातात.

भेटीनंतर रथ पुन्हा गणपती मंदिरापर्यंत आणला जातो. त्यानंतर महापूजा, प्रसाद वाटप होऊन विसर्जन केले जाते. या उत्सवाच्या वेळी देशभरातून मोठ्या भक्तीभावाने भाविक आपली हजेरी लावतात. गणपती पंचायत तर्फे उत्सवाचे नियोजन केले जाते.[५४]

तसेच आणखी काही धार्मिक मंदिरे तासगावमध्ये आहेत. सिद्धेश्वर मंदिर, काशी विश्वेश्वर मंदिर, हटकेश्वर मंदिर, शनीचे मंदिर, विष्णू मंदिर, नरसोबा मंदिर, दत्त मंदिर, जैन श्वेतांबर मंदिर, मारूती मंदिर, लक्ष्मी मंदिर इत्यादी तसेच शहरात दोन मस्जिद देखील आहेत.[५५] त्यापैकी १) जुम्मा मस्जिद २) खाटिक मस्जिद या आहेत.

## २.१३ तासगावातील राजवट

सन १८१८ साली पेशवाई नष्ट झाली व ब्रिटीश राजवटीला प्रारंभ झाला. पेशव्याच्या अधिपत्याखाली सर्व प्रदेश ब्रिटीशाकडे आले. तासगावही ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आले. कंपनी सरकारने लोकांचा रोष ओढावू नये म्हणून धूर्तपणे ग्रामीण शासन यंत्रणेत बदल करण्याची घाई केली नाही. वरच्या पातळीवर राज्यकर्ते बदलले तरी तासगावच्या व्यवस्थेत फारसा बदल झाला नाही. पूर्वीच्या ग्रामव्यवस्थेतील कारभार विषयक व न्याय विषयक काही अधिकार मान्य करून कंपनीच्या प्रशासनात त्यांना थोडेफार स्थान दिले. जहागिरदार, पाटील, कुलकर्णी यांची वतने जरी ब्रिटीशांनी नष्ट केली असली तरी त्यांना रोख पगार देण्याची व्यवस्था केली. गावातील त्यांच्या स्थानाला धक्का लावला नाही. आर्थिक सत्ता मात्र त्यांनी ताब्यात घेतली. पूर्वीचे तासगावातील पाटील, कुलकर्णी महसूल गोळा करून पेशव्यांच्या जहागिरदाराकडे देत असत. नंतर ते ब्रिटीशांच्या मामलेदाराकडे देऊ लागले. त्यावेळी तासगाव हे सातारा जिल्ह्यात होते. सातारा कलेक्टरच्या अधिपत्याखाली तासगावचे इंग्रज मामलेदार तासगावचा कारभार पहात असत.

सन १८४८ साली सातारा जिल्ह्यात अकरा शासकीय विभाग होते. विजापूर (आताचे कर्नाटक राज्यात), जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा आणि वाई. सन १८५६ मध्ये पुढील प्रमाणे बारा नवीन महाल निर्माण झाले. त्याची नावे पुढील प्रमाणे होती. पिपोड(कोरेगाव विभाग), खंडाळा(वाई), बागणोली(जावळी), कोळे(कराड), शिराळा पेठ, वाळवा, हेळवाक(तासगाव) मायणी(खानापूर), नातेपुते आणि पुसेगाव(खटाव), सांगोला, मालवणी आणि पंढरपूर. १८६२ साली वरील शासकीय विभागाच्या सीमामध्ये परत फेरबदल करण्यात येऊन विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, माळशिरस, माण, पंढरपूर, पाटण, सातारा, तासगाव, वाळवा आणि वाई असे शासकीय विभाग निश्चित करण्यात आले.[५६] सन १८६३ मध्ये तासगाव तालुका बेळगाव जिल्ह्यातून काढून सातारा जिल्ह्यास जोडण्यात आला. सन १८७५ मध्ये माळशिरस विभाग सोलापूर जिल्ह्यास जोडण्यात आला. १८८४ साली माल्कम नावाची पेठ निर्माण करण्यात आली. तिलाच पुढे महाबळेश्वर नाव पडले. सन १९२७ मध्ये खंडाळा पेठ विसर्जित करण्यात आली. परंतु १९४७ साली पुन्हा तिचे तालुक्यात पुनर्गटन करण्यात आले.[५७]

स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीच्या संस्थानाचे विलिनीकरण झाल्यावर सातारा जिल्ह्यात फलटण संस्थानाचा काही भाग जमखंडी, तासगाव, भोर, अक्कलकोट, औंध, सांगली या संस्थानाचे प्रदेश आणि पुणे जिल्ह्यातील एक खेडे जोडण्यात आले. १९४९ साली नवीन फलटण तालुका निर्माण करण्यात आला व याच वर्षी या जिल्ह्याचे उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन भाग पडले.

दक्षिण सातारा जिल्ह्याचे मुख्यालय सांगली येथे होते आणि त्यात खानापूर, तासगाव, वाळवा आणि शिराळा पेठ यांचा समावेश होता. उर्वरीत भागास उत्तर सातारा असे म्हटले जात असे. सन १९५६ मध्ये मुंबई राज्याची पुनर्रचना झाल्यावर वरील दोन्ही जिल्ह्याचा तत्कालीन मुंबई राज्यात अंर्तभाव करण्यात आला. सन १९५८ मध्ये दक्षिण सातारा जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील एक खेडे कराड तालुक्यात समाविष्ट करण्यात आले. सन १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्ह्याचे नाव सांगली असे ठेवण्यात आले.[५८] तासगाव तालुका निर्माण झाल्यानंतर, भारतात स्थानिक शहराचा विकास घडावा म्हणून कंपनी सरकारने बंगाल पुरता स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा केला होता. त्या कायद्यातील अडचणी काढून १८५० साली संपूर्ण हिंदुस्थानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा पास केला. या कायद्यानुसार मुंबई इलाख्यात तासगाव येथे १८६५ मध्ये नगरपालिका स्थापन करण्यात आली.[५९]

## २.१३.१ स्वातंत्र्य चळवळीतील तासगाव

१९२० च्या कालखंडामध्ये काँग्रेस चळवळीचे स्वरूप बदलून महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीस सुरूवात झाली होती. महात्मा गांधीजीच्या मिठाच्या सत्याग्रहाने आणि दांडी पदयात्रेमुळे इंग्रजी राजवटीबद्दलचा असंतोष पसरला होता. तासगावमध्ये स्वातंत्र्य प्रेमाने व गांधीजीच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक कार्यकर्ते तयार झाले होते व ब्रिटीश सत्तेच्या विरोधात अनेक चळवळी झाल्या.[६०] श्री. वि. स. पागे यांच्या नेतृत्वाखाली अनेक मोर्चे काढण्यात आले. १९४२ नंतर क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारच्या प्रतिसरकारचे कार्य प्रभावीपणे होते. तर तासगाव परिसरात अनेक स्वातंत्र्य सैनिक व राष्ट्रसेवादलातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले होते.[६१]

१९३० च्या महात्मा गांधीजीच्या मिठाच्या सत्यागृहात तासगावचे श्री. दत्तात्रय अभ्यंकर यांनी भाग घेतला होता.[६२] त्यांच्या सोबत त्यांनी मीठही आणले होते. श्री. का. दि. पोक्षे यांच्या नेतृत्वाखाली त्या मिठाची विक्री चालू होती. तेव्हा अभ्यंकर व पोक्षे यांना अटक झाली. एक महिन्याची अटक व सुटकेनंतर गंगाराम कुंभार यांच्या मदतीने त्यांनी घरोघरी खादीचा प्रचार केला. कायदेभंगाचे प्रचारक गावोगावी निर्माण झाले.[६३] या प्रचारकामध्ये तासगावचे अल्लाबक्ष लतीफ, अभ्यंकर, पोक्षे, श्री. आबासाहेब जोग इत्यादी होते. या प्रभात फेऱ्यात मुली-मुलांनी भाग घेऊन लोकांना सुर्योदयापूर्वी स्वराज्याची हाक दिली. अशा प्रभात फेऱ्यात राष्ट्रीय सभेच्या झेंड्याचे वंदन करणे हा तर प्रभात फेऱ्यांचा नित्यनियमित कार्यक्रम होता.

६/५/१९३० रोजी तासगावात विदेशी कापडाची लादी एका गाढवावर लादून त्यांची मिरवणूक कापूर ओढ्यात नेली. तेथे परांजपे वकीलांनी होळी पेटविली. तसेच १५० लोकांनी मिठाच्या सत्यागृहात

भाग घेतला. अशा पार्श्वभूमीवर तासगाव नगरपालिकेची सभा दिनांक २०/७/१९३० रोजी झाली. त्यावेळी हजर असलेल्या सभासदांनी दोन ठराव मांडले. पहिल्या ठरावानुसार नगरपालिकेवर निशाण (तिरंगा) फडकावा असे ठरले. अब्दुल कादरभाई मोमीन या सभासदाच्या हस्ते तिरंगा झेंडा डौलाने फडकविला.[६४] परंतु दोन दिवसानंतर तो काढण्यात आला.

श्री. वि. स. पागे यांनी याच काळात सांगली विलिंग्डन कॉलेजवर तिरंगा फडकविला. श्री. आबासाहेब जोग यांनी गजानन व्यायामशाळेच्या माध्यमातून राष्ट्रवादी तरूणांचे संघटन केले. जेधे-गाडगीळ यांची प्रचंड सभा १९३९ मध्ये तासगावात झाली होती. या सभेसाठी आसपासच्या गावातून लोक मोठ्या प्रमाणात गाड्या जुंपून आले होते. त्यांच्या गाड्यांच्या बैलाचे शेण २० गाड्या निघाले होते. एवढी प्रचंड सभा तासगावात झाली होती.[६५] श्री. वि. स. पागे, पद्म. वसंतदादा पाटील, श्री. गंगाराम पवार, श्री. धुळाप्पा नवले, श्री. आर. पी. पाटील यांनी तालुकाभर तासगाव, बिसूर, येळावी, भिलवडी, धामणी येथे वैयक्तिक सत्याग्रह केले. या पार्श्वभूमीवर तासगाव मोर्चा यशस्वी ठरला.

## अ) ३ सप्टेंबर, १९४२ चा तासगावचा ऐतिहासिक मोर्चा

३ सप्टेंबर, १९४२ चा तासगावचा ऐतिहासिक मोर्चा हा यशस्वी झालेला होता. पुढे तासगावचा मोर्चा हा अनेक स्वातंत्र्य चळवळींना व मोर्चांना प्रेरणादायी ठरला. पुढे १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत तासगावच्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कराड, तासगाव, इस्लामपूर, वडूज, महाड, या ठिकाणी सरकारी कचेरीवर मोर्चे काढले. या मोर्चामध्ये तासगावचा मोर्चा हा यशस्वी मोर्चा म्हणून त्याचे इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या मोर्चाने ब्रिटीश सत्तेला प्रचंड हादरा दिला.

## मोर्चाचे बाळकडू

मुंबईमध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी होणाऱ्या महाअधिवेशनास कराडवरून श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. के. डी. पाटील, श्री. काशिनाथ देशमुख, आमदार चंद्रोजी पाटील, श्री. वि. स. पागे, पद्म. वसंतदादा पाटील वगैरे अनेक कार्यकर्ते मुंबईला गेले होते.[६६] ७ ऑगस्ट १९४२ रोजी दुपारी अडीच वाजता 'वंदे मातरम्' गीताने सुरू झालेल्या या ऐतिहासिक अधिवेशनास काँग्रेस महासमितीचे २५० प्रतिनिधी, ३,००० स्वयंसेवक व जवळजवळ १०,००० काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबईच्या गवालियॉ टँक मैदानावरील या अधिवेशनासाठी उभारलेला मंडप कमी पडला होता. मंडपाबाहेर ५,००० कार्यकर्ते उपस्थित होते. काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद यांच्या भाषणाने अधिवेशनास सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी पंडित जवाहलाल नेहरू यांनी 'छोडो भारत' हा ठराव मांडला आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्या ठरावास अनुमोदन दिले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी हा

ठराव प्रचंड बहुमताने मंजुर झाला. शेवटी गांधीजी उभे राहिले. गांधीजीचे विचार ऐकण्यास सर्वजण उत्सुक होते. गांधीजीनी आपल्या भाषणातून नारा दिला, या क्षणापासून प्रत्येक भारतीय स्त्री व पुरूषाने स्वतःला स्वतंत्र समजावे. आपण स्वतंत्र आहोत. मी तुम्हाला एक मंत्र देतो. तो तुम्ही आपल्या अंत:करणात कोरून ठेवावा आणि प्रत्येक श्वासानंतर जपावा. तो मंत्र म्हणजे 'करेंगे या मरेंगे' हीच आपली प्रतिज्ञा झाली पाहिजे. या प्रतिज्ञापालनासाठी आहुती देण्यास तयार व्हा. शेवटी गांधीजीनी 'छोडो भारत' ही घोषणा केली.

अधिवेशन संपताच पुढील घटना वेगाने घडत गेल्या. ९ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजता गांधीजी जेथे उतरले होते, त्या बिर्ला हाऊसमध्येच गांधीजीना सरकारने अटक केली. त्यानंतर लगेच पंडित जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल इत्यादी नेत्यांना अटक झाली.[६७] या अधिवेशनास आलेल्या कार्यकर्त्यांची एक गुप्त बैठक यशवंतराव चव्हाण यांच्या मित्राच्या घरी पानबाजार, मुंबई येथे झाली. या मंडळीमध्ये यशवंतराव चव्हाण, के. डी. पाटील, काशिनाथ देशमुख, आमदार चंद्रोजी पाटील, वि. स. पागे, वसंतदादा पाटील इत्यादी पंधरा कारभारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये 'जिल्ह्यात कसे आंदोलन करायचे' यावर चर्चा झाली. चंद्रोजी पाटील यांनी 'चढाईच्या धोरणाने आंदोलन करावे' असे सुचविले. मात्र, यशवंतरावांनी 'वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आपण वागावे,' असे सांगितले.[६८] कार्यकत्यांनी वेगवेगळ्या गटात विभागून जिल्ह्यात चळवळ सुरू केली. प्रभातफेऱ्या, घोषणा, भाषणे, गुप्त पत्रके गावोगावी वाटली. इंग्रजी सत्ता संपवायचीच म्हणून तालुक्याच्या मामलेदार कचेरीवर इंग्रजांचा झेंडा काढून तिरंगा झेंडा फडकावयाचा म्हणून मोर्चे काढावयाचे, असे प्रमुख नेत्यांनी ठरविले.

## मोर्चाची पार्श्वभूमी

कराड, पाटण या तालुक्यात २४ ऑगस्ट १९४२ रोजी यशस्वीपणे मोर्चे काढण्यात आले. त्यामुळे उत्साहाची लाट सर्वत्र पसरली. तासगाव तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्तेही प्रभावित झाले. तासगावच्या मामलेदार कचेरीवर मोर्चा काढण्याचा त्यांनी निर्धार केला व सर्वजण तयारीला लागले. गावोगावी सभा घेतल्या. सायंफेऱ्या व प्रभातफेऱ्या काढल्या. भिलवडीचे वाय. के. सोहनी व सोनी गावच्या कार्यकर्त्यानी सभा घेतली या सभेस सुमारे ३०० लोक हजर होते. महात्मा गांधीजीना अटक झाल्यानंतर सर्वत्र वातावरण तापले होते, त्यावर डॉ. सोहनी यांनी भाष्य केले. त्यानंतर पागेसाहेबांचे भाषण झाले. त्यांनी लोकांना 'मामलेदार कचेरीवर झेंडा फडकलाच पाहिजे' असे सांगितले. किर्लोस्कर इजिनिअरिंग वर्क्सच्या कामगारांची सभा नाना पाटील यांनी घेतली व नियोजित मोर्चाची माहिती त्यांना देऊन त्याचे सहकार्य मिळविले.

## मोर्चाचे स्वरूप

तासगावच्या पश्चिमेला येरळा नदीच्या काठावर ३ सप्टेंबर, १९४२ रोजी साधारण पाच हजारापेक्षा अधिक लोक जमा झाले होते. हे लोक बुर्ली, आमणापूर, पलूस, अंकलखोप, भिलवडी, येळावी, निमणी, कुंडल, किर्लोस्करवाडी, घोगाव, ताकारी, बांबवडे वगैरे गावचे होते. त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रे होती. या जमावात वसंतदादा आपल्या सहकाऱ्यांबरोबर होते. मोर्चात सहभागी होता यावे म्हणून किर्लोस्कर इंजिनिअरिंग वर्क्सचे कामगार या दिवशी संपावर गेले. या मोर्चात अनुचित प्रकार घडू नये, दुखापत होऊ नये म्हणून किर्लोस्करवाडीचे डॉ. दिवाण, पलूसचे डॉ. साळुंखे, भिलवडीचे डॉ. गोसावी हे जमावात सहभागी झाले होते. या ठिकाणी 'मोर्चा कसा संघटीत करावा' या संबधीची चर्चा व नियोजन केले. नाना पाटील यांची आकस्मित अटक टाळता यावी म्हणून त्यांना व त्यांच्या पन्नास सशस्त्र सहकाऱ्यांना मोर्च्यातून वगळण्यात आले. मोर्चाचे नेतृत्व करण्यासाठी पलूसचे कृष्णा रामा कुऱ्हाडे यांची निवड करण्यात आली. जमावाचे मिरवणुकीत रूपांतर करण्यात आले. चार मोठ्या रांगा तयार करण्यात आल्या. त्यांच्यापुढे कॉंग्रेसचा झेंडा घेऊन कुऱ्हाडे उभे राहिले. सर्व मोर्चेवाल्यांच्या डोक्यावर गांधी टोप्या व हातात तिरंगा झेंडे होते.[६९] तासगाव मोर्चाचे प्रमुख नेते नाना पाटील, गोविंदराव खोत, वि. स. पागे, डॉ सोहनी, चिंतोपंत काळे, आदम पैलवान हे होते.[७०]

## मोर्चाचे विवेचन

तासगाव शहरातून राष्ट्रीय गाणी म्हणत व नेहमीच्या घोषणा देत मामलेदार कचेरीवर मोर्चा सरकू लागला. मामलेदार कचेरीच्या मार्गावर सबजज्ज यांचे कोर्ट होते. तेथे मोर्चेवाले थांबले. त्यावेळी एस. एच. पाटील सबजज्ज होते. त्यांना काही पुढारी भेटले व त्यांनी त्यांना असे आवाहन केले की, 'आपले कार्यालय बंद करून, मोर्चेवाल्यांना सामोरे जाऊन कॉंग्रेसच्या तिरंगा झेंड्याचा मान राखावा.' एकूण परिस्थिती सबजज्ज श्री. च. य. पाटील यांच्या नीट ध्यानात आल्यावर त्यांनी विनंती मान्य केली. मोर्चातील एकाने त्यांच्या डोक्यावर गांधी टोपी घातली आणि 'महात्मा गांधी की जय' अशी घोषणा त्यांनी द्यावी म्हणून त्यांचे मन वळविले. त्यानंतर श्री. च. य. पाटील यांच्या हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम पार पडण्यात आला. त्यानंतर मोर्चा मामलेदार कचेरीकडे वळला. सबजज्ज हे गृहस्थ सज्जन असावेत. कारण त्यांनी एल. टी. निकम नावाच्या मामलेदाराला खालील मजकुराची चिठ्ठी पाठवून दिली. 'आपण शांत राहूया, काही करायला नको. सर्व काही सुरळीत पार पडेल. आपण पुढाकार घेऊ नये आणि उतावळेपणे संकट ओढवून घेऊ नये.' अशा आशयाची चिठ्ठी मिळाल्यानंतर पंधरा मिनिटानी मोर्चा मामलेदार कचेरीवर धडकला. कृष्णा रामा कुऱ्हाडे, तासगावचे वि. स. पागे, भिलवडीचे डॉ. वाय. के.

सोहनी, अंकलखोपचे धुळाप्पाण्णा नवले, कुंडलचे नाथाजी लाड, रामा पवार, येडे निपणीचे पांडुमास्तर, आमणापूरचे गोविंदराव खोत वगैरे नेते मोर्चाच्या अग्रभागी होते.[७१]

कचेरीचे गेट कुलूप लावून बंद करण्यात आले होते व गेटच्या आतील बाजूस मामलेदार, पी. एस. आय. केसकर, ट्रेझरी गार्ड यांच्यासह तेहत्तीस सशस्त्र पोलिस उभे होते. त्यांच्याजवळ १४०० बंदुकीच्या गोळ्या होत्या. गेटच्या बाहेरून कृष्णा रामा कुऱ्हाडे यांनी मामलेदाराला सांगितले, आम्ही कचेरीवर झेंडा लावू इच्छितो. हजारोंचा जमाव पाहून व सबजज्जकडून मिळालेली आशयाची चिठ्ठी वाचून, मामलेदार गोंधळून गेलेला दिसला. त्याला काय करायचे सुचेना. म्हणून जवळ असलेल्या पी. एस. आय. ला विचारले, याबाबत आपण काय करावे? पी. एस. आय. ने चटकन मत दिले, कोणत्याही परिस्थितीत जमावाला आपण गेटच्या आत येऊ देता कामा नये. या उत्तराने मामलेदाराचे समाधान झाले नाही. तो पी. एस. आय. ला म्हणाला, आपण काही नेत्यांना आत येण्यास परवानगी देऊया आणि गेट उघडण्याचा त्यांनी हुकूम दिला. गेट उघडल्यावर दहा ते पंधरा महत्त्वाचे नेते आत घुसले. मोर्चेवाल्यांच्या वतीने स्वत: सही केलेले पत्र कृष्णा रामा कुऱ्हाडे यांनी मामलेदारांना दिले. या पत्रात थोडक्यात असे होते, सुरूवातीला ज्या प्रसंगामुळे गोंधळ निर्माण झाला होता त्याचा सारांश दिला होता. मोर्चेवाले आणि ब्रिटिश सरकार यांच्यात युद्ध जुंपल्याने ब्रिटिशांची नोकरी करणे हा गुन्हा समजण्यात आला होता. मामलेदार स्वत: भारतीय असल्याने त्यांनी आपल्या पदाचा त्याग करावा आणि कार्यालय बंद करून त्याचा ताबा त्यांना द्यावा, असे आवाहन करण्यात आले होते. मोर्चेवाले मामलेदाराच्या रक्तामांसाचे असल्याने त्यांनी त्याला अशी ग्वाही दिली की, त्याला त्रास होईल असे ते काही करणार नाहीत. शेवटी मोर्चेवाल्यांनी त्याला अशी विनंती केली की, मोर्चेवाल्यांच्या विनंतीचा त्याने मान राखावा.[७२]

कचेरीवर काँग्रेसचा तिरंगा झेंडा लागू द्यावा, म्हणून नेत्यांनी सारखी इच्छा व्यक्त केल्यामुळे मामलेदार व पी. एस. आय. यांनी थोड्या समजुतीच्या स्वरात त्यांनी सांगितले की, कार्यालयाबाहेर कोठेतरी किंवा गेटच्या जवळपास झेंडा लावावा, परंतु ही गोष्ट नेत्यांना पटली नाही. गेटला कुलूप लावण्यात आले होते व त्यावर पोलिस पहारा होता. कचेरीच्या आवारात नेते व मामलेदार यांच्यात काय चालले आहे हे न समजल्यामुळे गेटच्या बाहेर मोर्चेवाले अस्वस्थ होते. गेटवर आणि कार्यालयाच्या सभोवताली भिंतीवर चढून आत उतरण्याच्या तयारीत मोर्चेवाले होते. एकूण परिस्थिती हाताबाहेर जाण्याची लक्षणे पाहून व शासकीय कर्मचाऱ्यांच्या जीवितास व मालमत्तेस धोका पोहचण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेवटी मामलेदाराने आपला हेका सोडला. गेट उघडण्यात आले. 'महात्मा गांधी की जय!', 'क्रांती चिरायू होवो' वगैरे घोषणा देत मोर्चेवाले आत धावले. सर्वांना रांगेत उभे राहण्याची आज्ञा देण्यात आली. नंतर मामलेदाराला सांगितल्याप्रमाणे तो पुढे आला, त्याच्या डोक्यावर गांधी टोपी घालण्यात

आली. नंतर त्याच्या हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. या कार्यक्रमाची सांगता एकत्र 'वंदे मातरम्' म्हणून करण्यात आली. आपण सुटलो म्हणून मामलेदार निश्वास टाकतो न टाकतो तोच मोर्चेवाल्यांनी एका आवाजात दुसरी मागणी केली. 'बुर्लीच्या पाडुरंग शिवदे यांस एक तर मुक्त करावे किंवा ते शक्य नसल्यास त्यांना सर्वांना दाखवावे'. पाडुरंग शिवदे यास डिफेंस ऑफ इंडिया रूल्सच्या २६ व्या कलमानुसार अटक करून, त्यांना सब जेलमध्ये डांबून ठेवण्यात आले होते. आत्तापर्यंत जे काही घडले होते त्याने मामलेदार चक्रावून गेला होता. त्यामुळे मागणीस विरोध करण्याचे मानसिक धैर्य त्यांच्याजवळ नव्हते. केवळ त्याचे दैव बलवत्तर म्हणून पांडुरंग शिवदे यास मुक्त करण्यास नकार दिला परंतु जमावापुढे त्यास आणून दाखविण्याचे त्याने मान्य केले. शिवदे यास लॉकअपमधून बाहेर काढण्यात आले व त्यांना लांबून काही मिनिटे मोर्चेवाल्यांना दाखवण्यात आले. कृष्णा कुऱ्हाडे यांनी पत्रिका वाचून दाखविली.[७३] पागेसाहेबांनी मोर्चाला उद्देशून एक जाहीर भाषण केले. श्री. आर. एस. पवार यांनी राष्ट्रगीत म्हटले.[७४] मोर्चेवाल्यांनी विजयाच्या आनंदात कचेरी सोडली. हा सर्व प्रकार दुपारी तीन चारच्या दरम्यान घडला.[७५] मोर्चा चारी दिशांनी परतला. पश्चिमेकडे जाणारे मोर्चेवाले क्रांतीसिंह नाना पाटलांची घोषणा देत परतत होते. त्यांच्या डोळ्यात निमणी जवळचा डाकबंगला उतरला. मोर्चेवाले रानातल्या कडब्याच्या बुचडावर तुटून पडले. वाळला कडबा डाक बंगल्यात आला आणि इंग्रजांना 'चालते व्हा' म्हणणाऱ्या जनतेने इंग्रजांचे ठाणे कोळसा केले.[७६] जाताना मोर्चेवाल्यांनी बांबवडे येथील सातारा डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाच्या इन्स्पेक्शन बंगल्याचा एक भाग जाळून टाकाला. तसेच भिलवडी व तासगाव हद्दीतून जाणाऱ्या टेलिग्रामच्या तारा व खांब उद्ध्वस्त केले. सातारचे डी. एस. पी. व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, पुण्याचे कमिशनर यांनी तासगाव येथे घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल घेतली व भविष्यात मोर्चे मोडून काढण्यासाठी कठोर निर्णय घेतले.

## मोर्चाचे परिणाम

मामलेदार एल. टी. निकम यांना प्रथम सस्पेंड केले. नंतर सस्पेंड केल्याच्या तारखेपासून त्यांची पदावनती केली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनी तासगावातील मोर्चातील नेत्यांना पकडण्याचे आदेश डी. एस. पी. ला दिले. तसेच तासगाव, पाटण, वाळवा, कराड, खानापूर, शिराळा, पेठा या तालुक्यात कुऱ्हाडी व भाले जवळ बाळगण्यास बंदी घालण्यात आली. तासगाव येथे मिळालेल्या यशामुळे इतर काँग्रेस कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली. दुसरीकडे अशा तऱ्हेचे प्रयत्न होईल म्हणून तासगावचा प्रकार जिल्ह्यातील सर्व मामलेदार व महालकरी यांच्या निदर्शनास आणला. तसेच मामलेदार व महालकरी यांनी आपल्याजवळील पोलिसबळ कमी पडत असल्यास, तसा अहवाल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला पाठवावा.[७७] असा आदेश देण्यात आला. याचबरोबर त्यांना असे बजावण्यात आले की, सरकारी कार्यालयात

घुसणाऱ्या जमावास थांबवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. जमाव पांगविण्यासाठी सर्व मार्ग संपल्यावर 'शेवटचा उपाय' म्हणून गोळीबार करून जमाव थांबवावा. पुण्याच्या कमिशनरने वरील सर्व कृती मान्य केली. परंतु शेवटचा उपाय या शब्दावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते तासगावच्या जमावास फार सौजन्याने वागविले असेल. जमाव कचेरीच्या आसपास येण्यापूर्वी तो पांगवावयास हवा होता आणि प्रमुख नेत्यांना पकडण्यास हरकत नव्हती. त्यामुळे जिल्हाभर या रोगाची लागण होऊ नये म्हणून कठोर व परिणामकारक कृती हाच त्यावरील एक उपाय होता. शासनाने हे आंदोलन पोलादी हाताने मोडून टाकण्यासाठी कडेकोट बंदोबस्त केला, परंतु ही गोष्ट जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना माहित नव्हती.[७८]

थोडक्यात तासगावचा मोर्चा हाच अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झालेला मोर्चा होय. या मोर्चाचे नेतृत्व कोणी एका व्यक्तीने केलेले नसून जनतेचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसादही हा देखील तितकाच महत्वाचा आहे. या मोर्चात श्री. वि. स. पागे यांनी आपले बौद्धीक कौशल्याचा पुरेपूर वापर केला आहे. इंग्रजी सत्तेला या मोर्चाने आव्हान दिले होते. या मोर्चामध्ये अनेक वीर हुतात्मा झाले होते. पाटण, कराड, वडूज व इस्लामपूर येथील मोर्चाच्या तुलनेत तासगावचा मोर्चा हा सर्वाधिक यशस्वी व शांततेने पार पडलेला मोर्चा म्हणून इतिहासात त्याचा वेगळेपणाचा ठसा आहे.

# संदर्भसूची


१. तुळपुळे शं. गो.(संपादक) सागर प्रकाशन, कोल्हापूर प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ.१३५-३८.
२. मोडक बा. प्र. कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थानाचा इतिहास पूर्वार्ध भाग-२ रा आदिलशाही घराण्याचा इतिहास, १८८२ पृष्ठ. ३३.
३. 'तासगाव तालुक्याचा द्राक्षशेतीचा आर्थिक इतिहास,' चंद्रकांत गोविंद पाटील पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसेंबर २००७ पृष्ठ ९.
४. आपटे गो. वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास, प्रथम आवृत्ती साईनाथ प्रकाशन सांगली, २००१ पृष्ठ. २१५.
५. A socio-economic review abstract, Sangli district, 2010–11 Page 1.
६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १.
७. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963, PP. 54 to 64.
८. A socio-economic review abstract, Sangli district, 2010, Page 33.
९. जनगणना २००१-११ च्या प्रोव्हिजनल आकडेवारी व महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा, १९९९ पृष्ठ १२९.
१०. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे व जनगणना रजिस्टर संबधित वर्ष
११. तासगाव हायस्कूल तासगाव हिरक महोत्सव स्मरणिका १९८०-८१.
१२. A socio-economic review abstract, Sangli district, 2010 Page 77.
१३. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963 PP.122. A socio-economic review abstract, Sangli district, 2010 Page 130.
१४. तासगाव तालुक्याच्या द्राक्षशेतीचा आर्थिक इतिहास, चंद्रकांत गोविंद पाटील पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ,डिसेंबर २००७ पृष्ठ ९.
१५. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा अरूणचंद्र श. पाठक दर्शनिका विभाग मुंबई १९९९ पृ.७
१६. कोलारकर श. गो. भारताचा इतिहास(प्राचीन मध्ययुगीन) द्वितीय आवृत्ती ,२००१ पृष्ठ. ३०.
१७. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा अरूणचंद्र श. पाठक दर्शनिका विभाग मुंबई १९९९ पृ.१०.
१८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ८.
१९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ९.
२०. कोलारकर श. गो. भारताचा इतिहास(प्राचीन मध्ययुगीन) द्वितीय आवृत्ती ,२००१, पृष्ठ. ३०.
२१. शेख मोहियुद्दीन अहमद शताब्दी महोत्सव ग्रंथ, नगरपालिका विटा ,१९५९, पृष्ठ १०.
२२. कोलारकर श. गो. भारताचा इतिहास(प्राचीन, मध्ययुगीन) द्वितीय आवृत्ती ,२००१, पृष्ठ. ९३.

२३. शेख मोहियुद्दीन अहमद शताब्दी महोत्सव ग्रंथ, नगरपालिका विटा ,१९५९, पृष्ठ १२.

२४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १२.

२५. गायकवाड पठाण मध्ययुगीन भारताचा इतिहास १९९९, पृष्ठ ९.

२६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जि. अरूणचंद्र श. पाठक दर्शनिका विभाग मुंबई १९९९, पृ.७७.

२७. General Administration Report Kolhapur State 1921,Page 30.

२८. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ. १७.

२९. महाराष्ट राज्य गॅझेटिअर सातारा जि. अरूणचंद्र श. पाठक दर्शनिका विभाग मुंबई १९९९ ,पृ.७७.

३०. A socio-economic review abstract, Sangli district, 2010, Page 130.

३१. मुलाखत, शिंदे औदुत ई. टी. व्ही. वार्ताहर दि. २०/४/२०१० ,संध्या. ७ वा. व त्यांची अप्रकाशित कागदपत्रावरून.

३२. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963 ,PP.54 to 64.

३३. मोडक बा. प्र. कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थानाचा इतिहास, पूर्वार्ध भाग-२ रा आदिलशाही घराण्याचा इतिहास १८८२, पृष्ठ. ३३.

३४. पारसनीस डी. बी. शाहू महाराज यांची रोजनिशी १९१४, पृष्ठ. ५.

३५. आपटे गो.वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास प्र.आवृत्त साईनाथ प्रकाशन सांगली २००१, पृ.२१५.

३६. तासगावच्या पटवर्धन घराण्याचा इतिहास एम. फील. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसेंबर १९८४, पृष्ठ ९.

३७. आपटे गो.वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास प्र.आवृत्ती साईनाथ प्रकाशन सांगली २००१, पृ.२१५.

३८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २१६.

३९. डेव्हलपमेंट प्लॅन बुक, क्रांतिवैभव प्रकाशन कोल्हापूर १९८६, पृष्ठ. २३.

४०. पटवर्धन परशुरामभाऊ(तासगावकर) स्मरणिका २००३, पृष्ठ १.

४१. मुलाखत, राजेंद्र पटवर्धन दि.२१/१२/२००४, वेळ सकाळी ९ वा.

४२. उपरोक्त कित्ता.

४३. डेव्हलपमेंट प्लॅन बुक, क्रांतीवैभव प्रकाशन कोल्हापूर १९८६, पृष्ठ. २५.

४४. आपटे गो.वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास प्र.आवृत्ती साईनाथ प्रकाशन सांगली २००१, पृ. २१५.

४५. डेव्हलपमेंट प्लॅन बुक, क्रांतीवैभव प्रकाशन, कोल्हापूर १९८६. पृष्ठ. ३०.

४६. आपटे गो.वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास प्र.आवृत्ती साईनाथ प्रकाशन सांगली २००१, पृ.२१५.

४७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २१६.

४८. डेव्हलपमेंट प्लॅन बुक, क्रांतीवैभव प्रकाशन कोल्हापूर, १९८६, पृष्ठ. ३५.

४९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २३.

५०. मुलाखत, राजेंद्र पटवर्धन दि.२१/१२/२०११, वेळ सकाळी ९ वा.

५१. उपरोक्त कित्ता.

५२. पागे वि. स. यांचे 'जीवन व कार्य' चंपाताई श्रीरंग बोधले पीएच्.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डिसेंबर २००८ ,पृष्ठ. ६.

५३. साप्ताहिक 'राष्ट्रभूषण' संपादक, दत्तात्रय पाटील तासगाव सोमवार २९ ऑगस्ट २०११, पान ८.

५४. उपरोक्त कित्ता, पान ८.

५५. तासगाव तालुक्याचा द्राक्षशेतीचा आर्थिक इतिहास, चंद्रकांत गोविंद पाटील, पीएच्.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसेंबर २००७ पृष्ठ ९.

५६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा १९९९, पृष्ठ २.

५७. मंगूडकर मा. ए. पुणे महापालिका शताब्दी महोत्सव ग्रंथ १९९०.

५८. गुरव बाबुराव, उजळती प्रकाश रेषा, जनशक्ती प्रकाशन विटा, १९९९, पृष्ठ. ६१.

५९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६२.

६०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६३.

६१. गोखले बाबुराव, 'जागृत सातारा' सागर प्रकाशन सातारा, १९९७, पृष्ठ १२०-१२१.

६२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६३.

६३. मुलाखत, पवार सुखदेव सभापती शिक्षण मंडळ तासगाव दि.१३/९/२०११, वेळ दु. २.३० मी.

६४. मुलाखत, माळी धोंडीराम बापू जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक, वय वर्षे ९०, ठिकाण-कुपवाड, दिनांक १/१२/२००६, सकाळी १० वा.

६५. यादव विजय, दादा एक सेनानी, स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांचे चरित्र, उंडाळे, स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती २००२, पृष्ठ. ६२, ६३.

६६. पागे वि. स. 'छोडो भारत' चळवळीतील महत्त्व(सपा.) जयसिंगराव, क्रांतीसिंह गौरव ग्रंथ २००९ पृष्ठ क्र. ३०६.

६७. कोळेकर के. वाय. दैनिक अग्रदूत, सांगली. ३ सप्टेंबर तासगावचा यशस्वी स्वातंत्र्य लढा, मोर्चा स्वातंत्र्य दिन, एक सुवर्णपान दिनांक ३/९/१९९७, सकाळी १० वा.

६८. भोसले ए. आर. हिस्ट्री ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन सातारा डिस्ट्रिक्ट फ्रॉम १८८५-१९४७ ए क्रिटीकल स्टडी, पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ,१९७८ पृष्ठ २५०.

६९. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकारः प्रसंग आणि व्यक्ती, कोल्हापूर उषा प्रकाशन १९९९, पृष्ठ २२, २३

७०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २४.

७१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २५.

७२. गुरव बाबुराव, वि. स. पागे. एक व्रतस्थ लोकशिक्षक, वि. स. पागे स्मृति गौरव व जीवन विकास संस्था, तासगाव रौप्य महोत्सवी गौरव समिती ,१९९२.

७३. लाड जी. डी. पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य पुणे भारती विद्यापीठ प्रकाशन २००५ ,पृ.२५.

७४. पाटील उत्तमराव, लाड आप्पासाहेब, क्रांतीवीर देशभक्त नाना पाटील, औंध उषा प्रकाशन १९४७, पृष्ठ ७७.

७५. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकारः 'प्रसंग आणि व्यक्ती' कोल्हापूर उषा प्रकाशन १९९९, पृ.२५

७६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २६.

७७. कोळेकर के. वाय. दैनिक अग्रदूत सांगली ३ सप्टेंबर तासगावचा यशस्वी स्वातंत्र्य लढा, मोर्चा स्वातंत्र्य दिन एक सुवर्णपान, दिनांक ३/९/१९९७ ,सकाळी १० वा.

७८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १०

**प्रकरण तिसरे**

# तासगाव नगरपालिका वाढः विस्तार....


३.१ प्रस्तावना

३.२ तासगाव नगरपालिकेची पार्श्वभूमी

३.३ कमिशनरचा कारभार

३.४ नगरपालिकेची स्थापना

    ३.४.१ सभासदांच्या संख्येतील फेरबदल

    ३.४.२ तासगाव नगरपालिकेचे अध्यक्ष

    ३.४.३ १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम कायदा

    ३.४.४ प्रशासकीय कारकीर्द

    ३.४.५ तासगाव नगरपालिकेची रचना

    ३.४.६ मुख्य कार्यकारी अधिकारी

३.५ तासगाव नगरपालिका जमा-खर्च

३.६ तासगाव नगरपरिषदेची उत्पन्नाची साधने

    ३.६.१ शासकीय अनुदान

    ३.६.२ कर्ज

    ३.६.३ जकात

३.७ नगरपरिषदेवरील राज्यशासनाचे नियंत्रण

३.८ पाणीपुरवठा

    ३.८.१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना(UIDSSMT)

३.९ सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता

३.१० घनकचरा व्यवस्थापन

३.११ रस्ते

३.१२ सामाजिक सुविधा

३.१३ नगरपालिका शिक्षण मंडळ

१) बालवाड्या

३.१४ सारांश

**प्रकरण तिसरे**

# तासगाव नगरपालिका वाढ : विस्तार...

## ३.१ प्रस्तावना

स्थानिक प्रशासनात नगरपालिका व महानगरपालिका या संस्था महत्वाच्या मानल्या जातात. ब्रिटीश काळात नगरपालिकांची सुरूवात झाली व नगरपालिकांना महत्व प्राप्त झाले. औद्योगिक क्रांतीनंतर शहराचा जलद गतीने विकास झाला. कारखानदारी व उद्योगधंदे यांच्या भोवती शहरे वाढली. शहरांचे प्रश्न, अडी-अडचणी, प्रशासन त्या संबंधीच्या उपाय योजनाना महत्व प्राप्त झाले. शहरातील लोकांच्या गरजा भागविणे, त्यांचे मुलभूत प्रश्न सोडविणे, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, उद्योगधंदे, प्रदुषण, संरक्षण असे विविध पायाभूत प्रश्न सोडविणे गरजेचे बनले. अर्थात त्यातून नागरी स्व:शासनाची कल्पना पुढे आली. पाणी, आरोग्य, स्वच्छता, संरक्षण, शिक्षण, गृहबांधणी, रस्ते, वाहतूक, करमणूक असे अनेकविध प्रश्न शासनास 'स्थानिक स्वराज्य संस्था'मार्फत सोडविणे सुलभ झाले आहे.

'स्थानिक कारभार, स्थानिक लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीनी स्थानिक उत्पन्नातून करणे व स्थानिक लोकांच्या पायाभूत गरजा भागवून त्यांच्यासाठी सुखसोयी निर्माण करणे, याला सर्व साधारणपणे 'स्थानिक स्वराज्य संस्था' म्हणता येईल'. भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया इंग्रजांनी घातला.[१]

तासगाव शहराची नगरपालिका ही १४७ वर्षाहून अधिक वयाची आहे. सुमारे ४३.४१ चौ. कि. मी. क्षेत्रफळ असलेल्या व २००१ च्या जनगणनेनुसार ३३,४५७ लोकसंख्या असलेल्या या नगरपालिकेचा कारभार एका विशिष्ट ध्येयाने सुरू आहे. विकेंद्रीकरणाच्या दृष्टिकोनातून टाकलेले पहिले पाऊल म्हणजे 'स्थानिक स्वराज्य संस्था'मार्फत स्थानिक पातळीवर लोक प्रतिनिधीच्या हस्ते लोकशाही मार्गाने सत्ता सोपवून स्थानिक पातळीवर प्रश्न लोकप्रतिनिधीच्या मार्फत सोडविण्याकरता नगरपालिकेची स्थापना झाली. १८५०चा व २६वा कायदा १४/०७/१८५३ मध्ये प्रसिद्ध होऊन दि. ०१/०८/१८६५ पासून तासगाव नगरपालिका अस्तित्वात आली. तासगाव नगरपालिकेचे स्थापनेच्या वेळचे उत्पन्न २२ रूपये होते ते आता जवळजवळ ३१.३९ कोटीच्या घरात गेले आहे. दुरूस्ती अधिनियम, १९९४ नुसार तासगाव नगरपरिषदेत निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या १९ आहे व नामनिर्देशीत सदस्यांची संख्या २ असून लोकसंख्येच्या वाढीव निर्बंधामुळे तासगाव नगरपालिका '**क**' वर्गात मोडत आहे.[२]

प्रस्तुत प्रकरणात नगरपालिकेचा उगम व विकास कसा होत गेला, स्थापना, रचना, नगराध्यक्ष व नगरपालिकेचा जमा-खर्च, पाणीपुरवठा, उत्पन्नाची साधने, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, रस्ते, नागरी सुविधा, नगरपालिका(प्राथमिक) शिक्षण मंडळ इत्यादी घटकांचा आढावा घेतला आहे.

## ३.२ तासगाव नगरपालिकेची पार्श्वभूमी

तासगाव नगरपालिकेची स्थापना होण्यापूर्वी गावातील सार्वजनिक आर्थिक व्यवहार कसे चालत होते, याचा कोणताच पुरावा उपलब्ध नाही. मात्र त्या काळातील शासनकर्ते आपल्या पाटील, कुलकर्णी, देशमुख या प्रतिनिधीमार्फत कर रूपाने उत्पन्न जमा करीत होते. लोकोपयोगी कामे करावीत अशी दृष्टी त्या काळातील राज्यकर्त्यांकडे नसल्यामुळे मिळालेल्या महसूलातून स्थानिक ठिकाणी फारसा खर्च केला जात नव्हता. एखाद्या देवस्थानाला राजा जमिनी इनाम देत असत, बाकीचा व्यवहार गावातील स्थानिक अधिकारी व प्रमुख मंडळी गावगाडा पद्धतीने चालवित असत. एखाद्या धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी लोक धान्य व पैसा वर्गणीच्या रूपाने जमा करून खर्च करीत असत.[३]

## ३.३ कमिशनरचा कारभार

१९०१च्या कायद्याने नगरपालिकेच्या कारभारामध्ये संपत्ती मताधिकाराची(Property Franchise) तरतूद करण्यात आली. या तरतूदीनुसार केवळ मुठभर श्रीमंत लोक मतदार बनले. हे मतदार कोण होते याची माहिती मिळू शकली नाही. पण या तथाकथित लोकनियुक्त सभासदामार्फत ब्रिटीश अधिकाऱ्यांनी नगरपालिकेचे १९४७ पर्यत प्रशासन केले.

सन १८४८ साली तासगावचे संस्थान खालसा झाले व ते ब्रिटीश साम्राज्यात विलिन केले गेले. त्यामुळे प्रजेची काळजी घेणारा राजा नाहिसा झाला. त्यावेळी तासगाव हे जुना सातारा जिह्यामध्ये समाविष्ट होते. त्यावेळी तासगावमध्ये कमिशनरचा कारभार सुरू झाला. त्यांच्याकडे नागरी कारभार आल्याबरोबरच त्यांनी प्रथम आयात-निर्यात कर व तेथे तयार होणाऱ्या वस्तूंवर कर बसविले. या येणाऱ्या अल्पशः उत्पन्नातून सर्व खर्च भागत नव्हता. शहरातील गरजा वाढत होत्या. शहर सुधारणेसाठी सरकारकडून पैसा घेतला जात होता. स्थानिक प्रश्न स्थानिकरित्या कर उभा करून सोडविले पाहिजेत. संस्थाने खालसा झाल्यानंतर महाराष्ट्रभर सर्वत्र नगरपालिका स्थापन झाल्या. म्हणून नगरपालिका स्थापन करण्यास कमिशनरने सरकारकडे परवानगी मागितली व सरकारने नगरपालिका स्थापन करण्यास कमिशनरला परवानगी दिली.[४]

## ३.४ नगरपालिकेची स्थापना

पूर्वी तासगाव हे जुना सातारा जिल्ह्यामध्ये समाविष्ट होते. भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया इंग्रजांनी घातला. हिंदुस्थानातील मोठ्या शहराची आणि गावाची स्थानिक स्वरूपाची सार्वजनिक कार्ये स्थानिक कर बसवून करता यावीत व जिल्हा अधिकाऱ्यांचा कामाचा ताण कमी व्हावा म्हणून इंग्रज सरकारने नगरपालिका स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्याला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी इ. स. (Local Self Govt. Act. 1850) मंजूर केला.[५]

यानुसार कलेक्टरने तासगावला नगरपालिका स्थापनेबद्दल कमिशनरकडे शिफारस केली. कमिशनरने तासगावची पाहणी केली व प्रतिष्ठीत, सुज्ञ लोकांशी चर्चा केली (यामध्ये कोणते लोक होते याची माहिती मिळाली नाही) व सांगितले की, आतापर्यंत शहर सुधारण्यासाठी सरकारकडून पैसा घेतला आहे. आपल्या स्थानिक कराचे उत्पन्न २२ रू. आहे. तासगाव शहराला विकासासाठी स्थानिक कराच्या उत्पन्नातून स्वतंत्र नगरपालिका स्थापन करता येईल, असे कमिशनरने सूचविताच जनतेने मान्यता दिली व १८५० चा २६ वा कायदा ता. १४/०७/१८५३ रोजी प्रसिद्ध होऊन १/८/१८६५ पासून तासगाव नगरपालिका अस्तित्त्वात आली. कमिशनर अध्यक्ष व ५ नागरिक सरकार नियुक्त अशा नेमणुका होऊन नगरपालिकेचे स्थानिक स्वराज्य बोर्ड अस्तित्वात आले.[६]

नगरपालिका स्थापन झाली ती लोकशाही तत्त्वासाठी किंवा सत्तेचे विकेंद्रिकरण करण्यासाठी स्थापन झाली नाही तर सरकारचे खाते म्हणून उघडले गेले. कारण सरकार नियुक्त सभासद म्हणजे सरकारी अधिकारी होते. कारण प्रथमतः कमिशनर व त्यानंतर कलेक्टर हे तिचे अध्यक्ष असत. शिवाय हुजूर, डेप्युटी कलेक्टर, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, सिव्हील सर्जन, मामलेदार, फौजदार असे बडेबडे अधिकारी सरकार नियुक्त सभासद असत व पुढे त्यांच्या जोडीला ३ लोकनियुक्त सभासद, असा एकूण ७ लोकांचा कारभार चाले. यांची एकच कार्यकारणी असे व तिचे चेअरमन डेप्युटी कलेक्टर असत. असा कारभार ३५ वर्षे चालला.[७]

स्थानिक स्वराज्य कायद्यात बदल झाल्यामुळे सन १८८५ पासून निवडणुका घेण्यात येवू लागल्या. तथापि कलेक्टर, अध्यक्ष व त्याचे मदतनीस सरकार नियुक्त सदस्य ३ व २ लोकनियुक्त सभासद असत असे ५ सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले. सरकार नियुक्तीमध्ये नोकर व इतर लोक असत व कायमचे अध्यक्ष कलेक्टर असत असा काळ ५० वर्षापर्यंत गेला.[८]

### ३.४.१ सभासदांच्या संख्येतील फेरबदल

सन १८९० पर्यंत ४ सरकारनियुक्त व ३ लोकनियुक्त सभासद बोर्ड होते. लोकांच्यात जागृती झाल्याने लोकनियुक्त सभासद वाढत जावून पुढे १९२३ पासून निवडणुकीचे नियम बदलण्यात आले व सर्वच्या सर्व ७ सभासदांचे लोकनियुक्त सभासद बोर्ड अस्तित्वात आले. काँग्रेस सरकार अधिकारावर आल्यावर लोकशाही सुरू झाली. त्यामध्ये २ नामनिर्देशीत सदस्यांची निवड होवून ९ लोकांचे सभासद बोर्ड अस्तित्वात आले.[९]

### ३.४.२ तासगाव नगरपालिकेचे अध्यक्ष

सन १९०९ पर्यंत नगरपालिकेचे अध्यक्षपद कलेक्टर साहेब यांच्याकडे होते. कारण त्यावेळेपर्यंतचे अध्यक्षपद हे निवडणुकीने भरले जात नव्हते. सन १९०९ सालापासून आपला अध्यक्ष निवडण्याचा हक्क नगरपालिकेला मिळाला व त्यावेळेपासून जनतेने निवडलेल्या अध्यक्षांचा कारभार चालू झाला होता. पहिल्या निवडलेल्या अध्यक्ष पदाचा मान कृष्णा प्रल्हाद बोडके यांना मिळाला.[१०] तसेच सन १९३९ साली स्त्रियांना प्रथमच राखीव जागा मिळाली व पहिल्या स्त्री सदस्याचा मान सौ. धोंडूबाई मुरली यांना निवडून येण्याचा मान मिळाला. तसेच सांगली जिल्ह्यातील पहिल्या नगराध्यक्षा व तासगावच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा होण्याचा मान सौ. पद्मावती गणपतराव कोळी (१९६७ मध्ये) यांना मिळाला.[११] देशाच्या कारभाराचे जसे विकेंद्रीकरण होऊ लागले तसे नगरपालिकेच्या कारभाराचे विकेंद्रीकरण होऊ लागले. निरनिराळ्या कार्यकारणींची निवड होऊ लागली. सन १८८५ साली प्राथमिक शिक्षण नगरपालिकेच्या ताब्यात आले. तेव्हापासून शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी स्कूल कमिटी निवडण्यात येऊ लागली. सन १९१३ साली एक सरकारी अंमलदार एक्झिक्युटिव्ह ऑफिसर घेतला जावू लागला. सन १९२३ साली 'मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' सरकारने केला. तेव्हापासून स्कूलबोर्डाची स्वतंत्र घटना होऊन सन १९२५ साली प्रथम नगरपालिकांना शिक्षण मंडळ स्थापन करण्याचे अधिकार मिळाले.[१२]

### ३.४.३ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम कायदा

सन १९२५ साली 'म्युनिसिपल ब्युरोज ॲक्ट' तयार केला तेव्हापासून तासगाव नगरपालिका या कायद्याखाली सन १९६५ पर्यंत कारभार करत होती. तथापि कायद्यातील त्रुटी लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने नगरपालिकेसाठी सुधारित कायदा करण्याच्या दृष्टीने श्री. दत्तात्रय दिघे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली. त्यांच्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र राज्यात सर्व नगरपालिकांना समान कायदा असावा म्हणून महाराष्ट्र अधिनियम सन १९६५ चा कायदा लागू केला. या कायद्याप्रमाणे तासगाव

नगरपालिकेचा कारभार चालू आहे. या कायद्यामुळे नगरपालिकेच्या कारभारात एकसुत्रीपणा आला. या कायद्यातील तरतुदीप्रमाणे शासनाने उपविधी तयार केला व त्याप्रमाणे उपविधी करण्याचे बंधन प्रत्येक नगरपालिकेवर घातले. या नवीन कायद्याप्रमाणे प्रत्येक नगरपालिकेला लोकसंख्येच्या प्रमाणात वर्गीकरण करून दर्जा देण्यात आला.[१३] त्यानुसार तासगाव नगरपालिकेला सन १९८१ च्या जनगणनेनुसार तासगाव शहराची लोकसंख्या २६,१५९ म्हणून नगरपालिकेस '**क**' वर्ग दर्जा मिळाला.

## ३.४.४ प्रशासकीय कारकीर्द

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ४८(अ) अन्वये तासगाव नगरपालिका बरखास्त केली व चीफ ऑफीसर यांनी 'प्रशासक' म्हणून काम पहावे असा आदेश दिला. त्या आदेशाप्रमाणे दिनांक १५/६/१९६६ पासून तासगाव नगरपालिकेचा कारभार प्रशासक पहात होते. तासगाव नगरपरिषदेचे पहिले चीफ ऑफिसर (प्रशासक) म्हणून श्री. एल. जी. पोतनीस काम पहात होते त्यानंतर दुसरे प्रशासक श्री. के. पी. जाधव होते तर सर्वात दीर्घकाळ प्रशासक म्हणून श्री. एल. के. लटके यांनी काम पाहिले. महाराष्ट्र शासनाने सर्व नगरपरिषदामध्ये सार्वजनिक निवडणुका घेण्याची मान्यता दिली. त्या आदेशाप्रमाणे तासगाव नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष म्हणून मा. श्री. कृष्णा प्रल्हाद बोडके याना निवडून येण्याचा मान मिळाला.[१४]

स्थानिक स्वराज्य संस्थेचा लोकशाही घटक म्हणून नगरपालिका प्रभावी रितीने कार्य करू शकतील हे निश्चित करण्यासाठी घटना (७४)अ चा दुरूस्ती अधिनियम १९९२ मध्ये अंमलात आला. त्यानुसार महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, तसेच नागपूर शहर महापालिका अधिनियम १९४८, मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये दुरूस्त्या करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ६ डिसेंबर १९९४ रोजी मिटींग घेतली व अधिनियम १९९४ अंमलात आला. नवीन नियमानुसार पूर्वीच्या अधिनियमामध्ये अमुलाग्र बदल करण्यात आले. या नियमाचे ठळक वैशिष्टये म्हणजे नगरपालिकेच्या निवडणुका घेण्यासाठी 'राज्य निवडणूक आयोग' व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी 'वित्त आयोग' निर्माण करण्यात आला.[१५]

अधिनियम दुरूस्ती १९९४ नुसार नगरपालिकेचे तीन प्रकार करण्यात आले. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेस '**अ**' वर्ग, चाळीस हजारपेक्षा जास्त '**ब**' वर्ग आणि चाळीस हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेस '**क**' वर्ग असे वर्गीकरण करण्यात आले. नवीन नियमानुसार नगरपालिकेच्या बोर्ड कमिटीच्या सरळ निवडणुकीद्वारे समावेश केला. नगरपालिकेच्या प्रशासन

अनुभव, ज्ञान ज्या व्यक्तीला असेल अशाच व्यक्ती नामनिर्देशित सदस्य केले जातात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती इतर मागास प्रवर्ग व स्त्रियांना आरक्षण ठेवण्यात आले.[१६]

७४ व्या घटना दुरूस्ती अधिनियमाद्वारे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यासाठी 'राज्य निर्वाचन आयोग' स्थापन करण्यात आला. भारतात सध्या ७,००० नगरपरिषदा आहेत. महाराष्ट्रात सुमारे २२८ च्या दरम्यान नगरपरिषदा आहेत. अधिनियम दुरूस्ती १९९४ नुसार तासगाव नगरपालिका '**क**' वर्ग आहे कारण नगरपालिकेची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३३,४५७ आहे व सदस्य संख्या एकूण २१ आहे.[१७]

### ३.४.५ तासगाव नगरपालिका रचना

तासगाव नगरपरिषदेत लोकनियुक्त सभासद १९ व नामनिर्देशित सभासद संख्या २ आहेत. एकूण २१ सभासद आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५, कलम ६२(अ) अन्वये १९६५ मध्ये, प्रत्येक नगरपालिकेसाठी, एक स्थायी समिती व इतर विषय समित्यांची तरतूद करण्यात आली आहे. नगरपालिकेतील या सभासदांचे सर्वसधारण एक मंडळ असते. नगरपालिकेतील कामे करण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व विविध समित्या आणि त्यांचे सभापती यांची निवड करते. [१८]

१) स्थायी समिती २) सार्वजनिक बांधकाम समिती

३) आरोग्य रक्षण समिती ४) पाणीपुरवठा व जलतरण समिती

५) नियोजन विकास समिती ६) वृक्षसंवर्धन समिती

७) महिला बालकल्याण समिती

या समित्या नगरपालिकेच्या आहेत. शहरातील विविध कामांची वर्गवारी करून खातेवार मंजुरीसाठी ती ती कामे त्या-त्या समित्याकडे जातात.[१९] नगरपरिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो, नगरपरिषदेच्या सर्व विषय समिती व त्यांचे सभापती हे स्थायी समितीचे सदस्य असतात. नगरपरिषदेतील सदस्यांनी त्यांच्यातील निवडून दिलेले तीन सदस्य हे स्थायी समितीचे सदस्य असतात. स्थायी समितीच्या सदस्याची निवड 'एकल संक्रमण प्रमाणशीर' प्रतिनिधीत्त्वाच्या मतदान पद्धतीने होत असते. नगरपरिषदेविषयी महत्त्वाचे निर्णय स्थायी समित्यापुढे मांडले जातात. तसेच विषय समित्या पुढील निर्णय ही स्थायी समितीकडे येतात.[२०]

**तक्ता क्र. १ तासगाव नगरपालिका अध्यक्ष**

| अ.क्रं | नगराध्यक्षाचे नाव | कालखंड |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कृष्णा प्रल्हाद बोडके | १३/११/१९४४ ते ०७/११/१९४७ |
| २) | मा. श्री. गंगाराम जोती पवार | ०८/११/१९४७ ते २४/०१/१९५० |
| ३) | मा. श्री. रामचंद्र ज्ञानोबा लुगडे | २५/०१/१९५० ते १८/११/१९६३ |
| ४) | मा. श्री. महादेव गोपीनाथ हिंगमिरे | १७/१२/१९६३ ते २६/०६/१९६६ |
| ५) | मा. श्री. बाबुराव रामचंद्र माळी | २७/०६/१९६६ ते २६/१२/१९६६ |
| ६) | मा. श्री. ज्ञानु हरी घुले | २७/१२/१९६६ ते ११/०४/१९६७ |
| ७) | मा. सौ. पद्मावती गणपती कोळी | १२/०४/१९६७ ते २३/०६/१९६७ |
| ८) | मा. श्री. तुकाराम कृष्णा चव्हाण | १७/०७/१९६७ ते ३१/०७/१९६७ |
| ९) | मा. श्री. रामचंद्र ज्ञानोबा लुगडे | ०१/०८/१९६७ ते २०/१२/१९६७ |
| १०) | मा. श्री. जयसिंग परसु शिंदे | २१/१२/१९६७ ते २१/०६/१९६८ |
| ११) | मा. श्री. वसंतराव नारायण लुगडे | २२/०६/१९६८ ते २३/०६/१९६९ |
| १२) | मा. श्री. विनायक विठ्ठल हजारे | २४/०६/१९६९ ते १९/०२/१९७० |
| १३) | मा. श्री. शिवरूद्र शिवलिंग पैलवान | २०/०२/१९७० ते २०/१०/१९७० |
| १४) | मा. श्री. वसंतराव गोविंद गुजर | २१/१०/१९७० ते १९/०५/१९७१ |
| १५) | मा. श्री. विष्णु बाबु हुलवाणे | २०/०५/१९७१ ते ०१/१०/१९७१ |
| १६) | मा. श्री. गंगाराम गणपती शिंत्रे | ०२/१०/१९७१ ते २८/०४/१९७२ |
| १७) | मा. श्री. महमंद ताजुद्रीन मोमीन | २९/०४/१९७२ ते ०२/१०/१९७२ |
| १८) | मा. श्री. आबासाहेब दत्तू साळुंखे | ०३/१०/१९७२ ते ०९/०७/१९७४ |
| १९) | मा. श्री. दशरथ मारूती पाटील | १७/१२/१९७४ ते ०५/०२/१९८१ |
| २०) | मा. श्री. गुलाबराव शंकर पाटील | १५/०५/१९८१ ते २७/१०/१९८७ |
| २१) | मा. पैलवान महादेव कृष्णा बागणे | १८/११/१९८७ ते २५/०१/१९८९ |
| २२) | मा. भाई शिवाजीराव विनायक शिंदे | १४/०२/१९८९ ते २२/०९/१९८९ |
| २३) | मा. सौ.राजनीगंधा धनपाल लंगडे | ०६/१०/१९८९ ते ०८/११/१९९० |
| २४) | मा. मंन्सूर महमंद मोमीन पटेल | २०/११/१९९० ते ३०/०६/१९९१ |
| २५) | मा. श्री. भगवान रामचंद्र धाबुगडे | ११/०७/१९९१ ते १६/१२/१९९१ |
| २६) | मा. श्री. डी. एम. पाटील | १७/१२/१९९१ ते १८/०८/१९९५ |
| २७) | मा. श्री. दिलिप शंकर गुजर | ०८/०९/१९९५ ते १५/०१/१९९६ |
| २८) | मा. श्री. वसंत गौरीहर खेराडकर | २३/०१/१९९६ ते १६/१२/१९९६ |
| २९) | मा. श्री. बाळासाहेब ज्ञानू जामदार | १७/१२/१९९६ ते १६/१२/१९९७ |
| ३०) | मा. श्री. दगडू राऊ शिरतोडे | १७/१२/१९९७ ते १७/०६/१९९८ |
| ३१) | मा. श्री. प्रकाश दत्तू साळुंखे | ०१/०७/१९९८ ते १६/१२/१९९८ |

| | | |
|---|---|---|
| ३२) | मा. सौ. अलका भिकू पोरे | १७/१२/१९९८ ते २५/११/१९९९ |
| ३३) | मा. सौ. रेहना रशिद मुल्ला | ०७/१२/१८९९ ते १६/१२/२००१ |
| ३४) | मा. श्री. गुलाबराव शंकर पाटील | १७/१२/२००१ ते १६/१२/२००६ |
| ३५) | मा. श्री. जाफर कादर मुजावर | १७/१२/२००६ ते १७/१२/२००७ |
| ३६) | मा. श्री. राइत शहाजी कोळी | १७/१२/२००७ ते ३०/०७/२००९ |
| ३७) | मा. श्री. प्रकाश दत्तू साळुंखे | ०५/०८/२००८ ते ०६/०१/२००९ |
| ३८) | मा. श्री. बशीद अब्बास मोमीन | १३/०१/२००९ ते १६/०६/२००९ |
| ३९) | मा. श्री. अमोल हनमंतराव शिंदे | २२/०६/२००९ ते १६/०६/२०१० |
| ४०) | मा. श्री. अजयकुमार रामराव पाटील | ०७/०६/२०१० ते ०७/०२/२०११ |
| ४१) | मा. श्री. अशोक बाबुराव पवार | २१/०२/२०११ ते २०/०६/२०११ |
| ४२) | मा. श्री. दिनकर आनंदा धाबुगडे | २३/०६/२०११ ते १६/१२/२०११ |
| ४३) | मा. सौ. विजया बाळासो जामदार | २३/१२/२०११ **कार्यरत......** |

**संदर्भ-** *तासगाव नगरपलिका नगराध्यक्ष कालखंडयांच्या बोर्डावरून घेतलेली माहिती.* [२१]

## ३.४.६ मुख्य कार्यकारी अधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी हा नगरपरिषदेचा मुख्य (प्रशासकीय) अधिकारी (c.o) असतो, हा अधिकारी राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी हा मार्गदर्शक कायदेशीर सल्लागार असतो. नगरपालिकेच्या शासकीय कार्याची जबाबदारी त्यांच्यावर असते, तो नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस हजर राहून सभेच्या कामकाजात सहकार्य करतो. नगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करणे, घेतलेले निर्णय व ठराव याची तो अंमलबजावणी करतो.

महाराष्ट्र नगरपरिषद नियम १९६६ चा नियम १७(३) व २४(२) अन्वये नगरपरिषदेचे जे ठराव अधिनियम किंवा त्यातील नियम उपविधी याच्याशी सुसंगत नसतील व त्यांच्यावर नगरपरिषद निधीतून खर्च होणार असेल तर सभेमध्ये मुख्याधिकाऱ्यांचे त्यांच्यावरील मते प्रदर्शित करता येतात. तसेच त्यांचे अभिप्राय सभेचा वृत्तांत लिहिणे बंधनकारक आहे.[२२] महाराष्ट्र अधिनियम १९६५चे कलम ४८(अ) अन्वये नगरपालिका बरखास्त केली व चिफ ऑफिसर यांनी(प्रशासक) म्हणून काम पहावे या आदेशाप्रमाणे काम करण्याचे ठरविण्यात आले.

**तक्ता क्र. २ तासगाव नगरपरिषद तासगाव मुख्याधिकारी कालखंड पुढीलप्रमाणे**

| अ.न. | मुख्याधिकाऱ्याचे नाव | कालखंड |
|---|---|---|
| १) | मा. श्री. एल .जी. पोतनीस | १५/०६/१९६६ ते ०८/०५/१९६८ |
| २) | मा. श्री. के. पी. जाधव | ०९/०५/१९६८ ते १९/०५/१९६८ |
| ३) | मा. श्री. एल ऐ. लटके | २०/०५/१९६८ ते ३०/०४/१९७० |
| ४) | मा. श्री. के. पी. जाधव | ०२/०५/१९७० ते २८/०५/१९७० |
| ५) | मा. श्री. एल. के. लटके | २९/०५/१९७० ते १७/१०/१९७२ |
| ६) | मा. श्री. के. पी. जाधव | १८/१०/१९७२ ते १३/१०/१९७२ |
| ७) | मा. श्री. एल. ए. लटके | १४/११/१९७२ ते १४/०४/१९७५ |
| ८) | मा. श्री. व्ही. बी. पाटील | १५/०४/१९७५ ते ०५/०५/१९७५ |
| ९) | मा. श्री. एल. ए. लटके | ०६/०५/१९७५ ते २८/०५/१९७५ |
| १०) | मा. श्री. व्ही. बी. पाटील | २९/०७/१९७५ ते ३१/०७/१९७५ |
| ११) | मा. श्री. व्ही. जी. नांदगावकर | ०१/०८/१९७५ ते ११/०८/१९७५ |
| १२) | मा. श्री. एम. व्ही. मोडक | १२/०८/१९७६ ते २०/०४/१९७७ |
| १३) | मा. श्री. डी. पी. पवार | २१/०४/१९७७ ते २१/०५/१९७७ |
| १४) | मा. श्री. एस. व्ही. मोडक | ०१/०६/१९७७ ते ०८/०३/१९७७ |
| १५) | मा. श्री. डी. पी. पवार | ०९/०३/१९७८ ते २६/०३/१९७८ |
| १६) | मा. श्री. एस. व्ही. मोडक | २७/०३/१९७८ ते १२/०७/१९७८ |
| १७) | मा. श्री. डी. पी. पवार | १३/०७/१९७८ ते १६/०८/१९७८ |
| १८) | मा. श्री. पी. डी. कोळेकर | १७/०८/१९७८ ते १८/०४/१९८० |
| १९) | मा. श्री. एल. ए. लटके | १९/०४/१९८० ते १०/०९/१९८१ |
| २०) | मा. श्री. एम. व्ही. भोसले | ११/०९/१९८१ ते ०४/१०/१९८१ |
| २१) | मा. श्री. एल. ए. लटके | ०५/१०/१९८१ ते १८/०५/१९८५ |
| २२) | मा. श्री. वाय. बी. माळी | २०/०५/१९८५ ते १४/०४/१९८६ |
| | | ०७/०६/१९८६ ते ३०/०६/१९८६ |
| २३) | मा. श्री. एन. ए. जोशी | ५/०४/१९८६ ते ०६/०६/१९८६ |
| | | ०१/०७/१९८६ ते ०६/०७/१९८६ |
| २४) | मा. श्री. एम. बी. नागराळ | ०७/०७/१९८६ ते ३०/०९/१९८७ |
| २५) | मा. श्री. एन. आर. रेणावीकर | ०१/१०/१९८७ ते २२/०६/१९८८ |
| २६) | मा. श्री. आर. जी. औरगाबादकर | २३/०६/१९८८ ते०४/०१/१९८९ |
| २७) | मा. श्री. व्ही. व्ही. औताडे | ०५/०१/१९८९ ते २२/०८/१९९१ |
| २८) | मा. श्री. एस. एन. गायकवाड | २३/०८/१९९१ ते ३१/०३/१९९३ |

| | | |
|---|---|---|
| २९) | मा. श्री. बी. एस. चौगुले | ३०/०६/१९९३ ते १२/०९/१९९३ |
| ३०) | मा. श्री. एस. सी. देवकर | १३/०९/१९९३ ते ०३/०८/१९९७ |
| ३१) | मा. श्री. पी. ए. वजेरी | ०४/०८/१९९७ ते १६/०७/१९९९ |
| ३२) | मा. श्री. पी. डी. कोळेकर | १६/०७/१९९९ ते ०५/११/१९९९ |
| ३३) | मा. श्री. डी. पी. मोरे | ०५/११/१९९९ ते २४/०४/२००० |
| ३४) | मा. श्री. पी. डी. कोळेकर | २४/०४/२००० ते २५/०४/२००० |
| | | ०८/०५/२००० ते ३१/०७/२००० |
| ३५) | मा. श्री. पी. डी. सोनावने | २५/०४/२००० ते ०८/०५/२००० |
| ३६) | मा. श्री. आर. बी. फातले | ०१/०८/२००० ते १६/०४/२००३ |
| ३७) | मा. श्री. डी. के. नलवडे | १६/०४/२००३ ते ०७/०६/२००३ |
| ३८) | मा. श्री. आर. बी. फातले | ०८/०६/२००३ ते ३०/०९/२००३ |
| ३९) | कु. शिल्पा प्रताप दरेकर | ०१/१०/२००३ ते १५/०१/२००५ |
| ४०) | मा. श्री. एम. शंकर नारायण | १५/०१/२००५ ते १०/०२/२००५ |
| ४१) | मा. श्री. सुनिल एम. पवार | १४/०२/२००५ ते ०१/०४/२००६ |
| ४२) | मा. श्री. सचिन एम. पवार | ०१/०४/२००६ ते २२/०४/२००६ |
| ४३) | मा. श्री. सुनिल एम. पवार | २२/०४/२००६ ते ३१/०५/२००६ |
| ४४) | मा. श्री. आर. सी. कांबळे | ३१/०५/२००६ ते ३०/०४/२००७ |
| ४५) | मा. श्री. सुनिल एम. पवार | ०१/०५/२००७ ते २०/०६/२०११ |
| ४६) | मा. श्री. मनोजकुमार देसाई | २०/०६/२०११ **कार्यरत.....** |

**संदर्भ-** *तासगाव नगरपलिका मुख्याधिकारी कालखंड यांच्या बोडावरून घेतलेली माहिती.*[२३]

## ३.५ तासगाव नगरपालिका जमा-खर्च

कोणतीही योजना आखायची व ती पूर्ण करायची म्हणजे आर्थिक पाठबळाशिवाय ती पूर्ण होऊ शकत नाही. शहराचे सौंदर्य विकास वाढवायचा असेल तर नगरपालिकेची तिजोरी भक्कम असली पाहिजे. ही क्षमता वाढवण्यासाठी तासगाव नगरपालिकेच्या माध्यमातून अनेक उपाय योजना आखण्यात आल्या. तासगाव नगरपालिकेचे उत्पन्न हे प्रामुख्याने नगरपालिका ‘दर व कर’ विशेष अधिनियमाखाली वसुली, नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगी सेवा यांच्यापासून मिळालेला महसूल आणि कर आकारणी, या व्यतिरिक्त शासकीय अनुदाने, अंशदाने व संकिर्ण कर याद्वारे मोठ्या प्रमाणात मिळतो. तर नगरपालिकेचा खर्च हा प्रामुख्याने सामान्य प्रशासनात करवसुली, सार्वजनिक सुरक्षितता व सोयी सुविधा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, शिक्षण व संकिर्ण कर यावर मोठ्या प्रमाणात होतो.

थोडक्यात नागरी विकासाची कामे नगरपालिकेकडे आर्थिक स्थैर्य असल्याशिवाय ती पूर्ण होऊ शकत नाहीत. तासगाव नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन स्थापनेच्या वेळचे उत्पन्न २२ रूपये होते तर ते आता जवळजवळ ३१.३९ कोटीच्या घरात गेले आहे.[२४]

**तक्ता क्र. ३ तासगाव नगरपालिकेचे उत्पन्न व खर्च (सन १९७१-१९७२ ते २०१०-१९११ पर्यंत)**

| अ.नं. | सन | एकूण जमा | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | १९७१ - १९७२ | ५,८९,०२६ | १,४६,२९० |
| २) | १९७२ - १९७३ | ५,६०,३१४ | १,३४,२८६ |
| ३) | १९७३ - १९७४ | ६,१७,३५२ | १,१२,०६४ |
| ४) | १९७४ - १९७५ | ६,८१,५७८ | ९३,५७० |
| ५) | १९७५ - १९७६ | ८,२५,७६७ | ९८,५९७ |
| ६) | १९७६ - १९७७ | ९,६६,५२८ | ९,४०,२५७ |
| ७) | १९७७ - १९७८ | १३,२०,३४३ | ४,०४,६६२ |
| ८) | १९७८ - १९७९ | १,७२,२२८ | ४,४७,६७४ |
| ९) | १९७९ - १९८० | २०५६५७० | ३,७३,३०८ |
| १०) | १९८० - १९८१ | ३७,८९,६६२ | २,८०,९०३ |
| ११) | १९८१ - १९८२ | ३८,८५,९४३ | ४५,८८,७९० |
| १२) | १९८२ - १९८३ | ४८,९४,६७७ | ६१७९३८ |
| १३) | १९८३ - १९८४ | ४७,८३,६३४ | ४,३२,५३३ |
| १४) | १९८४ - १९८५ | ५५,६९,६७८ | ३,७०,२२७ |
| १५) | १९८५ - १९८६ | ५२,२७,४६२ | ६,९५,४५४ |
| १६) | १९८६ - १९८७ | ५८,८८,६४२ | ११,१४,७९४ |
| १७) | १९८७ - १९८८ | ६९,४३,६२८ | ७८८२२५९ |
| १८) | १९८८ - १९८९ | ८४,५९,००० | ८५,२८,१३३ |
| १९) | १९८९ - १९९० | ९७,८३,७५९ | १,०५,६२,५०९ |
| २०) | १९९० - १९९१ | १,२४,६६,१६७ | १,२७,१३,७९२ |
| २१) | १९९१ - १९९२ | १,१५,१८,७५७ | १,२१,०८,५९२ |
| २२ | १९९२ - १९९३ | १,२१,८२,८८१ | १,४०,५४,२४१ |
| २३) | १९९३ - १९९४ | १,१०,३६,८१६ | १,३५,१०,१६६ |
| २४) | १९९४ - १९९५ | १,१३,३३,९४७ | १,३२,०४,५७७ |
| २५) | १९९५ - १९९६ | १,३७,३५,९४२ | १,५०,५७,०५५ |
| २६) | १९९६ - १९९७ | २,४७,७६,६६० | २,६०,८७,२७६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | १९९७ - १९९८ | ३,३५,८७,०३० | ३,८२,२१,४८७ |
| २८) | १९९८ - १९९९ | २,७३,५५,०७९ | ३,३९,६२,७६५ |
| २९) | १९९९ - २००० | १,९२,०९,८६३ | २,९०,५८,४५५ |
| ३०) | २००० - २००१ | २,५८,४६,८४७ | ३,७६,८५,५८५ |
| ३१) | २००१ - २००२ | २,९६,९९,९०८ | ४,२५,८६,७४६ |
| ३२) | २००२ - २००३ | ३३१४५,१८५ | ४,८२,७७,१२५ |
| ३३) | २००३ - २००४ | २,४७,७०,३६५ | ४,६९,७९,६७० |
| ३४) | २००४ - २००५ | ३३,३८,५५,०४९ | ३,७३,३२,९७ |
| ३५) | २००५ - २००६ | ४,३५,३३,७५१ | ३,७६,८६,४९१ |
| ३६) | २००६ - २००७ | ६,५९,११,८१७ | ३,८३,८५,८७३ |
| ३७) | २००७ - २००८ | १०,९९,४४,९७५ | ५,८८,९३,७९३ |
| ३८) | २००८ - २००९ | ९,९६,६९,९५९ | ८,२७,६७,५४४ |
| ३९) | २००९ - २०१० | १४,०६,५२,३७६ | १४,८२,१९,७०३ |
| ४०) | २०१० - २०११ | १०,९२,५९,८२७ | १३,२९,४९,१३२ |

**संदर्भ**-*तासगाव नगरपरिषद तासगाव तिमाही व वार्षिक लेखे सन १९७१-१९७२ ते २०१०-१९११ (संबंधीत वर्ष)* [२५]

तक्ता क्र. ३ वरून तासगाव नगरपालिकेच्या(सन १८६५) स्थापनेपासून ते आतापर्यंत नगरपालिकेच्या उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे. स्थापनेच्यावेळी उत्पन्न २२ रू. होते. ते २०१०-२०११ अखेर ३१.३९ कोटीपर्यंत गेलेले दिसून येते. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, तासगाव नगरपालिकेचे उत्पन्न हे खर्चापेक्षा कमी असल्याचे दिसून येते. यावरून तासगाव नगरपालिका शहराच्या विकासावर भरपूर खर्च करते असे दिसून येते.

नगरपालिकेच्या उत्पन्नात प्रामुख्याने नगरपालिका 'दर व कर' यांचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये संयुक्त मालमत्ता कर, करमणूक कर, मालमत्ता कर, जाहिरात कर, पाण्यावरील विशेष कर, पाणीपट्टी, कोंडवाडा व भंगीपट्टी यांचा समावेश होतो तर विशेष अधिनियमाखाली वसुलीमध्ये मोटार, व्हेईकल, वृक्ष उपकर, भेसळ प्रतिबंधक, बांधकाम विकास, गुंठेवारी विकास शुल्क यांचा समावेश होतो. तसेच अनेक अनुदाने व अंशदाने यांच्यामध्ये नागरी कुटुंबकल्याण केंद्र अनुदान, महागाई भत्ता व अनुदान, रस्ता अनुदान, करमणूक करातील अनुदान, प्रादेशिक पर्यटन विकास, वित्त आयोग अनुदान, जकात कर भरपाई, एकात्मिक शहर विकास यांचा समावेश होतो तर संकीर्णमध्ये गुंतवणूकीवरील व्याज, नक्कल फी, मतदारांच्या यादया, प्रकाशन, ऑडीट वसुली, विकास योजना, कर्ज, नुकसान भरपाई यांचा समावेश होतो.[२६]

नगरपालिकेच्या स्थापनेपासून तासगाव नगरपालिका सातत्याने शहराचे सौंदर्य विकास वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत होती. त्यासाठी नगरपालिका मोठ्या प्रमाणात खर्च करीत होती. नगरपालिकेच्या खर्चामध्ये प्रामुख्याने सामान्य प्रशासन यामध्ये प्रशासन करवसुली, परतावे, निवृत्ती उपदाने यावर होत होता तसेच सार्वजनिक सुरक्षितता व सोयीमध्ये होत होता. सर्वात जास्त पालिकेचा खर्च पाणीपुरवठा, साफसफाई, सोयी, प्रसुतीगृहे, बाजारपेठा, कत्तलखाने, साथीचे रोग निवारणे, जन्म-मृत्यू नोंदणी, स्मशानभूमी, सार्वजनिक बांधकाम व जलनिःस्सारण, उद्याने या शहराच्या मुलभूत गरजावर नगरपालिका मोठ्या प्रमाणावर खर्च करीत होती. नगरपालिका शिक्षण, अंशदाने व संकीर्ण यावरही खर्च करीत होती.[२७]

## ३.६ तासगाव नगरपरिषदेची उत्पन्नाची साधने

नगरपरिषदांना ऐच्छिक व आवश्यक स्वरूपाची कार्ये पार पाडण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध होणे नितांत गरजेचे असते. नागरिकांना आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, वाहतूक इत्यादीबाबत सुखसोई व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिकेकडे मुबलक पैसा असावा लागतो. १९९३ साली ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार राज्य वित्त आयोग (राज्यघटनेतील कलम २४३ आय) स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे वित्त आयोगाला नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. सामान्यतः राज्यशासन व नगरपरिषद यांच्या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वाटणी कोणत्या पद्धतीने करावी, नगरपरिषद कोणते कर बसवू शकते, नगरपरिषदांना राज्याच्या संचित निधीतून किती आणि कोणत्या प्रकारचे अनुदान द्यावे. नगरपरिषदाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कोणते उपाय योजावेत इत्यादी बाबत शिफारशी करण्याचा अधिकार राज्य वित्त आयोगाला प्राप्त झालेला आहे.[२८] नगरपालिकेला कर, अनुदान व कर्ज या तीन मार्गाने उत्पन्न मिळते.

## अ) कर रूपाने मिळणारे उत्पन्न

तासगाव नगरपालिकेचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन म्हणजे करापासून मिळणारे उत्पन्न. ते पुढील प्रकारे कर लावते.

**१) मालमत्तेवरील कर**

यामध्ये सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, घरपट्टी, दिवाबत्ती, स्वच्छता व जलनिःस्सारण कर, अग्निशामक कर, पर्यावरण कर इत्यादीचा समावेश होतो. तासगाव नगरपालिकेला मालमत्तेवरील करापासून(सन २००४-२००५) एकूण मागणी रू. ७७,४८,६८० होते, दरडोई रू. १८७.०८ इतके होते.

**२) पाणीपट्टी**

तासगाव नगरपालिकेची पाणीपट्टी एकूण मागणी(सन २००९-२०१०) अखेर ६७ लाख ८६ हजार आहे. पूर्वी प्रत्येकी रूपये मागणी ८०६ होती. ती आता १,२०० रूपये करण्यात आली आहे. या पासून नगरपालिकेच्या एकूण उत्पन्नात वाढीव दराने १.५% पट सुमारे २० लाख रूपयाची वाढ झाली आहे. [२९]

**३) जकात कर**

२६ एप्रिल १९९९ पासून महाराष्ट्र शासनाने जकात कर रद्द केलेली आहे. त्यानुसार तासगाव नगरपालिकेला शासन निर्णय क्र.१ शासन पत्र नगर विकास विभाग, व शासन निर्णय क्र.२, शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.१ आकनि, १९९९/८/अर्थसंकल्प/१५/ दि.२६/४/१९९९ नुसार जकात वसुली बंद करण्यात आली. त्या ऐवजी नगरपालिकांना विशेष अनुदान देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. [३०]

i) सॅनिटरी सेस ४३,७४०

ii) फार्म विक्री ५०,४८५ (टेंडर फार्म इतर फार्म)

iii) लायसेन्स फंड ४,४४०

**६) नागरी संस्थेच्या मालमत्तेतून उत्पन्न**

भाड्याने दिलेले दुकान गाळे, बाजार भाडे व इतर या माध्यमातून तासगाव नगरपालिकेला वार्षिक उत्पन्न ६२७.१३ लाख रूपये मिळते.

**७) करमणूक कर**

चित्रपट, नाट्यगृह, मनोरंजनाचे कार्यक्रम प्रदर्शने यावरील कर नगरपालिकेला मिळतो.

**८) वाहनावरील कर**

वाहने व जनावरांच्या करांचे उत्पन्न नगरपालिकेला मिळते.

**९) इतर स्त्रोतापासूनचे उत्पन्न**

घनकचऱ्यावरील कर, यात्रेकरूवरील कर, कुत्र्यावरील कर, खाजगी स्वच्छता गृहे व जागा यावरील विशेष कर रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी उभ्या केलेल्या वाहनावरील कर, पथकर या माध्यमातून तासगाव नगरपालिकेला वार्षिक उत्पन्न १०,७७,६९१ रूपये मिळतात.

१) व्यापार, व्यवसाय, नोकऱ्यावरील कर

२) सामाजिक वनीकरण व वृक्षसंवर्धन कर

३) केंद्र व राज्य शासनाच्या योजनासाठी निधी सन २००६-२००७ अखेर अखर्चीत अनुदान

i) वित्त आयोग विकास निधी रू. ८५

ii) दलित वस्ती सुधारणा निधी रू. ९६.६२

iii) रस्ता अनुदान निधी रू. ८३.८१

iv) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अनुदान एकूण रूपये २६६.१४ लाख.[३१]

## ३.६.१ शासकीय अनुदाने

नगरपालिकांच्या विकास योजनाची अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून अनुदान मिळते. पाणीपुरवठा योजना, रस्ते बांधणी व दुरूस्ती, सांस्कृतिक भवन निर्मिती, शिक्षण व आरोग्यविषयक सुविधा इत्यादी कार्यासाठी तासगाव नगरपालिका '**क**' वर्ग असल्याने शासनाकडून नगरपालिकांना ३३% अनुदान खर्चाच्या प्रमाणात मिळते.

पाणीपुरवठा, जलनिःस्सारण, प्राथमिक व दुय्यम शिक्षण विकास योजना व नगररचना योजना, आरोग्य, अग्निशामक दल, रस्ते बांधणी व दुरूस्ती नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना महागाई भत्ता, सहाय्यक अनुदान(कर्मचारी मासिक वेतन खर्च रू.१४ लाख) इत्यादी कार्यासाठी नगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असते.[३२]

## ३.६.२ कर्ज

दीर्घकालीन योजना व कार्ये पार पाडण्यासाठी नगरपरिषद कर्जाची उभारणी करू शकते. विकास योजना राबविण्यासाठी १/३ रक्कम अनुदानाद्वारे व २/३ रक्कम नाममात्र व्याजदराने कर्ज स्वरूपात मिळते.

सामान्यतः जमिनीच्या खरेदीसाठी, जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी किंवा वाहन खरेदीसाठी शासनाच्या संमत्तीने नगरपालिका कर्ज घेते.[३३]

### ३.६.३ जकात

२६ एप्रिल १९९९ पर्यंत तासगाव नगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये जकात कर ही महत्वाची भूमिका पार पाडत होती. सरकारने ठरविले त्या नियमाप्रमाणे जकात कर घेतला जात होता. सन १९९९ पर्यत जकात विभागाकडून नियमाप्रमाणे मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत होते. जकात वसुलीकरीता नगरपालिकेचा स्वतंत्र विभाग असून त्याच्या वसुलीसाठी व देखरेखीसाठी व स्थायी आस्थापनेवर जकात अधिक्षकांची नियुक्ती केली होती. त्या विभागातील सर्व कामे या अधिकाऱ्यामार्फत केली जात होती. जकातीच्या नियमानुसार शहरात विविध वस्तू आयात होणाऱ्या मालावर जकात वसूली केली जात होती. निरनिराळ्या वस्तू जकातपात्र असतात. काही जकात मालाच्या किंमतीवर आकारली जात होती. शहरात आयात होणाऱ्या मालाची जकात वसुली करण्यासाठी नगरपालिकेने ज्या मार्गाने माल आयात होईल अशा ठिकाणी जकात नाकी बसविली होती. तासगाव शहरात जकात नाकी पुढीलप्रमाणे होती.[३४]

१) सांगली नाका २) भिलवडी नाका

३) ढवळी नाका ४) कुंभार नाका

५) विटा नाका

वरील सर्व नाक्यावर आवश्यक तेथे फोनची व्यवस्था करण्यात आली होती. तासगाव नगरपालिकेच्या भरीव उत्पन्नामध्ये जकात महत्वपूर्ण भूमिका पार पाडत होती.

७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक, आर्थिक, व सामाजिक अभिवृद्धि साधण्याचे स्वातंत्र आणि जबाबदारी नगर प्रशासनावर सोपवली असली तरी अजूनही नगर प्रशासनावर आणि प्रशासकीय बाबीवर राज्य सरकारचे नियंत्रण वाजवीपेक्षा जास्त आहे. नागरी विभागातील जमिनीवर कर लावण्याचे मालमत्ता कर वाढवून त्यात बाजार मुल्यानुसार वेळोवेळी वाढ करण्याचे स्वातंत्र्य नगर प्रशासनाला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी दुर्लक्षित आहे. जकातीच्या माध्यमातून नियमितपणे मिळणारा निधी २६ एप्रिल १९९९ पासून महाराष्ट्र शासनाने जकात कर रद्द केलेला आहे. त्याऐवजी विशेष अनुदान देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

तासगाव नगरपाालिकेला शासन निर्णय क्र.१ शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.२ आकनि १९९९/८/अर्थसंकल्प/१५/दि.२६/४/१९९९ नुसार जकात वसुली बंद करण्यात आली. त्यामुळे

तासगाव नगरपालिकेला खर्चासाठी राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागते. पण हे अनुदान अपुरे आहे. आणि ते वेळेवर मिळत नाही. त्यामुळे नगर प्रशासनाच्या आर्थिक कारभारावर विपरित परिणाम झाले आहेत.[३५]

## ३.७ नगरपरिषदेवरील राज्यशासनाचे नियंत्रण

स्थानिक स्वराज्य संस्था या नात्याने नागरी प्रशासनातील नगरपरिषद ही स्थायत्त संस्था आहे. तरी पण राज्यशासनाचे नगरपालिकावर नियंत्रण असते. कायदेमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण होत असतात. तेंव्हा राज्य शासनाचे नगरपालिकावर सर्वसाधारण नियंत्रण असते. राज्य शासन, संचालक, जिल्हाधिकारी याद्वारे नगरपालिकेच्या आर्थिक व प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवीत असते.[३६]

## ३.८ पाणीपुरवठा

मानवाच्या जीवनावश्यक गरजापैकी 'पाणी' ही प्रमुख गरज आहे. तासगाव नगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकाना पाण्याची सोय नव्हती. येथील नागरिकांना भर उन्हाळ्यात व पावसाळ्यात दूरवरून पाणी आणावे लागत होते. कपडे धुण्यासाठी ओढ्याला जावे लागत असे. त्यासाठी नगराध्यक्ष सौ. पद्मावती गणपतराव कोळी यांनी नगरपालिकेच्या एकूण पाणी योजनेच्या खर्चाच्या रक्कमेपैकी १०,००० रूपये भरले व तत्कालीन नगरपालिकेच्या शिष्टमंडळाने मुंबईला जावून पाणी योजना मंजूर करून आणली. वसंतरावदादांच्या हस्ते सन १९६६ मध्ये नळपाणी योजनेचे भूमिपूजन झाले. तासगावमधील दत्तमाळावर पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण केले व तासगावला नगरपालिकेला पाणी आणले होते.

तासगाव शहराला सुधारित पाणीपुरवठा योजना ही भिलवडी जॅकवेल येथून ६,२०० मीटर वितरण नलिका २,३१० मीटर रायझिंग मेन लाईन, ७५ एच. पी. पंप नग-३ बसविले आहेत. तसेच दत्तमाळावरील पाण्याची टाकी, स्वतंत्र पंपाने भरण्याची व्यवस्था केली आहे. यावरील मंजूर खर्च रूपये १.६८ कोटी नगरपालिकेने केला आहे. नगरपालिकेने वेळच्यावेळी लोकसंख्येच्या ३३,४३५ तुलनेत नियोजनात्मक दररोज दोन तास ३३,५०,००० लिटर(प्रत्येकी १००लिटर) इतका आवश्यक सर्वांना समान स्वच्छ पाणीपुरवठा केला जातो. पाणीसाठा क्षमता(जलशुद्धीकरण केंद्र) ३४ लाख लिटर इतका आहे. शासन निकषापेक्षा नगरपरिषद करीत असलेला पाणीपुरवठा '**क**' वर्ग नगरपरिषदेसाठी अनुज्ञयापेक्षा जास्त आहे. या योजनेची देखभाल दुरूस्ती नगरपालिका स्वत: करते.[३७]

तासगाव नगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि नगर विकास विभाग मंत्रालय, अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन २००८-२००९ मध्ये भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू स्वच्छ शहर स्पर्धा यामध्ये तासगाव नगरपालिकेने उल्लेखनीय काम करून विविध बक्षिसे मिळविलेली आहेत ती पुढीलप्रमाणे [३८]

**तक्ता क्र. ४ संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान बक्षीस**

| अ.क्र. | सन | स्तर | क्रमांक | रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १) | २००३-२००४ | जिल्हास्तरीय | द्वितीय | ३,००,००० |
| २) | २००७-२००८ | विभागीय | उत्तेजनार्थ | ५,००,००० |
| ३) | २००८-२००९ | विभागीय | उत्तेजनार्थ | ३,००,००० |
| ४) | २०११-२०१२ | राज्यस्तरीय | द्वितीय | २०,००,००० |

तक्ता क्र. ४ वरून तासगाव नगरपालिकेचे काम आदर्श असल्यामुळे सलग चार वेळा संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान स्पर्धेचे बक्षीस जिंकण्यात तासगाव नगरपालिकेला यश मिळाले आहे.

## ३.८.१ महाराष्ट्र शासन जीवन प्राधिकरण योजना(UIDSSMT)

तासगाव शहराची सन २०५१ ची संभाव्य लोकसंख्या गृहीत धरून पाणी व्यवस्थेचा आराखडा नुकताच जीवन प्राधिकरण योजनेकडे ७५,२०,२०० इतका निधी मागणी प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. तसेच ०७.८ M.L.D तसेच UIDSSMT योजने अंर्तगत नवीन ५.०० द. ल. लीटरचे S.S.M.I.D क्षमतेचे नवीन जलशुद्धीकरण केंद्र बांधण्याचे काम सुरू असून ७५% काम पूर्ण झाले आहे.

महाराष्ट्र शासन जीवन प्राधिकरण योजना(UIDSSMT) मार्फत भिलवडी जॅकवेल ते पाचवा मैल जलशुद्धीकरण केंद्रापर्यत स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक मोटारीने रायझिंग मेन लाईन, ४०० एम. पी. साइज, १०,१०० मीटर बदलण्याचे काम ७५% काम पूर्ण व जोतिबा मंदिर दत्तमाळ पाण्याची टाकी रायझिंग मेन लाईन २५० एम. एम. साइज, २,४९० मीटर वितरण नलिका बदलण्याचे काम ७६% पूर्ण झाले आहे. तीन नवीन पाणी साठवण टाक्या आहेत.

शहरातील प्रत्येक कुटुंबाला २४ तास नळाद्वारे पाणीपुरवठा, मीटरद्वारे पाण्याची बिले तसेच संगणकाद्वारे या व्यवस्थेचे नियंत्रण ठेवले जाणार आहे. अशा विविध सोयीसुविधांनी युक्त असलेली,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेचे काम ७६% पूर्ण झाले आहे. ते आता लवकरच नगरपालिकेच्या स्वाधिन होणार आहे.[३९]

**अ) तासगाव शहराला पाणी पुरवठा करणारे कोष्टक** (सन २००६-०७ दर दिवशी दरडोई)

| | |
|---|---|
| १) स्वत:च्या स्त्रोतापासून दैनिक उपलब्ध पाणीपुरवठा | ०३.३५ M.L.D |
| २) जलशुद्धीकरण क्षमता | ०७.८ M.L.D. |
| ३) एकूण दैनिक पाणीपुरवठा | ०३.३५० M.L.D. |
| ४) लोकसंख्या(२००१ जनगणनेनुसार) | ३३,४३५ |
| ५) पाणी पुरविण्याचे एकूण तास | २ तास[४०] |

तासगाव शहर पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्या कालबाह्य झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा करताना पुन्हा पुन्हा व्यत्यय होत असल्याचे आढळते. शहर पाणीपुरवठा व वितरण व्यवस्थेचे काम पुन्हा नव्याने होणे गरजेचे वाटते.

**तक्ता क्र. ५ तासगाव शहराला पाणीपुरवठा योजनेवरील वार्षिक खर्च** (सन २००६-०७)

| | | |
|---|---|---|
| १) | पाणी खरेदीवरील खर्च | ८,३०,७३९ |
| २) | पाणी शुद्धीकरणावरील खर्च | ३,१७,२२० |
| ३) | विजेवरील खर्च | ४६,९०,६९२ |
| ४) | देखभाल व दुरूस्ती खर्च | १४,१६,८६८ |
| ५) | कर्मचारी व आस्थापनावरील खर्च | १४,२०,९०६ |
| ६) | इतर खर्च हमी शुल्कासह | ४,९७,५०६ |
| ७) | व्याज व घसरा खर्च | २३,३५,८४५ |

संदर्भ-*गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००५-२००६ पृष्ठ ९.*[४१]

## ३.९ सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता

कोणत्याही नगरपालिकेला कायद्याचे काटेकोरपणे पालन करावे लागते. तसेच आवश्यक कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्या दृष्टीने तासगाव नगपालिकेने शहराच्या आरोग्यावर पहिल्यापासून लक्ष दिल्याचे दिसून येते. तासगावचे नैसर्गिक वातावरण स्वच्छ, आल्हाददायक आहे. तासगाव नगरपालिकेने आरोग्याच्या बाबतीत प्रामुख्याने साथीच्या रोगापासूनचा प्रसार थांबविणे, शहरातील सांडपाणी व गटारे यांची स्वच्छता करणे. गरीब लोकांना मोफत औषधोपचार करणे इत्यादी गोष्टीवर भर दिलेला दिसून येतो.

सन १९३२-१९४८ साली तासगाव नगरपालिकेने जास्तीत जास्त खर्च सार्वजनिक आरोग्यावर केला होता. कारण शहरात (सन १९३२-३४-४५) मध्ये प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. नगरपालिकेने तत्काळ उपाय योजना म्हणून प्लेगचा प्रसार रोखण्यासाठी लोकांच्यामध्ये जागृती करून मोफत औषधोपचाराची सोय केली होती. तसेच नागरिकाचे इतर ठिकाणी स्थलांतर केले. या साथीमध्ये किती लोक मृत्यूमुखी पडले याचा आकडा उपलब्ध नाही. पण बरेच लोक गाव सोडून गेल्याने शहर ओस पडले होते. यावेळी तासगाव हायस्कूल फक्त पाच मुलासह दत्तमाळावर झोपडीत भरत होते.[४२] अशा साथीचा प्रसार होवू नये म्हणून नगरपालिकेने उंदीर निर्मुलनीकरण, भटकी कुत्री, डुक्कर पकडणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे, कचरा उठाव करणे इत्यादी उपाय योजना नगरपालिकेमार्फत सातत्याने राबविल्या जातात. त्यामुळे सध्या तासगाव शहरात देवी, कॉलरा, प्लेग, कावीळ या सारख्या रोगांचेही उच्चाटन झाले आहे.

शहरातील आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी पूज्य कस्तुरबा प्रसूती गृहामार्फत ट्रिपल पोलिओ, क्षयरोग, काविळ प्रतिबंधक लस मोफत टोचली जाते. साथीचा फैलाव वेळीच थांबविण्यासाठी पाणी निर्जंतूक केले जाते. हल्ली आपल्या देशातून, जगातून देवीच्या रोगाचे उच्चाटन झाल्यामुळे देवीची लस टोचण्याचे काम बंद आहे. फ्ल्यू, मलेरिया, डेंगू याही रोगांनी बऱ्याच वेळा डोके वर काढलेले दिसते. १९७० पर्यंत शहरात मलेरिया अस्तित्वात होता. नगरपालिकेने शहरातील पाणस्थळ डबकी, जागा दररोज क्रुडाईलने स्प्रे करण्याची मोहिम तसेच डी.डी.टी. व मॅलिथियॉनने संपूर्ण शहरातील घरात, गल्ली बोळात टप्प्याटप्प्याने सन १९७७-७८ पर्यंत फवारण्यात आली होती.[४३]

शहराचे एकूण क्षेत्रफळ ४३.४१ चौ. कि. मी. आहे. शहरामधून कापूर ओढा वाहतो. त्यास शहरातील गटारी मिळवण्यात आली आहेत. सध्या शहरातील गटारे पक्की बांधण्यात आली आहेत. डोक्यावरून मैला वाहतुकीची पद्धतही बंद आहे. शासनाने आर्थिक मदतीचे प्रोत्साहन दिल्याने शहरातील पाटीचे संडास बंद होऊन त्याचे जल संडासमध्ये रूपांतर झाले आहे. शहरातील कचरा व मैला यापासून बंगलोर पध्दतीने कंपोस्ट खत तयार करून विकले जाते.[४४]

## अ) सध्या शहरातील शौचालयाची स्थिती

सध्या तासगाव शहरातील शौचालय एकूण ६३ युनिट ३०६ सिटस् ११८ पुरूष १८८ स्त्रिया तर मुतारी एकूण २९ युनिट ६६ सिटस ६१ पुरूष ५ स्त्रियांसाठी आहेत.

**तक्ता क्र. ६ शौचालय व्यवस्थापन** (संदर्भ वर्ष मार्च २०११)

| | | |
|---|---|---|
| i) | एकूण घरांची संख्या | ६,७६५ |
| i) | वैयक्तिक शौचालय असलेल्या घरांची संख्या | ४,३३७ |
| iii) | शौचालय नसलेल्या घरांसाठी सार्वजनिक सीट्सची संख्या प्रमाण | ३०६ |
| iv) | पुरेशा पाणी पुरवठा असलेल्या शौचालय संख्या | सर्व |
| v) | विद्युत पुरवठा असलेल्या शौचालय संख्या | सर्व |
| vi) | सांडपाणी व्यवस्थेशी जोडलेल्या शौचालय संख्या | सर्व |
| vii) | उघड्यावर बसण्याची पद्धत | बंद |

संदर्भ-*संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००५-०६* [४५]

तक्ता क्र. ६ वरून आपणास असे दिसते की सध्या शहरात जवळजवळ सर्वांचे संडास असून सर्व सोयींनी युक्त सांडपाण्याच्या व्यवस्थेशी जोडलेली आहेत. त्यामुळे निश्चितच आरोग्यावर चांगला परिणाम होत आहे.

## अ) नगरपालिकेची आरोग्य सेवाबाबत दक्षता

शहरामध्ये स्वच्छता अभियान दर दोन महिन्यांनी राबविले जाते. पाणी गाळून उकळून पिण्याबाबत सूचना प्रसारमाध्यमामार्फत दिल्या जातात. शहरात सर्व भागात फॅमिंग मशिनद्वारे फवारणी केली जाते. सर्व डॉक्टर, सेवाभावी संस्थाची कार्यशाळा आयोजित केली जाते. तसेच प्रत्येक गरोदर मातांना प्रसुती पूर्व निदान न करण्याविषयी सल्ला व मार्गदर्शन प्रसुती गृहामध्ये केले जाते. तसेच शहरामध्ये सोमवार ते शुक्रवार विविध भागांमध्ये लसीकरण केंद्रे नियमित वेळी नियमित तारखांना चालवली जातात. शिवाय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम चालू आहे. साथीचे रोग टाळण्यासाठी पावसाळ्याच्या सुरूवातीपासून पाणी गाळून, उकळून पिण्याबाबत सूचना प्रसारमाध्यमामार्फत केल्या जातात. पाण्यामध्ये ब्लीचिंग पावडर जंतूनाशके टाकण्यात येतात. कावीळ वैगेरे लसीकरण करून घेण्यास लोकांना प्रवृत्त केले जाते. केबलद्वारे किंवा सिनेमा गृहामध्ये स्लाईड दाखविल्या जातात. फॅमिंग मशिनने फवारणे व बी.सी.एस.सी. जंतुनाशक पावडर गटारीमध्ये टाकली जाते.

## ब) नगरपालिकेने मलेरिया रोखण्यासाठी पुढील पावले उचलली आहेत.

१) नियमित घरभेटी.

२) ताप रूग्णांचा शोध घेणे.

३) गृहित उपचार देणे.

४) दुषित रक्त असल्यास समूह उपचार देणे.

५) किटक शामियाना पाहणी करणे.

६) गप्पी मासे सोडणे.

७) धुर फवारणी करणे.

८) गोळ्या वाटप केंद्रे कार्यान्वित ठेवणे इ.

तसेच दर १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरी काढली जाते. यामध्ये महाविद्यालये, हायस्कूल, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात असतो. तसेच शासकीय कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, नगरसेवक आदी सर्व लोकांचा सहभाग असतो.[४६]

**तक्ता क्र. ७ माता बाल संगोपन सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमात मार्च २०१० अखेर झालेले काम व उद्दिष्टांची टक्केवारी (संदर्भ वर्ष २०१०-११)[४७]**

| अ.नं | साथीचे रोग | एकूण | ग्रामीण | शहरी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | डीपीटी | ४०१८ | ३५३९ | ४७९ | ८१% |
| २) | पोलीओ | ४०१८ | ३५३९ | ४७९ | १०५% |
| ३) | गोवर | ३९६९ | ३३३३ | ६३६ | ६८% |
| ४) | बीसीजी | ४०४ | ३४१ | ५७३ | १२५% |
| ५) | टीटी ANC | ३३९५ | ३२५२ | १४३ | ८७% |
| ६) | डीटी | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ८९% |
| ७) | डीटी १० वर्ष | ४७२० | ४३८३ | ३३७ | ५०% |
| ८) | डीटी १६ वर्ष | ३८७३ | ३४६६ | ४०७ | ४९% |
| ९) | गरोदर स्त्रिया | ४५४० | ३६६५ | ८७५ | १००% |

तक्ता क्र. ७ वरून तासगाव शहरामध्ये माता बालसंगोपन सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमां अर्तगत मार्च २०१० अखेर झालेले काम कस्तुरबा प्रसुती गृहामार्फत घरोघरी जाऊन जनजागृती करून, शिबिरे घेऊन लसीकरणाची मोहिम राबवून उद्दिष्टापेक्षा जास्त काम केल्याचे दिसून येते.

## ड) सार्वजनिक आरोग्य तक्ता

१) शहरातील एकूण लोकसंख्या ३३,४५७

| | |
|---|---|
| २) शहरातील एकूण दवाखाने | ३६ |
| ३) रूग्णालयांची संख्या | ४६ |
| ४) शासकीय दवाखाने | ०२ |
| ५) डॉक्टर्स | पंजीकृत डॉक्टर्स |
| ६) अस्थिरोग तज्ञ | ०१ |
| ७) बालरोग तज्ञ | ०३ |
| ८) नाक कान घसा तज्ञ | ०१ |
| ९) न्यूआनेटल सेंटर आय. सी. यू. | ०१ |
| १०) सिटी स्कॅन सेंटर | ०३ |
| ११) सोनोग्राफी सेंटर | ०१ |
| १२) प्रसुतीगृहे | ०५ |
| १३) सर्जन | ०३ |
| १४) दंतरोग | ०४ |
| १५) नेत्ररोग तज्ञ | ०२ |
| १६) पॅथोलॉजिस्ट | ०७ |
| १७) आयुर्वेद स्पेशालिस्ट | १० |
| १८) होमिओपॅथीक तज्ञ | ०४ [४८] |

## ३.१० घनकचरा व्यवस्थापन

तासगाव नगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यावरील कचरा गोळा करणारी प्रायोगिक तत्वावरील घंटागाडी आहे. सहा घंटागाड्या १५ कामगार होते. नगरपरिषदेला कचरा गोळा करणे कामी दि. युनायटेड वेस्टर्न बँकेकडून पाच घंटागाड्या, शिवाय ठिकठिकाणी कचरा कुंड्यामधील कचरा डंपीग वाहनाने कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचे गांडूळ खत तयार केले जाते.

खाजगीकरणातून (B.V.G.India Ltd) कंपनीला तासगाव नगरपालिकेने दर महिन्याला ५ लाख १० हजार ९८९ रू. तर वर्षाला जवळजवळ ६० लाख रूपयाचे टेंन्डर कचरा उठाव व शहर स्वच्छतेसाठी दिले आहे. या कंपनीकडून यांत्रिक पद्धतीने रस्ते स्वच्छतेचे काम रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत(Road sweeper) काम केले जाते. रिक्षा घंटागाडी, गारबेज, कॉम्पॅक्टर मैला टँकर, गारबेज कॉम्पॅक्टर ६ घंटागाड्या ६५ कर्मचारी आहेत.

i) कचरा कुंड्यातील अंतर ५०० मी

ii) एकूण कचरा कुंड्या ११

iii) कचरा कुंड्याची क्षमता २०० कि. ग्रॅ.

iv) डंपींग ग्राऊंडवर थेट वाहून नेण्यात येणारा कचरा ६ टन. भाजी मार्केटचा कचरा गोळा करून पाठविला जातो.

vi) मटण मार्केट व दवाखान्याचा कचरा नगरपालिकेकडे पोहचविले जाते.

vii) वाळलेला कचरा गोळा करताना प्रामुख्याने प्लास्टिक, धातू, काच, इत्यादी पदार्थ वेगळे करून नगरपरिषद कर्मचारी ट्रॉलीला लावण्यात आलेल्या पिशव्यामध्ये जमा होणारा एकूण वाळलेला कचरा ६ टन.[४९]

## ३.११ रस्ते

रस्त्यांना रक्त वाहिन्या म्हणून ओळखले जाते. रस्ते हे कोणत्याही शहराच्या विकासाला हातभार लावतात. ब्रिटीश कालखंडात रस्त्याचे महत्व ओळखून रस्त्यावर बराच खर्च केलेला दिसून येतो. तासगाव शहरातील एकूण रस्त्यांची लांबी २०१० अखेर ४२.९६ कि. मी. आहे. तासगाव नगरपालिके मार्फत शहरातील स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, नवीन रस्ते, कच्चे व पक्के मार्ग त्यांची आखणी करणे. त्याचबरोबर शहरात आठवड्याच्या वारानुसार पेठा वसविल्या आहेत. रत्याच्या दोन्ही बाजुनी, चौकामध्ये, इमारतीच्या ठिकाणी दिवाबत्ती यांची सोय करणे ही नगरपालिकेची कर्तव्ये असतात.[५०]

सार्वजनिक रस्ते बांधणे हे नगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य मानले जाते. त्यानुसार नगरपालिकेने नगर विकास योजनेनुसार शहरातील प्रमुख रस्ते रूंद करण्यात आले आहेत. तासगाव एस. टी. स्टँड ते दत्तमाळ हा सुंदर रस्ता करण्यात आला. सिध्देश्वर चौक ते एस. टी. स्टँड हा रस्ता अतिशय गजबजलेला असतो. त्यावरील वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी नवीन शंभर फुटी रस्ता तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. शहरातील सर्व रस्ते डांबरीकरण केले आहेत. काही रस्ते दगडी फरशीचे आहेत. परंतु त्याची देखभाल व दुरूस्ती व्यवस्थित केली जात नाही.[५१]

### अ) नगरपालिकेने रस्त्यावर केलेला खर्च

तासगाव नगरपालिकेला पंचवर्षिक योजनेतील तरतुदीप्रमाणे रस्ते देखभाल व दुरूस्ती यासाठी शासनाकडून अनुदानाची तरतूद २००६ पर्यत वार्षिक २० लाख रूपये तर २००६ नंतर शासनाकडून अनुदानाची तरतूद १ कोटी रूपये केली आहे.

तासगाव शहरामध्ये रस्त्याची एकूण लांबी ४२.९६ कि.मी. २०१० अखेरची आहे. फुटपाथ ६० मीटर आहे. तसेच नवीन बांधकामे चालू आहेत.

| | |
|---|---|
| अ) सिमेंट/काँक्रीट | ०१.१९२ कि. मी. |
| ब) डांबरी | १६.११ कि. मी. |
| क) खडीचे | ०७.६३ कि. मी. |
| इ) दगडी फरशी | ०४.००८ कि. मी. |
| फ) इतर | १९.०२ कि. मी. |

## ब) रस्ता सजावट उपाययोजना

सूचना फलक तसेच पार्किंग लाईन सेंटर, लाईन व दुरूस्ती साफसफाई तसेच वेग गतिरोधकांची रचना व्यवस्थित व योग्य केली आहे.

| | |
|---|---|
| एकूण रस्त्यापैकी डिव्हायडर्स | ५ कि. मी. आहे. |
| स्टीट लाईट लावलेल्या दिव्यांची संख्या | १,४२१ |
| स्टीट लाईटवर वार्षिक देखभालीवरील खर्च | १,०१,१७२ |

## क) स्टीट लाईट सुधारणा उपाय योजना

शहरातील दिवे जास्त वेळ चालू नयेत यासाठी टायमर बसविले आहेत व जादा प्रकाश मिळावा, मेन्टनन्स खर्च कमी करण्यासाठी ट्यूब लाईट काढून सोडियम व्हेपर दिवे लावण्यात आले आहेत. चालू खांबाना आर्थिंग ठेवले आहे.[५२]

## ड) बगीचे/उद्याने/क्रीडांगणे

शहरात बगीच्यांची संख्या - ३ जागेचे क्षेत्र अंदाजे तीन एकर

## १) बगीच्यांची गुणवत्ता

शहरातील महात्मा गांधी उद्यान सुधारण्यासाठी काम सुरू आहे. लहान मुलांसाठी खेळण्याची व्यवस्था करण्यासाठी ठराव मंजुरी दिलेला आहे. तसेच नाना-नानी पार्कचे काम सुरू आहे.

## इ) नागरिकासाठी क्रीडांगणे

१. तालुका क्रिडा संकुलनाचे काम सुरू आहे.

२. स्विमिंग पूल क्रीडांगण व बॅडमिंटन कोर्टचे काम प्रस्तावित आहे.

३. शहरात क्रीडांगण खाजगी संस्थेची आहेत.

४. नगरपालिकेमार्फत क्रीडामंडळांना अनुदान दिले जाते.

५. खाजगी संस्थेची सुसज्ज व्यायाम मंडळे आहेत. सर्वात जुने श्रीपाद व्यायाम मंडळ १९४८ सालचे आहे तर दर्यावर्दी किसान व्यायाम मंडळ १९५७ सालचे आहे.

## नागरी सुविधा

नगरपालिकेचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे शहरातील लोकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काय उपाय योजना केल्या आहेत तसेच त्याचा स्तर काय आहे त्या पुढीलप्रमाणे -

### मार्केटस्

शहरामध्ये अद्यावत असे शॉपिंग सेंटर व भाजी मार्केटचे बांधकाम चालू आहे. सोमवार पेठेत मटण मार्केट आहे. शहरात आठवडा बाजार सोमवार व गुरूवारी भरतो. तर दररोज फळे भाजी कासार गल्ली येथे मिळते.

### अ)बेदाणा मार्केट

तासगाव शहरामध्ये बेदाण्याची जवळजवळ ८५ अडत दुकाने आहेत. तेथे बेदाण्याचे खुले सौदे केले जातात. तासगावमधील बेदाण्याला मोठी परदेशी बाजार पेठ मिळाल्यामुळे परदेशी गुंतवणुकीची उलाढाल येथे होते. बेदाणा उद्योगामुळे तासगावची आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

### ब) आठवडा बाजार

शहरामध्ये सोमवार व गुरूवार असे दोन आठवडा बाजार भरतात. सदर बाजारामध्ये पाणी, दिवाबत्ती व साफसफाई नगरपालिकेमार्फत केली जाते. रहदारीस अडथळा होणार नाही, अशा रस्त्यावर भाजीपाला फळे वगैरे विक्री करणाऱ्या लोकांना परवानगी दिली जाते.[५३]

### अग्निशामक दल

तासगाव नगरपालिकेकडे ४ अग्निशामक दलातील वाहने आहेत. १ फायर फायटर १ ड्रायव्हर व १ क्लिनर आहेत. यावर होणारा वार्षिक खर्च रूपये २,१०,१६२ आहे.[५४]

**शहरातील वृक्षांची संख्या**

वृक्षगणनेनुसार सन २००१-२०१० अखेर १७,००० वृक्ष आहेत.

**तक्ता क्र. ८ नगरपालिकेमार्फत करण्यात आलेले वृक्षारोपन** [५५]

| अ.नं. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | ००१ | ००२ | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० |
| संख्या | ५०० | ३७०० | ६७९० | ११०९ | ५०० | ७०० | २६५८ | २०४५ | १९४५ | १००००० |

तक्ता क्र. ८ वरून तासगाव नगरपालिकेमार्फत वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात करण्यात आलेले आहे. सदर वृक्षांचे चांगले संगोपन करण्याची गरज आहे.

## ३.१२ सामाजिक सुविधा

### अ) शहर विकास आराखडा

सन १९९२ ला तासगाव शहर विकास आराखडा मंजूर झाला असून एकूण ८३ जागांवर आरक्षणे असून ५ विकसित तर ७८ जागांवर आरक्षणे नगरपालिकेने विकसित करण्याचे आहेत.

एकूण आरक्षित क्षेत्र ०३.५४ चौ. कि. मी.

शहराचे एकूण क्षेत्र ४३.४१ चौ. कि. मी.

(३.५४ द १००) /४३.४१ = ८.१५ %

एकूण विकसित झालेल्या जागेची टक्केवारी ७.७३% असून आजपर्यंत विकसित केलेल्या जागा ५ आहेत. भूसंपादनाद्वारे जमिनी ताब्यात घेतल्या आहेत. जागा विकसित करण्यासाठी नगररचना योजनेतून अर्थसहाय्य कर्ज व अनुदान घेऊन त्या पूर्ण केल्या आहेत.[५६]

**एकूण विकसित केलेल्या जागा पुढीलप्रमाणे**

I) कै. डी. एम. पाटील शॉपींग सेंटर (आ. क्र. २५)
II) नविन शॉपिंग सेंटर (आ. क्र.२४)
III) मटण मार्केट (आ. क्र. १२)
IV) साठे नगर येथे प्राथमिक शाळा (आ. क्र. १७)
V) ढवळवेस येथे प्राथमिक शाळा (आ. क्र. १८)

### १) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास(IHSDP)

महाराष्ट्र सरकारने १९८८ पासून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून अनुसूचित-जाती-जमातीसाठी घरकूल योजना सुरू केली. तर १ जानेवारी १९९६ पासून केंद्र सरकारने दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती-जमातीच्या व्यक्तींना आणि मुक्त वेठबिगारांनी तसेच इतर गरीब लोकांना मोफत घरे उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र इंदिरा आवास योजना सुरू केली आहे. केंद्र सरकार ही योजना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून राबविते. त्यानुसार टिकावू व मजबूत स्वरूपाची घरे बांधून देण्यासाठी प्रत्येक घराची किंमत रूपये ३०,००० रूपयाची किंमतीतील हिस्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| I) केंद्र शासनाचा हिस्सा (७५%) | रूपये १५,०००/- |
| II) राज्य शासनाचा हिस्सा (२५%) | रूपये ५,०००/- |
| III) राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा | रूपये ८,५००/- |
| IV) मजुरीच्या स्वरूपात लाभार्थीचा हिस्सा | रूपये १,५००/- |
| | एकूण रूपये ३०,०००[५७] |

तासगाव नगरपरिषद हद्दीत इंदिरा आवास योजनेच्या एकूण ५ ठिकाणी झोपडपट्टया आहेत. इंदिरानगर झोपडपट्टी ३९३ घरकुले, बांधण्यासाठी लाभार्थींची रक्कम रू.४.४१ कोटीच्या(IHSSDP) प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे. प्रति घरकूल क्षेत्र २५.२८ चौ. मी. लोड बेअरिंग स्ट्रक्चर, आर. सी. सी. स्लॅबसह यामध्ये दोन रूम, स्वयंपाक घर, संडास बाथरूम यांचा समावेश आहे.

झोपडपट्टीमध्ये नगरपालिकेने पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रस्ते, दिवाबत्ती इत्यादी मुलभूत सुविधा दिल्या आहेत. त्याचे व्यवस्थापन व देखभाल नगरपालिका पहाते.[५८]

### २) महिला बालकल्याण विकास व योजना

पंचायत समिती व जिल्हा परिषद सांगली समाजकल्याण विभागाकडून महसुलातील २०% रक्कमेतून विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती-जमातीमधील पात्र महिलांना शिलाई मशीन वाटप, विद्यार्थ्यांना सायकल वाटप, घरकुल योजना, स्वच्छतागृह बांधकाम अनुदान, दळपयंत्र वाटप, यातून महिला मेळावे घेणे, बचत गटांना प्रोत्साहन देणे. अद्यावत व्यवसाय निर्मितीसाठी महिलांना प्रवृत्त केले जाते. यातून महिला मेळावे घेणे, बचत गटांना प्रोत्साहन देणे. इत्यादी अनेक योजना सुरू केल्या आहेत.[५९]

**अ) शिलाई मशिन वाटप योजना**

मागासवर्गीय महिलांच्या आर्थिक उन्नती करण्याच्या हेतूने शिलाई मशिन वाटप योजना सन १९९६ पासून अंमलात आली आहे. या योजनेतून १३५ महिलांना शिलाई मशिन वाटप केल्या असून ६४ महिलांना फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण दिले आहे. यासाठी सन २००६-०७ महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी अंदाजपत्रकीय तरतूद ३,५०,००० अंदाजपत्रकीय तरतूदीतून प्रत्यक्ष झालेला खर्च ७,९८० रुपये आहे.

वरील लाभार्थीपैकी ३ लाभार्थीशी चर्चा करता, त्यामध्ये भ्रष्टाचार आढळून आला. वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत काही रक्कम द्यावी लागते तर काही लाभार्थी ठराविक रक्कम त्यांना(मध्यस्थ) देवून प्रत्यक्ष शिलाई मशिन न घेता रक्कम उचलतात. त्यामुळे ही योजना गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोचलेली नाही.[६०]

**ब)** DWCUA

बचत गटांचे व्यवसाय सुरू करणेसंबंधीचे प्रस्ताव बँकेकडे पाठविले होते. म्हैस पालन, शेळीपालन, प्रकल्प अहवालास आय.डी.बी.आय. बँक, शाखा तासगाव यांचे अर्थसहाय्य घेवून ३,४८,००० अनुदान वाटप केले आहे.

**क) S.J.S.R.Y. चे प्रशिक्षण कार्यक्रम**

१. S.J.S.R.Y. अंतर्गत प्रशिक्षाणार्थींची संख्या - १७३

२. स्वयंरोजगार योजनेचे लाभ घेतलेले प्रशिक्षणार्थी - ०५

३. नागरी स्वयंरोजगार योजने अंतर्गत लाभार्थी संख्या - १७

**ड) S. J. S. R. Y. ची व्याप्ती**

| | |
|---|---|
| १. एकूण लाभार्थी कुटुंब | ४८२ (१९९७) |
| २. एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे | १६६१ (२००५) |
| एकूण खर्च | ११२.५१ लक्ष. |

**३) दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रम** (S.J.S.R.Y)

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत ३० महिला बचतगट रजिस्टर्ड असून त्यामध्ये ३२८ महिला समाविष्ट आहेत. शहरात एकूण ५०० महिला बचतगट आहेत. हे महिला बचतगट आपापल्या परीने आर्थिक व्यवहार व्यवस्थित चालवित आहेत.[६१]

**४) दलित वस्ती सुधार योजना**

दलित वस्त्यामध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे दलितांना असंख्य अडचणींनी आणि गैरसोयींना तोंड द्यावे लागते. म्हणून महाराष्ट्र शासनाने १९९५ मध्ये दलित वस्ती सुधारणा योजना कार्यक्रम सुरू केला. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे दलित वस्तीमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, विजेच्या दिव्याची सोय, समाज मंदिर, गटारी, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा करणे हा होता. परंतु या योजनेतही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या योजनेत ठेकेदार प्रथम आर्थिक गुंतवणूक करतो त्यामुळे त्यांच्याकडून काम निकृष्ट दर्जाचे झालेचे दिसते. तासगाव शहराला दलित वस्ती सुधार योजना एकूण प्राप्त निधी १५७.९२ लक्ष [६२]

**शहरात २०१० अखेर पूर्ण झालेली कामे.**

१. कापूर नाल्यावर कांबळेवाडीकडे जाणारा कॉजवे.
२. फिरते शौचालय मोबाइल टॉयलेट
३. साठेनगरमध्ये लायब्ररी जिमनॅशियम हॉल.
४. कांबळेवाडीमध्ये लायब्ररी जिमनॅशियम हॉल.
५. कांबळेवाडी स्मशानभूमी कंपौड, शेड, गॅलरी, रस्ते.
६. दलित वस्तीमध्ये सौर ऊर्जेवरील पथदिवे.
७. साठेनगरमध्ये रस्ते गटर्स (हेडवॉलसह)

वैयक्तिक लाभ योजनामध्ये मागासवर्गीय शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश मोफत पुस्तके शिष्यवृत्त्या दिल्या जातात. तसेच रस्ते, गटारी, शौचकूप, कूपनलिका, समाज मंदिर इत्यादी बाबीसाठी खर्च केला जातो.[६३]

**१.** सामाजिक केंद्राची संख्या - ५ आहे.
२. शहरातील ग्रंथालयाची संख्या - ३
३. मोक्षधाम एकूण संख्या - ३
४. मोक्षधामाचे एकूण क्षेत्र - ५ एकर
५. विविध धर्मियासाठी व्यवस्था - आहे

६. नागरिकांना मोक्षधामामध्ये इतर कैलासभूमी क्षेत्र माहुली येथे आहे.[६४]

## ३.१३ नगरपालिका शिक्षण मंडळ

तासगाव नगरपालिका ही सन ०१/०८/१८६५ पासून नगरपालिका असून तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळाची अधिकृत स्थापना ०१/०२/१९८० झाली. तेंव्हापासून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकेने घेतली आहे. शहरात प्राथमिक शिक्षणासाठी कायद्यातील तरतुदीप्रमाणे या शिक्षण मंडळाचा कारभार चालविला जातो. १५/०५/१९८५ पासून अस्तित्वात आलेल्या कौन्सिलने शिक्षण मंडळाच्या सदस्यांची निवड केली. त्यानुसार तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळात १० लोकनियुक्त व २ सदस्य सरकार नियुक्त असे एकूण १२ सदस्यांचे शिक्षण मंडळ आहे.[६५]

**तक्ता क्र. ९ नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती**

| अ.नं. | सभापती | कालावधी |
|---|---|---|
| १) | मा. श्री. डी. एम. पाटील | १०/०२/१९८० ते २१/०७/१९८६ |
| २) | मा. श्री. आर. बी. जोतराव | २२/०६/१९८६ ते २१/०६/१९९० |
| ३) | मा. श्री. सी. पी. कांबळे | २२/०७/१९८६ ते २१/०६/१९९० |
| ४) | मा. श्री. वसंतराव नारायण लुगडे | ३०/०५/१९९३ ते १६/०४/२००१ |
| ५) | मा. श्री. शंकराव पाडुरंग थोरबोले | १६/०४/२००१ ते १५/०८/२००३ |
| ६) | मा. मुख्याधिकारी तथा सभापती नगरपालिका शिक्षण मंडळ | महाराष्ट्रातील शिक्षण मंडळ बरखास्त केली. |
| ७) | मा. श्री. मारूती भिमराव गुरव | २५/०३/२०१० ते २८/१०/२०१० |
| ८) | मा. श्री. सुखदेव तुकाराम पवार | २८/१०/२०१० ते २४/०३/२०११ |
| ९) | मा. श्री. सुनिल दशरथ पाटील | २५/०३/२०११ **कार्यरत....** |

***संदर्भ-****नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती बोर्डावरील माहिती.*[६६]

**तक्ता क्र. १० नगरपालिका शिक्षण मंडळ**

| | | |
|---|---|---|
| १) | नगरपालिका शिक्षण मंडळाकडून चालविण्यात येणाऱ्या शाळांची संख्या | १६ |
| २) | विद्यार्थी संख्या | १६६८ |
| ३) | शिक्षक संख्या | ६७ |
| ४) | संगणक उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या | ४ |
| ५) | दुपारच्या जेवणाची व्यवस्था | होय |
| ६) | मोफत पुस्तके | होय |

| | | |
|---|---|---|
| ७) | शालेय गणवेश पुरविला जातो | होय |
| ८) | नगरपालिका शिक्षण मंडळावरील खर्च | ३,००,००० |
| ९) | शौचालय असणाऱ्या शाळांची संख्या | २ |
| १०) | पाणी सुविधा असणाऱ्या शाळांची संख्या | १० |
| ११) | फर्निचर उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या | १४ |
| १२) | वीज व पंखे उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या | ३ |
| १३) | क्रीडांगणे उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या | ४ |
| १४) | शैक्षणिक साधने उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या | १६ |

***संदर्भ -*** *संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०*[६७]

तक्ता क्र. १० वरून असे लक्षात येते की, तासगांव नगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेत जास्त विद्यार्थी संख्या असून गरीब, झोपडपट्टीमधील तसेच, मध्यमवर्गीय पालकांची मुले आहेत. श्रीमंत पालकांची मुले शहरातील नामवंत शाळेत प्रवेश घेतात. नगरपालिकेच्या शाळांच्या तुलनेत त्यांचा शैक्षणिक स्तर चांगला आहे. परंतु गरजू, गरीब, होतकरू मुलांसाठी नगरपालिकांच्या शाळा चांगली सेवा देत आहेत. त्यातही काही नगरपालिकांच्या शाळांनी आपला दर्जा उंचावला आहे. परंतु शहरातील मान्यवर खाजगी संस्था पुढे टिकवायच्या असतील तर पालिकेला आपली पारंपारिक धोरणे बदलून विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी उपलब्ध करून आपला दर्जा सुधारणे आवश्यक वाटते.

**१) बालवाड्या**

शहरातील खाजगी शाळांच्या बालवाड्यातून गोरगरीब, तळागळातील नागरिकाच्या मुलांना प्रवेश मिळू शकत नाही. त्याला कारण आर्थिक दुर्बलत्ता! म्हणून गोरगरीब तळागळातील नागरिकाच्या मुलांकरिता ०१/०९/१९८५ पासून शहरात बालवाड्या सुरू केल्या.[६८] सध्या नागरी संस्थेच्या अंगणवाड्या व बालवाड्यांची संख्या २५ आहे. प्रत्येक बालवाडीकरिता एक शिक्षिका व आया यांची हंगामी स्वरूपात नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ५०० मुले व ३४८ मुली असे एकूण ८४८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[६९]

थोडक्यात तासगाव शहराचा मर्यादित आवाका असल्यामुळे नगरपालिकेचे लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे उत्पन्न आहे. औद्योगिक विकासाचा अभाव, नगरपालिकेतील सत्ता स्पर्धेचे राजकारण या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे तासगाव शहरात मुलभूत नागरी सोयी व आवश्यक त्या सुधारणा होवू शकल्या नाहीत. तासगाव तालुक्याच्या ठिकाणचे शहराचे स्वरूप मात्र 'एक शहर' म्हणून एवढेच मर्यादित राहिले आहे.

# संदर्भसूची


१. कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, सोलापूर नगरपालिका शतसांवत्सारिक ग्रंथ १९५३, पृष्ठ क्र. १०.

२. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे व तासगाव नगरपालिका विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२, पृष्ठ क्र. २.

३. मुलाखत, कोळेकर के. वाय. सचिव जीवन विकास संस्था तासगाव, दिनांक २० जाने. २०११, वेळ दु. २ वाजता.

४. डेव्हलपमेन्ट प्लॅन बुक, द्वितीय आवृत्ती, जनशक्ती प्रकाशन कोल्हापूर, १९७८ ,पृष्ठ क्र. १६.

५. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, १९९९, पृष्ठ. ६३१

६. डेव्हलपमेन्ट प्लॅन बुक, द्वितीय आवृत्ती, जनशक्ती प्रकाशन कोल्हापूर, १९७८, पृष्ठ क्र. २६.

७. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा १९९९, पृष्ठ. ६३१.

८. डेव्हलपमेन्ट प्लॅन बुक, द्वितीय आवृत्ती, जनशक्ती प्रकाशन कोल्हापूर १९७८, पृष्ठ क्र. ३०.

९. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे व विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२, पृ.१३.

१०. तासगाव नगरपालिका नगराध्यक्ष कालखंड यांच्या बोर्डावरून घेतलेली माहिती दिनांक १३/११/१९४४ ते ०७/११/१९४७ पर्यत.

११. पुरोगामी जीवन सफर! भाई गणपत कोळी श्री. मधुकर रावकर संपादक ‘युगारंभ’ मुंबई, प्रथम आवृत्ती २००८, पृष्ठ क्र. ६५.

१२. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा १९९९, पृष्ठ क्र. ६३१.

१३. स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर, एक नागरी ऐतिहासिक अभ्यास पीएच्. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २०००, पृष्ठ क्र. ३१.

१४. डेव्हलपमेन्ट प्लॅन बुक, द्वितीय आवृत्ती, जनशक्ती प्रकाशन कोल्हापूर १९७८, पृष्ठ क्र. ३१.

१५. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा १९९९, पृष्ठ. ६२९.

१६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ६२९.

१७. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, वार्षिक अहवाल सन २००५-०६ ,पृष्ठ क्र. ६.

१८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ६३०.

१९. बाहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा जिल्हा १९९४ ,क्रांतीवैभव प्रकाशन सांगली पृ.१४५-४६.

२०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १४६.

२१. तासगाव नगरपालिका नगराध्यक्ष कालखंड यांच्या बोर्डावरून घेतलेली माहिती दिनांक १३/११/१९४४ ते २३/१२/२०११ पर्यत.

२२. नगरपरिषद प्रशासन संचानालय स्थायी आदेश क्र.नपसु/२००१/प्र.क्र.६/२००१/५ गृहनिर्माण भवन मुंबई-४०००५१, दि.१५ जानेवारी २००१.

२३. तासगाव नगरपलिका मुख्याधिकारी कालखंड यांच्या बोर्डावरून घेतलेली माहिती दिनांक १/०६/१९६६ ते २०/०६/२०११ पर्यत.

२४. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान वार्षिक अहवाल सन २०१०-११ पृष्ठ क्र. ३३.

२५. तासगाव नगरपरिषद तासगाव तिमाही व वार्षिक लेखे सन १९७१-७२ ते २०१०-११ पर्यत (संबंधीत वर्ष)

२६. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, वार्षिक अहवाल सन २००५-०६, पृष्ठ क्र. ३४.

२७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ३४.

२८. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा १९९९, पृष्ठ ६३१.

२९. तासगाव नगरपालिका अर्थसंकल्प सन २००९-२०१०

३०. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, वार्षिक अहवाल सन २०१०-०११, पृष्ठ क्र. ४०.

३१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४०.

३२. पाटील बी. बी., 'महाराष्ट्र राज्य शासन आणि राजकारण' फडके प्रकाशन कोल्हापूर २००८, पृष्ठ क्र. २७६.

३३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २७६.

३४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २७६.

३५. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे व विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२, पृ.२२.

३६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. २७.

३७. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००५-०६

३८. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे.

३९. मुलाखत, संभाजी जाधव आरोग्य विभाग, नगरपालिका तासगाव दिनांक २२/९/२०११ सकाळी ११ वाजता व संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००५-०६, पृ. ६,७.

४०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ७ व ८.

४१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ८ व ९.

४२. तासगाव हायस्कूल तासगाव, हिरक महोत्सव स्मरणिका १९८०-८१.

४३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ९.

४४. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००५-०६

४५. मुलाखत, संभाजी जाधव, आरोग्य विभाग, नगरपालिका तासगाव दि. २२/९/२०११, स. ११ वाजता व संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २०११-१२, पृ. क्र. ३३.

४६. तासगाव नगरपालिका विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२ ,पृष्ठ क्र. ३३.

४७. सांगली जिल्हा आरोग्य अधिकारी व सामाजिक व आर्थिक समालोचन सांगली जिल्हा २०१०-११ पृष्ठ. १२४.

४८. मुलाखत, संभाजी जाधव, आरोग्य विभाग, नगरपालिका तासगाव दि. २२/९/२०११, स. ११ वाजता व संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २०११-१२, पृ. ४९.

४९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४९.

५०. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २०११-२०१२, पृष्ठ क्र. ५०.

५१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ५१.

५२. तासगाव नगरपालिका विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२, पृष्ठ क्र. ३३.

५३. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २०१०-११

५४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ३९.

५५. तासगाव नगरपालिका कार्यालयीन रजिस्टर २०१२.

५६. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २०१०-११.

५७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४०.

५८. पाटील बी. बी 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण' फडके प्रकाशन कोल्हापूर २००८ पृ.२६६.

५९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. क्र. २६७.

६०. तासगाव नगरपालिका अर्थसंकल्प सन २०११-२०१२.

६१. तासगाव नगरपालिका विकास आढावा मार्गदर्शिका सन २०१२ पृष्ठ क्र. ३९.

६२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. क्र. ३९.

६३. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०

६४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४५.

६५. नगरपालिका शिक्षण मंडळ, तासगाव जनरल सभेचे प्रोसिडींग संबधित वर्ष.

६६. नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती, बोर्डावरील माहिती दि. १०/०२/१९८० ते २५/०३/२०११ पर्यत.

६७. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०.

६८. मुलाखत, श्री. वाडकर, ए.बी., प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव दिनांक १२ जाने २०१२ दुपारी १२ वाजता.

६९. नगरपालिका शिक्षण मंडळ, तासगाव जनरल सभेचे प्रोसिडींग संबधित वर्ष.

**प्रकरण चौथे**

# तासगाव शहरातील शैक्षणिक स्थिती

४.१ प्रस्तावना

४.२ प्राथमिक शिक्षणासंबंधी घटनेतील तरतुदी व बदल

४.३ तासगावातील शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.४ शहरातील प्रमुख शिक्षण संस्था

४.४.१ सांगली शिक्षण संस्था (स्था. १९१४)

४.४.२ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, तासगाव (स्था. १९५४)

४.४.३ साधना शिक्षण संस्था (स्था. १९५९)

४.४.४ जीवन विकास संस्था, तासगाव (स्था. १९६४)

४.५ पूर्व प्राथमिक शाळांची स्थिती

४.६ अंगणवाड्यांची स्थिती (एकात्मिक बालविकास योजना)

४.७ तासगांव शहरातील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांची स्थिती

४.७.१ नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी

४.७.२ नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती

४.७.३ वस्तीशाळा

४.८ प्राथमिक शिक्षणातील विविध योजना

४.८.१ पुस्तकपेढी योजना

४.८.२ लेखन वाचन हमी कार्यक्रम

४.८.३ दत्तक शाळा योजना (सावित्रीबाई दत्तक पालक योजना)

४.८.४ सर्व शिक्षा अभियान

४.८.५ शिष्यवृत्ती परीक्षा

४.८.६ प्राथमिक शाळेतील विविध उपक्रम

४.९ शहरातील प्रमुख खाजगी प्राथमिक शाळा

४.९.१ संस्कार मंदिर सरावपाठशाळा, तासगाव (स्था. १९६५)

४.९.२ नुतन मराठी विद्यानिकेतन तासगाव (स्था. १९८४)

४.९.३ आण्णासाहेब डांगे आश्रमशाळा तासगाव (स्था. १९९८)

४.९.४ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव (स्था. २००२)

४.१० स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शिक्षणाची स्थिती

४.११ शहरातील प्रमुख माध्यमिक शाळांचा आढावा

४.११.१ चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव (स्था. १९२०)

४.११.२ विद्यानिकेतन कृषि माध्यमिक विद्यालय, तासगाव (स्था. १९६७)

४.११.३ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव (स्था. १९५५)

४.११.४ यशवंत हायस्कूल, तासगाव (स्था. १९६७)

४.११.५ पटवर्धन कन्या प्रशाला तासगाव(स्था. १९७५)

४.११.६ गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तासगाव

४.१२ कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक शिक्षण

४.१२.१ प. डॉ. वसंतरावदादा पाटील ज्युनि. कॉलेज, तासगाव

४.१२.२ विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स (ॲग्री) तासगाव (स्था. १९७५)

४.१२.३ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव (स्था. १९५५)

४.१२.४ जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव (स्था. १९५९)

४.१२.५ अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तासगाव (स्था. १९६०)

४.१३ व्यावसायिक शिक्षण

४.१३.१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय)

४.१४ उच्च शिक्षण (वरिष्ठ महाविद्यालये)

४.१४.१ प. डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव.

४.१४.२ महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव.

४.१४.३ कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय तासगाव.

(स्था. २००१ कायम विनाअनुदानित)

४.१४.४ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र तासगाव.

४.१४.५ दूर शिक्षण केंद्र तासगाव.

४.१५ शासकीय महिला तंत्रनिकेतन (स्था. २००९)

### प्रकरण चौथे

# तासगाव शहरातील शैक्षणिक स्थिती

## ४.१ प्रास्ताविक

शिक्षणाला मानवी जीवनात विशेष महत्त्वाचे स्थान असून शैक्षणिक प्रगतीवरून समाजाची व देशाच्या प्रगतीचे मूल्यमापन होत असते. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करणारा समाज हा सुसंस्कृत व प्रगत असतो. व्यक्तीच्या बौद्धिक, मानसिक व सांस्कृतिक विकासाला परिणाम होणारे ज्ञान ते शिक्षण होय. अशी 'शिक्षण' शब्दाची व्यापक अर्थाने व्याख्या भारतीय संस्कृती कोषात केली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणाबद्दल विचार मांडताना म्हणतात, ''दारिद्र्य, अंधश्रद्धा व अज्ञान यांच्या तावडीतून मानवाला सोडविण्यासाठी शिक्षणावाचून दुसरे साधन नाही''. समाज परिवर्तनासाठी शिक्षण हे गरजेचे आहे. 'शिक्षण' ही संकल्पना सर्व प्राणीमात्रांना व्यापून राहिली आहे. माणसाच्या आत्मिक विकासातून त्याला अर्थव्यापी तत्त्वाकडे घेवून जाणे, हे शिक्षणाचे उद्दिष्ठ ठरते. शिक्षणाचे ध्येय विचारी मानव निर्माण करणे, संपूर्ण मानवाचा विकास करणे, इच्छा शक्तीचा व मानवतेचा विचार करणे, तिचे नियंत्रण करून आत्मविकासाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे 'शिक्षण' अशी शिक्षणाविषयी भूमिका स्वामी विवेकानंद यांनी मांडली.[१]

अमेरिकन इतिहासकार व विचारवंत विल ड्यूरंट म्हणतात, शिक्षण म्हणजे संस्कृतीचा वारसा पुढील पिढीच्या हाती देणे आणि यात इतिहास मोलाची भूमिका बजावतो. (Education is transmission of civilization and history plays a significant role in it)[२] यानुसार इतिहास लेखन करत असताना त्या प्रदेशातील शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

थोडक्यात समाज परिवर्तनाचे 'शिक्षण' हे प्रभावी माध्यम आहे. तासगाव शहराचा शैक्षणिक वाटचालीचा विचार करताना वरील सर्व गोष्टीला महत्त्व प्राप्त होते. शैक्षणिक विकासामुळे सोळाव्या शतकात युरोपात झालेल्या प्राचीन विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर वैचारिक क्रांती घडून आली. इतिहास लेखनामध्ये सामाजिक, राजकीय, वैचारिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाबरोबर शैक्षणिक विकास पाहणे गरजेचे झाले. या दृष्टिकोनातून तासगाव शहराचा आढावा घेण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणात तासगाव शहरातील पूर्व प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्चमाध्यमिक, व्यावसायिक अभ्यासक्रम, वरिष्ठ महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे.

## ४.२ प्राथमिक शिक्षणासंबंधी घटनेतील तरतुदी व बदल

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आली. घटनेमध्ये प्राथमिक शिक्षणासंबंधी ४५ वे कलम असे आहे, की संविधान स्विकारल्यापासून १० वर्षाच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास १४ वर्षे पूर्ण होईपर्यत मोफत, सक्तीचे शिक्षण देण्यास राज्यसरकार प्रयत्नशील राहील. या कलमाप्रमाणे प्रत्येक मुलाला १४ वर्षे पूर्ण होईपर्यत शिक्षणाची सोय करण्याची शासनाची जबाबदारी राहील.[३] मोफत शिक्षण याचा अर्थ नि:शुल्क शिक्षण होय. स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी संस्था यांच्यामार्फत शासनाने शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. सार्वत्रिक शिक्षण याचा अर्थ ६ ते १४ वयोगटातील दखलपात्र सर्व मुले-मुली शाळेत आली पाहिजेत. याप्रमाणे १९५० पासून शासनाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. परंतु त्यात अपयश आल्याने, ही मुदत आज अखेरपर्यत वाढवली आहे. १४ मे २००२ च्या दुरूस्ती अधिनियमानंतर प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण हा मुलभूत अधिकार प्राप्त झाला. प्राथमिक शिक्षणाचा समावेश मार्गदर्शक तत्त्वामध्ये केला होता. तर मुलभूत अधिकारामुळे प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराला वाव मिळाला. त्यानंतरच्या काळात केंद्रशासनाने 'सर्व शिक्षा अभियान' योजना राबविली.

## ४.३ तासगावातील शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

तासगाव शहराचा शैक्षणिक दृष्टिकोनातून विचार केला असता तर शहराला शैक्षणिक परंपरा फार पुरातन आहे. सन १८१८ साली पेशवाई संपुष्टात आली. ब्रिटीशांनी आपली सत्ता स्थिर करण्यासाठी आँग्ल विद्येचा प्रसार सुरू केला. समाज सुधारणेचे प्रणेते राजाराम मोहन रॉय यांनी पाश्चात्य ज्ञान, विज्ञानाचा प्रसार होण्यासाठी हिंदी लोकांना इंग्रजी भाषा, भौतिक विद्या, पाश्चात्त्य विद्येची गरज आहे, यासाठी सरकारकडे आग्रह धरला. त्यानंतर लॉर्ड मेकॅलेने इंग्रजी शिक्षणाची स्थूल योजना तयार केली. ती लॉर्ड बेंन्टिग्जने इ. स. १८३५ मध्ये स्विकारली, त्यामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला.

सन १८५४ मध्ये बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष सर चार्लस् वुड यांनी शिक्षण देण्याची योजना तयार केली. ती शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण समजली जाते. या योजनेत प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तर करून भारतीय शिक्षण व्यवस्थेत सुसूत्रता आणली. पुढे हंटर कमिशन नेमून शिक्षण उदारमतवादी बनविले, यामुळे येथील शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली. १९४६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. खाजगी शिक्षण संस्थांना शिक्षण कार्यात सहकार्य व आर्थिक मदत देवू केली. समाजसुधारक राजाराम मोहन रॉय सन (सन १७७३ ते १८३३) या काळातील त्यांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्वत्र मराठी शाळा सुरू केल्या?[४] या शाळांमध्ये संस्कृत, पार्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष, व्यायामाबाबत शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे कित्येक शतके

अध्यापनावर पगडा असणाऱ्या सनातन्यांचे पित्त खवळले. म. फुले व सावित्रीबाई फुले यांनी सनातन्यांचा असलेला प्रखर विरोध झुगारून बहुजन समाज व स्त्री शिक्षणाची कवाडे खुली केली.

## ४.४ शहरातील प्रमुख शिक्षण संस्था

### ४.४.१ सांगली शिक्षण संस्था (स्थापना १९१४)

सन १९१४ साली निरपेक्ष वृत्तीच्या चार ध्येयवेड्या तरूणांनी संघटित होवून केवळ चार विद्यार्थी संख्या असलेल्या एका छोट्या शाळेची स्थापना गावभाग सांगली येथे सिटी हायस्कूल या नावाने सुरू केली. यामध्ये स्व. धोंडो विठ्ठल सखदेव, ब्रम्हीभूत गुरूनाथ गोंविंद तोरो, स्व. विनायक सदाशिव जोशी व राजाराम रावजी चिकोडीकर यांचा सिंहाचा वाटा आहे.[५]

तासगाव शहरात सांगली शिक्षण संस्थेने खालील ज्ञानकेंद्रे सुरू केलेली आहेत.[६]

१. चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव. (तासगाव हायस्कूल).
२. पटवर्धन कन्या प्रशाला तासगाव. (स्थापना १९७५)
३. गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव. (स्थापना १९९७)
४. बालशाळा (स्थापना १९८५)

### ४.४.२ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, तासगाव (स्थापना १९५४)

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक क्रांती घडवून आणणारे थोर व आदर्श व्यक्तिमत्व बापूजी साळुंखे होते. म. फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार व कार्य कर्तृत्त्वाने बापूजी साळुंखे प्रभावित झाले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शैक्षणिक धोरणात बदल झाला नव्हता. ग्रामीण भागात शिक्षणासाठी २० कि. मी. पेक्षा अधिक अंतरावर जावे लागे. म्हणून प. पूज्य. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे १९५४ मध्ये स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.[७]

सुरूवातीला बापूजींनी आपल्या प्रमुख सहकाऱ्यांची (श्री. स्वामी रामानंद भारती, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, ना. बाळासाहेब देसाई, भाई माधवराव बागल) यांची बैठक कराड येथे १९ ऑक्टोबर १९५४ मध्ये कृष्णा काठावर भगवान मुरलीधराच्या मंदिरात घेतली. या बैठकीत शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे ठरले.

या संस्थेचा नामकरण सोहळा तासगाव परिसरातील तुरची या गावी १ नोव्हेंबर १९५४ रोजी घेण्यात आली. बापूजींनी 'संत शिक्षण संस्था' व 'भागवत शिक्षण संस्था' अशी नावे सुचविली परंतु स्वामी रामानंद भारती यांनी 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' असे नांव सुचविले.

तत्कालीन शिक्षण उपसंचालक आप्पासाहेब पवार होते. त्यांच्या मार्गदर्शनाने बापूजींनी नव्या शिक्षण संस्थेची मोठ्या परिश्रमाने घटना तयार केली आणि शाखा विस्तार केला. 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हे ब्रीद वाक्य बापूजींनी निश्चित केले.

महाराष्ट्रात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने आपल्या कार्यास ६ जून १९५५ रोजी प्रारंभ केला. याच दिवशी बापूजींनी शिक्षण उपसंचालक आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे सहकारी स्वामी रामानंद भारती, दिनकर रामचंद्र माने, श्री. काकडे गुरूजी, आप्पासाहेब साळुंखे इत्यादी ध्येयवादी शिक्षकांनी कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे आणि उंडाळे या ठिकाणी सुरूवातीला ५ पाच ज्ञानकेंद्रे (हायस्कूल) सुरू केली. सध्या या संस्थेच्या ३७५ ज्ञानकेंद्राद्वारे महाराष्ट्र कर्नाटक भागात शाखा कार्यरत आहेत.[८]

त्याद्वारे संस्था आपली पुढील उद्दिष्ट्ये साध्य करीत आहे.

१) सामान्य समाजात सुसंस्कारी शिक्षण प्रसाराच्या साधनेने समाजाचे परिवर्तन घडवून आणणे.
२) सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग या मौलिक निष्ठा मनात उतरविण्याचा प्रयत्न करणे.
३) सामान्य समाजाच्या सुसंस्कारी विकासाच्या ध्येयासाठी वाहून घेणारे मार्गदर्शक समाज सेवक निर्माण करणे.
४) आचार, विचार आणि उच्चार यांच्या पवित्र्यावर आग्रहपूर्वक भर देणे.
५) स्वतंत्र्य विचार वृत्ती व नवनिर्मिती यांची कुवत विकसित करणे.
६) कला, वाणिज्य, शास्त्र, शेती, समाजशास्त्र, विधी, तंत्र व शारिरीक शिक्षण आदी विषयांचा समावेश होणारे परिणामकारक प्राथमिक, माध्यामिक व उच्च शिक्षण याद्वारे सामाजिक सांस्कृतिक विकास साधणे.

शिक्षण महर्षी बापूजी साळुखे यांनी स्थापन केलेल्या स्वामी विवेकानंद संस्थेने तासगाव शहरात चार ज्ञानकेंद्रे सुरू केली आहेत.

१. स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव.
२. अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तासगाव.

३. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव.

४. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव.

स्वामी विवेकानंद संस्थेचा उगम, विकास व विस्तार प्रामुख्याने तासगाव परिसरातच झाला. शहराच्या शैक्षणिक विकासामध्ये या संस्थेचे महत्त्वाचे योगदान आहे.

## ४.४.३ साधना शिक्षण संस्था (स्थापना १९५९)

प. पूज्य साने गुरूजींच्या प्रेरणेने स्वा. श्री. निवृत्ती हरी सोन्नर (गुरूजी) यांच्या कार्य कर्तृत्वाने तसेच तासगाव परिसरातील सेवादलातील वि. रा. जोगळेकर, ज. पा. पेटकर, दत्ताजी आकाराम पाटील, केशराव ज्ञानोबा लुगडे, मोहनलाल मोतीलाल कोटेचा, महादेवराव भुजंगा माने इत्यादी अनेक लोक एकत्र येऊन साधना शिक्षण संस्थेची स्थापना १९५९ मध्ये केली. या संस्थेला एकूण १२ ज्ञान केंद्राची मान्यता मिळालेली असूनही आर्थिक अडचणीमुळे केवळ पाच ज्ञान केंद्रे सध्या कार्यरत आहेत.[९]

या संस्थेने अनेक समाजसेवक, उद्योजक, अधिकारी, साहित्यिक, क्रीडापटू, जन्माला घातले. यामध्ये आश्विनी कुलकणी (कलेक्टर), शिवाजीराव दौंड (डी. एस. पी.), डॉ. लुगडे, बी. बी. पाटील (सुपरिडेंन्ट इंजिनिअर), जितेंद्र पोपट जाधव (डी. एस. पी.), इत्यादी कर्मयोग्यामुळे शहराच्या लौकिकात भर पडली.[१०]

**तक्ता क्र.१ तासगाव शहरातील साधना शिक्षण संस्था शाखा विस्तार.**[११]

| अ.नं | शाखेचे नाव | स्थापना | वर्ग | सध्याचा पट |
|---|---|---|---|---|
| १) | संस्कार मंदिर सराव पाठशाळा, तासगाव. | १९६२ | ५ ते १० | ३५० |
| २) | यशवंत हायस्कूल, तासगाव. | १९६७ | ५ ते १० | ५३४ |
| ३) | जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव. | १९६० | डी. एड. | १७४ |

## ४.४.४ जीवन विकास संस्था, तासगाव (स्थापना १९६४)

जीवन विकास संस्थेचे कार्य गेली चार तपापासून चालू आहे. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुसंस्कारित शिक्षणाचे लक्ष ठेवून, त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. वंजारवाडी सारख्या गावाचा कायपालट केला आहे. अज्ञान व दारिद्र्यात जाऊन नव्या जीवनाची दिशा देण्याचा या विद्यासंकुलाचा सिंहाचा वाटा आहे. तासगाव तालुक्यातील शेती ही प्रगतशील शेतकऱ्यांची कर्मभूमी आहे. शेती विषयातील नव्या तंत्रज्ञानाची वैज्ञानिक दृष्टीकोनातून गरज लक्षात घेऊन, या संस्थेने मोठे कार्य

केले आहे. माध्यमिक, उच्चमाध्यमिक व व्यवसायिक स्तरावर कृषि शिक्षणाला नवी दृष्टी देऊन परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांना कृषि पदवीधर, हजारो विज्ञाननिष्ठ कृषिक निर्माण करण्याचे राष्ट्रीय कार्य केलेले आहे.

सामान्यजनांचा विचार करण्याची प्रेरणा देण्यात रोजगार हमी योजनेचे जनक, वि. स. पागे यांचे मार्गदर्शन व संस्थापक अध्यक्ष शं. ज. कुत्ते (वकील) यांच्या नेतृत्त्वाखाली संस्थेची १९६४ मध्ये स्थापना होऊन सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे. सुरूवातीला या संस्थेचे प्राथमिक वर्ग महिला मंडळाच्या इमारतीत (या इमारतीचे उद्‌घाटन श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले) भरत होते. यावेळी संस्थेच्या पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून सौ. कमल कृ. कोळेकर यांनी अध्यापन केले. नंतर नरगुंदे बोळ येथे काही वर्ग भरत होते.[१२] कालांतराने संस्थेने शहराच्या केंद्रस्थानी साधारण एक हेक्टर जागा मिळवून या जागेमध्ये सुसज्ज विद्यासंकुलाची उभारणी केली आहे. संस्थेच्या स्थापनेच्या वेळी २२ विद्यार्थी तर सध्या २,५०० विद्यार्थी या संस्थेत ज्ञानाचा लाभ घेत आहेत. येथे कला, वाणिज्य विज्ञान, कृषी व व्यावसायिक इत्यादी विभागाची सोय आहे.

रोजगार हमी योजनेचे जनक, महाराष्ट्र विधान परिषदेचे भूतपूर्व अध्यक्ष विठ्ठल सखाराम तथा वि. स. पागे, शं. ज. कुत्ते, म. गो. पागे, अ. रा. शहा, कृ. य. कोळेकर, डी. आर. माने, सौ. क. कृ. कोळेकर, ग. रा महामुनी, सदाशिव कराडे, चंद्रकात पोरे, तु. पा. माळी, एल. डी. म्हेत्रे, सु. ग. महामुनी, नंदु (काका) कराडे अशा अनेक हितचिंतक व समाजसेवकांनी या विद्यासंकुलाच्या शाखा विस्तारामध्ये योगदान दिले.[१३]

**जीवन विकास संस्थेची उद्दिष्ट्ये -**

१. बहुजन समाजाच्या जीवन विकासासाठी शिक्षणाची योजना करणे.
२. शिक्षणातून सुसंस्कारित नवीन प्रगत समाजाची जडण-घडण करणे.
३. शेती शिक्षण व जीवन यांचा सामाजिक समन्वय साधणे.
४. कृषी, तंत्र, विज्ञान, संगणक व व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करणे.
५. महिलांचे शिक्षण, सृजनात्मक कलांचा विकास, सेवाभावी उपक्रमांचे नियोजनातून संस्कारक्षम नागरिकांची जडण-घडण करणे.
६. सुसंस्कारीत सृजनशील, लोकशाहीवादी, संस्कारक्षम नागरिकांची निर्मिती करणे.

**जीवन विकास संस्थेची ज्ञानकेंद्रे पुढीलप्रमाणे**

१. विद्यानिकेतन कृषी माध्यमिक विद्यालय, तासगाव (स्था. १९६७)

२. विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स (ॲग्री) तासगाव (स्था. १९७५).

३. कला, वाणिज्य, व्यवसायिक कनिष्ठ महाविद्यालय, तासगाव (स्था. १९९५).

४. कला, वाणिज्य, विज्ञान महिला महाविद्यालय, तासगाव (स्था. २०००).

५. नूतन मराठी विद्यानिकेतन, तासगाव. (स्था. १९८४).

६. नीरादेवी बाळकृष्ण सेवेकरी बालप्रबोधिनी, तासगाव (स्था. १९८५).

७. कलासाधक सूर-ताल संगीत विद्यालय, तासगाव (स्था. २००५) जीवन विकास संस्थेच्या विद्या संकुलाच्या उभारणीसाठी खालील व्यक्तींचे सहकार्य लाभले.

ना. आर. आर.(आबा) पाटील यांच्या वरदहस्ताने श्री. सिद्धीविनायक ट्रस्ट, मुंबई, स्व. धोंडीराम (नाना) पाटील, मा. बाळकृष्ण हरी सेवेकरी, पुणे. मा. राजेंद्र शं. कुत्ते, सौ. पद्माबेन अमृतलाल शहा, धोंडीराम सावळा म्हेत्रे, मा. माधवराव दि. जोगळेकर, मा. बा. व. कुलकर्णी, मा. बंडोपंत वि. श्री. देवधर इत्यादी दानशूर आश्रयदाते यांनी संस्थेस आर्थिक हातभार लावला.[१४]

## ४.५ पूर्व प्राथमिक शाळांची स्थिती

भुतपूर्व मुंबई राज्यांच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे बालमंदिर ही पूर्व प्राथमिक शिक्षणाची पहिली पायरी आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्यानंतर भारतात १९ व्या शतकाच्या शेवटी युरोपियन धर्मोपदेशकांनी 'किंडर गार्डन' शाळांची स्थापना करून पूर्व प्राथमिक शाळेची सुरूवात केली.[१५] पूर्व प्राथमिक शाळा प्रामुख्याने शहरी भागात चालविल्या जात होत्या. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना या शिक्षणाचा फायदा मिळत नव्हता.

पूर्व प्राथमिक शाळेत सर्वांगीण विकास व्हावा यासाठी खेळ, मनोरंजन, गाणी, यातून मुलांचा विकास साधणे हे या शाळेचे उद्दिष्ट आहे. प्राथमिक शिक्षणाला अग्रक्रम देण्यात आला. गरिबी, अनिष्ठ रूढी-परंपरा, मागासलेपणा, साधनांची कमतरता यासारख्या असंख्य प्रतिकूल परिस्थितीमध्ये लक्षावधी मुलांना ब्रिटीश काळात शिक्षणापासून वंचित ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र असे एकमेव राज्य निर्माण झाले की, त्याने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण केले. कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे यांनी 'खेड्याकडे चला' या महात्मा गांधीच्या तत्त्वाचा अंगिकार करून तासगाव शहरात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला.

पूर्व प्राथमिक शाळेमुळे शिक्षणाच्या प्रसाराला चालना मिळाली. मुलांना शाळेचे आकर्षण वाटावे, व मुले शाळेत टिकून रहावीत, यासाठी पूर्व प्राथमिक शाळांना बाल वर्ग जोडण्याची योजना पुढे आली.

पूर्व प्राथमिक शाळा व बालवाड्या यांच्यात फरक असून, पूर्व प्राथमिक शाळा ३ ते ५ वयोगटातील मुलांसाठी असते.[१६] सन २०१० अखेर तासगाव शहरात २५ पूर्व प्राथमिक शाळा आहेत.[१७]

सन २००० मध्ये तालुक्यात एकात्मिक बालविकास योजनेतून गाव (वस्ती) तेथे अंगणवाड्या ही मोहिम राबविण्यात आली. त्यामुळे पूर्व प्राथमिक शाळेचे रूपांतर अंगणवाड्यामध्ये झाल्याचे दिसून येते.

## **४.६ अंगणवाड्यांची स्थिती** (एकात्मिक बाल विकास सेवा योजना)

देशातील बालकांच्यातील वाढते कुपोषणाची दखल घेत केंद्र सरकारने संशोधन विकास मंत्रालयाद्वारे 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' हा उपक्रम १९९६ मध्ये सुरू करण्यात आला.[१८] या उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांचा बौद्धिक, सामाजिक, मानसिक व शारिरीक विकास साधणे. तसेच आरोग्य विषयक सुविधा व पुरक पोषक आहार याद्वारे कुपोषित मुलांचे प्रमाण कमी करणे, बाल मृत्यूदर कमी करणे इत्यादी होता. शहरात 'एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची' अंमलबजावणी सन २००० पासून सुरू करण्यात आली.[१९]

तासगाव शहरात गोसावी वस्ती, इंदिरानगर झोपडपट्टी, साठेनगर, सिद्धेश्वर कॉलनी, पेटकर प्लॉट अशा सहा बिटमध्ये अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यामध्ये विद्यार्थी संख्येनुसार एक सेविका व एक मदतनिसाची नियुक्ती करण्यात आली. अशा एकूण बारा सेविका व मदतनिस म्हणून स्त्री शिक्षिका काम करतात.[२०]

### अ) एकात्मिक बाल विकास सेवा उपक्रम

१. अंगणवाडीतील मुलांना खिचडी, कडधान्य (मटकी, चना) मोड आणून दिले जाते. तसेच हा आहार गरोदर माता व स्तनपान करणाऱ्या मातांनाही दिला जातो.
२. हा आहार आठवड्यातून तीन दिवस खिचडी डाळ व मसालेभात, शिरा व कडधान्ये तीन दिवस दिले जातात. तसेच शेंगदाण्याचे लाडू, राजगिरा लाडू, भडंग इत्यादी दिले जाते.
३. अंगणवाड्यामध्ये पिण्याची पाण्याची सुविधा व शौचालयाची व्यवस्था केली आहे.
४. लहान मुलांचे मनोरंजन व्हावे या दृष्टीकोनातून विविध उपक्रम राबविले जातात. उदा. झोपाळा, घसरगुंडी, सिसॉ, पाळणा इत्यादी बरोबरच विविध खेळण्याद्वारे त्यांचा बौद्धिक व मानसिक विकास केला जातो.

बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली अंगणवाड्याचे कामकाज चालते. आहार शिजविण्याचे उपक्रम बचत गटांच्या माध्यमातून राबविला जातो. बचत गटांना काम दिल्याने बचत

गटांच्या प्रगतीत वाढ होण्यास मदत झाली आहे. अंगणवाडी आदर्श निर्माण व्हाव्यात, मुलांचा व अंगणवाडीचा विकास व्हावा या उद्देशाने दरवर्षी प्रत्येक महिन्याला अंगणवाडीची तपासणी करून त्याचा गौरव केला जातो.

**तक्ता क्र. २ शहरातील कार्यरत अंगणवाड्यांची स्थिती (२०१०-११ अखेर)**

| अ. नं | अंगणवाडीचे/बिटचे नाव | पट | किशोरी | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गोसावी वस्ती | ४५ | ३ | २५ | २० | ४८ |
| २) | इंदिरानगर झोपडपट्टी | ८१ | ३ | ५० | ३१ | ८४ |
| ३) | साठेनगर | ४१ | ३ | २६ | १५ | ४४ |
| ४) | सिद्धेश्वर कॉलनी | ४६ | ३ | ३० | १६ | ४९ |
| ५) | बापूवाडी | ४५ | ३ | २८ | १८ | ४८ |
| ६) | पेटकर प्लॉट | ५७ | ३ | ३० | २७ | ६० |

**संदर्भ**-*शहरी एकात्मिक बालविकास केंद व सौ.आलदर एस. ए. मुलाखत अंगणवाडी सुपरवायझर* [२१]

तक्ता क्र. २ वरून शहरात २०१०-११ वर्षामधील एकूण बालकापैकी ० ते १ वयोगटामधील ७०, १ ते ३ मधील १७४ व ३ ते ६ मधील बालके ७४ आहेत. तर शहरात बालमृत्यूदर ६८.९७ आहे. शहरात कुपोषणामध्ये मध्यम वजनाची बालके ९७ व कमी वजनाच्या बालकांची संख्या १ असून टक्केवारी ०.१६ आहे. शहरात ६ अंगणवाड्यापैकी चार अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये व दोन नियमित इमारतीशिवाय चालविल्या जातात. स्तनदा मातांची संख्या ४४ आहे. तसेच येथे विविध पायाभूत सुविधा राबविल्या जात आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय, खेळणी, मुलांना शासकीय मेनूकार्डप्रमाणे खाऊ दिला जातो. पण शौचालयाची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

## ४.७ तासगाव शहरातील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांची स्थिती

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात तासगाव शहरात प्राथमिक शिक्षणाचा विकास व्हावा, या दृष्टीने प्रयत्न झाले. भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमानुसार १४ वर्षाच्या आतील बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले.[२२] त्यानुसार शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी संस्था यांच्या माध्यमातून शिक्षण देण्याची व्यवस्था केली. ५० च्या दशकात १० वर्षासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले होते. परंतु पहिल्या १० वर्षात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यास शासनास अपयश आल्याने, शासनाने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे या धोरणाची मुदत पुन्हा दहा वर्षानी वाढवली. त्या धोरणाचा परिणाम तासगाव शहरात प्रभावी झाला.

भारत सरकारने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी १९६४ मध्ये कोठारी आयोगाची स्थापना केली. आयोगाने प्राथमिक शिक्षणावर भर देण्याची शिफारस केली. शिक्षणाची १९६२ पर्यत सूत्रे स्कूल बोर्डाकडे होती. १९६२ मध्ये जिल्हा परिषद स्थापन झाल्यानंतर प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले. जिल्हा परिषदेने शिक्षणाचा गुणात्मक दर्जा सुधारावा म्हणून स्वतंत्र शिक्षण विभागाची स्थापना केली. तासगाव शहरातील नगरपालिकेच्या सन १९७८-७९ मध्ये १२ प्राथमिक शाळा विद्यार्थी संख्या ३,२७० एवढी होती.[२३]

देशाच्या कारभाराचे जसे विकेंद्रिकरण होवू लागले. तसे नगरपालिकेच्या कारभाराचे विकेंद्रीकरण सुरू झाले व निरनिराळ्या कार्यकारणीची निवड होवू लागली. तासगाव नगरपरिषदेने दि. ०१/०२/१९८० रोजी प्राथमिक शिक्षण आपल्या ताब्यात घेतले.[२४]

तासगाव नगरपालिकेचे तत्कालीन नगराध्यक्ष डी. एम. पाटील, सर्व नगरसेवक यापैकी श्री. सदाशिव बा. साठे, श्री. अ. भा. चिवटे व तत्कालीन मुख्याधिकारी श्री. एल. ए. लटके यांनी तासगांव मधील प्राथमिक शिक्षण नगरपालिकेच्या ताब्यात मिळावे यासाठी वारंवार अर्ज सांगली जिल्हा परिषदेकडे केला तरी जाणून बुजून त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. म्हणून शहरातील प्रमुख कार्यकर्त्यांनी सांगली जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला. एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करून तत्कालिन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा. आप्पासाहेब बिरनाळे यांना कोंडून घातले होते. ही बातमी तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांच्या कानी जाताच त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. अ. जो. पाटील यांना तत्काळ आदेश देऊन नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व प्राथमिक शाळा हस्तांतरित करण्यासंबंधी आदेश दिला.[२५]

त्यानुसार जावक क्र. प्रत आस्था-१ शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली ३० जाने. १९८० रोजी नोटीफिकेशन क्र. एम. एस. बी. १५-७८ (३१५१) (८२) तेवीस दि. २५/०४/१९८९ अन्वये तासगाव नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांचा ताबा नगरपरिषदेकडे सुपूर्द करणे बद्दल दि. १३/०८/१९७९ व्या संबंधित समितीच्या महासभेत झालेल्या ठरावानुसार हस्तांतरीत केल्या व तासगांव नगरपरिषदेने दि. ०१/०२/१९८० रोजी प्राथमिक शिक्षण आपल्या ताब्यात घेतले.[२६]

**तक्ता क्र. ३ नगरपरिषदेच्या शाळेतील मुला-मुलींच्या माध्यमवार संख्या**

| अ.क्र. | माध्यम | मुलांच्या शाळा(संख्या) | मुलींच्या शाळा संख्या |
|---|---|---|---|
| १) | मराठी | १० | ० |
| २) | उर्दू व इंग्रजी | ०१ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | इंग्रजी | ०१ | ० |

तक्ता क्र. ३ वरून नगरपरिषदेच्या शाळेतील सन १९७८-७९ मध्ये १२ प्राथमिक शाळा असून विद्यार्थी संख्या ३,२७० एवढी होती. तसेच सन १९८०-८१ मध्ये नगरपरिषदेकडे मुला-मुलींच्या एकूण पट ३,३०० व १०७ शिक्षकांची यादी हस्तांतरित करण्यात आली व दहा मराठी शाळा एक उर्दू शाळा व एक इंग्रजी शाळा हस्तांतरित झाल्या. शाळावार मुला-मुलींची माहिती मिळाली नाही.

**तक्ता क्र. ४ नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी**

| **अ.नं.** | **प्रशासन अधिकारी** | **कालावधी** |
|---|---|---|
| १) | मा. श्री. एम. एन. शेटे | ०१/०२/१९८० ते ०८/०७/१९८२ |
| २) | मा. श्री. एस. आर. बिरासदार | ०९/०७/१९८२ ते ०४/०७/१९८५ |
| ३) | मा. श्री. पी. आर. शेंदूरे | ०५/०७/१९८३ ते ०९/०७/१९८५ |
| ४) | मा. श्री. वाय. एन. पाटील | १०/०७/१९८५ ते ०८/१२/१९८६ |
| ५) | मा. श्री. एस. के. निकम | ०९/१२/१९८६ ते २३/०६/१९८८ |
| ६) | मा. श्री. डी. एम. पाटील | २४/०६/१९८८ ते २५/०५/१९८९ |
| ७) | मा. श्री. डी. एम. पाटील | २४/०६/१९८८ ते २५/०५/१९८९ |
| ८) | मा. श्री. जे. एन. पाटील | २९/०५/१९८९ ते १७/०१/१९९० |
| ९) | मा. श्री. अनिल ए. पाटील | १८/०१/१९९० ते ०२/०५/१९९० |
| १०) | मा. श्री. मुकुंद बी. गुरव | ०५/०५/१९९० ते २८/०८/१९९१ |
| ११) | श्री. उदय बी. शेटे | २९/०८/१९९७ ते ०५/०१/१९९२ |
| १२) | श्री. पितांबर ल. हणबर | ०६/०१/१९९२ ते १३/०५/१९९७ |
| १३) | श्री. आदिनाथ बी. वाटकर | १४/०५/१९९७ ते १२/०७/२००० |
| १४) | श्री. पी. टी. पाटील | १२/०७/२००० ते ०७/०७/२००३ |
| १५) | श्री. पितांबर ल. हणबर | ०८/०७/२००३ ते ०४/०६/२००६ |
| १६) | श्री. एस. डी. शिंदे | ०५/०६/२००६ ते ०४/०६/२००८ |
| १७) | श्री. पी. डी. कुंभार | ०५/०६/२००८ ते ०४/०६/२००९ |
| १८) | श्री. आर. जे. शिंदे | २०/०६/२००९ ते ३१/०५/२०१० |
| १९) | श्री. के. एन. जठार | १६/०६/२०१० ते ३०/०६/२०११ |
| २०) | श्री. ए. बी. वाडकर | ०१/०७/२०११ ते **कार्यरत....** |

***सदर्भ***-*नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांच्या बोर्डावरील माहिती.*[२७]

तक्ता क्र. ४ वरून तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी १९८० पासून २०११ अखेर १९ प्रशासन अधिकाऱ्यांनी विविध शैक्षणिक सुधारणा केल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ५ नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती**

| अ.नं. | सभापती | कालावधी |
|---|---|---|
| १) | मा. डी. एम. पाटील | १०/०२/१९८० ते २१/०७/१९८६ |
| २) | मा. आर. बी. जोतराव | २२/०६/१९८६ ते २१/०६/१९९० |
| ३) | मा. सी. पी. कांबळे | २२/०७/१९८६ ते २१/०६/१९९० |
| ४) | मा. वसंतराव नरायण लुगडे | ३०/०५/१९९३ ते १६/०४/२००१ |
| ५) | मा. शंकराव पाडुरंग थोरबोले | १६/०४/२००१ ते १५/०८/२००३ |
| ६) | मा. मुख्याधिकारी तथा सभापती नगरपालिका शिक्षण मंडळ | महाराष्ट्रातील शिक्षण मंडळे बरखास्त केली. |
| ७) | मा. मारूती भिमराव गुरव | २५/०३/२०१० ते २८/१०/२०१० |
| ८) | मा. सुखदेव तुकाराम पवार | २८/१०/२०१० ते २४/०३/२०११ |
| ९) | मा. सुनिल दशरथ पाटील | २५/०३/२०११ **कार्यरत**... |

***संदर्भ***-*नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती यांच्या बोर्डावरील माहिती.* [२८]

तक्ता क्र. ५ वरून तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळाचे एकूण ९ सभापतींनी आपली कारकीर्द शाळांच्या हितांचे विविध निर्णय घेऊन आजमावली आहे. सध्या तासगाव नगरपालिकांच्या शाळांची संख्या १६ असून विद्यार्थी संख्या १,३४८ आहे. शिक्षक संख्या ६६ आहे. खाजगी शाळा ८ असून विद्यार्थी संख्या २,४०८ आहे. शिक्षक संख्या ३९ आहे.

**तक्ता क्र. ६ नगरपरिषद शिक्षण मंडळ तासगाव अंतर्गत एकूण १६ प्राथमिक शाळा खालील प्रमाणे**

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | स्थापना | एकूण पट | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १ | मराठी | १८७० | १४६ | ६ |
| २) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. २ | मराठी | १८७१ | २८ | २ |
| ३) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ३ | मराठी | १८७५ | १२७ | ६ |
| ४) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ४ | उर्दू | १८७५ | ९२ | ४ |
| ५) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ५ | मराठी | १९४९ | १०१ | ५ |
| ६) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ६ | मराठी | १८९१ | १८ | २ |
| ७) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ७ | मराठी | १८९९ | २२७ | ८ |
| ८) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ८ | मराठी | १९८९ | २७ | २ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ९ | मराठी | १८७८ | १५८ | ७ |
| १०) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १० | मराठी | १९८१ | २३ | १ |
| ११) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. ११ | मराठी | १९७५ | ३० | २ |
| १२) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १२ | मराठी | १९९० | ११५ | ६ |
| १३) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १३ | मराठी | १९७६ | १३७ | ७ |
| १४) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १४ | मराठी | १९८५ | २९ | २ |
| १५) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १५ | मराठी | २०१० | २० | १ |
| १६) | तासगांव नगरपरिषद शाळा क्र. १६ | मराठी | २०१० | १३ | १ |

*संदर्भ-तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळाची खतावणी* [२९]

तक्ता क्र. ६ वरून आपणास असे दिसते की, शिक्षण मंडळाच्या स्थापनेच्या वेळी विद्यार्थ्यांची संख्या ३,३०० होती व सध्या ती १,३४८ एवढी आहे.[३०] एकंदरीत विद्यार्थ्यांची संख्या निम्याहून कमी झाली आहे. याचे प्रमुख कारण शहरामध्ये वाढणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा व दिवसे-दिवस शहरातील पालकांचा कल किंवा दृष्टीकोन मराठी शाळेपेक्षा इंग्रजी माध्यमाकडे जास्त दिसत आहे. या इंग्रजी शाळाशिवाय काही मराठी माध्यमांच्या दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा अलिकडच्या काळात निघालेल्या दिसून येतात. नगरपालिकेच्या शाळेत प्रामुख्याने गरीब, कष्टकरी व मध्यम वर्ग व झोपडपट्टीतील मुले शिक्षण घेताना दिसतात.

### ४.७.३ वस्तीशाळा

महाराष्ट्र शासनाने सार्वत्रिक शिक्षणाचे धोरण राबवूनही प्राथमिक शिक्षण सर्वत्र पोहचले नव्हते. त्याला तासगाव परिसर अपवाद नव्हते. शासन नियमानुसार दीड कि. मी. परिसर व २०० लोकसंख्या असणाऱ्या गावामध्ये व आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात एक कि. मी. व १०० लोकसंख्या असणाऱ्या गावामध्ये प्राथमिक शाळा स्थापन केली जाते. ज्या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी वस्तीशाळा स्थापन करण्याचा निर्णय सन २००० मध्ये घेण्यात आला. परंतु या वस्तीशाळा स्थापन करण्यासाठी १ ली ते ४ थी या वर्गात मिळून कमीत कमी १५ विद्यार्थ्यांची संख्या असली पाहिजे अशी अट घालण्यात आली.[३१]

तासगाव परिसरात कांबळेवाडी, साठेनगर, दत्तमाळ, गोसावीवस्ती, लांडघोल मळा, बापूवाडी, इंदिरानगर झोपडपट्टी, पेटकर प्लॉट या ठिकाणी वस्ती शाळा स्थापन झाल्या आहेत.[३२]

## ४.८ प्राथमिक शिक्षणातील विविध योजना

### ४.८.१ पुस्तक पेढी योजना

ही योजना शासनाने सन १९७७-७८ मध्ये सुरू केली. या योजनेनुसार शासनाच्या नियमानुसार अनुदान प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेतील २५% विद्यार्थ्यांना पुणे येथील महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडून क्रमित पुस्तके पुरविली जातात. जिल्हा परिषदेच्या अधिकाराखाली प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होतो. परिणामी गरीब विद्यार्थ्यांना या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला आहे. सन २००५ पासून १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व मुलांना या योजनेतून मोफत पाठ्यपुस्तके दिली जात आहेत [३३]

### ४.८.२ लेखन-वाचन हमी कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा गुणात्मक विकास व्हावा म्हणून विविध योजना राबविल्या. लेखन-वाचन हमी कार्यक्रम हा त्याचाच एक भाग होय. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या वर्गातील अप्रगत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध 'लेखन-वाचन हमी' कार्यक्रमातून घेतला. या 'लेखन-वाचन हमी' कार्यक्रमातून महाराष्ट्र राज्यातील ४८% विद्यार्थी अप्रगत आढळून आले.[३४] तर सांगली जिल्ह्यातील ४०% विद्यार्थी अप्रगत आढळून आले. त्यात तासगाव शहरातील २२% विद्यार्थी अप्रगत आढळून आले.[३५] या अप्रगत विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास व्हावा म्हणून विविध योजना राबविल्या. यानुसार परिपूर्ण कार्यक्रम पुस्तिका तयार करून तीन लाख प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले व ६१ दिवसांचा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला. यामध्ये शाळा भरण्यापूर्वी दीड तास अगोदर व नंतर दीड तास, रविवार पूर्ण दिवस या कामासाठी वापरून लेखन-वाचन गणित या विषयाची विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेण्यात आल्याचे निदर्शनास येते.[३६]

### ४.८.३ दत्तक शाळा योजना (सावित्रीबाई दत्तक पालक योजना)

प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी अप्रगत मुलांची शोधमोहिम सुरू करण्यात आली. साधारणपणे शहरात २५% अप्रगत विद्यार्थी आढळून आले. अशा या अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी खास प्रयत्न करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला. अशा शाळांबाबत अधिकाऱ्यांनी वारंवार भेटी देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, याचा अहवाल तपासणे इत्यादी उपक्रम राबविण्यासाठी विचार सुरू झाला. त्यातून दत्तक शाळाही योजना सुरू करण्यात आली. या योजनेनुसार एक विद्यार्थी दत्तक घेवून व तसेच रू. ३,०००/- बँकेत ठेवून त्याच्या येणाऱ्या व्याजातून त्या विद्यार्थ्यांला शिष्यवृत्ती दिली

जाते.[३७] तासगाव शहरात प्रत्येक शाळेमध्ये कमीत कमी चार विद्यार्थी दत्तक घेतल्याचे दिसून येतात. याचा निश्चित आकडा उपलब्ध झाला नाही.

### ४.८.४ सर्व शिक्षा अभियान

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान सन २००१-२००२ मध्ये सुरू करण्यात आले. या अभियानांतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना आठवीपर्यत शिक्षण देणे तसेच इ.स. २०१० पर्यत जीवनावश्यक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट या योजनेचे आहे. सर्व शिक्षा अभियानानुसार शहरात अनेक प्राथमिक शाळेच्या इमारती बांधणे, इमारती दुरूस्ती करणे, शैक्षणिक साहित्य वाटप, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षक अनुदान, शाळा अनुदान इ. सुविधा पूर्ण झाल्या. तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षणाचे सुक्ष्म नियोजन विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकविणे व शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी केंद्र प्रमुखांची गटवार नियुक्ती करण्यात आली.[३८]

सर्व शिक्षा अभियानातील विविध उपक्रमांचे सनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी शासनाच्या नियमानुसार साधनगट तयार करण्यात आला आहे. यानुसार या गटात गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, दोन गणित तज्ज्ञ, दोन भाषा तज्ज्ञ, एक इंग्रजी तज्ज्ञ, एक सामाजिक शास्त्र तज्ज्ञ, एक विज्ञान तज्ज्ञ व एक अपंगाचे शिक्षण तज्ज्ञ अशा १२ लोकांची समिती (गट) तयार करण्यात आली आहे. ही समिती मार्गदर्शन, नियंत्रण करण्याचे काम करत आहे.[३९]

### ४.८.५ शिष्यवृत्ती परीक्षा

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची जबाबदारी राज्य शासनावर आली. प्रत्येक राज्याचा विकासाचा वेग आणि सांस्कृतिक दर्जा लक्षात घेऊन शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. त्यानुसार शासनाने विद्यार्थ्यांत स्पर्धा वाढावी, त्यांच्यात गुणवत्ता निर्माण व्हावी. स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शिष्यवृत्ती योजना अंमलात आली. त्यानुसार प्रत्येक वर्षी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा सुरू करण्यात आली.

**तक्ता क्र. ७ शिष्यवृत्ती परीक्षा** (तासगाव शहर विभाग)[४०]

| **वर्ष** | **जिल्हास्तर गुणवत्ता क्रमांक** | **एकूण** |
|---|---|---|
| २००१ | ०१, ११ | ०२ |
| २००२ | १९ | ०१ |

| | | |
|---|---|---|
| २००४ | २२ | ०१ |
| २००५ | ५, ९, ९, १३ | ०४ |
| २००६ | ७, १८, १९, २१, २२, २२, २३ | ०७ |
| २००७ | १५, १८, १९, २०, २४, २५, २६, ३१, ३१, ३२, ३४, ३५ | १२ |
| २००८ | ३, ५, ९, १६, १७, २१, २५, २६, २७, ३४ | १० |
| २००९ | ३, ७, ८, १०, ११, १२, १७, १८, २०, २३, २४, २४, २५, २७, २८, २९, ३२, ३५ | १८ |
| २०१० | ४, ११, १३, २४, २६, २५, ३३, ३७, ४२, ४४, ५०, ७०, ७१, ८१, १०१, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३, १४५, १४६ | २३ |
| २०११ | २, ११, ७, १२, १४, १४, १४, १५, १६, १६, १७, १७, १७, १८, १८, २१, २७, २९, ३०, ३०, २१, ३३, ४४, ५० | २४ |

तक्ता क्र. ७ वरून माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तासगाव शहर विशेषत: सैनिकी शाळेने धवल यश प्राप्त केले आहे. २००१ पासून २०११ पर्यत पहिल्या ५ क्रमांकामध्ये १० विद्यार्थी बसले आहेत. सैनिकी शाळेमधील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या १०० च्या वर गेली आहे.[४१]

## ४.८.६ प्राथमिक शाळेतील विविध उपक्रम

प्राथमिक शाळेतील मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा व गुणवत्तेत वाढ व्हावी. यासाठी शासनाबरोबरच प्राथमिक शाळेने विविध उपक्रम राबविले. त्यामध्ये वृक्षारोपण, शाळा सुधार योजना, सावित्रीबाई दत्तक पालक योजना, सामाजिक वनीकरण, सुंदर बगीचा इत्यादी उपक्रमांचा समावेश होता.[४२]

## ४.९ शहरातील प्रमुख खाजगी प्राथमिक शाळा

मुंबई राज्यात १९३७ मध्ये कॉंग्रेस मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यावर प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी ऐच्छिक प्राथमिक शाळांची योजना सुरू केली. पुढे १९४७ मध्ये मुंबई शासनाने सक्तीचे व मोठ्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर केल्यामुळे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सर्वस्वी शासनावर पडली. त्यामुळे शहरातील शाळा हळूहळू जिल्हा स्कूल बोर्डाच्या ताब्यात गेल्या. याच कायद्याने सात वर्षाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला व त्यानुसार जिल्हा स्कूल बोर्ड व मान्यताप्राप्त नगरपालिकांकडे शाळा सुरू करण्याचे अधिकार देण्यात आले. साहजिकच प्राथमिक शाळेच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.[४३]

सध्या खाजगी प्राथमिक शाळांची संख्या ८ असून विद्यार्थ्यांची संख्या १८०० इतकी आहे तर शिक्षकांची संख्या ४९ इतकी आहे. तासगाव शहरात खाजगी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळांची संख्या ८ वर गेलेली दिसून येते.[४४] यावरून असे दिसते की, खाजगी शाळेचे महत्त्व वाढत असून बहुसंख्य शहरातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा कल हा इंग्रजी माध्यमाकडे वाढत आहे.

## **४.९.१ संस्कार मंदिर सरावपाठ शाळा, तासगाव** (स्थापना १९६५)

साधना शिक्षण संस्थेचे 'संस्कार मंदिर सरावपाठ शाळा तासगाव' हे एक संस्कार केंद्र होय. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने २००० स्वे. फूट जागा भाड्याने घेतली आहे. येथे १९६५ मध्ये यशवंत हायस्कूल या नावाने विद्यासंकुलाची उभारणी केली. या प्रशालेत इयत्ता १ ली ते ५ वी वर्ग सुरू आहेत. या शाळेच्या स्थापनेच्यावेळी ९० पट तर सध्या २०० विद्यार्थी ज्ञानग्रहण करतात. तर ४ शिक्षक पूर्णवेळ ज्ञानदानाचे काम करतात. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम मुलांना कला व क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.[४५]

## **४.९.१ नूतन मराठी विद्यानिकेतन तासगाव**(स्थापना १९८४)

जीवन विकास संस्थेने तासगाव शहरात बालचिमुंच्या शिक्षणासाठी नुतन मराठी विद्यानिकेतन तासगाव या प्राथमिक शाळेची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आली. पुढे २०१० मध्ये महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांच्या हस्ते या शाळेचे 'संत नामदेव नुतन मराठी विद्यानिकेतन', तासगाव असे नामकरण करण्यात आले.

स्थापनेच्या वेळी ४५ विद्यार्थी होते. तर सध्या २०१० मध्ये ५३५ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. तर ८ शिक्षक पूर्णवेळ ज्ञानदानाचे काम करतात. या विद्यासंकुलामध्ये बालचमुंच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. उन्हाळी पाच दिवसाचे शिबीर, वार्षिक स्नेह संमेलन तसेच विविध बौद्धिक स्पर्धा घेतल्या जातात. मुलांना सर्वांगीण विकासासाठी कला व क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.[४६]

## **४.९.२ आण्णासाहेब डांगे आश्रमशाळा तासगाव** (स्थापना १९९८)

तासगाव शहरात 'संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था इस्लामपूर' संचलित आण्णासाहेब डांगे आश्रमशाळा तासगाव येथे संस्थापक मा. आण्णासाहेब डांगे यांच्या पुढाकाराने शहरात ११ गुंठे जागेमध्ये 'आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत' १९९८ मध्ये एकमेव शासकीय आश्रमशाळा स्थापन केली. स्थापनेच्या वेळी विद्यार्थी संख्या ९८ होती तर २०१० अखेर २१९ विद्यार्थी आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत.

यापैकी १२८ मुले व ९१ मुली आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या १३ आहे. पगारापोटी शासनास महिना २ लाख ५८ हजार खर्च होतो.[४७]

आश्रमशाळेत अनु. जाती-जमाती व विमुक्त जाती भटक्या जमातीचे विद्यार्थी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुले शिकतात. येथे १ ली ते ७ वी पर्यतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. येथे निवासी १२० मुलांना वसतिगृहाची सोय आहे. वसतीगृहासाठी शासन प्रत्येकी मुलापाठीमागे महिना ६०० रूपयेप्रमाणे महिना ७२,००० खर्च करते. इतर मुले अनिवासी आहेत. सध्या ही आश्रमशाळा 'विशेष जिल्हा समाज कल्याण विभाग' या शाळेचा कारभार पहात आहे.[४८] या आश्रमशाळेमुळे आथिकदृष्ट्या दुर्बल मागासलेल्या गरीब मुलांना शिक्षण जेवणाची व राहण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

## **४.९.३ स्वामी रामानंद भारती प्राथमिक विद्यामंदिर तासगाव** (स्थापना २००२)

स्वामी रामानंद भारती विद्यालयाच्या स्थापनेत स्वामी शिक्षण संस्थेने कायम विनाअनुदानित तत्वावर स्थापन केले आहे. स्थापनेच्या वेळी ५० विद्यार्थी होते. तर सध्या २०१० मध्ये २३५ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.[४९]

## **४.१० स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाची स्थिती**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात तासगाव शहरातील माध्यमिक विद्यालयाच्या संख्येत वाढ होत गेली. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत विकास झाला नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर माध्यमिक शिक्षणाचा बराच विकास झाला. खाजगी संस्थेच्या माध्यमातून तासगाव परिसरातील वि. स. पागे, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे, आण्णासाहेब डांगे, डी. एम. पाटील, तसेच सेवादलातील श्री. निवृत्ती हरी सोन्नर, मा. शं. ज. कुत्ते, मा. के. वाय. कोळेकर, इ. सामाजिक कार्यकर्त्याच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले.[५०]

डॉ. कोठारी आयोगाची १९६८ मध्ये स्थापना झाली. सन १९६८ चे शैक्षणिक धोरण यांच्या आधारावर महाराष्ट्र शासनाने सन १९६८ साली श्वेतपत्रिका प्रसिध्द केली. यात १५ ते २० वर्षाच्या कालावधीसाठी राज्याच्या शैक्षणिक पुर्नरचनेचा आराखडा देण्यात आला. त्यानुसार मोफत शिक्षण, शिष्यवृत्त्या, पुस्तकपेढी, फी सवलत, शासकीय विद्यावेतन यासारख्या योजना हाती घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात शाळांना तुकड्या वाढवून देणे, शिक्षकांकरिता निवृत्ती वेतन, शाळा इमारतीच्या बांधकामासाठी अनुदान इत्यादी योजना कार्यान्वित करण्यात आल्या. थोडक्यात, स्वातंत्र्योत्तर

काळात केंद्र व राज्य शासनाच्या शैक्षणिक धोरणामुळे व खाजगी संस्थांमार्फत शाळा मोठ्या प्रमाणात उघडण्यात आल्या.[५१]

डॉ. कोठारी आयोगामुळे खाजगी शाळांना अनुदान मिळाल्याने शहरातील खाजगी शाळांनी इमारती बांधून सुसज्ज शाळा निर्माण केल्या. मोफत शिक्षण, शिष्यवृत्त्या व पुस्तकपेढी योजनेमुळे अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमातीमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली. परिणामी नवीन शाळा व नवीन तुकड्या वाढल्या.

सन २००० मध्ये महाराष्ट्र शासनाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे, या हेतूने खाजगी संस्थांना कायम स्वरूपी विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यास सुरूवात केल्याने, नवीन शाळा व तुकड्या वाढल्या. त्याचबरोबर या शिक्षण संस्थामुळे गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा सुरू झाली. विनाअनुदानित व कायमस्वरूपी विनाअनुदानीत शाळेतील शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांचेही मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याचे दिसून येते. तसेच एकाच गावात एकापेक्षा अधिक शिक्षण संस्था स्थापन झाल्यामुळे अनुदानित शाळेचा पट कमी हेवू लागल्याचे दिसून येते.

## ४.१०.१ शहरातील प्रमुख माध्यमिक शाळांचा आढावा

## ४.१०.२ चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव (स्थापना १९२०)

सांगली शिक्षण संस्थेचे पूर्वीचे ए. व्ही. स्कूल हे सर्व सामानासह नगरपालिकेकडून १ जून १९२० रोजी सांगली शिक्षण संस्थेकडे हस्तांतर झाले व 'तासगाव हायस्कूल' नाव पडले. सुरूवातीला दातार वाड्यात पुढे मोकासवाडा, हुपरीकरवाडा, खाजगीवालेवाडा अशा दीर्घकालीन प्रवासानंतर भाऊसाहेब पटवर्धनानी २४,००० स्वे. फुट जागा प्रशालेला दान दिली. मोरारजी भाई देसाई व काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्ते १९५४ मध्ये शाळेच्या इमारतीचे भूमीपूजन झाले.[५२]

प्रशालेच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त उद्योजक रसिकलाल वाडीलाल शहा हे शाळेचे माजी विद्यार्थी यांनी २ लाख रूपये देणगी दिली. म्हणून त्यांच्या आईच्या नावे सन १९८३ मध्ये 'चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर' तासगाव असे नामकरण करण्यात आले.[५३] स्थापनेच्या वेळी विद्यार्थी संख्या ५४ होती तर २०१० अखेर ७३६ यापैकी २०९ मुली व ५१० मुले ज्ञानग्रहण करतात तर १९ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ज्ञानदानाचे काम करतात. पगारापोटी शासन वार्षिक ७५ लाख खर्च करते.

सदर प्रशालेने अनेक समाजसेवक, उद्योजक, अधिकारी, साहित्यिक, क्रिडापटू जन्माला घातले. वि. स. पागे. डॉ. बाबासाहेब भोसले, शं. ज. कुत्ते, वि. दा. करंदीकर, नदाफ साहेब, रामचंद्र ज्ञ. लुगडे,

धोंडीराम (नाना) पाटील, के. वाय. कोळेकर, रसिकलाल वाडीलाल शहा इत्यादी कर्मयोग्यामुळे शहराच्या लौकिकात भर पडली.[५४]

## ४.१०.२ विद्यानिकेतन कृषि माध्यमिक विद्यालय, तासगाव (स्थापना १९६७)

जीवन विकास संस्थेच्या विद्यानिकेतन कृषि माध्यमिक विद्यालयाची स्थापना १९६७ मध्ये वि. स. पागे यांनी केली. पुढे २०१० मध्ये महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर (आबा) पाटील यांच्या हस्ते या शाळेचे ‘महाराष्ट्ररत्न वि. स. पागे, कृषि माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज’, तासगाव असे नामकरण करण्यात आले.[५५] या विद्यालयामुळे विसापूर, राजापूर, वंजारवाडी, चिंचणी, शिरगाव, बोरगाव, वासुंबे, मणेराजुरी, कुमठे, मतकुणकी, निमणी, इ. गावातील मुला-मुलींना शिक्षणाची सोय झाली आहे. या विद्यालयात शिक्षक संख्या २६ तर एकूण १५ तुकड्या आहेत. विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी २२ विद्यार्थी होते. तर सध्या ७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[५६]

## ४.१२.१ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव (स्थापना १९५५)

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक क्रांती घडविणारे प. पू. बापूजी साळुंखे हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व होय. स्वामी रामानंद भारती यांचे विचार व कार्याने प्रभावित होऊन तासगाव येथे ‘स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर’ या विद्यासंकुलाची प. पू. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये संस्थेची स्थापना केली.

महाराष्ट्रात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने आपल्या कार्यास ६ जून १९५५ रोजी प्रारंभ केला. याच दिवशी बापूजींनी शिक्षण उपसंचालक आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाने आणि त्यांचे सहकारी स्वामी रामानंद भारती, दिनकर रामचंद्र माने, श्री. काकडे गुरूजी, आप्पासाहेब साळुंखे इ. शिक्षकांनी कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे आणि उंडाळे या ठिकाणी सुरूवातीला ५ पाच संस्कृती केंद्र (हायस्कूल) सुरू केली.

यामध्ये तासगाव शाखेची जबाबदारी निःस्वार्थी, ऋषितुल्य शिक्षक श्री. दिनकर रामचंद्र माने यांच्यावर टाकली. त्यांना तालुक्यातील गरीब जनतेने तसेच तत्कालिन नगराध्यक्ष रामचंद्र ज्ञा. लुगडे व कुत्ते वकील यांचे सहकार्य लाभले. या विद्यालयाची स्थापना १९५५ मध्ये झाली. स्थापनेच्यावेळी २३ मुले होती या विद्यालयामुळे विसापूर, राजापूर, वंजारवाडी, चिंचणी, शिरगाव, बोरगाव, वासुंबे, मणेराजुरी, कुमठे, मतकुणकी, निमणी, इ. गावातील मुला-मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. या विद्यालयात एकूण २० तुकड्या असून १८८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[५७]

### ४.१०.४ यशवंत हायस्कूल, तासगाव (स्थापना १९६७)

'साधना शिक्षण संस्थेने' १९६७ मध्ये 'यशवंत हायस्कूल' या नावाने विद्यासंकुलाची उभारणी केली. या प्रशालेत इयत्ता ५ वी ते १० वी वर्ग सुरू आहेत. या शाळेच्या स्थापनेच्या वेळी १०० पट तर सध्या ३५० विद्यार्थी ज्ञानग्रहण करतात. तर १० शिक्षक ज्ञानदानाचे काम करतात. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ही प्रशाला अहोरात्र प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.[५८]

### ४.१०.४ पटवर्धन कन्या प्रशाला तासगाव (स्थापना १९७५)

सांगली शिक्षण संस्थेचे पटवर्धन कन्या प्रशालेची स्थापना १९७५ मध्ये केली. हे इयत्ता पाचवी ते १० वी पर्यत मुलींच्यासाठी ज्ञान केंद्र सुरू केले. भाऊसाहेब पटवर्धनानी २४,००० स्वे. फुट जागा प्रशालेला दान दिली. म्हणून या शाळेचे नामकरण 'पटवर्धन कन्या प्रशाला तासगाव' असे करण्यात आले. या प्रशालेच्या स्थापनेच्या वेळी ४५ पट तर सध्या ३०० कन्या ज्ञानग्रहण करतात. मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी ही प्रशाला अहोरात्र प्रयत्न करत आहे.

### ४.१०.४ गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तासगाव (स्थापना १९९७)

१९९६ मध्ये मुख्यमंत्री ना. मनोहर जोशी यांच्या कारकीर्दीत प्रत्येक जिल्ह्याला एक सैनिकी शाळा (१००% अनुदानित) याप्रमाणे सांगली जिल्ह्याला एका सैनिकी शाळेची मान्यता मिळाली.[५९] सांगली शिक्षण संस्थेने १० जुलै १९९७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. नितिन करीर व तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक श्री. एस. एन. पवार यांच्या शुभहस्ते 'गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळेचा' शुभारंभ ग. रा. पुरोहित कन्या प्रशाला, राजवाडा, सांगली येथे पार पडला. त्यानंतर जागे अभावी तासगाव येथील दत्तमाळावर स्वतःच्या २८ एकर जागेत शाळेचे स्थलांतर झाले.[६०] मूळ योजनेत ३० एकर जागा शासनाकडून स्वयंसेवी संस्थांना उपलब्ध होणार होती, परंतु या संस्थेने शासनाची जागा न घेता स्वतःच्या २८ एकर जागेत या शाळेची उभारणी केली. ना. आर. आर. पाटील, मेजर जनरल आर. कार्तिकेयन, दिनकर (आबा) पाटील व संजयकाका पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.[६१]

ना. आर. आर. पाटील, यांच्या वरदहस्ताने व मुख्याध्यापक श्री. श. गो. उमराणी यांच्या व्यवस्थापन नियोजन कौशल्याने या शाळेने महाराष्ट्रात अल्पावधीत सर्वत्र नावलौकीक मिळविला. शाळेने शैक्षणिक व इतर उपक्रमातून बरीच प्रगती साध्य केली. पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी व अन्य मिलिटरी शाळांमधील प्रवेश सुकर करण्यासाठी विद्यार्थ्यांची बौद्धिक शारिरीक व मानसिक तयारी करणे हे या शाळेचे प्रमुख ध्येय आहे.[६२]

'गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा' ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्नित आहे. शाळेचे बांधकाम ३ कोटीचे आहे. शाळेची वेळ सकाळी ५.३० ते रात्री १०.३० वाजेपर्यत मुलांकडून वेळापत्रकाप्रमाणे सैनिकी शिक्षण दिले जाते. शाळेतील अध्यापन व अध्यापनाचे माध्यम (५ वी ते १० वी पर्यत) सेमी इंग्रजी असून अकरावी बारावी विज्ञान शाखेचे माध्यम इंग्रजी आहे.[६३] स्थापनेच्या वेळी ४५ तर सध्या ३६० इतके विद्यार्थी सैनिकी शाळेत शिक्षण घेत आहेत. प्रत्येकी विद्यार्थ्यांना २५००० रूपये वार्षिक फी घेतली जाते. या फीमधून गणवेश, सुसज्ज प्रयोगशाळा, वसतिगृहाची सुविधा तसेच चहा, नाष्टा, जेवण दिले जाते. शिक्षक संख्या दीड तुकडीला दोन टीचर याप्रमाणे ३५ टीचर आहेत. यामध्ये काही सैन्य दलातील निवृत्त अधिकारी आहेत.[६४] पगारापोटी शासन महिना १० लाख खर्च करते.

तासगाव सैनिक शाळेत विद्यार्थ्यांना UPSC, NDA , प्रवेश परिक्षा NTS, M.T.S, N.M.M.S., स्कॉलरशिप, डॉ. होमी भाभा यंग सायंटिस्ट स्पर्धा परिक्षा, T. S. C. आणि I.K.E.N. Scientifical मार्गदर्शन केंद्रे चालविली जातात.[६५] सैनिकी शालेय शिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयात प्रवेश मिळणे सोपे जाते. ही शाळा केंद्रशासनामार्फत चालविली जाते.

## सैनिकी शाळेचे मुख्य उद्दिष्ट

१. संरक्षण सेवेतील अधिकारी वर्गातील प्रादेशिक असमतोल दूर करणे.
२. आजच्या तरूण पिढीला भावी सक्षम नागरिक बनविण्यासाठी त्यांच्यात शारिरीक, मानसिक व नैतिक मुल्यांचा विकास करणे.
३. सर्व सामांन्य लोकांपर्यंत शिक्षण पोहचविणे.
४. सामाजिक जाणीव, निरोगी शरीरात निरोगी मन तयार करून जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात एक उत्कृष्ट नागरिक म्हणून जगता येईल असे उद्दिष्ट विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतले जाते.

## सैनिकी शाळेची उल्लेखनीय कामगिरी

सैनिकी शाळेची ८ माजी विद्यार्थी सैन्यामध्ये अधिकारी पदावर आहेत. यापैकी खालील यशस्वी विद्यार्थ्यांची नावे

१. कॅडेट अभिजीत चंद्रकांत महाजन, (जाने २००८ N.D.A.११९).
२. कॅडेट अभिनंदन आण्णासाहेब शिरोटे, (जुलै २००८ N.D.A.१२०).
३. कॅडेट आकाश महादेव पाटील,(जाने २००९ N.D.A.१२१).

४. कॅडेट ओंकार किरण महाजन, (जाने २००८ N.D.A. २०).

५. कॅडेट दत्तात्रय रमेश खंडागळे, (जुलै २००८ N.D.A. ८८).

६. कॅडेट विवेकानंद गोविंद पाटील. (जाने २०१२ N.D.A. १३२)

या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.) साठी निवड झाली आहे. [६६]

**तक्ता क्र. ८ तासगाव सैनिकी शाळेचा एन.डी.ए. निकाल (**सन. २००४ ते २०११ पर्यंत**)**

| **वर्ष** | **(UPSC) उतीर्ण संख्या** | **एस.एस.बी** | **एन.डी.ए साठी निवड** | **टेक्नि.एन्ट्री (१०+२)** | **सी. डी.एस.** |
|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट ०५ | ०२ | - | - | - | - |
| ऑगस्ट ०६ | ०४ | - | - | - | - |
| एप्रिल ०७ | ०२ | ०१ | - | - | - |
| ऑगस्ट ०७ | ०४ | ०१ | - | - | - |
| एप्रिल ०८ | ०५ | ०१ | ०१ | - | - |
| ऑगस्ट ०९ | ०७ | ०१ | - | - | - |
| एप्रिल ०९ | ०१ | - | - | - | - |
| ऑगस्ट १० | ०५ | - | ०१ | - | - |
| एप्रिल १० | ०२ | - | - | - | - |
| एप्रिल ११ | ०५ | - | - | - | - |
| ऑगस्ट ११ | ०३ | - | - | - | ०१ |
| डिसेंबर ११ | ०१ | - | - | - | - |
| **एकूण** | **५०** | **०६** | **०५** | **०१** | **०१** |

*संदर्भ - तासगाव सैनिकी शाळेचे माहिती पत्रक* [६७]

तक्ता क्र. ८ वरून या शाळेतील विद्यार्थांची UPSC परिक्षेत ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाराष्ट्र संरक्षण प्रबोधिनी (एन. डी. ए.) ०५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. अशा प्रकारे आज प्रशासकीय सेवेत, राजकारणात, व्यवसायात, उत्कृष्टपणे हे विद्यार्थी कार्यसेवेत भूमिका बजावत आहेत.

या सैनिकी शाळेच्या खेळाच्या सुविधामध्ये धावण्याचा ४०० मी. टॅक, ॲथलेटीक, बास्केटबॉल, क्रिकेट, खो-खो, बुद्धिबळ, पोहणे, घोडेस्वार, टेबलटेनिस, लॉनटेनिस, हॉकी, फुटबॉल, योगा, संगणक तसेच विविध कला गुणांना वाव देण्यात येतो. या शाळेमध्ये ५ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण देण्यात येते. सध्या ३६० इतके विद्यार्थी सैनिकी शाळेत शिक्षण घेत आहेत.[६८] अशा प्रकारे सैनिकी शाळा सातत्याने प्रयत्नांची पराकाष्टा करून सर्व क्षेत्रात चांगले नागरिक, प्रशासक देण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ४.१२ कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक शिक्षण

सन १९७३-७४ पूर्वी १ ली ते ७ वी पर्यंत प्राथमिक शाळा व ८ वी ते ११ वी पर्यंत माध्यमिक शाळा असा शैक्षणिक आकृतीबंध होता. इ. ११ वी नंतर शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश मिळत असे त्यावेळी अर्थातच महाविद्यालय पदवी परीक्षा अभ्यासक्रम चार वर्षाचा होता. तथापि ही परिस्थिती फक्त पश्चिम महाराष्ट्रातच होती. विदर्भ व मराठवाडा विभागात वेगळा शैक्षणिक आकृतीबंध होता. या संपूर्ण विभागामध्ये एक समानता आणण्याच्या धोरणानुसार शासनाने सन १९७२ मध्ये १०+२+३ हा संपूर्ण राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतीबंध स्विकारला.[६९]

सन १९७५-७६ च्या शैक्षणिक वर्षापासून सुधारित शैक्षणिक आकृतीबंधानुरूप दहावीची शालांत परीक्षा घेण्यास प्रारंभ झाला व त्यानुसार १०+२ स्तरावरील ११ वी व १२ वी उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यान्वित झाला. कनिष्ठ महाविद्यालयाचे ११ वी १२ वी चे वर्ग आवश्यकतेनुसार सक्षम उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालय यांना जोडण्यात आले. या २ वर्षाच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून दिली जाते.[७०]

**तक्ता क्र. ९ तासगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालये**

| अ.नं | कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव | संस्था | माध्यम/ शाखा | व्यवस्थापन |
|---|---|---|---|---|
| १) | पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील ज्यु.कॉलेज, तासगांव | स्वामी शिक्षण संस्था, कोल्हापूर | कला, वाणिज्य व विज्ञान शाखा | खाजगी अनुदानित |
| २) | विद्यानिकेतन ज्युनि. कॉलेज, तासगांव | जीवन विकास संस्था तासगाव | कला, वाणिज्य, विज्ञान व कृषी शाखा | खाजगी अनुदानित |
| ३) | जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव. | साधना शिक्षण संस्था, तासगाव. | शिक्षणशास्त्र | खाजगी अनुदानित |
| ४) | अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ ऐज्युकेशन, तासगाव | स्वामी शिक्षण संस्था, कोल्हापूर. | शिक्षणशास्त्र | खाजगी अनुदानित |
| ५) | स्वामी रामानंद भारती ज्युनिअर कॉलेज, तासगाव. | स्वामी शिक्षण संस्था, कोल्हापूर. | कला, वाणिज्य व विज्ञान शाखा | खाजगी अनुदानित |

तक्ता क्र. ९ वरून असे दिसून येते की, तासगाव शहरामध्ये माध्यमिक विभागात कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व कृषिशाखा इ. सर्व शाखेचे शिक्षण मिळत असून विद्यार्थ्यांच्या पुढे दहावी पास झाल्यापासून विविध पर्याय उपलब्ध आहेत. तसेच ही कनिष्ठ महाविद्यालये विविध संस्थेची असून दर्जेदार

शिक्षणासाठी प्रसिद्ध आहेत. परंतु लोकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन शहरामध्ये अभियांत्रिकी टेक्निकल वैद्यकिय शिक्षणाची सोय करणे गरजेचे आहे.

## ४.१२.१ पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील ज्युनि. कॉलेज, तासगाव.

जगातील थोर व आदर्श व्यक्तिमत्त्व स्वामी विवेकानंद, त्यांचे विचार व कर्तृत्वाने प्रभावित होऊन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने तासगाव शहरात प. पू. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील ज्युनि. कॉलेजची १९६० मध्ये स्थापना केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान या शाखाद्वारे उच्च माध्यमिक शिक्षणाची संधी प्राप्त झाली.[७१] येथे विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. येथे ११ वी ते एम. ए. एम. एस्सी. पर्यंत अध्यापनाचे कामकाज केले जाते.

या विद्यालयाच्या स्थापनेच्यावेळी संख्या ५१ इतकी होती. तर २०१० अखेर या विद्यालयामध्ये २००० इतकी विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांना कला, क्रीडा व साहित्य लेखनासंबधी प्रोत्साहन दिले जाते. या विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तासगाव तालुक्यात प्रथमच 'तायक्वांदो' या खेळाची सुरूवात झाली. कुंडल व कराड येथे झालेल्या जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळविले आहे. डेहराडून येथे झालेल्या राष्ट्रीय तायक्वांदो' स्पर्धेत हर्षा विष्णू मदने हिने सिल्वर मेडल व विशाल माने याने ब्रांझ मेडल प्राप्त केले आहे. तसेच जमादार एस. ए., प्राजक्ता पवार, जावेद नदाफ, पंकज गायकवाड, महमद नदाफ, विकास बरगुले इत्यादीनी विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल पटकविले. विद्यार्थी विविध क्षेत्रात चमकले आहेत.[७२]

ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारतीत विविध विषयावरील आधुनिक ग्रंथ, जुनी दुर्मिळ व संशोधनमूल्य जोपासणारी येथील ग्रंथसंपदा आहे. संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला वाव दिला जातो. २०११ अखेर एकूण ग्रंथ संख्या ५,४४७ किंमत ३,३२,६०३ इतकी आहे व ६६ नियतकलिके व १२ दैनिके नियमितपणे येतात.[७३]

## ४.१०.२ विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स(ॲग्री) तासगाव (स्थापना १९७५)

जीवन विकास संस्थेने विद्यानिकेतन ज्युनि. कॉलेजची स्थापना १९७५ मध्ये वि. स. पागे यांच्या प्रेरणेने केली. या विद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, कृषि व व्यावसायिक इ. अभ्यासक्रमाचे विभाग आहेत पुढे २०१० मध्ये महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांच्या हस्ते या शाळेचे 'महाराष्ट्ररत्न वि. स. पागे, कृषि माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज, तासगाव'. असे नामकरण करण्यात आले.[७४]

या संस्थेने महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, अंतर्गत व्यवसायिक अभ्यासक्रम १९९३ मध्ये सुरू केला आहे. यामध्ये अनुदानित तीन ट्रेड व विनाअनुदानित तीन ट्रेड असे सहा ट्रेड आहेत. अनुदानित तीन ट्रेड मेन्टेनन्स ॲड रिपेअरिंग ऑफ डोमेस्टीक अप्लायन्सेस, हॉर्टीकल्चर व ॲटो इंजिनिअरिंग टेक्निशियन व विनाअनुदानित तीन ट्रेड रिपेअरिंग मेन्टेनन्स ॲड रिवायडींग ऑफ इलेक्ट्रीक मोटर्स, बॅकींग व कॉम्प्युटर सायन्स असे सहा ट्रेड आहेत. सुरूवातीला ३५ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते तर सध्या ३०० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. १३ शिक्षक ज्ञानदानाचे काम करतात.[७५]

या विद्यालयातून शालेय विषयाबरोबर शेती विषयक माहिती व आधुनिक तंत्रज्ञान जीवनोपयोगी शिक्षण दिले जाते. येथील ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, कविता संग्रह इत्यादी एकूण ५,००० संदर्भ ग्रंथ आहेत. तसेच सुसज्ज इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य, लेडीज रूम, स्वच्छतागृह, सभागृह, क्रिडांगण, बगीचा इत्यादी सोयी आहेत. समाजसेवा शिबीर, उन्हाळी शिबीर घेतली जातात. त्याबरोबर शारिरीक विकासाबरोबरच बौद्धिक विकासासाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात. या विद्यालयामुळे आस-पासच्या गावातील मुला-मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. या विद्यालयात एकूण शिक्षक संख्या ३९ शिक्षक ज्ञानदानाचे काम करतात. ७ शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा देण्याचे काम करतात. तर एकूण १५ तुकड्या आहेत. विद्यालयाच्या स्थापनेच्यावेळी ४६ विद्यार्थी होते तर सध्या १,१०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[७६]

## ४.१२.२ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव (स्थापना १९५५)

स्वामी रामानंद भारती विद्यालयाच्या स्थापनेत स्वामी रामानंद भारती यांचा मोठा वाटा आहे. या विद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान इ. अभ्यासक्रमाचे विभाग आहेत. या विद्यालयामुळे आस-पासच्या गावातील मुला-मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. या विद्यालयात एकूण २२ तुकड्या असून १,१८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[७७]

## ४.१२.३ जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव (स्थापना १९५९)

स्वातंत्र्योत्तर काळात साधना शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी व ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार करण्यासाठी तासगाव शहरात ट्रेनिंग कॉलेज सुरू करण्याचे ठरविले. भूमीपूजन वि. रा. जोगळेकर यांच्या हस्ते झाले [७८]

'महाराष्ट्र राज्य शिक्षण प्रशिक्षण व संशोधन संस्था' पुणे यांच्या अंतर्गत दि. ३/८/१९६० मध्ये जागृती अध्यापिका विद्यालय ४,००० स्वे. फूट जागेमध्ये सुरू झाले. शहरात शिक्षकांच्या ट्रेनिंगची आवश्यकता असल्याने स्व. श्री. निवृत्ती हरी सोन्नर (गुरूजी) यांच्या प्रेरणेने तासगाव परिसरातील सेवादलातील अनेक लोक एकत्र येऊन हे संस्कार केंद्र सुरू केले.[७९]

१९६० मध्ये फक्त मुलींसाठी या विद्यालयाला मान्यता मिळाली. नंतर सन १९६८ ते १९९३ पर्यत मुला-मुलींसाठी मान्यता व परत १९९३ पासून फक्त मुलींसाठी हे ज्ञानकेंद्र कार्यरत आहे. विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी ४० अध्यापिका ज्ञानग्रहण करीत होत्या. तर सध्या १७४ अध्यापिका आहेत. प्राचार्यासह ११ शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करतात तर ६ शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा देण्याचे कार्य करतात.[८०]

या विद्यालयात शासकीय नियमानुसार संवर्गनिहाय प्रवेश दिला जातो. अनुदानित २ डिव्हीजनसाठी ७४ विद्यार्थी व विनाअनुदानित २ डिव्हीजनसाठी १०० विद्यार्थी आहेत. अनुदानित विद्यार्थ्यासाठी प्रत्येकी ३,००० रूपये फी आकारली जाते, तर विनाअनुदानित विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी १२,००० रू. फी आकारली जाते. विद्यालयामध्ये कृतीसंशोधन तसेच विविध विभागाच्या मंडळाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन केले जते. छात्रसेवा शिबीर, समाजसेवा शिबीर, विविध बौद्दिक स्पर्धा घेतल्या जातात.[८१] सामाजिक समस्येवर या विद्यालयाने शहरामध्ये जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे.

या विद्यालयातून भाषा, गणित, इतिहास, भूगोल आदी शालेय विषयाबरोबर शेतीविषयक माहिती व आधुनिक तंत्रज्ञान जीवन उपयोगी शिक्षण दिले जाते. येथील ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, कविता संग्रह इत्यादी एकूण ८,३७५ ग्रंथ आहेत. तसेच सुसज्ज इमारत, अद्यावत प्रयोगशाळा, क्रीडा, साहित्य, लेडीज रूम, स्वच्छतागृह, सभागृह, क्रीडांगण, बगीचा इत्यादी सोयी आहेत.[८२]

**विद्यालयाच्या गुणवंत छात्राध्यापिका**

१. कु. भोसले वर्षाराणी मच्छिंद्र, सन २००८ - ९ ८३.६०%
२. कु. माने निलम हिंदुराव, सन २००९ - १० ८२.३०%
३. कु. पाटील नीता तुळशीराम, सन २००७ - ८ ७९.५०%
४. कु. गायकवाड वृषाली विलास, सन २००६ - ७ ७८.७०%

### ४.१२.४ अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तासगाव (स्थापना १९६०)

स्वातंत्र्योत्तर काळात 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हे बिद्र घेऊन 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने' प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी व ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षक देण्यासाठी संस्थेने स्थापन केलेल्या आठ अध्यापक विद्यालयामध्ये तासगावच्या अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन यांचा समावेश होतो. [८३]

'महाराष्ट्र राज्य शिक्षण प्रशिक्षण व संशोधन संस्था' पुणे यांच्या अंतर्गत शासन परवानगी NO/WRC/५-६/२४/२०००/९२७० दि.१३/४/१९६० मध्ये शहरात या विद्यालयाची स्थापना केली. या अध्यापक विद्यालयाची सुसज्ज इमारत, क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यानुभव हॉल, इतिहास भूगोल विभाग, कृतीसंशोधन तसेच विविध समित्याद्वारे हे विद्यालय ज्ञानदानाचे काम करते. विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी २३ अध्यापक ज्ञानग्रहण करीत होते. तर सध्या ६४ अध्यापक आहेत. प्राचार्यासह ०८ शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करतात तर ३ शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा देण्याचे कार्य करतात.

या विद्यालयात शासकीय नियमानुसार संवर्गनिहाय प्रवेश दिला जातो. अनुदानित २ डिव्हीजनसाठी ६४ विद्यार्थी आहेत. विद्यालयामध्ये कृतीसंशोधन तसेच विविध विभागाच्या मंडळाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. छात्रसेवा शिबीर, समाजसेवा शिबीर, विविध बौद्धिक स्पर्धा घेतल्या जातात. ज्वलंत समस्येवर (स्त्री-भ्रूणहत्या, एडस्, पर्यावरण, प्रदुषण इ.) या विद्यालयाने शहरामध्ये जनजागृती करणे गरजेचे वाटते. [८४]

या विद्यालयातून भाषा, गणित, इतिहास, भूगोल आदि शालेय विषयाबरोबर शेती विषयक माहिती व आधुनिक तंत्रज्ञान जीवन उपयोगी शिक्षण दिले जाते. येथील ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, कविता संग्रह इत्यादी एकूण २,६२० संदर्भ ग्रंथ आहेत. तसेच अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडा, साहित्य, लेडीज रूम, स्वच्छतागृह, सभागृह, क्रिडांगण, बगीचा इत्यादी सोयी आहेत.

## ४.१३ व्यवसायिक शिक्षण

### ४.१३.१ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय)

तासगाव शहरामध्ये सन १९९३ पूर्वी व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांना सांगली, कोल्हापूर, कराड, सातारा, पुणे, येथे व्यावसायिक शिक्षणासाठी जावे लागे. ही समस्या दूर करण्यासाठी तासगाव शहरामध्ये शासन निर्णय क्र. TSA /१०९०/५९७/ व्य. शि. ४ दि १४/१०/१९९३ मध्ये मा. ना. आर. आर. पाटील यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र शासन उच्च

व तंत्र शिक्षण विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, अंतर्गत 'शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था' दत्तमाळ, मणेराजुरी रोड, वासुंबे फाटा, तासगाव येथे सुरू करण्यात आली.[८५] आहे. येथे १६३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये मुलींच्यासाठी २५% राखीव जागा असून मुलींची संख्या फक्त एक जागा इलेक्ट्रीशियन विभागासाठी आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य यांच्यासह १४ शिक्षक आहेत व त्या शिक्षकांना 'निर्देशक' असे म्हणतात. सर्व शिक्षकांच्या पगारासाठी शासन महिना ५ लाख ३० हजार रूपये खर्च करते.[८६]

'शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था' तासगाव येथे १० एकर जागेमध्ये इमारत बांधकामासाठी तीन कोटी खर्च आला आहे. यापैकी जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत १ कोटी ५० लाख रूपये मिळाले आहेत. येथे ५० विद्यार्थ्यासाठी राहण्याची सोय आहे पण मेसची सोय नाही. वसतिगृह बांधकामासाठी खर्च ८० लाख रूपये आहे.[८७] प्रत्येक तालुक्याला एक व्यावसायिक शिक्षण या धोरणानुसार महाराष्ट्र शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत खालील विभाग सुरू केले आहेत.

## तक्ता क्र. १० औद्योगिक प्रशिक्षण संस्था विभाग पुढीलप्रमाणे [८८]

| अ.नं. | विभागांची नावे | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १) | वेल्डर (गॅस आणि इलेंक्ट्रॉनिक) | एक वर्ष | १२ + ४ |
| २) | प्लंबर | दोन वर्ष | १६ + ५ |
| ३) | वायरमन | दोन वर्ष | १६ + ५ |
| ४) | इलेक्ट्रिशियन | दोन वर्ष | १६ + ५ |
| ५) | मॅकॅनिक इलेंक्ट्रॉनिक | दोन वर्ष | १६ + ५ |
| ६) | फिटर | दोन वर्ष | १६ + ५ |
| ७) | मॅकॅनिक डिझेल | एक वर्ष | १६ + ५ |
| ८) | मॅकॅनिक रेडिओ टी. व्ही. | दोन वर्ष | १६ + ५ |

अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा नवी दिल्ली श्रम मंत्रालय भारत सरकार यांच्या अखत्यारित या विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेतल्यानंतर येथील मुलांना वेगवेगळ्या औद्योगिक अस्थापनामध्ये रोजगार मिळतो. यामध्ये किर्लोस्करवाडी कारखाना, मिरज, कुपवाड एम.आय. डी. सी, कोल्हापूर एम. आय. डी. सी, एम. एस. ई. बी, तसेच एस. टी. वर्कशॉप इत्यादी ठिकाणी बहूसंख्य मुलांना रोजगार मिळतो.[८९]

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये मुलींच्यासाठी २५% राखीव जागा असून फक्त एक जागा इलेक्ट्रिशियन विभागासाठी (मुलगी) आहे. कारण या विभागाकडे मुलींच्या पालकांचा बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. पालकामध्ये जागृती करण्याची गरज आहे. तसेच मुलींच्यासाठी शासनाने कॉम्प्युटर ऑपरेटर, प्रोग्रॅमिंग असिस्टंट, फॅशन टेक्नॉलॉजी व हेअर ॲण्ड स्कीन केअर इत्यादी नवीन ट्रेड सुरू करण्याची गरज आहे. परिणामी मुलींची संख्या वाढून त्यांना रोजगार मिळेल.

### ४.१४ उच्च शिक्षण (वरिष्ठ महाविद्यालये)

### ४.१४.१ पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव.

स्वातंत्र्योत्तर काळात जिल्ह्यात व तासगाव शहरात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थ्यांना पुणे, कोल्हापुर, मुंबई, बडोदा येथे उच्च शिक्षणासाठी जावे लागे. ही समस्या दूर करण्यासाठी तासगाव शहरामध्ये प. पू. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी 'पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाची' स्थापना १९६० मध्ये केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान या शाखाद्वारे उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली.[९०]

नॅक कमिटी पुनर्मूल्यांकनाने या महाविद्यालयास 'बी' नामांकन प्राप्त झाले असून येथे विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. येथे ११ वी ते एम. ए. एम. एस्सी. पर्यत अध्यापनाचे कामकाज केले जात असून, बी. सी. ए. (कॉम्प्युटर) या संगणक विभाग, दूरशिक्षण केंद्र व यशवंराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक अशा विविध अभ्यासक्रमाची सोय आहे. त्यामुळे नोकरी व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय झाली आहे. या महाविद्यालयामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र हे विभाग आहेत. या सर्वच विभागांना मान्यता मिळालेली आहे.[९१]

या महाविद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी संख्या १०० इतकी होती तर २०१० अखेर या महाविद्यालयामध्ये ५००० इतके विद्यार्थी आहेत. या महाविद्यालयामध्ये 'राष्ट्रीय सेवा योजना' (२५० विद्यार्थी), तर १६ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. ४९ छात्र आहेत. तसेच विविध ३० कमिट्या कार्यरत आहेत. विद्यार्थ्याना कला, क्रीडा व साहित्यलेखनासंबंधी प्रोत्साहन दिले जाते. या महाविद्यालयाचे विद्यार्थी राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चमकले आहेत. सिंगापूर येथे झालेल्या चॅाकबॉल स्पर्धेसाठी भारतीय मुलांच्या संघाचे नेतृत्व करण्याची संधी भारत पाटील व प्रणाली पाटील यांना मिळाली.[९२]

ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारतीची एकूण १२ विभागामध्ये निर्मिती केली आहे. तासगाव परिसरामध्ये एकमेव माहितीचे अद्ययावत केंद्र म्हणून उल्लेख करावा लागेल. विविध विषयावरील आधुनिक ग्रंथ, जुनी दुर्मिळ व संशोधनमूल्य जोपासणारी येथील ग्रंथसंपदा आहे. संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला वाव दिला जातो. २०११ अखेर एकूण ग्रंथ संख्या ६०,७४७ इतकी आहे व ६६ नियतकलिके व १२ दैनिके नियमितपणे येतात.[९३]

## ४.१४.२ महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव (स्थापना १९८४)

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगा उद्धारी' या न्यायाने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात तासगाव नगरीत भर घालणारी महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. स्वत:चे असे एक वेगळे तत्त्वज्ञान घेऊन कार्यरत असणारी १९८४ साली संस्थेचे माजी सचिव व सध्याचे कार्याध्यक्ष मा. अभयकुमार साळुंखे व मा. गजेंद्र ऐनापुरे यांच्या प्रयत्नांनी या महाविद्यालयाची स्थापना झाली. हे महाराष्ट्रातील एकमेव महिला महाविद्यालय आहे.[९४]

महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दरवर्षी ८० विद्यार्थिनींना प्रवेश मिळतो. एकूण शिक्षक संख्या ०८ व शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या ०९ आहते. १९८८ पासून या महाविद्यालयास शासनाने अनुदान दिले. हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी संलग्न आहे. सर्व सुविधांनीयुक्त प्रशस्त तीन मजली इमारत, मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, तेरा सराव पाठशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडांगण व क्रीडा साहित्याची उपलब्धता व ३० मुलींचे वसतिगृह आहे.[९५]

**तक्ता क्र. ११ महाविद्यालयाची प्रवेश क्षमता** (विषय व संवर्गनिहाय)

| % | OP | SC | ST | DT | NT1 | NT2 | NT3 | OBC | SBC | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | १२ |
| हिंदी | ०४ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०८ |
| इंग्रजी | ०८ | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०० | १६ |
| इतिहास | ०२ | ०१ | ०० | ० | ०० | ०० | ० | ०१ | ०० | ०४ |
| भूगोल | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ० | ०० | ०४ |
| वाणिज्य | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०४ |
| एास्त्र | ०९ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०४ | ०० | १८ |
| एकूण | ४० | १० | ०६ | ०२ | ०२ | ०३ | ०२ | १५ | ०० | ८० |

***संदर्भ* - *महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माहितीपत्रक*** [९६]

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की महाविद्यालयात प्रवेश हा शासनाच्या कोट्यानुसार संवर्गनिहाय दिला जातो. तसेच शासनाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थीनीस प्रवेश शुल्क १४,२३० रूपये आकारली जाते. महाविद्यालयाच्या विशेष गुणवत्ताप्राप्त करणाऱ्या विद्यार्थीनी खालीलप्रमाणे

१. कु. संतीकर गीता कल्लाप्पा विद्यापीठात २ री ६९.७१% गुण मिळाले आहेत.
२. कु. माने पल्लवी सुभाष विद्यापीठात ४ थी ७३% गुण मिळाले आहेत.
३. कु. गायकवाड पोर्णिमा तानाजी विद्यापीठात ४ थी ७२.३३% गुण मिळाले आहेत.
४. कु. कुलकर्णी वैशाली विठ्ठल विद्यापीठात ५ वी ६६.१५% गुण मिळाले आहेत.

### **४.११.३ कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय तासगाव** (स्था.२००१)

'जीवन विकास संस्थेने' तासगाव शहरात महिलांच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय व्हावी म्हणून 'कायम विनाअनुदानित तत्त्वावर' फक्त मुलींच्यासाठी कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाची सन १ ऑगस्ट २००१ मध्ये स्थापना केली.[९७] महाविद्यालयाच्या स्थापनेच्यावेळी विद्यार्थीनीची संख्या ५० होती तर २०१० अखेर या महाविद्यालयामध्ये ५०० इतकी विद्यार्थीनीची संख्या होती. या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांद्वारे मुलींना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली. मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र या पाच विभागाद्वारे ज्ञानदानाचे कार्य चालू आहे. हे तासगाव तालुक्यातील एकमेव महिला महाविद्यालय आहे.[९८] या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना (१०० मुली) तसेच विविध ३० कमिट्या कार्यरत आहेत. मुलींना कला, क्रीडा व साहित्यलेखनासंबंधी प्रोत्साहन दिले जाते. हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्त्वावर असल्याने अल्पमानधनावर एकूण ३५ प्राध्यापक काम करतात. तसेच महाविद्यालयाला आर्थिक हातभार लावण्यासाठी महाविद्यालयाने बी. सी. ए. (कॉम्प्युटर) या संगणक विभागाची स्थापना केली आहे.

ग्रंथालयामध्ये विविध विषयावरील आधुनिक ग्रंथ, जुनी दुर्मिळ ग्रंथसंपदा आहे. संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला येथे वाव दिला जातो. २०११ अखेर एकूण ग्रंथ संख्या ५,००० इतकी आहे. व १० नियतकलिके व ५ दैनिके नियमितपणे येतात.[९९]

महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांच्या वरदहस्ताने श्री. सिद्धीविनायक ट्रस्ट, मुंबई, मा. बाळकृष्ण हरी सेवेकरी, पुणे. सौ. पद्माबेन अमृतलाल शहा, इत्यादी छोटे-मोठे दानशूर आश्रयदाते यांनी या महिला महाविद्यालयास आर्थिक हातभार लावला.[१००]

## ४.१४.४ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र तासगाव

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव. हे अभ्यासकेंद्र जुलै, १९९४ पासून गेली १६ वर्षे सातत्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अध्यापनाचे व ज्ञानदानाचे बहुमोल कार्य करीत आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' या ब्रीदवाक्यातून सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये या शिक्षण क्षेत्राने मुलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. आपल्या आयुष्यात उच्च शिक्षणापासून जे वंचित राहिले आहेत किंवा ज्यांनी घरगुती अडचणीमुळे व नोकरी-व्यवसायामुळे शिक्षण अर्धवट सोडून दिले होते, अशा गरजू विद्यार्थ्यांना या शैक्षणिक उपक्रमाचा लाभ झालेला आहे.[१०१]

तासगाव येथे मुक्त विद्यापीठाच्या या अभ्यासकेंद्राच्या वतीने पूर्वतयारी शिक्षणक्रम, बी. ए. भाग-१, बी. ए. भाग-२, व बी. ए. भाग-३ या वर्गाचे अध्यापनाचे कार्य करीत आहेत. सुरूवातीला १० विद्यार्थी संख्येने सुरू झालेले सध्या ३०५ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत असलेले दिसून येतात.

या अभ्यास केंद्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र या विषयाचे अध्यापन केले जाते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या या अभ्यासकेंद्रामध्ये वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामध्ये विद्यार्थ्यासाठी विविध चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली जातात.[१०२]

थोडक्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे तासगाव येथील अभ्यासकेंद्र जे उच्च शिक्षणापासून गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन व प्रेरणा देऊन शैक्षणिक व सामाजिक विकासाचे बहुमोल कार्य करीत आहे.

## ४.१४.५ दूर शिक्षण केंद्र तासगाव

शिवाजी विद्यापीठाने ग्रामीण भागातील शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या परंतु शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या व महाविद्यालयात येऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यासाठी दूरशिक्षण विभाग सुरू केला आहे. त्याचे अभ्यास व मार्गदर्शन केंद्र पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे कार्यान्वित आहे. बी. ए. भाग-१, बी. ए. भाग-२, बी. ए. भाग-३, बी. कॉम. भाग-१, बी. कॉम. भाग-२, बी. कॉम. भाग-३ व एम. कॉम. भाग-१, यासाठी २०१० अखेर ३१३ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेतात. या विभागामार्फत संपर्क सत्रे आयोजित केली जातात.[१०३]

## ४.१५ शासकीय महिला तंत्रनिकेतन (स्थापना २००९)

यांत्रिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या युगात तांत्रिक शिक्षणाची कमतरता भासू लागल्यामुळे स्वर्गीय नेते वसंतरावदादा पाटील यांनी कृषि-औद्योगिक व तंत्रशिक्षणाची चळवळ सुरू केली. महाराष्ट्र शासनाने त्यानुसार प्रत्येक तालुक्यात एक तंत्रनिकेतन यानुसार तासगावमध्ये आर. आर. (आबा) पाटील यांच्या प्रयत्नाने सर्वप्रथम मुलांच्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. त्यानंतर त्यांनी मुलींच्यासाठी मणेराजुरी रोड, दत्तमाळ तासगाव. येथे शासकीय महिला इंजिनिअरिंग कॉलेज उभारण्याचा महत्वकांक्षी प्रकल्प मार्गी लावला. त्यासाठी त्यांनी राज्य शासनाकडून २६ कोटी रूपयाचा निधी उपलब्ध करून घेतला.[१०४] तासगावमध्ये दत्तमाळावर शासकीय महिला तंत्रनिकेतन सन २००९ मध्ये सुरू केले. येथे विद्यार्थीनींची संख्या ३०० व शिक्षक संख्या ४८ आहे. येथे सुसज्ज इमारत, अद्ययावत वसतिगृह, प्रयोगशाळा भव्य क्रीडांगण असून मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो.[१०५]

**तक्ता क्र. १२ शासकीय महिला तंत्रनिकेतन**

| अ.नं | विषयाचे नाव | २००९-१० | २०१०-११ | कोड नंबर |
|---|---|---|---|---|
| १) | कॉम्प्युटर इजिनिअरिंग | ६० | ६० | ६०१४२५५५०-५० |
| २) | ड्रेस डिझाईनिंग आणि गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग | ६० | ६० | ६०१४२४५५०-५१ |
| ३) | इलेक्ट्रॉनिक टेलिकम्युनिकेशन इजिनिअरिंग | ६० | ६० | ६०१४८७२५०-५१ |
| ४) | इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० | ६०१४२४६५०-५१ |
| ५) | इलेक्ट्रॉनिक इजिनिअरिंग | ६० | ६० | ६०१४२१६५०-५१ |

# संदर्भसूची

१. कोठेकर शांता, 'इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान' श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, १५ ऑगस्ट २००७ ,पान नं. ८.

२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ७.

३. जीवन शिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ,माहिती पुस्तिका पृष्ठ २९.

४. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा १९९९, पृष्ठ. ६४५.

५. तासगाव हायस्कूल तासगाव, हीरक महोत्सव स्मरणिका १९८०-८१, पृष्ठ. ६.

६. मुलाखत, श्री. गायकवाड मारूती दत्तात्रय, मुख्याध्यापक चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव, दि. २ जूलै २०११, सकाळी ११ वा.

७. मुलाखत, बाबर पी. व्ही., माजी सेक्रेटरी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, दि. ६ जून २०११, सकाळी. १० वा.

८. अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ ऐज्युकेशन, तासगाव वार्षिक अहवाल सन २००६-२००७ पृष्ठ. २, ३, ४.

९. मुलाखत, माजी प्राचार्य श्री. एडके के. डी., जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव, दि. २१ जून २०११, सकाळी १० वा.

१०. जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव वार्षिक अहवाल सन २०१०-११, पृष्ठ. १६.

११. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २८.

१२. मुलाखत, सौ. कोळेकर कमल. कृ. सदस्या, जीवन विकास संस्था तासगाव, दि. २१ जाने २०११, दुपारी १ वा.

१३. मुलाखत, कोळेकर के. वाय. सचिव, जीवन विकास संस्था तासगाव.

१४. 'जीवनदीप' स्वातंत्र्य संग्राम स्मृति प्रतिष्ठान व वि. स. पागे स्मृतिभवन तासगाव स्मरणिका, २०१०, पृष्ठ १२.

१५. तांबोळी शामसुद्दीन 'महाराष्ट्र राज्याचा शैक्षणिक विकास', डायमंड पब्लिकेशन्स पुणे २००९, पृष्ठ १८१.

१६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १८१.

१७. सांगली जिल्हा परिषद वार्षिक अहवाल १९९३-९४, पृष्ठ ३३.

१८. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कार्यालयीन टिपण्णी पंचायत समिती तासगाव आमसभा, २०१०.

१९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १०.

२०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ११.

२१. शहरी एकात्मिक बालविकास केंद्र व मुलाखत, सौ. अलदर एस. ए. अंगणवाडी सुपरवायझर मुलाखत, दि.६/१/२०११, सकाळी १० वा.

२२. General Administration Report Sangli 1983–84 p 27.

२३. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८९, पृष्ठ ५७८.

२४. A socio-economic review abstract, Sangli district, 1961- 62,71,72,2oo6-7.

२५. A socio-economic review abstract, Sangli district, 1960-61, page २९. व सामाजिक, आर्थिक समालोचन, सांगली जिल्हा १९८२, पृष्ठ ३३.

२६. कार्यालयीन टिप्पणी पंचायत समिती तासगाव आमसभा २००४.

२७. नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांच्या बोर्डावरील माहिती.

२८. नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती यांच्या बोर्डावरील माहिती.

२९. तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळाचे खतावणी सन २०१० पृष्ठ ४२.

३०. मुलाखत, श्री. वाडकर ए. बी., प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव दि. २२ जाने २०११, दुपारी. १२ वा.

३१. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग जी. आर, दि. २० मार्च २००१, जिल्हा परिषद सांगली (जी. आर. फाईल).

३२. मुलाखत, सौ. अलदर एस. ए. अंगणवाडी सुपरवायझर दि. ६/१/२०११ स. १० वा.

३३. जिल्हा परिषद सांगली, वार्षिक अहवाल सन १९७०-७१,९०, २००३-०४.

३४. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, जी. आर, दि. २०/०४/१९९२.

३५. A socioeconomic review abstract, Sangli district, 1960-61, page 29 व सामाजिक, आर्थिक समालोचन, सांगली जिल्हा २००३-५,६,८,९.

३६. मुलाखत, वाडकर ए. बी., प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव, दि. २२ जाने २०११, दुपारी. १२ वा.

३७. पंचायत समिती तासगाव, शिक्षण विभाग कार्यालयीन कागदपत्रे सन २०११, प. १२,१३.

३८. पंचायत समिती तासगाव, शिक्षण विभाग कार्यालयीन टिप्पणी आमसभा २००४ व २००७ पृष्ठ १२६,२७.

३९. तांबोळी शामसुद्दीन 'महाराष्ट्र राज्याचा शैक्षणिक विकास', डायमंड पब्लिकेशन्स पुणे २००९ पृष्ठ १८१

४०. माहिती पत्रक, गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव व इतर शाळाकडून मिळालेली माहिती.

४१. पंचायत समिती तासगाव, शिक्षण विभाग कार्यालयीन कागदपत्रे.

४२. मुलाखत, श्री. वाडकर ए. बी., प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव, दि. २२ जाने २०११, दुपारी १२ वा.

४३. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा १९९९, पृष्ठ ६५५.

४४. मुलाखत, श्री. वाडकर ए. बी., प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव दि. २२ जाने. २०११, दुपारी १ वा.

४५. मुलाखत, माजी प्राचार्य श्री. एडके के. डी., जागृती अध्यापिका विद्यालय, तासगाव, दि. २१ जून २०११, सकाळी १० वा.

४६. मुलाखत, सौ. गुरव सत्यवती मारूती, मुख्याध्यापक नुतन मराठी विद्यानिकेतन तासगाव, दि. ३० जून २०११, सकाळी ११ वा.

४७. मुख्याध्यापक शिणगारे सुनिल, आण्णासाहेब डांगे आश्रम शाळा तासगाव.

४८. उपरोक्त कित्ता.

४९. मुलाखत, प्राचार्य श्री. पवार अशोक, स्वामी रामानंद भारती प्राथमिक विद्यामंदिर तासगाव, दि. ७ जाने २०११, सकाळी ११ वा.

५०. मुलाखत, कोळेकर के. वाय., सचिव जीवन विकास संस्था तासगाव, दि. ६ फेब्रु. २०११, सकाळी ९ वा.

५१. तांबोळी शमशुद्दीन, महाराष्ट्र राज्याचा शैक्षणिक विकास, डायमंड पब्लिकेशन्स पुणे ,२००९ पृष्ठ १८१

५२. मुलाखत, श्री. गायकवाड मारूती दत्तात्रय, मुख्याध्यापक चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव, दि. ६ फेब्रु. २०११, सकाळी ११ वा.

५३. उपरोक्त कित्ता.

५४. तासगाव हायस्कूल तासगाव, हिरक महोत्सव स्मरणिका १९८०-८१.

५५. मुलाखत, श्री. जमादार एस. ए., मुख्याध्यापक विद्यानिकेतन कृषि माध्यमिक विद्यालय तासगाव, दि. ७ फेब्रु २०११, दुपारी २ वा.

५६. उपरोक्त कित्ता.

५७. मुलाखत, प्राचार्य श्री. पवार अशोक, स्वामी रामानंद भारती प्राथमिक विद्यामंदिर तासगाव, दि. ७ मार्च २०११, दुपारी ३ वा.

५८. मुलाखत, श्री. गायकवाड मारूती दत्तात्रय, मुख्याध्यापक चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव, दि. ९ फेब्रु. २०११, दुपारी ३ वा.

५९. मुलाखत, श्री. उमराणी एस. जी., मुख्याध्यापक गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव, दि. २७ सप्टेंबर २०११, दुपारी २ वा.

६०. माहिती पत्रक, गुरूवर्य दादोजी कोंडदेव, सैनिकी शाळा तासगाव, पृष्ठ २६.

६१. मुलाखत, श्री. उमराणी एस. जी., मुख्याध्यापक गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव, दि. २७ सप्टे २०११, दुपारी २ वा.

६२. उपरोक्त कित्ता.

६३. उपरोक्त कित्ता.

६४. उपरोक्त कित्ता.

६५. माहिती पत्रक, गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव पृष्ठ ६.

६६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ७.

६७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ८.

६८. मुलाखत, श्री. उमराणी एस. जी., मुख्याध्यापक गुरूवर्य दादोजी कोंडदेव, सैनिकी शाळा तासगाव, दि. २७ सप्टे. २०११, दुपारी २ वा.

६९. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा १९९९ पृष्ठ ६४६.

७०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६४६.

७१. 'संस्कार' पद्म. डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११ पृ.५.

७२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६ व ७.

७३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १०८.

७४. मुलाखत, कोळेकर के. वाय. सचिव जीवन विकास संस्था तासगाव दि. २३ सप्टें २०११, दु.२.

७५. मुलाखत, श्री. मंडले एस. ए. व्यवसाय शिक्षण विभाग प्रमुख विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स(ॲग्री) तासगाव.

७६. मुलाखत, प्राचार्य श्री. थोरवत डी. एस. विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स(ॲग्री) तासगाव दि. ६ सप्टें २०११, दुपारी २ वा.

७७. मुलाखत, प्राचार्य श्री. पवार अशोक स्वामी रामानंद भारती प्राथमिक विद्यामंदिर तासगाव.

७८. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव वार्षिक अहवाल सन २०१०-११, पृष्ठ ९.

७९. मुलाखत, माजी प्राचार्य श्री. एडके के. डी. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव दि. २१ जून २०११, स.१० वा.

८०. मुलाखत, प्राचार्य श्री. सूर्यवंशी आर. व्ही. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव दि. २१ जून २०११, स. ११ वा.
८१. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव वार्षिक अहवाल सन २०१०-११, पृष्ठ १०.
८२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ११.
८३. मुलाखत, प्राचार्य गरूड पी. डी. अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन तासगाव दि. २२ सप्टें. २०११, दुपारी २ वा.
८४. अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ ऐज्युकेशन तासगाव वार्षिक अहवाल २००६-२००७
८५. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचनालय, माहिती पुस्तिका, ऑगस्ट २०११, पृष्ठ २९.
८६. मुलाखत, प्राचार्य श्री. दाभणे के. के. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आय.टी.आय) तासगाव दि. २७ एप्रिल २०११, दुपारी २ वा.
८७. उपरोक्त कित्ता.
८८. उपरोक्त कित्ता.
८९. मुलाखत, प्राचार्य शेजवळ एस. जी. पद्म. डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव दि. ४ सप्टें. २०११, दुपारी ४ वा.
९०. 'संस्कार' पद्म. डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११, पृ.५.
९१. मुलाखत, प्राचार्य शेजवळ एस. जी. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव दि. २३ सप्टें. २०११, दुपारी ४ वा.
९२. 'संस्कार' पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११, पृष्ठ.१०८.
९३. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव माहिती पत्रक.
९४. मुलाखत, प्राचार्य सौ. शेटे. पी. एस. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात तासगाव दि. १७ जाने २०११, दुपारी ३ वा.
९५. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माहिती पत्रक.
९६. मुलाखत, प्राचार्य सौ. शेटे पी. एस. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात तासगाव दि. १७ जाने २०११, दुपारी ३ वा.
९७. मुलाखत, कोळेकर के. वाय. सचिव जी. विकास संस्था तासगाव दि.१६ जाने २०११, दु.१ वा.
९८. 'प्रेरणा' कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय वार्षिक अंक २००८ पृष्ठ १२.

९९. मुलाखत, प्राचार्य एस. ए. मांगलेकर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय तासगाव दि. २६ जून २०११ सकाळी १२ वा.

१००. मुलाखत, कोळेकर के. वाय. सचिव जी. विकास संस्था तासगाव दि.२७ जाने २०११ दु. ३ वा.

१०१. 'संस्कार' पद्म. डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११ पृ. १२६.

१०२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १२६.

१०३. 'संस्कार' पद्म. डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११ पृ.१२५.

१०४. मुलाखत, प्राचार्य दाभणे ए. एस, दि. ४/३/२०११, दु. २ वाजता.

१०५. गव्हमेंट बेबसाईट व शासकीय महिला तंत्रनिकेतन माहिती पुस्तिका.

**प्रकरण पाचवे**

# तासगाव शहराची सामाजिक स्थिती

५.१ प्रस्तावना

५.२ लोकसंख्या

५.२.१ कुटुंब नियोजन उपक्रम

५.२.२ स्त्री-पुरूष प्रमाण

५.३ शासनाने अनुसूचित जाती-जमातीसाठी राबविलेल्या योजना

५.३.१ आर्थिक उपाययोजना

५.३.२ भारत सरकार शिष्यवृत्ती योजना

५.३.३ अनुसूचित जाती-जमातीतील मुलींना शिष्यवृत्ती

५.३.४ दुर्बल घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता

५.३.५ शासकीय वसतिगृहांची उपलब्धता

५.३.६ इंदिरा आवास(घरकुल) योजना (IHSDP)

५.३.७ दलित वस्ती सुधार योजना

५.३.८ समाजकल्याण विभागामार्फत राबविलेल्या योजना

अ) शिलाई मशिन वाटप योजना

५.४ शासनाने महामंडळाद्वारे राबविलेल्या विविध योजना

५.४.१ महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्यादित मुंबई-१९७८

५.४.२ वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ-१९८४

५.३.३ संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ-१९७४

५.४.४ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ-१९८५

५.४.५ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीयांचे वित्त व विकास महामंडळ-१९९३

५.४.६ महाराष्ट्र राज्य अपंग आणि विकास महामंडळ-२००१

५.५ एकात्मिक ग्रामीण विकास योजना

५.६ जवाहर योजना

५.७ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

५.८ सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

५.९ कुटुंब व्यवस्था

५.१० लोकजीवन

१) घरे २) आहार ३) पेहराव ४) दागदागिने ५) भाषा ६) विवाह

५.११ समाजरचना

५.११.१ हिंदू समाज, १) ब्राह्मण, २) मराठा, ३) लिंगायत, ४) सुतार, ५) गुरव, ६) कुंभार, ७) न्हावी, ८) परीट, ९) तेली, १०) धनगर

५.११.२ अनुसूचित जाती, अ) महार, ब) चांभार, क) मांग

५.११.३ अनुसूचित जमाती

अ) नागरी हक्क संरक्षण कायदा-१९७६

५.११.४ मुस्लीम समाज

५.१२ स्त्रियांची स्थिती

५.१२.१ हुंडा पद्धत

५.१३ सण-उत्सव,

१) गुढीपाडवा, २) पोळा, ३) गणेश चतुर्थी, ४) दसरा, ५) दिपावली,

६) मकर संक्रांत, ७) होळी

५.१४ उत्सव व यात्रा

५.१५ कला व क्रीडा परंपरा

५.१५.१ सर्कशीचे तासगाव

५.१५.२ लाठीवीर बाबूराव थोरबोले सतत १८ तास १ मिनिटाचा लाठी विक्रम

५.१५.३ महाराष्ट्रातील पहिला तासगावचा पारंपरिक लोकनाट्य तमाशा

५.१६ सामाजिक सुधारणांमधील वृत्तपत्रांचा सहभाग

**प्रकरण पाचवे**

# तासगाव शहराची सामाजिक स्थिती

## ५.१ प्रस्तावना

महाराष्ट्रातील इतर ठिकाणाप्रमाणे तासगाव शहरसुद्धा सामाजिकदृष्ट्या महत्वाचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा यावरून दोन गट पडले होते. प्रथम राजकीय स्वातंत्र्य मिळवू व नंतर सामाजिक सुधारणा करता येतील, असे म्हणणारा टिळकांचा एक गट कार्यरत होता तर प्रथम सामाजिक सुधारणा केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही, असे आगरकर-फुले वगैरे गटाचे म्हणणे होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात देशात राजकीय चळवळी बरोबरच सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू झाली. आगरकर, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांनी सामाजिक सुधारणेला महत्व दिले. या समाज सुधारकांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींच्या उन्नतीसाठी खूप परिश्रम घेतले. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने अनुसूचित जाती-जमाती व दुर्बल घटकासाठी विविध कल्याणकारी योजना आखून सामाजिक परिवर्तन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

प्रस्तूत प्रकरणात तासगाव शहरातील समाज, लोकसंख्या, स्त्री-पुरूष प्रमाण, धर्मनिहाय व जातीनिहाय स्थिती, सरकारने वंचित घटकासाठी राबविलेल्या योजना व त्याची झालेली परिणिती, कुटुंब व्यवस्था, स्त्री-जीवन, सामाजिक चालीरिती, धार्मिक प्रथा, सण-उत्सव, रूढी, परंपरा इत्यादी घटकांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

भारतीय समाज बहुधर्मीय असून जगातील प्रमुख धर्म भारतात आहेत. त्यास तासगाव शहर अपवाद नाही. शहरात हिंदू धर्मीय बहुसंख्य असले तरी इस्लाम, जैन, धर्माचे लोक देखील येथे राहतात. हिंदू धर्माची लोकसंख्या जास्त असून त्यांच्या अनेक जाती, पोटजाती आहेत. तसेच येथे व्यवसायावरून पडलेली बलुतेदारीची पद्धत १९७० च्या दशकापर्यंत काही प्रमाणात टिकून होती. बलुतेदारी पद्धती व्यतिरिक्त रूढी परंपरा, कुळाचार, व्यवसाय अशा अनेक कारणांनी त्यांच्यात असंख्य जाती आणि पोटजाती निर्माण झाल्या. त्यातील काही जाती अस्पृश्य मानल्या गेल्या. समाजव्यवस्थेत त्यांचे स्थान कनिष्ठ दर्जाचे मानले गेले होते.

शेती व्यवसायात प्रामुख्याने मराठा लोक, धंदा व व्यापारात वैश्य, वाणी, लिंगायत या जाती असल्यामुळे अस्पृश्य मानल्या गेलेल्या जाती, पोटजाती आर्थिक व सामाजिक विकासात मागे राहिल्या. त्यामुळे समाजात सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी, यासाठी गेल्या शतकापासून शर्थीने प्रयत्न सुरू आहेत. घटनेने ही अस्पृश्यता रद्द ठरवली. जन्मापासून व्यवसाय न ठरता सर्व क्षेत्रामध्ये व्यक्तींच्या कर्तृत्त्वाला वाव देण्यासाठी आणि विकासाची संधी न मिळालेल्यांना अग्रहक्क देण्यासाठी वर्गीकृत जाती निश्चित करून ती यादी सरकारने प्रसिद्ध केली. त्यामध्ये महार, मांग, चांभार, ढोर, खाटीक इत्यादी जाती-पोटजातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये तर कोळी लोकांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला. त्याचबरोबर बेलदार, धनगर, घिसाडी, वडार, भाट, डवरी, गोसावी, इत्यादींचा समावेश भटक्या व विमुक्त जमातीमध्ये केला तर सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, सोनार इत्यादींचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये करण्यात आला.[१]

## ५.२ लोकसंख्या व कुटुंब नियोजन उपक्रम

तासगाव शहराची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३३,४५७ यामधील स्त्रिया १६,०७० व पुरूष १७,३८७, लोकसंख्येची घनता ७७१ आहे.[२] देशात वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने १९५० च्या दशकापासून विविध उपक्रम हाती घेतले. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात आरोग्य केंद्रे स्थापन केली. (कुटुंब नियोजन केंद्रे) तसेच शासनाने व सामाजिक संस्थांनी प्रबोधन करणे, राष्ट्रीय सुरक्षा व देशहित इत्यादी उपक्रमाद्वारे लिपीज लुप, नसबंदी, छोटे कुटुंब, सुखी कुटुंब, दोन मुलातील पाळणा लांबवा, सरकारी अनुदान, बक्षीस इत्यादीद्वारे वाढत्या लोकसंख्येला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाची तासगाव तालुक्यात शासकीय कुटुंब कल्याण केंद्राची संख्या १० आहेत. तर शहरामध्ये एक कस्तुरबा या शासकीय प्रसूतीगृहामार्फत मोठ्या प्रमाणात कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी होत आहे.[३]

### तक्ता क्र. २ तासगाव शहर कुटुंब नियोजनचा कार्यक्रम[४]

| अ.क्र. | कुटुंब नियोजनाचे उपक्रम | २००७-०८ | २००९-१० |
|---|---|---|---|
| १) | जननक्षम जोडप्यांची संख्या | ४,४४० | ६,७४१ |
| २) | पुरूष नसबंदी एकूण | ४ | ८३ |
| ३) | स्त्रियांची नसबंदी एकूण | ३,६२६ | ३,३०८ |
| ४) | लूप पद्धती एकूण | १६९ | २,११५ |
| ५) | इतर पद्धती एकूण | ७६२ | ६,७०४ |

तक्ता क्र. २ वरून तासगाव शहरामध्ये कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामध्ये कस्तुरबा प्रसूती गृहामार्फत घरोघरी जावून जनजागृती करण्यात आली. शिवाय मोफत शिबिरे घेऊन २,११५ स्त्रियांना लुप बसविण्यात आले. पुरुष नसबंदी, स्त्रियांची नसबंदी, लूप पद्धती व इतर पद्धतीत सन २०१० अखेर शहरात एकूण १२,२१० जोडप्यावर कुटुंब नियोजनात यश मिळविले.[५] तसेच शासनाबरोबर सामाजिक संस्थांनीही कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम राबवून वाढती लोकसंख्या रोखण्याचा प्रयत्न केला.

**१. स्त्री-पुरुष प्रमाण**

तासगाव शहराची २००१ जनगणनेनुसार लोकसंख्या ३३,४५७ यामधील स्त्रिया १६,०५४ व पुरूष १७,३८१, स्त्री-पुरूष प्रमाण दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण सन १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१ या दशवर्षामध्ये अनुक्रमे ९१२, ८९३, ९१९, ९३२, ९५८, इतके आहे. तसेच शहरात २०१० च्या आकडेवारीवरून  एका वर्षात १६५० बालके जन्माला आली. त्यापैकी ९०७ मुले व ७४३ मुली जन्माला आल्या.[६] यावरून शहरात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. यावरून शहरात पुरूष मृत्यूदर ५३४ तर स्त्री मृत्यूदर ६३९ इतका होता. यावेळी स्त्री मृत्यूदराचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत १६.४४% इतके जास्त होते. त्यात स्त्रिया प्रसूती काळात मृत्यू पावत असल्याने त्यांच्या मृत्यूदराचे प्रमाण अधिक दिसून येते. उपरोक्त जन्मदर व मृत्यूदर या दोन्ही कारणांमुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. स्त्रियांची संख्या कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे वंशाला दिवा पाहिजे. मुलगी म्हणजे परक्याचं धन असे समजले जाई. तिला लग्नामध्ये हुंडा व मानपान करावा लागतो. या सर्व गोष्टी खर्चिक आहेत. यासाठी मुलगा होण्याचा अट्टाहास धरला जातो. तसेच गर्भलिंग निदान चाचणी करून मुलगी जन्माला येण्याआगोदरच तिची गर्भातच हत्या केली जाते. त्यामुळे स्त्री-भ्रूण हत्यामध्ये वाढ झाली. अनेक स्त्रिया प्रसूतीकाळात मृत्यू पावल्या. अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. परंतु सन २००२ नंतर स्त्री-भ्रूण हत्या कायद्याच्या कठोर अंमलबजावणीमुळे सन २००३ मध्ये स्त्री मृत्यूदरात कमालीची घट झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ३ माता बाल संगोपन सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमात मार्च २०१० अखेर झालेले काम व उद्दिष्टांची टक्केवारी (संदर्भ वर्ष २०१०-११)[७]**

| अ.नं | साथीचे रोग | एकूण | ग्रामीण | एहरी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | डीपीटी | ४,०१८ | ३,५३९ | ४७९ | ८१% |
| २) | पोलीओ | ४,०१८ | ३,५३९ | ४७९ | १०५% |
| ३) | गोवर | ३,९६९ | ३,३३३ | ६३६ | ६८% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४) | बीसीजी | ४,०२४ | ३,४५१ | ५७३ | १२५% |
| ५) | टीटी ANC | ३,३९५ | ३,२५२ | १४३ | ८७% |
| ६) | डीटी | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ८९% |
| ७) | डीटी १० वर्ष | ४,७२० | ४,३८३ | ३३७ | ५०% |
| ८) | डीटी १६ वर्ष | ३,८७३ | ३,४६६ | ४०७ | ४९% |
| ९) | गरोदर स्त्रिया | ४,५४० | ३,६६५ | ८७५ | १००% |

तक्ता क्र. ३ वरून तासगाव शहरामध्ये माता बाल संगोपन, सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमा-अंर्तगत मार्च २०१० अखेर झालेले काम कस्तुरबा प्रसूती गृहामार्फत घरोघरी जाऊन जनजागृती करून, शिबिरे घेऊन, लसीकरणाची मोहिम राबवून उद्दिष्टापेक्षा जास्त काम केल्याचे दिसून येते.

## ५.३ शासनाने अनुसूचित जाती-जमातीसाठी राबविलेल्या योजना

भारतीय जनगणना १९९१ प्रमाणे सांगली जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या १२.५६% लोक अनुसूचित जाती व जमातीचे आहेत. या एकूण लोकसंख्येपैकी ७४% ग्रामीण भागात तर उर्वरीत २६% शहरी भागात राहतात. तासगाव शहरातील ६,४३२ कुटुंबापैकी दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती १७७ कुटुंबे व अल्पसंख्याक १६७ एकूण १,३१७ कुटूबे आहेत. अनुसूचित जातीच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी २५.८२ आहे.[८]

### ५.३.१ आर्थिक उपाय योजना

सन १९६१ ते १९७२ पर्यंत सामुदायिक शेती करण्यासाठी देवस्थान मंडळ, मुलकी पड जमिनी व भूदान चळवळीतून मिळालेल्या जमिनी या लोकांना कसण्यासाठी देण्यात आल्या. तासगाव शहरात पैलवान (लिंगायत) व महार लोकांना या जमिनी देण्यात आल्या आहेत. त्या जमिनी विकता येत नाहीत. सध्या हे लोक ९९ वर्षाच्या कराराने जमिनी देतात. याशिवाय शेती सुधारणेसाठी, विहीर खोदण्यासाठी, आधुनिक अवजारे विकत घेण्यासाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली.[९]

### ५.३.२ भारत सरकार शिष्यवृत्ती योजना

सन १९५१ मध्ये अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या हेतूने केंद्र सरकारने, भारत सरकार शिष्यवृत्ती नावाची योजना सुरू केली. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ४,५०० पेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्यात आली. सन १९५८-५९

मध्ये दरमहा ५ रूपये शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना दिली जात होती.[१०] ही योजना १९५९-६० मध्ये राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात आली. या काळात अनुसूचित जाती-जमातीतील शिकणाऱ्या मुलांचे प्रमाण अत्यल्प होते, तसेच पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी व इतर फी अशी १००% सवलत मिळत होती.

## ५.३.३ अनुसूचित जाती-जमातीतील मुलींना शिष्यवृत्ती

अनुसूचित जातीतील मुलींच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. १२/०१/१९९९ पासून मुलींना शिष्यवृत्ती योजना सुरू केली. इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना दरमहा ३० रूपये शिष्यवृत्ती दहा महिने प्रत्येक वर्षी पात्र विद्यार्थ्यांना दिली जात होती. त्यामुळे मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाच्या गळतीमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली.[११]

## ५.३.४ दुर्बल घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता

अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जातीतील दारिद्र्य रेषेखालील मुलींना शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता देण्याची योजना सन १९९२ पासून राज्य शासनाने सुरू केली. त्यानुसार इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये शाळेत जाणाऱ्या वरील घटकांसाठी प्रतिदिन रूपये १ प्रमाणे भत्ता देण्याची योजना सुरू करण्यात आली. त्यासाठी त्या विद्यार्थ्याची महिन्याच्या ७५% दिवस उपस्थिती अनिवार्य राहील पण सलग तीन महिने अनुपस्थितीत राहिल्यास त्यांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात येईल, अशी अट घालण्यात आली. शैक्षणिक वर्षात एकूण कामकाजाच्या दिवसाचा विचार करता, साधारणपणे २२० दिवस होतात. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकास २२० रूपये प्रमाणे भत्ता दिला जातो.[१२]

## ५.३.५ शासकीय वसतिगृहांची उपलब्धता

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सहज शक्य व्हावे म्हणून तासगाव शहरात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने ६० मुलांची क्षमता असलेले वसतिगृह सुरू केले आहे. तसेच महाविद्यालयीन मुलींच्यासाठी १०० मुलींचे क्षमता असलेली शासकीय वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. या वसतिगृहामध्ये मुलांना मोफत भोजन, अंथरूण, वैद्यकीय सेवा, पाठ्यपुस्तके, लेखन सामग्री इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. तसेच २१९ विद्यार्थी आण्णासाहेब डांगे आश्रम शाळेत शिक्षण घेतात.[१३]

## ५.३.६ इंदिरा आवास (घरकुल) योजना (IHSDP)

महाराष्ट्र सरकारने १९८८ पासून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी घरकुल योजना सुरू केली तर १ जानेवारी १९९६ पासून केंद्र सरकारने दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना आणि मुक्त वेठबिगारांनी तसेच इतर गरीब लोकांना मोफत घरे उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र इंदिरा आवास योजना सुरू केली. केंद्र सरकारने ही योजना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून राबविते. त्यानुसार टिकावू व मजबूत स्वरूपाची घरे बांधून देण्यात येणार आहेत.[१४]

## ५.३.७ दलित वस्ती सुधार योजना

दलित वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे दलितांना असंख्य अडचणींना आणि गैरसोयींना तोंड द्यावे लागते. म्हणून महाराष्ट्र शासनाने १९९५ मध्ये दलित वस्ती सुधार योजना कार्यक्रम सुरू केला. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे दलित वस्तीमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, विजेच्या दिव्याची सोय, समाज मंदिर, गटारी, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा करणे हा होता. परंतु या योजनेतील सर्व काम अत्यंत निकृष्ट झाल्याचे दिसते असे तेथील लोकांच्या तक्रारीवरून लक्षात येते. या योजनेत ठेकेदार प्रथम आर्थिक गुंतवणूक करतो त्यामुळे त्यांच्याकडून काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसते.[१५]

तासगाव शहराला दलित वस्ती सुधार योजना एकूण प्राप्त निधी १५७.९२ लक्ष शहरात २०१० अखेर पूर्ण झालेली कामे.

१. कापूर नाल्यावर कांबळेवाडीकडे जाणारा कॉजवे.
२. फिरते शौचालय मोबाइल टॉयलेट-४.
३. साठेनगरमध्ये लायब्ररी जिम्नॅशियम हॉल.
४. कांबळेवाडीमध्ये लायब्ररी जिम्नॅशियम हॉल.
५. कांबळेवाडी स्मशानभूमी कंपौड, शेड, गॅलरी, रस्ते.
६. दलित वस्तीमध्ये सौर ऊर्जेवरील पथदिवे.
७. साठेनगरमध्ये रस्ते गटर्स (हेडवॉलसह)

वैयक्तिक लाभ योजनेमध्ये मागासवर्गीय शाळेत विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पुस्तके, शिष्यवृत्त्या दिल्या जातात. तसेच रस्ते, गटारी, शौचकूप, कुपनलिका, समाज मंदिर इत्यादी बाबीसाठी खर्च केला जातो.[१६]

## ५.३.८ समाजकल्याण विभागामार्फत राबविलेल्या योजना

समाजकल्याण विभाग पंचायत समिती तासगाव व जिल्हा परिषद सांगली समाजकल्याण विभागाकडून महसुलातील २०% रकमेतून विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती-जमाती मधील पात्र महिलांना शिलाई मशिन वाटप, विद्यार्थ्यांना सायकल वाटप, राजर्षी शाहू घरकुल योजना, स्वच्छतागृह बांधकाम अनुदान, घरघंटी, दळपयंत्र वाटप यातून महिला मेळावे घेणे. बचत गटांना प्रोत्साहन देणे. अद्ययावत व्यवसाय निर्मितीसाठी महिलांना प्रवृत्त केले जाते.[१७] यातून महिला मेळावे घेणे, बचत गटांना प्रोत्साहन देणे इत्यादी अनेक योजना सुरू केल्या आहेत.

## अ) शिलाई मशिन वाटप योजना

मागासवर्गीय महिलांच्या आर्थिक उन्नती करण्याच्या हेतूने शिलाई मशिन वाटप योजना सन १९९६ पासून अंमलात आली आहे. या योजनेतून १३५ महिलांना शिलाई मशिन वाटप केलेले दिसून येते तर ६४ महिलांना फॅशन डिझाईनिंगचे प्रशिक्षण दिले आहे. यासाठी सन २००६-०७ महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी अंदाजपत्रकीय तरतूद ३,५०,००० या अंदाजपत्रकीय तरतुदीतून प्रत्यक्ष ७,९८० इतका खर्च झाला आहे.[१८]

वरील लाभार्थी पैकी ३ लाभार्थीशी चर्चा करता त्यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले. शिवाय लाभ मिळण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही काही रक्कम द्यावी लागते तर काही लाभार्थी ठराविक रक्कम त्यांना (मध्यस्थ) देवून प्रत्यक्ष शिलाई मशिन न घेता रक्कम उचलतात. त्यामुळे ही योजना खऱ्या, गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहचलेली दिसत नाही.

## ५.४ शासनाने महामंडळाद्वारे राबविलेल्या विविध योजना

शासनाने अनुसूचित जाती-जमातीमधील, नवबौद्ध, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाची आर्थिक उन्नती जलद गतीने घडवून आणण्याच्या उद्देशाने विविध महामंडळाची स्थापना केली व त्याद्वारे विविध योजना राबविल्या.

## ५.४.१ महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्यादित मुंबई-१९७८

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती-जमाती, नवबौद्ध, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाची आर्थिक उन्नती जलद गतीने घडवून आणण्याच्या मुख्य उद्देशाने महाराष्ट्र शासनाने, महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाची कंपनी अधिनियम

१९५६ अन्वये १० जुलै, १९७८ रोजी स्थापना केली. परंतु, पुढे १९८४ मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी वसंतराव नाईक विकास महामंडळ व १९८५ मध्ये अनुसूचित जातीमधील मातंग, मादगी, मांग व महार या जातीच्या कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना केल्यामुळे सन १९८६ पासून महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ हे अनुसूचित जाती व नवबौद्धासाठी कार्यरत आहे.[१९] हे महामंडळ कर्ज अनुदान योजना, ५१% अनुदान योजना, प्रशिक्षण योजना, बीज भांडवल योजना राबविते.

## ५.४.२ वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ-१९८४

शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील व्यक्तिंना सवलतीच्या दराने अर्थसहाय्य देण्यात येते. शिवाय त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीकरिता ८ फेब्रुवारी १९८४ रोजी महामंडळाची स्थापना केली. या महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज योजना, नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भाग खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना, शैक्षणिक कर्ज योजना, महिला समृद्धी योजना, इत्यादी योजना राबविल्या जातात. ही योजना मिळविण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे, अर्जदार विमुक्त जाती व भटक्या जमातीपैकी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ४५ वर्षे असावे. त्याचे वार्षिक उत्पन्न ३९,३०८ इतके असावे. तसेच सरकारचे किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार असता कामा नये, अशी अट असल्याचे दिसून येते.[२०]

## ५.३.३ संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ-१९७४

राज्यातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या चांभार समाजातील लोकांचे जीवनमान उंचाविणे, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळविण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना १९७४ मध्ये करण्यात आली. या महामंडळामार्फत ५०% अनुदान योजना, बीज भांडवल योजना, ४% व्याजदराने कर्ज दिले जाते. ही योजना मिळविण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे, अर्जदार हा चांभार समाजातील असला पाहिजे. अर्जदाराचे वय १८ ते ४५ वर्षे असावे. त्याचे वार्षिक उत्पन्न १९,६५४ इतके असावे. तसेच सरकारचे किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार असता कामा नये.[२१]

### ५.४.४ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ-१९८५

राज्यातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या मातंग समाजातील लोकांचे जीवनमान उंचाविणे, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळविण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना ११ जुलै १९८५ मध्ये करण्यात आली. या महामंडळामार्फत अनुदान योजना, बँक कर्ज, प्रशिक्षण योजना राबविल्या जातात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे, अर्जदार हा मातंग समाजातील असला पाहिजे. अर्जदाराचे वय १८ ते ४५ वर्षे असावे. त्याचे वार्षिक उत्पन्न १९,६५४ इतके असावे.[२२]

### ५.४.५ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीयांचे वित्त व विकास महामंडळ -१९९३

अनुसूचित जाती-जमाती प्रमाणे इतर मागासवर्गीय जातीदेखील सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या आहेत. या जातीना भारतीय संविधानाच्या ३४० व्या कलमांतर्गत अनुसूचित जाती-जमाती प्रमाणे आरक्षणाची व्यवस्था केली होती. या जातीमध्ये तेली, माळी, लोहार, सुतार, सोनार, शिंपी इत्यादी अनेक जातींचा समावेश आहे. भारतीय संविधानाच्या ३४० व्या कलमातंर्गत २९ जानेवारी १९५३ रोजी काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला मागासवर्गीय आयोग सरकारने स्थापन केला होता. या आयोगाने ३० मार्च १९५५ ला आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये इतर मागासवर्गीय जातीमध्ये समावेश केला होता.[२३] या आयोगाने इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची शिफारस केली होती.

१ जानेवारी १९७० मध्ये भारत सरकारने संविधानाच्या ३४० व्या कलमांतर्गत श्री. बिंदेश्वर प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने २१ डिसेंबर १९८० ला आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर केला. या अहवालावरून भारतीय राजकारणात फार मोठे वादळ उठले होते. या आयोगाने सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक हे निकष लक्षात घेऊन त्या आधारे देशातील एकूण ३,७४३ जातींचा इतर मागासवर्गीय जातीमध्ये समावेश केला होता, तर महाराष्ट्रातील २७२ जातींना अन्य मागासवर्गीय ठरविण्यात आले.[२४] त्यानुसार तासगाव शहरातील तेली, कुंभार, कासार, लोहार, सुतार, सोनार, शिंपी, कुणबी, भाट, परीट इत्यादी असंख्य जातींचा समावेश आहे. ७ ऑगस्ट १९९० मध्ये तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने मंडल आयोग लागू केला.[२५]

इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या आर्थिक विकासाबरोबर त्यांना स्वयंरोजगार देण्यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीयांचे वित्त व विकास महामंडळाची स्थापना २५ सप्टेंबर १९९८ रोजी करण्यात आली. या

महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज योजना, सूक्ष्म पत पुरवठा योजना, मुदत कर्ज योजना, शैक्षणिक ऋण योजना, महिला समृद्धी योजना, इत्यादी योजना राबविल्या जातात. या योजनेच्या माध्यमातून इतर मागासवर्गीय जातीच्या समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील व्यक्तिंचा सर्वांगीण विकास घडवून आणणे व ते करत असलेला व्यवसाय सक्षम करणे हा या महामंडळाचा मुख्य उद्देश आहे.[२६] या महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ तासगाव शहरातील इतर मागासवर्गीय जातीना झालेला दिसून येतो. तासगाव शहरातील इतर मागासवर्गीय पात्र लोकांनी शेती व संलग्न व्यवसायासाठी, पारंपारिक व्यवसायासाठी (कुटीरउद्योग) व शिक्षणासाठी सन २००२ ते २०१० पर्यत २० लोकांनी वरील योजनेचा लाभ उठवलेला आहे. महामंडळाने वरील काळात बँकेच्या माध्यमातून रूपये १४,५०,००० चे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. तर त्यास महामंडळाने २,००,००० रूपयांचे अनुदान दिले आहे.[२७] वरील कर्जास केवळ ५% इतके व्याज होते. वरील लाभधारकांमध्ये दोन शैक्षणिक कर्ज घेणाऱ्या लाभार्थी असून त्याचबरोबर फर्निचर, झेरॉक्स मशिन, लेडीज ब्युटीपार्लर, परीट व्यवसाय इत्यादीसाठी कर्ज घेतलेले दिसून येते.

### ५.४.६ महाराष्ट्र राज्य अपंग आणि विकास महामंडख -२००१

राज्यातील कर्णबधिर, अस्थि विकलांग, मनोविकलांग मुलांना शिक्षण, प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य अपंग आणि विकास महामंडळाची २१ नोव्हेंबर २००१ रोजी स्थापना करण्यात आली. या महामंडळाद्वारे किमान ४०% अपंगत्त्व असणाऱ्यांना स्वयंरोजगार, प्रशिक्षण, शैक्षणिक शिष्यवृत्ती, अपंगांना कृत्रिम अवयव, बीज भांडवल आदि विविध योजना उपलब्ध करून दिल्या जातात.[२८] तसेच या विविध योजनाबरोबरच अपंगाना वैयक्तिक थेट कर्ज योजना सुरू केल्यामुळे अपंगाना स्वयंरोजगार उपलब्ध झाला आहे.

## ५.५ एकात्मिक ग्रामीण विकास योजना

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी विविध योजना कार्यरत होत्या. त्यामध्ये १९५२ ची समुदाय विकास योजना, १९६१ चा क्षेत्रीय विकास कार्यक्रम, १९६४ चा कृषी क्षेत्रीय विकास कार्यक्रम तर १९७१-७२ चा सर्वांगीण विकास कार्यक्रम इत्यादी योजनांचा त्यामध्ये समावेश होता. परंतु वरील योजनेद्वारे अपेक्षित यश प्राप्त करता न आल्यामुळे वरील सर्व योजना एकाच छताखाली आणण्याची कल्पना पुढे आली. त्यातूनच सन १९७७-७८ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास योजना सुरू केली. परंतु या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी १९८२-८३ पासून झाली.[२९] या योजनेचा मुख्य उद्देश दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, लहान शेतकरी, शेतमजूर, सीमांत शेतकरी, मागासवर्गीय

कुटुंबे आणि स्त्रिया यांच्यापर्यंत कार्यक्रमाचा लाभ पोहचविणे इत्यादी होते. या योजनेच्या माध्यमातून तासगाव शहरातील लोकांनी लाभ घेतला आहे. मात्र याचा निश्चित आकडा उपलब्ध झाला नाही.

## ५.६ जवाहर योजना

ग्रामीण भूमिहिनांना रोजगार मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय भूमिहीन योजना राबविण्यात आली. तिचे रूपांतर पुढे जवाहर योजनेत केले गेले. १ एप्रिल १९८९ ही योजना राबविण्यात आली. या योजनेअंर्तगत दारिद्र्य निमुर्लनासाठी पुरुषाप्रमाणे महिलांकडेही लक्ष देण्यात आले आहे. या योजनेत ८०% केंद्र व २०% राज्याच्या सहभागाची योजना असून यातून ६% रक्कम इंदिरा आवास करिता, २०% मागील वर्षाची अपुरी कामे करण्यासाठी तर ५% आस्थापन खर्चासाठी वापरली जाते. या योजनेवर उपजिल्हाधिकारी यांचे नियंत्रण असते.[३०] १ एप्रिल १९९९ पासून या योजनेचे रूपांतर स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेत करण्यात आले. जवाहर योजनेच्या माध्यमातून शहरातील भूमिहीन लोकांना १९८८-८९ पासून १९९६-९७ पर्यंत १ कोटी रूपये रोजगार, इंदिरा आवास व आस्थापन व्यवस्थेसाठी खर्च केले होते.

## ५.७ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ग्रामीण भागात असणाऱ्या अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने सन १९७७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविली. या योजनेनुसार दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबातील अकुशल काम करणाऱ्या प्रौढ व्यक्तींना एका आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांचा रोजगाराची हमी उपलब्ध करून देण्याचे काम केले. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार पुरवून रोजगार सुरक्षा निर्माण करणे हा आहे.

सन २००५ मध्ये ही योजना केंद्र सरकारने राज्याच्या धर्तीवर राबविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा पास केला. त्यानुसार या योजनेत ९०% केंद्र व १०% राज्य या प्रमाणात आर्थिक निधीची तरतूद केली आहे. १०० दिवसांच्या रोजगाराची हमी उपलब्ध करून देण्यास शासन असमर्थ ठरल्यास वरील काम करणाऱ्या अकुशल कामगारांना शासन बेरोजगार भत्ता देत असते. या योजने अंतर्गत ५०% कामे ग्रामपंचायतीला व उर्वरित कामे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून राबविली जातात. या योजनेनुसार ३०% रोजगार महिलासाठी राखीव आहे. स्त्री-पुरूषांना समान रोजगार दिला जातो. रोजगार हमी योजनेची कामे विशेष करून रस्ता दुरूस्ती, जलसंधारण, जमीन सपाटीकरण इत्यादीद्वारे राबविली जातात.[३१]

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेनुसार तासगाव शहरात सन १९८२ पासून ही योजना प्रत्यक्षात तासगाव पंचायत व जिल्हा परिषद सांगली द्वारे राबविण्यात आली. त्यामुळे अकुशल असणाऱ्या कामगारांना या योजनेच्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध झाली.

## ५.८ सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

ही योजना केंद्र सरकारने एप्रिल १९९९ रोजी सुरू केली. पूर्वी सुरू असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, ग्रामीण महिला व बाल विकास कार्यक्रम इत्यादी सर्व योजना एकत्रित करून 'सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' हा नवीन कार्यक्रम सुरू करण्यात आला.[३२] ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या क्षमतेवर आधारित मोठ्या प्रमाणात लहान व्यवसाय व उद्योग स्थापन करून, त्याद्वारे तेथील गोरगरीबांना स्थिर व कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणे, प्रत्येक सहाय्यीत कुटुंबाला तीन वर्षामध्ये दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, स्वयंरोजगाराला प्रशिक्षण देणे, विपणनासंबधी सहकार्य करणे, इत्यादी उद्देश या योजनेचे होते. या योजनेमध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे हे प्रमुख लाभार्थी असून, किमान ५०% अनुसूचित जाती व जमाती, ४०% महिला व ३% अपंग स्वयंरोजगारांना लाभ देणे बंधनकारक आहे. या योजनेत ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासन निधीचा पुरवठा करते.[३३]

या योजनेच्या माध्यमातून तासगाव शहरातील बचतगट स्थापून या गटांनी राष्ट्रीय बँकामार्फत अल्पदरात कर्जपुरवठा केला जातो. तसेच त्यांच्यामार्फत छोटे-छोटे लघु उद्योग सुरू करण्यात आले आहेत. या योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील किमान १० व जास्तीत जास्त २० व्यक्तींना एकत्र येऊन बचतगट स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले आहे. विशेषतः महिला बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. या बचतगटातून महिलांचे सबलीकरण करणे, त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करणे हा या योजनेचा हेतू आहे. त्यानुसार सन २००१ ते २००९ या काळात दारिद्र्यरेषेखालील एकूण ५० महिला बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी ३० बचतगटांना खेळते भांडवल पुरविले आहे.[३४]

## ५.९ कुटुंब व्यवस्था

### ५.९.१ कुटुंब पद्धती

कुटुंब ही एक मुलभूत सामाजिक संस्था असून, कुटुंबामुळेच समाजसातत्य टिकून राहते. बर्जेस व लॉक यांनी कुटुंबाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. विवाह संबंध, रक्त संबंध किंवा दत्तक विधान इत्यादी संबंधानी एकत्रित आलेल्या एकाच घरात राहणाऱ्या परस्परांशी पती-पत्नी, आई-वडिल, मुलगा-

मुलगी, भाऊ-बहिण यासारख्या भूमिकांतून व्यवहार करणाऱ्या व समान संस्कृतीचे जतन करणाऱ्या व्यक्तीच्या समुहाला कुटुंब म्हणतात.[३५]

तासगाव शहरातील संयुक्त व विभक्त अशा दोन्ही पद्धती आढळतात. शेती व्यवस्थेला असलेली अनुकूल असणारी संयुक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण घटत असल्याचे दिसून येते. सन १९९८ मध्ये ५,१२३ इतकी कुटुंबे होती तर २००१ मध्ये त्यात वाढ होऊन कुटुंबाची संख्या ६,७६५ इतकी झाली.

## ५.१०. लोकजीवन

### १. घरे

१९६० च्या दशकामध्ये शहरातील बहुतांशी घरे ही मातीची व कच्च्या विटांनी बांधलेली, तर काही ठिकाणी दगडी बांधकाम असलेली कौलारू होती.[३६] १९८० व्या दशकानंतर लोकांची स्थिती सुधारत गेली. श्रीमंताची घरे दगडी व सिमेंट काँक्रिटची बांधली गेली. आज शहरामध्ये बंगल्यांची संख्या वाढत चालली आहे. सध्या नगरपालिकेद्वारे घरकुल योजना राबविल्या गेल्यामुळे अनुसूचित जाती व जमातील तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांची स्लॅबची घरे झाली आहेत. तसेच गोसावी वस्ती, इंदिरानगर झोपडपट्टी येथे आजही मोठ्या प्रमाणात झोपड्या व मातीची घरे आहेत.[३७]

### १. आहार

तासगाव तालुक्यातील शेतकरी साधारणपणे दिवसातून दोन वेळा जेवण करतात. सकाळी येथे चहा घेण्याची पद्धत रूढ आहे. सर्वसामान्यपणे शहरातील लोकांत चहाबरोबर नाष्टा करण्याची सवय दिसून येते. लोकांच्या जेवणामध्ये गव्हाची चपाती, ज्वारीची भाकरी, भात, आमटी, भाजी, डाळ इत्यादी पदार्थ असतात. त्याचबरोबर दुध, दही, काही वेळा मटण, मासे यांचा समावेश असतो. सणासुदीला गोड पुरणपोळी, वरण, लाडू, अंबोळी, इडली वगैरे केले जातात. शहरात तिखट पदार्थ खाणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. ९० च्या दशकानंतर दैनंदिन जीवनावर शहरी संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. दिवाळी सारख्या सणामध्ये लाडू, चकली, करंजी, चिवडा आदी पदार्थ तयार केले जातात. नाष्ट्यासाठी काही वेळा पोहे, उपीट, इडली, डोसा, अंबोळी, उत्ताप्पा यासारखे पदार्थ केले जातात.[३८]

### २. पेहराव

६० च्या दशकामध्ये शहरातील स्त्रिया नऊवारी लुगडी परिधान करित होत्या. मुली फ्रॉक, झबला, परकर, झंपर यासारखे कपडे वापरत होत्या. पुरूष लेंगा, चडड्ी, पंचा, धोतर, पायजमा, बंडी, कुडते,

लंगोटी आदी स्वरूपाचे कपडे वापरण्याची पध्दत होती. तर डोक्याला टोपी, पागोटे, पगडी, मुंडासे, पटका इत्यादी वापरत होते. ६० च्या दशकानंतर आधुनिकीकरणामुळे पोषाखामध्ये बदल होऊ लागले. स्त्रिया नऊवारी ऐवजी सहावारी व फॅन्सी साड्या नेसू लागल्या तर मुली चुडीदार, पंजाबी ड्रेस, मुले फुल्ल पँट, शर्ट, टी-शर्ट वापरू लागले. लहान मुलांची रंगीबेरंगी कपडे बाजारात आली. ९० च्या दशकानंतर मुली चुडीदाराबरोबर जीन्स, टॉप वापरू लागल्या. तर मुले शर्ट पँट, जीन्स, शर्ट, सलवार, बाबासुट, कोट, शेरवानी इत्यादी आधुनिक फॅशनचे कपडे वापरू लागले आहेत.[३९]

### ३. **दागदागिने**

तासगाव शहरातील पूर्वी स्त्रिया नाजूक दागिन्याऐवजी ठसठशीत दागिने वापरत होत्या. यामध्ये चिताक, साज, गुंड, पुतळ्या, कर्णफुले, बोरमाळ, गोट, पाटल्या, बाजुबंद, पायात तोडे, साखळ्या इत्यादी दागिन्यांचा समावेश होता. पुरुषांमध्ये दागिने वापरण्याचे प्रमाण कमी होते. अनेक लोक बोटामध्ये अंगठ्या घालत होते. लहान मुलांना करगोटे, कडी, पैंजण इत्यादी सोन्या चांदीचे दागिने करत. १९८० नंतर नाजूक दागिने वापरण्याचे प्रमाण वाढले. स्त्रिया नेकलेस, गोट, बिल्वर, लक्ष्मीहार, मोहनमाळ, राणीहार, कानातील विविध प्रकारचे टॉप्स, साखळ्या, झुमके, रिंगा इत्यादी तर पुरूष अंगठी, चेन, हातातील कडी वापरू लागले आहेत.[४०]

### ४. **भाषा**

तासगाव शहरामध्ये मराठी ही प्रमुख भाषा आहे. येथील सर्व लोक मराठी भाषा बोलतात. पण मुस्लिम लोक आपल्या समाजातील लोकांशी उर्दू, वडर लोक तेलगू भाषा बोलतात व जैन लोक कन्नड तर गावातील इतर लोकांशी वडर लोक मराठीतच बोलतात.[४१]

### ६. **विवाह** (लग्न समारंभ)

विवाह संस्कार हा भारतीय संस्कृतीचा सन्मान बिंदू आहे. शहरातील विवाह हे पारंपारिक पद्धतीने पार पाडले जातात. विवाहाअगोदर व विवाहानंतर असणारे विधी पूर्ण केले जातात. श्रीमंत लोक विवाहावर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करतात. अलिकडे नोंदणी विवाहाला कायद्याने मान्यता दिल्यामुळे काही किरकोळ नोंदणी विवाह केले जातात. पूर्वी शहरात बालविवाह मोठ्या प्रमाणात होत होते. विशेष करून मुलींचे बालविवाह होत होते. बालविवाहावर कायद्याने बंदी घातल्यामुळे व शिक्षणामुळे बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. कायद्यानुसार मुला-मुलींसाठी वयोमर्यादा अनुक्रमे २१ व १८ वर्षे करण्यात आली. तरीही मुलींचे बालविवाह काही ठिकाणी घडून येताना दिसत आहेत.[४२] ९० व्या

दशकानंतर काही ठिकाणी सामाजिक संस्था, मंडळांच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळे पार पाडले जाऊ लागले आहेत.

## ५.११ समाजरचना

तासगाव शहरामध्ये प्रामुख्याने हिंदू, मुस्लिम, जैन व बौद्ध धर्मियाचे लोक गुण्या-गोविंदाने राहतात. येथे मोठ्या प्रमाणात हिंदूधर्मीय असून इतर धर्मियांचे प्रमाण अल्प आहे. हिंदू धर्मामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण, मराठा, कुणबी, सुतार, लोहार, मांग, महार, चांभार, इत्यादी अनेक पोट जाती आढळतात. स्वातंत्र्योत्तर काळात सुतार, लोहार, न्हावी, परीट, सोनार इत्यादी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला. स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथील सामाजिक रचनेच्या बदलास प्रारंभ झाला. शिक्षण कायदा, व्यवसाय, नोकरी यामुळे जाती व्यवस्थेची बंधने शिथिल झाली आहेत. तरीही व्यवसायावरून पडलेल्या आपापल्या व्यवसायाशी काही प्रमाणात चिकटून आहेत. उदा. सुतार, लोहार, चांभार, कुणबी, परीट, जोशी, गुरव या सारख्या विविध जातीचा उल्लेख करता येईल. अलिकडे बलुतेदारी व्यवसाय व्यवस्था विस्कळीत झाली असली तरी समाज व्यवस्था बहुजातीय अशीच आहे. मात्र समाजात असणारी स्पृश्य-अस्पृश्यता आता कायमची गळून पडली आहे. पण या जाती-पोटजाती निवडणुकीच्या व्होट बँका बनल्या आहेत. त्याद्वारे त्या राजकीय पक्षावर दबाव टाकून आपला विकास साधण्याचा प्रयत्न करत आहेत.

### ५.११.१ हिंदू समाज

#### १. ब्राह्मण

महाराष्ट्रात ब्राह्मणांमध्ये सुमारे ३० पोटजाती आहेत. त्यापैकी देशस्थ, चित्पावन, कऱ्हाडे, सारस्वत, देवरूखे, प्रभु इत्यादी पोटजाती आढळतात. शहरात वरील पोटजातीमध्ये सारस्वत जातीचे प्रमाण अधिक आढळते. पूवी ब्राह्मण समाज धार्मिक विधी, पंचांग, पुरोहितपणा, अध्यायन, अध्यापन तसेच जमीनदार, सावकार, लेखक इत्यादी व्यवसाय करीत होते. अलिकडे शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्र, शिक्षण, डॉक्टर, वकील व इतर क्षेत्रात कार्यरत आहेत.[४३]

#### २. मराठा

तासगाव शहरामध्ये प्रामुख्याने ७०% पेक्षा अधिक लोक मराठा-कुणबी जातीतील आढळतात. मराठ्यामध्ये अस्सल व कुणबी मराठे असे दोन वर्ग आहेत. मराठा व कुणबी यांचा पोशाख, पेहराव व आहारामध्ये फारसा फरक राहिला नाही. मात्र अस्सल मराठ्यांचा कल लग्न समारंभात भरपूर खर्च

करण्याकडे असतो. पूर्वी जे इनामदार लोक होते, ते शहरात राहून गावाकडील शेती वगैरे कुळाकडून करून घेत होते. कसेल त्याची जमीन या कायद्यामुळे त्यांची कुळे त्या शेतीचे खरे मालक बनले आहेत.

कुणब्यांना कुळवाडी किंवा कुलवाडी असेही म्हणतात. ते प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात. कुणबी शब्द कुलपती-कुळपती किंवा कुळवई-कुळवी कुणबी असा झाला असावा. यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे हे लोक शेतीवर जास्त प्रेम करतात. मराठा व कुणबी यांच्यात कुळे व देवके एकच आढळतात. एकाच कुळात व देवकांत लग्न होत नाहीत. दोघांचीही कुलदैवते एकच आहेत.[४४] मंडल आयोगाच्या अंमलबजावणी नंतर कुणबी समाजाचा इतर मागासवर्गीयांमध्ये समावेश झाला आहे. त्यामुळे या समाजातील लोकांना राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षणाचा लाभ मिळत आहे.

## ३. लिंगायत

तासगाव शहरामध्ये लिंगायत समाजाचे प्रमाण अत्यल्प आहे. हा समाज शिवाचे उपासक असून, ते बसवेश्वराला नंदीचा अवतार मानतात. ते शाकाहारी आहेत. या समाजात तेली, नवणे, पैलवान, शेटे, खेराडकर, शिंत्रे वगैरे आडनावाचे लोक दिसून येतात.[४५]

## ४. सुतार

सुतार या जातीचा महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीयांमध्ये समावेश केला आहे. सुतार ही पूर्वीपासून अत्यंत महत्वाची जात आहे. हे लोक शेतकऱ्यांना शेतीची अवजारे बनवून देत होते. अलिकडे लोखंडी नांगरामुळे हा व्यवसाय कमी झाला आहे. मात्र अवजारे, फर्निचर, घराला लागणारे साहित्य ते अजूनही बनवितात. पूर्वी बलुता घेऊन हे लोक व्यवसाय करीत होते. अलिकडे बलुतेदारी पद्धत बंद झाल्यामुळे व्यवहार रोखीने केले जातात. हे लोक हिंदू धर्माचे सर्व रितीरिवाज करतात. त्यांची जोतिबा, खंडोबा व विठोबा ही कुलदैवत आहेत.[४६]

## ५. गुरव

तासगाव शहरामध्ये गुरवांच्या मराठी व लिंगायत अशा पोट जाती आहेत. गुरव लोक पूर्वीपासून पत्रावळी तयार करण्याचे काम करतात. तसेच ते गावातील मंदिराचे वंश परंपरागत पुजारी असून त्याबद्दल बहुतेकांना देवस्थान जमिनी इनाम दिलेल्या आहेत. त्या जमिनीना गुरवकी म्हणतात.[४७] तसेच शहरात अजूनही बलुतेदारी पद्धत आढळून येते. महाराष्ट्र शासनाने या समाजाची इतर मागासलेल्या वर्गात गणना केली आहे.

## ६. कुंभार

'कुंभकार' या संस्कृत शब्दापासून कुंभार हा शब्द तयार झाला आहे. कुंभार समाज हा पूर्वीपासून मातीची भांडी, मुर्ती, विटा तयार करण्याचे काम करीत होता. पूर्वी बलुतेदारी वस्तुविनिमयाच्या पद्धतीने मातीची भांडी, देवदेवतांच्या मूर्त्या, शेतकऱ्यांना देत असत. याचा मोबदला शेतकरी धान्याच्या स्वरूपात देत असत. अलिकडे ही पद्धत जवळजवळ बंद झाली आहे. काही कुंभार मातीच्या वस्तू रोखीनेच विकतात. अनेक ठिकाणी ते कौले, विटा करतात. यासाठी कुंभार औद्योगिक सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. याद्वारे ते आपला व्यवसाय चालवतात. हे लोक हिंदू धर्माप्रमाणे सर्व रितीरिवाज, सण-उत्सव साजरे करतात. महाराष्ट्र शासनाने या समाजाची इतर मागास जातीमध्ये समावेश केला आहे.[४८]

## ७. न्हावी

हा समाज बारा बलुतेदारापैकी एक आहे. लिंगायत न्हावी, मशाल न्हावी व मराठा न्हावी अशा या समाजाच्या पोटजाती आढळतात.[४९] शहरात मराठा न्हावी मोठ्या प्रमाणात आढळतात. केशकर्तन हा त्यांचा मुख्य धंदा होय. काही केशकर्तन सांभाळून शेती व्यवसायही करतात. त्यांचे धार्मिक विधी, सण-उत्सव हिंदू धर्माप्रमाणे आढळतात. महाराष्ट्र शासनाने न्हावी समाजाची इतर मागासलेल्या वर्गामध्ये समावेश केला आहे.[५०]

## ८. परीट

पूवी हा समाज श्रीमंत लोकांचे, इनामदारांचे कपडे धुण्याचे काम करीत होता. परीट समाज सध्या कपडे इस्त्री करण्याचे काम करतो. त्यासाठी रोखीने पैसे घेतो. सणासुदीच्या काळात हा समाज बैता मागतो. काही लोक शहरात (लॉन्ड्री) कपडे धुण्याचे काम आजही करतो. सध्या शिक्षणामुळे या समाजातील मुलांना शासकीय निमशासकीय सेवेत नोकरी मिळविली आहे. महाराष्ट्र शासनाने परीट समाजाची इतर मागासलेल्या वर्गामध्ये समावेश केला आहे.[५१]

## ९. तेली

तेली समाज पूर्वी खाद्य तेलाचा पुरवठा करण्याचा व्यवसाय करीत होता. सध्या या समाजाचा हा व्यवसाय बंद झाला आहे. महाराष्ट्र शासनाने तेली समाजाची इतर मागासलेल्या वर्गामध्ये समावेश केला आहे.[५२]

### १०. धनगर

तासगाव शहरामध्ये डंगे धनगर व मेंढ्या धनगर यांच्या पोटजाती आढळतात. डंगे धनगर डोंगर कपारीत राहून गुरेढोरे पाळायचे, लाकडाच्या मोळ्या विकण्याचे व गुरांचा बाजार करण्याचे काम करतात. तर मेंढ्या धनगर हे मेंढ्या, शेळ्यांपासून मिळणारे लोकर विकण्याचे काम करतात. डंगे धनगरापेक्षा मेंढ्या धनगराची स्थिती थोडी चांगली दिसून येते.

धनगर लोक काटक, कष्टाळू असतात. ते हवामानात होणारे फेरफार सांगतात. तसेच जंगलातील औषधी वनस्पती त्यांना माहिती असते. अशा औषधी वनस्पतीची विक्री ते शहरात जावून करतात. या समाजाचे कुल आणि देवक एक असेल तर लग्न होत नाही. या समाजाची अजूनही विधवा विवाहाची प्रथा दिसून येते. १९८० च्या दशकापर्यत या समाजात बालविवाह म्हणजे पाळण्यातच विवाह होत होते. तर बहुविवाहाची पद्धत १९८५ पर्यत रूढ होती. या समाजातील लोक मोठ्या प्रमाणात अशिक्षित आढळतात. लोकगीते व लोकनृत्य याबद्दल ही जमात प्रसिद्ध आहे. त्यांची लग्ने पुरोहिताकडून न होता त्यांच्याच जातीतील पुरोहिताकडून होतात. नवरदेवाकडून मुलीला हुंडा दिला जातो.[५३] तसेच हा समाज आजही विविध नागरी सुविधांपासून वंचित आहे. त्यामुळे या समाजाचा एस. टी. या प्रवर्गामध्ये समावेश करावा अशी त्यांची मुख्य मागणी आहे. यासंदर्भात आण्णासाहेब डांगे यांनी वेळोवेळी आंदोलने व मोर्चे काढून शासनाला निवेदने दिली आहेत.

## ५.११.२ अनुसूचित जाती

ग्रामीण भारतात अस्पृश्यता शतकानुशतके रूढ होती. अस्पृश्यता पाळणे हाच समाजमान्य नियम होता. अस्पृश्य किंवा हरीजन जातीच्या गावकुळाबाहेर वस्त्या होत्या. महारवाडा, मांगवाडा अशा गावाबाहेरील जातीनिहाय वस्त्यांमध्ये अस्पृश्यांनी राहावे. सर्वांची अत्यल्प मोबदल्यात सेवा करावी, अशा विविध प्रकारचे रितीरिवाज खेडोपाडी अस्तित्वात होते. पुढे फुले शाहू आंबेडकरांनी व विविध समाज धुरीणांनी त्या विरोधात चळवळी केल्या. भारत सरकारने १९५५ मध्ये अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविणारा कायदा केला. राज्यघटनेने अस्पृश्य जातींना समानतेचे सर्व अधिकार दिले. तरीही १९७० पर्यत अस्पृश्यता काही प्रमाणात होती. डॉ. बाबा आढाव यांनी 'एक गाव, एक पाणवठा' मोहिम राबवून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. २७ जुलै १९७७ पासून शासनाने अनुसूचित जाती आदेश कायदा १९७६ मध्ये अस्तित्वात आणला. त्यानुसार शहरात महार, मांग, चांभार, खाटीक, ढोर इत्यादी जातींचा अनुसूचित जातीमध्ये समावेश झाला.[५४]

### अ. महार

तासगाव शहरात या समाजाच्या महार व तराळ अशा दोन पोटजाती आहेत. महार हा पूर्वी गावची राखण करणारा अत्यंत महत्त्वाचा बलुतेदार होता. तो गावाबाहेर राहात असल्याने, त्यांना वेसकर म्हणत. या समाजातील लोकांना गाव स्वच्छ ठेवणे, रात्रीच्या वेळी गस्त घालणे, दवंडी देणे, गावातील गुन्हे शोधून काढणे, मृत जनावरे नेणे इत्यादी कामे करावी लागत. ही पद्धत शहरात साधारणपणे १९८० पर्यंत होती. सन १९८५ पर्यत या समाजातील लोकांच्यासाठी चहाचे कप व इतर भांडी वेगळी ठेवली जात होती. शासनाच्या विविध योजनेचा लाभ ह्या समाजातील लोकांना होत असल्याने यांच्या सामाजिक स्तरामध्ये बदल होत आहे. तसेच स्पृश्य व अस्पृश्यता हा भेद बहुतांशी कमी झाला आहे.[५५]

### ब. चांभार

तासगाव शहरात चांभाराच्या दोन जाती आहेत. कोकणात चांभारांना चिवले चांभार म्हणतात. तर शहरात चांभारांना हराळे चांभार म्हणतात. या दोहोत रोटी किंवा बेटी व्यवहार होत नाहीत. चांभारांचा पूर्वी बलुतेदारात समावेश होता. ते वर्षभर शेतकऱ्यांना चपला, जोडे, मोट इत्यादी चामड्यांच्या वस्तू करून देत होते. त्याच्या मोबदल्यात शेतकरी शेतीमालाचा काही भाग बलुता म्हणून देत होते. बलुतेदारी पद्धत आता जवळजवळ संपुष्टात आली.[५६]

चांभार समाजात पुनर्विवाहास मान्यता आहे. चांभार लोकांचे सण-उत्सव हिंदू धर्माप्रमाणेच साजरे केले जातात. या लोकांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केल्यामुळे त्यांना शासनाकडून अनेक सवलती मिळतात. तसेच नोकरीमध्ये राखीव जागाचे त्यांना आरक्षण असल्यामुळे, काही लोकांना याचा फायदा झालेला दिसून येतो. सध्या हे लोक तयार चपला विक्रीची दुकाने घालून ती विकतात.

### क. मांग

या समाजामध्ये मांग व मांग गारूडी अशा पोट जाती आहेत. हा समाज पूर्वी बारा बलुतेदारापैकी एक होता. दोरखंड वळणे, गोफणी, शिंकी, केरसुण्या तयार करणे, धार्मिक कार्यात वाजंत्री वाजविणे, बैलांना कैची करणे, इत्यादी कामे त्यांना करावी लागत होती. मांग लोक आजही काही ठिकाणी धार्मिक कार्यात वाजंत्री वाजविण्याचे तर दोरखंड देण्याचे काम करतात. हे लोक सर्व सण-उत्सव हिंदू धर्माप्रमाणेच साजरे करतात. या लोकांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केल्यामुळे त्यांना शासनाकडून महार लोकांच्याप्रमाणे अनेक सवलती मिळतात.[५७]

## ५.११.३ अनुसूचित जमाती

पूवी ज्यांचा आदिम जमाती, आदिवासी व वन्य जमाती इत्यादी नावांनी उल्लेख केला जात असे. त्याचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला. तासगाव शहरात या जातीचे प्रमाण अत्यल्प आहे. कोळी लोकांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला आहे.

## अ) नागरी हक्क संरक्षण कायदा-१९७६

सन १९५५ चा अस्पृश्य कायदा पास करून ही प्रत्यक्षात स्पृश्य व अस्पृश्य यांच्यातील दरी कमी होण्यासाठी अनेक अडचणी होत्या. म्हणून शासनाने १९७६ मध्ये नागरी हक्क संरक्षण कायदा लागू केला. या कायद्यानुसार एखाद्या समुहाने किंवा समुदायाने अस्पृश्यांविरूद्ध गुन्हा केल्याचे सिद्ध झाल्यास त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हा नोंदविण्याची तरतूद करण्यात आली आहे. नागरी हक्क संरक्षण कायद्याखाली शहरातील एकूण चार दलित अत्याचारी प्रकरणे घडली होती.[५८] यावरून दलित अत्याचारी कायदा झाल्यावरही दलित अत्याचारी प्रकरणे घडत होती. परंतु ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्याचा काही प्रमाणात राजकीय हेव्यादाव्या पोटी गैरफायदा घेतलेला दिसून येतो.

## ५.११.४ मुस्लिम समाज

तासगाव शहरात बहुसंख्य मुसलमान सय्यद, पठाण व शेख कुळातील आहेत. याशिवाय इतर मुसलमान व्यवसायानुसार अत्तार, मणियार, बागवान, मुजावर, मोमीन, पटवेगार, नालबंद इत्यादी पोट जातीत मोडतात.[५९]

शहरात सर्व मुसलमान घरात व आपापसांत भाषा बोलतात व इतरांशी मराठी बोलतात. बोलतानासुद्धा पुष्कळ मराठी शब्दांचा उपयोग करतात. सर्व मुसलमान लोक मांसाहारी असले तरी त्यांच्या रोजच्या जेवणात मांस असतेच असे नाही. तसेच त्यांच्या पोशाख व पेहरावामध्ये व हिंदूच्या पेहरावामध्ये फारसा फरक असत नाही. या समाजातील स्त्रिया हिंदू सुहासिनीप्रमाणे कपाळला कुंकू लावत नाहीत व गळ्यात मण्याच्या पोतीत सोन्याच्या मंगळसुत्राऐवजी चंद्रकोर असलेला लथ्या नावाचा अलंकार घालतात. जुन्या पिढीचे धर्मांतरीत मुसलमान दाढी राखतात व डोक्यावरचे केस काढावयाचे झाल्यास सर्व केस काढतात. तसेच बहुतांशी लोक शेती करतात, त्यांचा व्यवसाय करण्याकडे अधिक कल असून बांगड्या, फळभाज्या, मटण व मासे विकण्याचे काम करतात. तसेच छोटे मोठे व्यवसायही केल्याचे दिसून येतात.[६०]

भारतीय मुसलमानाप्रमाणेच शहरातील मुस्लिम मोहरम, ईद-इ-मिलाद, मेराज, राबेरान, रमजान ईद, बकरी ईद इत्यादी सण साजरे करतात. सणासुदीला अन्न, वस्त्र व पैशाच्या स्वरूपात दानधर्म करतात. शहरात तीन मशिदी आहेत. तेथे नियमाने प्रार्थना करतात.[६१] तसेच तलाक म्हणजे घटस्फोट वगैरे कायदेशीर बाबी आहेत. पण तो ईश्वराला पसंत नाही, असा समज आहे. मुसलमानात विधवा विवाहाला बंदी नाही.

## ५.१२ स्त्रियांची स्थिती

भारतीय समाजात मातृसत्ताक पद्धतीत स्त्रियांना महत्त्वाचे स्थान होते. स्त्री ही कुटुंबप्रमुख, कुलदीपक अथवा वारस होती. पण आर्यांच्या आगमनानंतर तिचे अधःपतन सुरू झाले व पितृसत्ताक पद्धत रूढ झाली. त्या पिडीत व शोषित बनल्या आहेत. स्त्रिया ह्या अबला, दुबळ्या व सर्वच बाबतीत कमी आहेत. ही भावना सार्वत्रिक होती. स्त्री ही समाजातील महत्त्वाचा घटक असूनही, ती वंचित व दुर्लक्षित राहिली होती. समाजात स्त्रीचे स्थान हे तिचे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य व सामाजिक जीवनातील तिचे स्थान कसे आहे, यावर ठरत असते. सर्व अधिकार पुरुषाकडे असल्यामुळे समाजामध्ये स्त्रियांचे स्थान गौण आहे.

१९६० च्या दशकांत शहरात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण केवळ ४.८०% इतके होते. लोक आपल्या मुलीला शाळेत पाठवत नव्हते. या दशकात बालविवाह प्रतिबंधक कायदा होऊनही बहुतांशी मुलींचे विवाह बालवयात होत होते. त्यामुळे बालमाता, विधवा माता व मातांचे मृत्यूचे प्रमाण अधिक होते. स्त्रिया चूल व मूल या संकल्पनेत अडकून राहिल्या होत्या. त्या पुरुषांच्या बरोबरीने शेतात काम करत होत्या पण स्त्रियांच्या व पुरुषांच्या मजुरीमध्ये तफावत होती. स्त्रियांना केवळ दहा आणे तर पुरूषांना एक रूपाया मजुरी मिळत होती. शहरात नगराध्यक्ष सौ. पद्मावती गणपतराव कोळी (१९६७) या राजकीय नेत्याच्या घरातील असल्यामुळे त्या वगळता सर्वसामान्य स्त्रियांचा राजकीय क्षेत्रामध्ये सहभाग नव्हता. समाजावर पुरूषांचे वर्चस्व होते.[६२] स्त्रियांना धार्मिक कार्यात मात्र महत्त्वाचे स्थान होते.

१९८० च्या दशकांकानंतर स्त्रियांच्या स्थितीमध्ये बदल होत गेले. मुली-मुलांच्या बरोबरीने शाळेत जावू लागल्या. पालकही मुलींच्या शिक्षणाबद्दल जागरूक झाले होते. त्यामुळे साक्षरतेचे प्रमाणही वाढले पण उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण कमी होते.[६३]

७३ व्या घटनादुरूस्तीने १९९० च्या दशकांकानंतर स्त्रियांना पंचायत राज व्यवस्थेत १/३ जागा ठेवण्यात आल्या. त्यानुसार ३०% स्त्रिया जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व ग्रामपंचायतीमध्ये काम करू लागल्या. तासगाव शहरात ७ महिला नगरसेविका होत्या.[६४] त्यामध्ये

नगराध्यक्ष सौ. रजनीगंधा धनपाल लंगडे (१९९०) यांनी नगरपालिकेत चांगल्याप्रकारचे काम केल्याचे दिसून येते. तसेच अनेक शासकीय निमशासकीय नोकऱ्यामध्ये महिला जबाबदारपणे काम करीत आहेत. पण काही ठिकाणी महिला ह्या नाममात्र ते पद भुषवितात. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले आहे. पण असे दिसून येते की या सर्व महिला राजकारण्यांच्या घरातीलच दिसून येत आहेत. असे म्हणावे लागेल की महिलांना ५०% आरक्षण म्हणजे राजकारण्याने त्याच्या पत्नीला निवडून द्यावयाची संधी होय.

सन १९८४ च्या ४९८अ व २००५ च्या कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार स्त्रियांना सुरक्षितता प्राप्त झाल्याने स्त्रिया गुन्हा नोंदवू लागल्या आहेत पण ५०% महिला स्वकियांच्या व समाजाच्या दबावाखाली पोलिस स्टेशनला जात नाहीत. परिणामी समाजातील अनेक नराधम मोकाट वावरताना दिसतात. अनेक गुन्हे करण्यास ते मागेपुढे पहात नाहीत.

तासगाव शहरात महिला लघु व कुटीरद्योग यांच्या माध्यमातून त्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्यामुळे त्यांचा सामाजिक स्तर उंचावत आहे.[६५] शहरात दारूबंदी मोहीम राबवली जात असून महिलांनी पुढाकार घेऊन वरचे गल्लीतील दारूचे दुकान शहराबाहेर घालविले आहे. तसेच शहरात बचतगटाच्या माध्यमातून शालेय पोषण आहाराचे ठेके शहरातील ७०% शाळांचे घेतले आहेत. त्याचबरोबर शेवया, कुरवड्या, पापड, लोणची, मेणबत्ती तयार करणे, रेडिमेड ड्रेस, तयार ब्लाऊज व खाण्याचे विविध पदार्थ हे सर्व महिला बचत गटाचा स्टॉल (दख्खन जत्रेत व उत्सवात) मांडून विकतात व मार्केटिंगही करत असल्याचे दिसून येते. महिला दुध डेअरी, आईस्क्रीम पार्लर, ब्युटी पार्लर तसेच शेळी पालन, म्हैस पालन याद्वारे महिला सक्षम बनत आहेत. अनेक स्त्रिया आज नोकरी व गृहिणी ह्या दोन्ही भूमिका पार पाडतात. पण अशा स्त्रियांना घरच्या मंडळीची योग्य ती सरबराई करावी लागते. ती गृहिणी म्हणून तिची भूमिका बजावत नाही, असे आरोप तिच्यावर होतात. आजही ती पुरुषी अहंकार व संस्कृतीची शिकार बनत आहे. समाजात स्त्री अत्याचाराच्या बलात्कार, विनयभंग व हुंडाबळीच्या अनेक घटना घडत अहेत.[६६]

## ५.१२.१ हुंडा पद्धत

शहरात फार पूर्वीपासून हुंड्याची चाल प्रचलित असली तरी अलिकडच्या काळात तिला अनिष्ठ वळण लागले आहे. हुंडा म्हणजे विवाहात वर पक्षाने वधू पित्याकडून रोख रकमेच्या किंवा मौल्यवान वस्तूच्या रूपात घेतलेली देणगी होय. म्हणून हुंड्याला वरदक्षिणा असे म्हटले जाते. मुलांची शैक्षणिक पात्रता, घराणे व नोकरीनुसार हुंड्याची रक्कम व मानपानाची अपेक्षा ठरते.

शहरात हुंडा पद्धत सर्रास सुरू आहे. अधिक हुंडा घेणाऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. हुंडा देता येत नसल्यामुळे अनेक मुलींना विवाह प्रसंगी प्रतिकूल स्थळांना मान्यता द्यावी लागते. धनगर व वडार समाजात वर पित्याकडून हुंडा दिला जातो. त्यामुळे या समाजात वधुमूल्य प्रथेद्वारे स्त्रिची उपयुक्तता दिसून येते.[६७]

## ५.१३ सण-उत्सव

तासगाव शहरातले लोक पारंपरिक पद्धतीने चालीरिती, रूढी, परंपराचे काटेकोरपणे पालन करीत असलेले दिसतात. येथे बाराही महिन्यात असलेले प्रत्येक सण, समारंभ, उत्सव उत्साहाने पार पाडीत असत. येथील लोकसाहित्यात त्याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. हिंदू धर्मातील सर्वच सण-उत्सव मोठ्या आनंदाने साजरे करतात. त्याचबरोबर यात्रा, जत्रा, गणेशोत्सव, अष्टमी व उरूस मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. त्याची माहिती पुढीलप्रमाणे

### १) गुढीपाडवा

हा सण चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी साजरा केला जातो. मराठी नववर्षाची सुरूवात या दिवसापासून होते. या दिवशी वेळूच्या काठीवर नवीन वस्त्र, पेला, पुष्पमाला व कडुनिंब बांधून ती घराच्या दाराशी उभी करतात. तिला गुढी म्हणतात. याच दिवशी गुळ, चणे व कडुनिंबाच्या झाडाची पाने यांचे मिश्रण कुटुंबातील सर्व मंडळीना प्रसाद म्हणून वाटण्याची पद्धत आहे. या दिवशी घरोघरी पुरणपोळी केली जाते. वर्षातील साडेतीन मुहूर्तापैकी हा एक गुढी पाडव्याचा शुभमुहूर्त मानला जातो.

### २) पोळा

हा सण आषाढी पोर्णिमेला साजरा केला जातो. शहरात काही ठिकाणी देशी बेंदूर व काही ठिकाणी कर्नाटकी बेंदूर साजरा करतात. हा सण प्रामुख्याने शेतकऱ्यांचा असून या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना अंघोळ घालून, सजवून त्यांची पूजा करतात. जनावरांच्या शिंगांना रंग लावला जातो. त्याचबरोबर त्यांना चांगला खाऊ घालून गोडेतेलही पाजतात. काही गावात बैलाची सजवून मिरवणूक काढली जाते. आता ही प्रथा कमी होत चालली आहे. या दिवशी पुरणपोळी व गुळमिश्रित गव्हाच्या पिठाची कडबोळी करतात.

## ३) गणेश चतुर्थी

भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून गणेशोत्सवास प्रारंभ होतो. गणेशचतुर्थीच्या आदल्या दिवशी स्त्रिया हरतालिकेची पूजा करतात. गणेश चतुर्थीच्या दिवशी सुशोभित केलेल्या गणपतीच्या मुर्त्यांची घरोघरी मोठ्या उत्साहाने प्रतिष्ठापना केली जाते. हा उत्सव दहा-अकरा दिवस चालतो. पण घरातील गणपती हे गणेश पाच, सात व दहाव्या-अकराव्या दिवशी विसर्जित करतात. या कालावधीत ऋषी पंचमी उंदरपेजी, गौरी पूजन, शंकर पूजन केले जाते. गौरीपुजनावेळी मातीचे मुखवटे लावून गौरी सजवल्या जातात. तसेच दहीभाताचा नैवैद्य दाखवला जातो. त्यानंतर शंकराची पूजा केली जाते. सुवासिनी स्त्रिया या दिवशी उपवास करतात. मोठ्या उत्साहाने गणेशमुर्तीचे विर्सजन केले जाते. गावोगावी सार्वजनिक गणोशोत्सव साजरे केले जातात.

## ४) दसरा (नवरात्रोत्सव)

नवरात्रोत्सवाचा प्रारंभ अश्विन शुद्ध प्रतिपदेला होऊन दहाव्या विजयादशमीला दसऱ्याची समाप्ती होते. प्रतिपदेला घटस्थापना करून नऊ दिवस पूजा करतात. घरोघरी घट बसविले जातात. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन केले जाते. कारागीर लोक आपापल्या औजारांची पूजा करतात. सायंकाळी गावाच्या सीमेवर जाऊन गणपती पूजन करून, शमी किंवा आपटा या वनस्पतीच्या झाडांची पाने लुटतात. या विधीला सोने लुटणे असे म्हणतात. यादिवशी ग्रामदैवतेची पूजा केली जाते.

## ५) दिपावली

दिपावली उत्सव हा सर्वात मोठा उत्सव अश्विन वैद्य चतुर्थीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत चालतो. मोठ्या धामधुमीत आनंदाने हा सण साजरा केला जातो. नरक चतुर्थी, लक्ष्मीपूजन, दिपावली पाडवा, वहिपूजन, भाऊबीज आदी कार्यक्रम या काळात साजरे केले जातात. दिव्याची रोषणाई, फटाक्याची आतषबाजी केली जाते. नरकचतुर्थीपासून रोज तेला लावून न्हाऊ घातले जाते. पाडव्याच्या दिवशी स्त्रिया आपल्या पतीला ओवाळतात. भाऊबीजेच्या दिवशी बहिण आपल्या भावाला ओवाळते. या दरम्यानच्या काळात पंचपक्वान्न, गोडधोड पदार्थ केले जातात.

## ६) मकर संक्रांत

पौष महिन्यात १४ जानेवारीला मकर संक्रांत हा सण तिळगुळ वाटून आणि एकमेकाचे तोंड गोड करून साजरा केला जातो. या दिवशी कुंभाराकडून आणलेल्या मातीच्या वाणाची संक्रांतीची (बोळकी-लहान मडकी) सुवासिनी पूजा करतात. त्यात ऊसाचे तुकडे, हरभरा, वटाणा, गाजर, बोराचे तुकडे इ.

घालतात. संक्रांतीच्या आदल्या दिवशी बाजरीची भाकरी व भोगीच्या कालवणाची (भाजी, उसळ), ओला हरभरा, वाटण्याची प्रथा आहे. याला भोगी म्हणतात.

### ७) होळी

फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला होळीचा सण असतो. या दिवशी प्रत्येक गावोगावी रात्री होळीची पूजा करतात व ती पेटवितात. यादिवशी पुरणपोळी केली जाते. दुसऱ्या दिवशी धुलिवंदनाचा सण असतो. ८० च्या दशकापर्यंत या सणानिमित्त सोंग काढण्याची प्रथा आहे. तसेच मनोरंजनाचे कार्यक्रमही साजरे केले जातात. होळीनंतर पाच दिवसांनी रंगपंचमी येते. रंगपंचमीदिवशी एकमेकांच्या अंगावर रंग उडवून साजरी केली जाते.

याशिवाय श्रीकृष्ण जन्माष्टमी, रथसप्तमी, महाशिवरात्री, वटपौर्णिमा, तुलसी विवाह, आषाढी एकादशी, श्रावण महिना, नारळी पौर्णिमा, गोकुळाअष्टमी इत्यादी सण साजरे केले जातात. याशिवाय गावोगावी ग्रामदैवतेच्या दरवर्षी यात्रा होत असतात. तसेच शहरातील मुस्लिम बांधव बकरी ईद, मोहरम, रमजान ईद इत्यादी सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.[६८]

## ५.१४ उत्सव व यात्रा

ज्या एखाद्या धार्मिक समारंभात तो करणाऱ्या आणि त्यात भाग घेणाऱ्या लोकांना हर्ष, आनंद व मनप्रसाद याचा अनुभव घडतो, त्यास उत्सव व जत्रा यामधून मानवाच्या सामाजिक विकासाला व कलात्मक प्रवृत्तीला अविष्काराची संधी मिळते. यात्रेच्यावेळी गावोगावी कीर्तने, प्रवचने, नृत्य, नाटय, सोंगी भजन, तमाशा इत्यादी लोककलांच्या माध्यमातून प्रबोधन, मनोरंजन केले जाते. तसेच यात्रेच्या काळात बैलगाडी शर्यत, कुस्त्या, दांडपट्टा, लेझीम, इत्यादी मर्दानी खेळ खेळले जातात. तसेच यात्रा काळात विविध प्रदर्शने भरवली जातात.

तासगाव शहरात तासगावच्या ऐतिहासिक रथोत्सव, सिद्धेश्वर अष्टमी, दत्त जयंती, रामनवमी, हनुमान जयंती, लक्ष्मी यात्रा इत्यादी यात्रा व उत्सवाचे आयोजन केले जाते. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून भक्तांना महाप्रसाद दिला जातो.

## ५.१५ कला व क्रीडा परंपरा

व्यक्तींला स्वसंरक्षण व हिंस्त्र मानवी स्वभावाला आवर घालण्यासाठी कुस्ती कलेस प्राचीन काळापासून महत्व प्राप्त झाले. तासगावात शहरात खेळ कधी सुरू झाला याची नोंद मिळत नाही. शहरात

आबासाहेब जोग यांनी गजानन व्यायामशाळेच्या माध्यमातून अनेक कलेत पारंगत असणारे तरूण निर्माण केले.

### ५.१५.१ सर्कशीचे तासगाव

तासगाव हे सर्कशीचे गाव म्हणून इतिहास काळापासून ओळखले जाते. सर्कस म्हणजे करमणुकीचा व ह्दयाचा ठोका चुकवायला लावणारा अविष्कार, सर्कस म्हणजे आश्चर्यकारक, चित्त थरारक, रोमांचकारी अनुभवाची मालिकाच होय. हा ह्दयाचा ठोका चुकवायला लावणारा अविष्कार कलाकाराकडून प्राण्याकडून होत असतो. यामध्ये विविध कलागुणांचे कल्पना शक्तीची व जोखमीचे यथार्थ दर्शन घडते. तसेच ते योजकता व अचूकता यांचे अद्वितीय मिश्रण होय. ही परंपरा भारतात हजारो वर्षापूर्वी पासून अस्तित्त्वात होती.[६९]

तासगावात प्रामुख्याने १५ ते २० सर्कशी होत्या. या सर्कशी राज्यातच नव्हे तर परराज्यातही प्रसिद्ध होत्या. त्यापैकी परशुराम माळी यांनी आपले दोन भाऊ कृष्णराव माळी व रामचंद्रराव माळी यांच्या सहकार्याने जगप्रसिद्ध 'दी ग्रेट रिनाऊड सर्कस' या नावाची सर्कस १८९७ मध्ये सुरू केली. माळी बंधूचे मुळगाव सांगली जिल्ह्यातील कोकळे होय. त्यांचे वडील यल्लाप्पा माळी व त्यांची तीन मुले सांगली शहरात येऊन लाकूड कापणीचा व्यवसाय करू लागले. कालांतराने ते तासगाव शहरात वास्तव्यास आले. तासगाव शहरात आल्यानंतर यल्लाप्पा माळी व त्यांची पत्नी शिवणाबाई यांनी भाजी व्यवसाय सुरू केला. नंतर शेती व्यवसाय करत त्यांनी गायी, म्हैस, बैल, शेळी पालन सुरू केले. मुले या कामात मदत करू लागली.[७०]

त्यावेळी तासगाव शहरात सर्कस आली होती. ही तिन्ही भावंडे ही सर्कस पाहण्यासाठी गेली. या सर्कशीतल्या रोमांचकारी कसरती पाहिल्यावर ही भावंडे आपल्या प्राण्यावर शेतात चरायला गेल्यावर करू लागले. यात ते पटाईत झाल्यावर आणखी सर्कशीचे प्रशिक्षण घेऊन अभ्यास करावा याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यासाठी परदेशातील सर्कशीमध्ये नोकरी पत्करली. सर्व कलागुण व बारकावे आत्मसात करून ते तासगावला परतले. भांडवलाचा अभाव असल्यामुळे त्यांनी आपले राहते घर ३०० रूपयास गहाण ठेवून पैसे द्यायला कोणी तयार नव्हते. त्यांची जिद्द व चिकाटी पाहून वायफळे (तासगाव) येथील पाटील नामक व्यक्तीने त्यांना २,००० रू. भांडवल दिले. या भाडवलातून सर्कशीचा जन्म झाला. या सर्कशीला आणखी पाळीव प्राण्याची गरज होती. त्यासाठी ते परदेशात गेले व त्या मालकाला विनंती करून त्याचे काही प्राणी व रिंगमास्टरला योग्य तो मोबदला देऊन काही कालावधी करिता आपल्या नव्या सर्कशीत आणला. येथे जंगली जनावरांचे रिंगमास्टर खेळ घेऊ लागला. तो खेळ कसे घेतो? व जनावरांना कसे ट्रेड करतो? ही कला या दोघांनी आत्मसात केली व आणलेला रिंगमास्टरची मुदत संपल्यावर परत

पाठवून दिला. या बंधूनी जनावरे आवाजाने व चाबकाच्या फटकऱ्यांनी कंट्रोल करून सर्कशीच्या खेळात स्वत:चे विश्वनिर्माण केले. सर्कशीचे खेळ राज्यभर सुरू झाले. जाणकार प्रेक्षकांनी ही सर्कस डोक्यावर घेतली. परशुराम माळी यांना सर्कस सिंह म्हणून ओळखले जात.[७१]

हिंन्सू मिशनरी सोसायटीच्या मदतीसाठी मुंबई येथे 'न्यू गँड सर्कस'चा भव्य तंबू गॅलरीसह खचाखच भरलेला होता. घोडेस्वार जसा घोड्यावर स्वार होऊन येतो तसेच चांगदेवाप्रमाणे वाघावर स्वार होऊन एका धिप्पाड देहाच्या रिंगमास्टरने प्रवेश केला. त्याच्या पाठोपाठ एक युवती एक खाण्याचे तबक घेऊन आली. रिंगमास्टरने वाघ, सिंह व शेळी यांना तबकाभोवती बसविले या सर्व प्राण्यांनी कोणतीही कुरबूर न करता एकाच कुटुंबातील सदस्याप्रमाणे भोजनाचा आस्वाद घेतला. हे पराकोटीचे ऐक्य पाहून टाळ्यांचा कडकडाट झाला. वाघ, सिंहांना हत्तीच्या पाठीवर वसविणे, अनेकांना तारेवरून शिडीवरून चालविणे, ६ ते ७ फूट उंचीवरून अनेक प्राण्यांच्या अंगावरून उडया मारणे तसेच अनेक धाडसी कार्यक्रम प्रो. परशुराम माळी यांनी करून दाखविले.

लोकमान्य टिळकांच्या उपस्थितीत सर्कसचे प्रो. परशुराम माळी यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी लोकमान्य टिळक म्हणाले, 'वाघ-सिंह यांचे खेळ करण्यासाठी केलेला हा पिंजरा हा केवळ प्रेक्षकांना भिती वाटू नये, त्यांनी निर्धास्तपणे खेळ पहावा यासाठीच आहे. अन्यथा परशुरामराव आपले खेळ उघड्यावर सुद्धा करून दाखवतील'

लोकमान्य टिळक या प्रसंगाने भारावून गेले होते. क्रुर श्वपदांना वठणीवर आणून त्यांना 'माणसाळवणे' हे अलौकिक बुद्धिमत्तेचे लक्षण आहे. प्रो. परशुरामरावांनी धैर्य, चिकाटी व अविरत परिश्रमांच्या जोरावर 'पशुविद्यावशीकरण' या विद्येत प्रचंड यश संपादन केलेले आहे. थोडक्यात वाघ-सिंहाच्या हातात लेखणी देऊन त्यांच्या कडून क्रुरपणाचा राजीनामा लिहून घेण्याचे कार्य केले आहे काय, अशा प्रकारची कौतुकाची थाप प्रो. परशुरामाच्या पाठीवर मारून लोकमान्य टिळकांनी सुवर्णपदकाला इतर पदकासमवेत परशुरामरावांच्या छातीवर जागा करून दिली. तसेच त्यांना 'दि लायन ऑफ दि सर्कसेस' हा किताब देऊन भव्य सत्कार केला. प्रत्यक्ष सिंहापेक्षा परशुराम हेच खरे सिंह आहेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. 'सर्कससिंह' या लोकमान्य टिळकांच्या उपाधीने प्रो. परशुराम माळी खऱ्या अर्थाने सर्कशीचे मानबिंदू ठरले.[७२]

### ५.१५.२ लाठीवीर बाबूराव थोरबोले सतत १८ तास १ मिनिटाचा लाठी विक्रम

तासगावचे व्यायाम प्रवीण श्री. आबासाहेब जोग यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन व्यायाम शाळेत सतत १८ तास १ मिनिटाचा लाठी विक्रम मोडून काढणारे लाठीवीर बाबूराव रामचंद्र थोरबोले यांनी

महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल हिंदुस्थानभर आपले स्वत:चे गजानन व्यायाम शाळेचे नाव अजरामर केले. हे वीरपण तासगाव नगरीला भूषणावह आहे.[७३]

श्री. बाबूराव रामचंद्र थोरबोले यांना लहानपणापासून व्यायामाची आवड होती. त्यांच्या चपळ स्वभाव व सडपातळ शरीरयष्टी यामुळे ते सर्व प्रकारची कामे करत.

सन १ मे १९३० सालापासून तासगावमध्ये लाठी सप्ताह आयोजित करण्यात आला. त्यावेळी श्री. थोरबाले यांनी सतत १२ तास लाठी फिरवून वयाच्या २१ व्या वर्षी लाठी विक्रम करण्याच मान मिळविला, व त्यानंतर अ.म.शा.शि. मंडळाने माणिक व्यायाम शाळेच्या मैदानावर भव्य मंडप उभारून, धर्मभास्कर, विनायक महाराज मसूरकर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. गुजर वकील, डॉ. कालगावकर, डॉ. काळे, श्री. देसाई, बँक एजंट व विश्वनाथराव माळी वैगेरे यांच्या या प्रमुख उपस्थितीत सन १३ जुलै १९३५ साली तासगावमध्ये लाठी सप्ताह आयोजित करण्यात आला.[७४]

सर्वाचे आशिर्वाद घेऊन बाबूराव रामचंद्र थोरबोले आनंदी व उत्साही मुद्रेने मैदानात लाठी फिरविण्यास सुरूवात केली. शनिवारी सकाळी ४.२० वाजता सुरुवात करून रविवारी १०.२१ ला लाठी खाली ठेवली. ही लाठी ८० तोळे वजनाची असून एका मिनिटात ९० ते १०० फेरे सुरू होते. ते स्वत: भोवती फिरत लाठी फिरवत असत. चेहऱ्यावर किंचीतही थकवा जाणवत नव्हता. उलट सर्वाशी मित्राशी बोलत, हसत किंवा त्यांना दमही लागला नव्हता. लाठी फिरवत असताना शेवटी त्यांच्या हातच्या बोटातून व काखोतून रक्ताचा सडा पडला होता.[७५] तरीही त्यांनी आपला विक्रम पूर्ण केला. प्रकृति करीता डॉ. काळे व डॉ. खालगावकर हजर राहत असत. लाठी फिरविताना थोरबोले यांना कंटाळवाणे होऊ नये म्हणून दुसरे लोक आळी पाळीने त्यांच्या बरोबरीने लाठी फिरवत असत. कु. शांता जोग वय ८ वर्षे हिने एक तास लाठी फिरवून दाखविली. व पाच वर्षाच्या मुलानेही लाठी फिरवून दाखविली.[७६] तसेच व्यायाम शाळेतील सर्व मित्र परिवार जमला होता. सांगली, कोल्हापूर, मुंबई तसेच अनेक ठिकाणाहून हा सप्ताह पाहण्यासाठी लोकांची गर्दी (२०० ते ३०० लोक महिलावर्गासह) झाली होती.[७७]

थोरबाले यांनी जे अपूर्व यशयुक्त धाडसाचे कृत्य केल्याबद्दल सर्वांनी त्यांचे बक्षिसे देऊन अनेकांनी पत्रे लिहून अभिनंदन केले. रविवार तारीख १४/७/१९३५ रोजी सायंकाळी जनपद युनिव्हर्सिटी विद्यापीठातर्फे प्रशस्तीपत्र व 'लाठी वीर' ही पदवी देण्यात आली.[७८]

**५.१५.३ महाराष्ट्रातील पहिला पारंपरिक लोकनाट्य तमाशा**

आधुनिक लोकनाट्य तमाशाची निर्मिती करणारे तमासगीर उमाजी कांबळे व बाबाजी साठे यांचे कार्यकर्तृत्व इतके मोठे आहे की, त्यांचे नाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत तमाशाभूषण म्हणून वारंवार उल्लेखले जाते.[७९]

तासगाव तालुक्यातील पेढ व सावळज परिसरातील तमाशा भूषण शाहीर उमाजी कांबळे, सावळजकर व बाबाजी साठे पेडकर हे इतके लोकप्रिय होते की, त्यांच्या नावावरील आणखी एक गौरवशाली गोष्ट म्हणजे बाबाजी साठे यांनी रचलेली 'मोहना बटाव' ही दीर्घ स्वरूपाची आख्यानक स्वरूपातील लावणी त्यांच्या तमाशातून लोकप्रिय झाली. काल्पनिक कथा भागावरील आधारित ही लावणी प्रेक्षकांना इतकी आवडली की, लोक तिला 'बटावाचा वग' म्हणू लागले. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या ७० वर्षात ही लावणी तमाशातला पहिला वग असे म्हटले. तासगाव तालुक्यातील पेढ व सावळज परिसरात आजही वयोवृद्ध तमाशा रसिक ही लावणी म्हणून दाखवितात. इतकी ही लावणी रसिकमान्य होती.

अहमदनगरची रूपसंपन्न मोहना सुंदरी आणि दिल्लीचा सरदार बटाव यांच्या प्रेम संबंधातील ही कथा या लावणीतून सांगितली आहे.[८०]

*'मोहना नारीचं रूप अनिवार*

*तनू सुकुमार आलाय बहार*

*खासी दिसण्यात उमेतेकर*

*फिरविती हात छातीवर*

*भुवया दोन्ही चंद्राची कोर*

*तुटली तार  हरीण बावरी'*

असे तिच्या सौंदर्याचे वर्णन या लावणीत येते. या लावणीच्या शेवटी सांगली शहर आणि पेड (तासगाव) परिसराचे वर्णन पुढीलप्रमाणे येते.

*'प्रसन्न झाला सांगलीचा गणपती*

*दरवाज्याच्यापुढे झुलतो हत्ती*

*कृष्णाबाईची धार चालती*

*किल्ल्यावर तोफेचे आवाज होती*

*घोडेस्वाराची शोभा किती तुका*

*ताड्यानं जडण ही जडली*

*होता ठिकाणा पेड, सावळजला वस्ती*

*शिदुबा देवाची बुद्धी झाली प्राप्ती'*

ही लावणी बाबाजी साठे यांनी लिहिली असून तमाशाच्या सादरीकरणात तिला स्वतंत्र स्थान होते. तमाशा अभ्यासकांना 'मोहना बटाव' या लावणी वजा वर्गाचा वारंवार उल्लेख केला असला तरी त्याचे राजा 'हरिश्चंद्र' व 'लक्ष्मी' हे वग अख्यानपर पद्यरचनेत आजही पहावयास मिळतात. १० व्या शतकात उमाजी-बाबाजी या सर्व वगाचे सादरीकरण गायनातून करीत त्याला त्यावेळी 'म्हणणी' असे म्हटले जाई. एकंदरीत आधुनिक तमाशाची निर्मिती करणारे उमाजी-बाबाजी कांबळे सावळजकर हे तमासगीर आजच्या कलावंतांना व प्रेक्षकांना माहित नसले तरी उमाजी कांबळे यांची पाचवी पिढी किसन कांबळे सावळजकर हे २००५ पर्यत तमाशाचा फड चालवित होते. तर बाबाजी साठे पेडकर यांचे चिरंजीव चंदू साठे यांनी बाबाजी साठे यांची समाधी पेढ येथे बांधली आहे. ती त्यांच्या वारसदारांनी जतन करून ठेवली आहे असून आजही ती दुरावस्थेत पहावयास मिळते.[८१]

आधुनिक लोकनाट्य तमाशाची निर्मिती करणारे तमासगीर उमाजी कांबळे व बाबाजी साठे यांचे कार्यकर्तृत्व इतके मोठे आहे की, त्यांचे नाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत वारंवार उल्लेखले जावे. तसेच शासन पातळीवर दखल घेऊन उपेक्षित दलित तमाशा कलावंताची आठवण म्हणून सावळज पेड येथे स्मारक उभारले जावे तसेच बाबाजी साठे यांच्या समाधीचा जिर्णोद्वार करावा कलावंताची स्मारके उभारली जातात मग तमाशगीरांची का नकोत? अशी लोकांची मागणी आहे. लोकनाट्य तमाशाची निर्मिती करणारे उमा-बाबाजी सावळजकर यांचे कार्य खरोखरच ऐतिहासिक आहे.

## ५.१६ सामाजिक सुधारणांमधील वृत्तपत्रांचा सहभाग

वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा खांब तसेच समाजाचा आरसा म्हणतात. समाजातील घडामोडींचे प्रतिबिंब त्यात दिसून येते. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात तासगाव शहरात अनेक वृतपत्रांची सुरूवात झाली. या वृतपत्रांनी तासगाव शहरातील सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. वृत्तपत्रांनी शहरातील सामाजिक विषय जनतेसमोर मांडले व सामान्य जनतेस सामान्य परिस्थिती माहिती करून दिली.

वृतपत्रांनी आपल्या वृतपत्रांतून समाजाची दु:खे मांडली. त्यांनी सत्यशोधक समाज्याच्या प्रचारातही सहभाग घेतला. तासगाव शहरातील वृतपत्रांनी सामाजिक जागृतीबरोबरच राष्ट्रीय भावना वाढीसही मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे. त्यामुळे सामाजिक चळवळीस गती प्राप्त होऊन सामाजिक प्रगती होण्यास मदत झाली. वृत्तपत्रांनी प्रस्थापित रूढी, परंपरा, अंध:श्रद्धा या विरूद्ध बंड करण्याची समाजाची मानसिक तयारी केली. समाजसुधारकांनी जुन्या परंपरा, अंधश्रद्धा व रूढीविरूद्ध लढा दिला.[८२] विद्रोही चळवळीचे प्रणेते व ज्येष्ठ विचारवंत डॉ. बाबूराव गुरव यांचा महत्वाच वाटा आहे. त्यांनी परंपरावादी समाजावर आघात करण्याचे व प्रचलित व्यवस्थेवर आपल्या साहित्यातून व व्याख्यानातून कडाडून टिकेची झोड उठविली.

शहरातील समाज हा एकंदर धार्मिक भावनेने प्रभावित झाला असल्यामुळे कथा, कीर्तन व भजन यांना फार महत्व होते. करमणुकीच्या साधनामध्ये लावण्या, पोवाडे व तमाशा यांचा समावेश असे.

बालविवाह कायदा, सतीप्रथा बंदी कायदा इ. कायद्यांमुळे तासगाव शहरात बालविवाह व सतीप्रथेची पद्धत २० व्या शतकाच्या पूर्वार्धात कोठेही आढळत नाही.[८३] काळाच्या ओघात सामाजिकदृष्ट्या अनेक स्थित्यांतरे झाली आहेत. पूर्वीची सामाजिक बंधने व प्रथा यांच्यात बदल होऊन पाश्चिमांत्य पद्धतीनुसार सुधारणा झालेल्या दिसून येतात. आधुनिक काळात शैक्षणिक प्रगती झाल्यामुळे जुन्या, बुरसटलेल्या व अंध:श्रद्धेवर आधारित असलेल्या परंपरा नष्ट होत आहेत व नवा समाज नवीन समाजरचना अस्तित्त्वात येत आहे.

# संदर्भसूची


१. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963, PP.54 to 64.

२. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा, १९९९, पृष्ठ १२९.

३. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सांगली २००६-०७, पृष्ठ १३७.

४. उपरोक्त कित्ता सन २००७-०८, पृष्ठ १०० व सन २००९-१०, पृष्ठ १३७.

५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १३८.

६. सांगली जिल्हा आरोग्य अधिकारी सांगली व A socio-economic review abstract, Sangli district, 2010 Page 121.

७. तासगाव नगरपालिका वार्षिक अहवाल सन २०१०, व जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सांगली २००९-१०, पृष्ठ १४०.

८. Maharashtra State Gazetteers Satara District, 2nd Edition 1963, PP. 122. व A socio-economic review abstract, Sangli district, 2010 ,Page 130.

९. 11.Census of India, 1969, Series II Maharastra Part II C, Social & Cultural Tables 1975, page 211, 214, 215. 375.

१०. सांगली जिल्हा परिषद वार्षिक अहवाल १९७१-७२, ७५, ८९, ९१, ९७,

११. उपरोक्त कित्ता, ९७,

१२. तासगाव पंचायत समिती शिक्षण विभाग आमसभा टिप्पणी २००४.

१३. पाटील बी. बी., महाराष्ट्र राज्य शासन आणि राजकारण फडके प्रकाशन कोल्हापूर २००८, पृष्ठ क्र. १७६.

१४. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०, पृष्ठ २४.

१५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २४.

१६. तासगाव नगरपालिका अर्थसंकल्प सन २००९-२०१०, पृष्ठ ४३.

१७. पाटील बी. बी., महाराष्ट्र राज्य शासन आणि राजकारण फडके प्रकाशन कोल्हापूर २००८, पृष्ठ क्र. १७७.

१८. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०, पृष्ठ ३४.

१९. 'महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ' मर्यादित मुंबई, माहिती पुस्तिका सन २०११, पृष्ठ ११.

२०. 'वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ' सांगली लाभार्थी अनुदान योजना सन २०११, फाईल क्र. ४.

२१. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ माहिती पुस्तिका सन २०११, पृष्ठ १२.

२२. लोक शाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ विभाग फाईल नं. ३. सन २०११, पृष्ठ ११.

२३. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीयांचे वित्त व विकास महामंडळ माहिती पुस्तिका सन २०११, पृष्ठ १३.

२४. लोकराज्य जुलै २०१० माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई ३३.

२५. उपरोक्त कित्ता.

२६. सामाजिक न्यायाच्या दिशेने महासंचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय मुंबई पुस्तिका पृष्ठ. ६४ ते ६६.

२७. इतर मागासवर्गीय बीज भांडवल योजना, समाज कल्याण इतर मागासवर्गीय महामंडळ सांगली फाईल क्र. १ ते ४.

२८. महाराष्ट्र राज्य अपंग आणि विकास महामंडळ लाभार्थी योजना सन २००९, पृष्ठ २३.

२९. सांगली जिल्हा परिषद वार्षिक अहवाल १९८८-८९, ९०,८९,९१,९२,९७

३०. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०११ माहिती पुस्तिका पृष्ठ ७.

३१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ७.

३२. महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना माहिती पुस्तिका महाराष्ट्र शासन २००१. पृष्ठ १९.

३३. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल सन २००९-१०, पृष्ठ ३६.

३४. तासगाव तालुका पंचायत समिती आमसभा टिप्पणी २००४.

३५. A Socio-eco review abstract 1934 & District censushandbook, Kolhapur. 1971,1981, 1991, 2001.

३६. मुलाखत, श्री. प्रताप घाडगे मुख्य लिपीक नगरपलिका तासगाव दिनांक २१ जाने २०११, दुपारी २ वाजता.

३७. तहसील कार्यालय तासगाव दारिद्र्य रेषेखालील जनगणना माहिती रजिस्टर २००१, पृ. ३४.

३८. मुलाखत, कलावती दामू यादव ज्येष्ठ समाजसेवक वय ८० दि. २१ जुलै २०१०, सकाळी १०. वाजता.

३९. मुलाखत, सिंधू वसंत पाटील, वय ७८ दिनांक १४ मार्च २०११, सकाळी ११ वाजता.

४०. मुलाखत, प्रमिला शिवाजी पाटील ५५ दिनांक १४ जुलै २०११, संध्याकाळी ९ वाजता.

४१. मुलाखत, सौ. स्मिता संतोष साठे ज्येष्ठ विचारवंत, वय ३५ दिनांक १४ जून २०१०, दु. ११ वाजता.

४२. मुलाखत, भारती सुरेश पाटील ज्येष्ठ साहित्यिक, वय ४४ दिनांक १४ जाने २०११, दुपारी २ वाजता.

४३. सदर्न मराठा कंट्री स्टेस्टसचे १९४१ ची खाने सुमारी व जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सांगली २००६-०७, पृष्ठ १३.

४४. चौधरी कि. का, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ २२.

४५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २३.

४६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २४.

४७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २५.

४८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ २५.

४९. कुलकर्णी एम. जी., भारतीय समाज व्यवस्था औरंगाबाद परिमल प्रकाशन २००१ ,पृष्ठ १७.

५०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १८.

५१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १८.

५२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १९.

५३. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती इनाम जमिनी रजि. फाईल १.

५४. Census of India, 1971, Social & Cultural Tables 1975 page 217.पृष्ठ १७०-७१.कित्ता. पृष्ठ २१७

५५. कुलकर्णी एम. जी., भारतीय समाज व्यवस्था औरंगाबाद परिमल प्रकाशन २००१, पृष्ठ ७७.

५६. तासगाव पोलीस स्टेशन रेकॉर्ड फाईल वार्षिक नागरी हक्क गुन्हा नोंद रजिस्टर.

५७. Census of India, 1971, Social & Cultural Tables 1975, page 214.

५८. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ १७०-७१.

५९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १८७.

६०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ७३.

६१. निवडणूक स्मृतिमंजूषा सार्वजनिक लोकसभा निवडणूक २००९,जिल्हा माहिती कार्यालय सांगली.

६२. तासगाव नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे सन २०११.

६३. सांगली जिल्हा परिषद वार्षिक अहवाल १९९१-९२ पृष्ठ ४२.

६४. मुलाखत, सौ. रजनीगंधा धनपाल लंगडे माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष तासगाव.

६५. तासगाव पोलीस स्टेशन कार्यालय वार्षिक पोलीस रेकॉर्ड फाईल १९७१-२००७.

६६. चौधरी कि.का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ १४२-१४.

६७. गरूड पी. डी. दै. पुण्यनगरी 'सांगलीरत्न' वर्धापनदिन विशेषांक बुधवार, दि. २५ जाने २०१२, पान ४.

६८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ४

६९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ४

७०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ४ व ८.

७१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ८.

७२. पुरोगामी जीवनसफर! भाई गणपतराव कोळी संपादक 'युगारंभ' मुंबई प्र. आ. जून २००८.

७३. दैनिक, 'नव शक्ती' मुंबई, दिनांक १७/०७/१९३५ पान. १.

७४. उपरोक्त कित्ता.

७५. उपरोक्त कित्ता.

७६. दैनिक, त्रिकाळ-मुंबई मिती आषाढ व! ५ शनिवार शके १८५७, दिनांक २०/०७/१९३५.

७७. 'विश्वोद्वार - मसूर व पुणे,' ता. २० जुले १९३५, पान २.

७८. उपरोक्त कित्ता.

७९. साप्ताहिक, 'राष्ट्रभूषण' सोमवार दि. २९ ऑगष्ट २०११, पृष्ठ क्र.३.

८०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ३.

८१. मुलाखत, पार्लेकर संपत दि. २५ जाने २०१२ दुपारी ३ वा.

८२. मुलाखत, पत्रकार माळी दिपक दै सकाळ तासगाव तालुका प्रतिनिधी दि.२१ जाने. २०११, दुपारी २ वाजता

८३. मुलाखत, गुरव बाबुराव जेष्ठ विचारवंत व साहित्यिक तासगाव. दिनांक १४ फेब्रु. २०११, दुपारी २ वाजता.

**प्रकरण सहावे**

# तासगाव शहराची आर्थिक स्थिती

६.१ प्रस्तावना

६.२ व्यावसायिक स्थिती

६.२.१ विविध व्यवसाय

१. शेतकरी २. शेतमजूर ३. बलुतेदारी ४. व्यापार वाणिज्य ५. फळबाग ६. घरगुती उद्योग ७. बांधकाम व्यवसाय ८. पोल्ट्री व्यवसाय ९. इतर व्यवसाय.

६.३ तासगाव परिसरातील द्राक्षशेती

६.३.१ 'वैज्ञानिक द्राक्षेकुल' संस्थेचे योगदान

६.३.२ महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघ, पुणे यांचे योगदान

६.३.३ बेदाणा उद्योग

६.४ जमीन सुधारणा

१. कमाल जमीन सुधारणा २. इनाम पद्धती

३. तुकडीकरण प्रतिबंध व एकत्रिकरण अधिनियम (तुकडे जोड योजना)

४. जमीन ५. पिके

६.५ धारण क्षेत्र व भूमिउपयोजन

६.६ उद्योगधंदे

६.६.१ कुटिरउद्योग

१. तेलघाणा (गळीतधान्य उद्योग) २. चिरमुरे व फुटाणे व्यवसाय

३. बांबु व वेतकाम ४. दोरखंड वळणे ५. बांगडी उद्योग

६. सुतारकाम ७. चर्मोद्योग ८. कुंभार उद्योग ९. साप्ताहिक बाजार

६.७ तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती

६.८ सावकारी व्यवसाय

६.९ सहकार चळवळ व सहकारी संस्था

६.९.१ दुग्ध व्यवसाय व सहकारी संघ

६.१० बँकिंग सुविधा

६.१०.१ सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. लि तासगाव.

६.१०.२ दि तासगाव अर्बन को-ऑप. बँक लिमिटेड तासगाव.

६.११ आयुर्विमा

६.१२ साखर उद्योग

६.१२.१ तासगाव सहकारी साखर कारखाना लि. तुरची ता. तासगाव.

६.१३ बचत गट

६.१४ सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

६.१५ शहरातील दारिद्र्य रेषेखाली कुटुंबांची स्थिती

६.१६ धान्य पुरवठा संस्था

६.१७ वाहतूक व दळणवळण

**प्रकरण सहावे**

# तासगाव शहराची आर्थिक स्थिती

## ६.१ प्रस्तावना

आर्थिक व्यवहार हे माणसाच्या व समाजाच्या दैनंदिन जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. मानवी जीवन भौतिकदृष्ट्या अधिकाधिक सुखकर करण्याचा प्रयत्न करणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. त्यातूनच आर्थिक व्यवहार सुरू होतात. रानटी अवस्थेतील मानवाने आपल्या बुद्धी कौशल्याचा वापर करून शेतीची कला विकसित केली. त्यातूनच वस्तूच्या देवघेवीचा व्यापार सुरू झाला. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर नवनव्या प्रक्रिया व नव्या वितरण पद्धती रूढ होऊ लागल्या. आर्थिक भरभराटीच्या काळात देशात शांतता नांदून विविध कलागुणांना प्रोत्साहन मिळाले. तर आर्थिक दुर्बलतेने उठावांना, संघर्षाला जन्म दिला. अशा या मानवी जीवनाच्या महत्त्वपूर्ण अंगाकडे १९ व्या व २० व्या शतकामध्ये जाणीवपूर्वक लिखाण होऊ लागले.[१]

आर्थिक व्यवहाराचा परिणाम समाजाच्या रचनेवर, समाजातील भिन्न गटांच्या परस्पर संबंधावर होतो. कार्लमार्क्सने मानवी समाजाच्या विकासाचे भौतिकवादी भाष्य करून आर्थिक व्यवहाराकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली. माणसाच्या सर्व कृतीचा उगम आर्थिक व्यवहारावर होत असतो. हा आर्थिक हेतूमुलकतेचा सिध्दांत त्यांनी मांडला.

सध्या शहरे ही प्रादेशिक व आर्थिक विकासात महत्वाची भूमिका पार पडत असतात तसेच ती प्रादेशिक विकासाला ऊर्जा देणारी इंजिने असतात.[२] स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी क्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रात जे क्रांतिकारी, विधायक, रचनात्मक कार्य झाले त्यात सांगली जिल्हा अग्रेसर राहिला आहे.

तासगाव हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे विविध प्रशासकीय कार्यालयाची स्थापना झाली आहे. शहरातील सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या प्रमाणामध्ये औद्योगिक वसाहत, शासकीय कार्यालये, शिक्षण, आरोग्य संस्था, व्यापार, कृषी, करमणूक, वाहतूक, बँका, दुकाने व पतसंस्था, फेरीवाले व बाजार यांचा समावेश होतो. शहराच्या आर्थिक आधाराची संकल्पना ही औद्योगिक व वाणिज्य प्रकारच्या कार्यावर अवलंबून आहे. अभ्यासाच्या क्षेत्रामध्ये असे आढळून आले की, शहरात ८०% लोकसंख्या तृतीय क्षेत्रात कार्यरत आहे. (उदा. दळणवळण, आयुर्विमा, शिक्षण, आरोग्य, व्यापार, वाहतूक, बँका) ६% लोकसंख्या द्वितीय (उदा. उद्योगधंदे व व्यवसाय) क्षेत्रात कार्यरत आहे. व १४% लोकसंख्या कृषी

क्षेत्रात आहे. एकंदरीत तासगावचा राजकीय व सामाजिक इतिहासाशी आर्थिक इतिहासाचा खूप निकटचा संबंध आहे.[३]

प्रस्तूत, प्रकरणात तासगाव शहराच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्याच्या दृष्टीने शहरातील कृषी पुरक व्यवसायाचा, कृषी अवजारे, पशुधन, वितरण करणाऱ्या संस्था, साप्ताहिक बाजार, व्यापार, बँका, आयुर्विमा, औद्योगिक विकास महामंडळे, दुध संघ, बाजार समिती, साखर उद्योग इत्यादी घटकांचा या प्रकरणात समावेश केला आहे.

### ६.२.१ व्यावसायिक स्थिती

प्राचीन काळापासून देशाची अर्थव्यवस्था शेती व शेती संबंधित व्यवसायावर अवलंबून आहे. तासगाव शहराचा आर्थिक इतिहास पाहिला असता कृषी व त्यावर अवलंबून असलेले पूरक व्यवसाय हेच आर्थिक व्यवस्थेचा प्रमुख घटक असल्याचे दिसून येते. सन १९४७ पूर्वी देश आर्थिक पारतंत्र्यात (ब्रिटीश काळात) असल्याने आपल्या अर्थव्यवस्थेत मागासलेपणा होता. तसेच मोसमी पावसावर अवलंबून असलेली पारंपारिक शेती, सिंचन सुविधांचा अभाव, भांडवली बाजारपेठांची कमतरता, अविकसित तंत्रज्ञान, उद्योगांना प्रतिकूल परिस्थिती इत्यादी घटक कारणीभूत होते. मात्र सन १९५० नंतर अर्थव्यवस्थेत बदल होऊ लागला कारण, स्वातंत्र्योत्तर काळात या परिसरात सिंचनाचे क्षेत्र वाढले, सहकार चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्था स्थापन झाल्या. आधुनिक तंत्रज्ञानाने पारंपारिक तंत्रज्ञानाची जागा घेतली. तसेच शेतीपूरक जोडधंद्याकडे स्वतंत्र व्यवसाय म्हणून पाहण्याचा कल वाढला. या सर्वांचा परिणाम म्हणजे आर्थिक स्थितीत बदल होण्यास सुरूवात झाली.

तासगाव शहरातील मुख्य व्यवसाय शेती असून दुय्यम व्यवसाय हा शेतीशी निगडीत आहे. शहरातील बहुतांशी लोक शेतमजुरी करतात. द्राक्षबागा, बेदाणे प्रक्रिया उद्योग, पशुसंवर्धन बांधकाम व्यवसाय, लघु व कुटिरोद्योग, घरगुती व्यवसाय, कोल्डस्टोअरेज व्यवसाय, व्यापार व वाणिज्य इत्यादी व्यवसाय करतात.

**तक्त क्र.१ तासगावमधील दुकाने, व्यापारी संस्था व त्यातील कामगार सन (२०१० ते २०११)**[४]

| अ.क्र. | व्यवसाय | संख्या | कामगार |
|---|---|---|---|
| १) | दुकाने | १९४२ | ६३५ |
| २) | व्यापारी संस्था | ६९२ | १४०४ |
| ३) | हॉटेल व उपहार गृहे | ११७ | २२० |
| ४) | चित्रपट गृहे | ०२ | १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | इतर संस्था | ०२ | ०५ |
| ६) | एकूण कामगार | २२८० | |

*संदर्भ-जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र सांगली*

तक्ता क्र. १ नुसार सन २०१० ते २०११ या वर्षामध्ये एकूण कामगार २,२८० आहेत.

## ६.४ विविध व्यवसाय

प्राचीन काळापासून खेड्यांची अर्थव्यवस्था शेती व शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायावर व बलुतेदारीवर अवलंबून होती. येथील शेती हा मुख्य व्यवसाय असून शेती बरोबरच पशुपालन व कुटीर उद्योग हा जोडधंदा म्हणून करत होता. ५० च्या दशकापासून पीक पद्धती, कृषि आधारित उद्योगधंदे, भांडवल पुरवठा, पायाभूत सुविधा इत्यादीमध्ये बदल होत गेले. परिणामी शेती करण्याच्या पद्धतीत बदल होऊन अर्थव्यवस्थेत सुधारणा होत आहे.[५]

### १) शेतकरी

शेतकरी हा कृषि व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. येथील शेतकरी अतिशय कष्टाळू व प्रयोगशील असून प्राप्त परिस्थितीमध्ये शेती सुधारणा करून जास्त उत्पन्न घेण्याकडे त्यांचा कल असतो. १९५० च्या दशकांत जलसिंचनाचा अभाव होता. १९६० नंतर पाण्याची उपलब्धता होताच तो शेतीमध्ये विविध प्रयोग करून, शेती करू लागला. पुढे जमीनधारणा कमी होताच तो शेतीपूरक व्यवसायाकडे वळला. येथील शेतकरी मध्यम उंचीचे, सुदृढ बांध्याचे आणि भाकरी, चपाती, भात व मसालेदार भाज्या खाणारे असून ते साध्या पद्धतीने जीवन जगतात. तर त्यांच्या स्त्रिया घरकाम सांभाळून दुग्ध व्यवसाय आणि कुकूट पालन इत्यादी व्यवसाय करतात.

९० च्या दशकापर्यंत येथील शेतकऱ्यांमध्ये संकेत आणि अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. त्यामुळे शेतीच्या नांगरणीपासून मळणीपर्यंतचे सर्व व्यवहार शेतकरी मुहूर्त व नक्षत्र पाहूनच करत होते. येथील मराठा-कुणबी, ब्राह्मण, जैन, लिंगायत, महार, मांग, मुस्लिम इत्यादी सर्व जाती धर्माचे लोक व्यवसायात गुंतले आहेत.[६]

### २) शेतमजूर

कृषि व्यवस्थेत शेतकऱ्याबरोबर शेतमजुरांना महत्वाचे स्थान आहे. दुसऱ्याच्या शेतीवर काम करणाऱ्या लोकांना शेतमजूर म्हणतात. जिल्ह्यातील सर्व शेती मनुष्यबळ व प्राण्यावर अवलंबून आहे. त्याला तासगाव परिसर अपवाद नाही.

मानवी श्रमात शेतकरी व शेतमजूर यांच्या श्रमाचा अंर्तभाव होतो. म्हणून शेत मजुरांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळण्यासाठी शासनाने किमान वेतन अधिनियम संमत केला.[७] किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी शेतमजूरांनी मोर्चे, सत्याग्रह केले. त्यामुळे सन १९८२ मध्ये किमान वेतन अधिनियमानुसार सांगली जिल्ह्यातील शेती व्यवसायातील अकुशल (वार्षिक करारावरील पूर्ण वेळ कामगार) यांना दर साल रूपये १,४४०, अकुशल मजुरांना दरमहा रू. १२० तसेच इतर अकुशल मजुरांना दैनंदिन ४.५० रूपये मजुरी ठरवून देण्यात आली होती.[८]

**तक्ता क्र. २ तासगाव परिसरातील शेतमजुरीचे दर** [९]

| अ.क्र. | वर्ष | पुरूष | स्त्रिया | लहान मुले |
|---|---|---|---|---|
| १. | १९५७ - ५८ | २ रूपये | १० आणे | १० आणे |
| २. | १९६१ - ६२ | ३.५० | २.०० | १.०५ |
| ३. | १९८३ - ८४ | ४.५८ | ३.५० | ☐ |
| ४. | १९८५ - ८६ | ५.५५ | ३.७२ | ☐ |
| ५. | १९८७ - ८८ | ४० | २० | ☐ |
| ६. | १९९३ - ९७ | ८०.०० | ३० | ☐ |
| ७. | २००९ - १० | १७०.०० | १०० | ☐ |
| ८. | २०१० - ११ | २०० | १२५ | ☐ |

तक्ता क्र. २ वरून हे शेतमजुरांच्या दरावरून हे स्पष्ट होते की, सन २००८ मध्ये द्राक्ष व उसाला दर मिळाल्यानंतर शेतमजुरांच्या मजुरीत वाढ झाल्याचे दिसून येते. पण पुरूषांच्या तुलनेत स्त्री मजुराला कमी वेतन दिले जाते.

## ३) बलुतेदारी

पूर्व परंपरेनुसार भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत बलुतेदारांना महत्त्वाचे स्थान होते. त्याला तासगाव परिसर अपवाद नाही. येथे कृषि व्यवस्थेशी प्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या बलुतेदारामध्ये सुतार, लोहार, चांभार, मांग, बुरूड इत्यादींचा समावेश होतो. १९८० च्या दशकापर्यंत बलुतेदारांना त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून धान्याच्या स्वरूपात बलुता मिळत होता. सन १९८० च्या दशकानंतर बलुतेदारी व्यवस्था जवळजवळ संपुष्टात आली. त्यांना पैशाच्या स्वरूपात मजुरी मिळू लागली.[१०]

## ४) व्यापार वाणिज्य

व्यापार वाणिज्य हा अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असून, शहरात या व्यवसायामध्ये असणाऱ्यांची संख्या सन १९६१, १९७१ व १९९१ या काळात अनुक्रमे ४६, ७९, व १०० यावरून या व्यवसायात असणाऱ्यांचे प्रमाण अल्प आहे.[११] सन १९८१ मध्ये व्यापार व वाणिज्य व्यवसायामध्ये काम करणाऱ्यांची स्वतंत्र नोंद मिळत नाही.

शहरातील घरगुती उद्योगाव्यतिरिक्त इतर विविध व्यवसाय करणाऱ्या कामगारांची संख्या असून, सन १९६१, १९७१ व १९९१ या काळात अनुक्रमे २००, ४४३ व ५५५ यावरून घरगुती उद्योगा-व्यतिरिक्त इतर विविध व्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढताना दिसते.[१२] सन १९८१ मध्ये घरगुती उद्योगा व्यतिरिक्त इतर विविध व्यवसाय करणाऱ्यांची स्वतंत्र नोंद मिळत नाहीत.

## ५) फळबाग

शेतकरी व शेतमजुराबरोबर पशुसंवर्धनाबरोबरच फळबागा प्रामुख्याने द्राक्षे, आंबा, चिक्कू, आवळा, पेरू, केळी, डाळींब इत्यादीचे उत्पादने घेतली जातात. येथे जगप्रसिद्ध द्राक्षाचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. परदेशातील बाजारपेठेत पाठविण्यासाठी द्राक्ष तयार केली जातात. द्राक्षापासून बेदाणे तयार करण्याचे ही येथे मोठे प्रक्रिया उद्योग आहेत.[१३]

कृषि विभागाच्या रोजगार योजनेअंतर्गत फळबाग लागवड योजना व राष्ट्रीय फलोत्पादन अभियान यामुळे फळबाग व भाजीपाला या क्षेत्रात वाढ होत असल्याचे दिसून येते. फळांमध्ये डाळिंब, पेरू, केळी, लिंबू, मोसंबी, आंबे, नारळ, चिक्कू इ. उत्पादने काढली जातात. हा उत्पादित माल मुंबई, सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे पाठविला जातो. पण द्राक्षाव्यतिरिक्त इतर फळबागांचा विकास म्हणावा तेवढा झालेला नाही.[१४]

## ६) घरगुती उद्योग

घरगुती उद्योगात महिला वर्ग मोठ्या प्रमाणात काम करताना दिसतो. लोकांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी बचतगट चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होत आहे. तसेच शासनाच्या विविध आधुनिक धोरणामुळे लघु व कुटिरोद्योग मोठ्या प्रमाणात उभारले जात आहेत. यामध्ये शिलाई काम, फॅशन डिझायनिंग, लोणची, पापड, शेवया, विविध प्रकारचे मसाले, चणे-फुटाणे, मेणबत्या, नीळ तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन मार्केटही उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे लोक या व्यवसायाकडे आकर्षिले जातात.[१५]

## ७) बांधकाम व्यवसाय

शहरात बांधकाम व्यवसायात काम करणारे अनेक लोक असून त्यांची संख्या उपलब्ध होऊ शकली नाही पण बांधकाम व्यवसायातील कुशल कामगारांना सन १९८१ मध्ये ५०, १९९१ मध्ये १००, २००१ मध्ये १२५, तर २०१० मध्ये २५० रूपये मजुरी मिळत होती. तर अकुशल कामगारांना उपरोक्त काळात २०, २८, ५० व १५० रूपये मजुरी मिळत होती.[१६]

## ८) पोल्ट्री व्यवसाय

शेती व्यवसायाला पुरक असणारा कुक्कूट पालन व्यवसाय आहे. सुरुवातीला हा घरगुती स्वरूपात हा व्यवसाय होता. कमी मनुष्यबळ लागणारा व्यवसाय अंडी व मांस याला बाजार पेठेत चांगली मागणी आहे. या व्यवसायात लेअर पक्षी, ब्रॉयलर पक्षी इ. चा समावेश होतो. एका दिवसाचे पिल्लू आणून त्याच्यापासून अंड्याचे उत्पादन मिळेपर्यंत सांभाळले जाते व नंतर ते ब्रॉयलर चिकनसाठी विकले जाते. १९९० च्या दरम्यान हा व्यवसाय तेजीत होता. या व्यवसायात ८० टक्के खाद्यांवर खर्च होतो. तसेच अंडी विक्री, मांस विक्री, औषध विक्री व हॅचरीजच्या पिलांची विक्री यामुळे शेकडो बेकार कामगारांना रोजगार मिळाला आहे. अलिकडे या व्यवसायावर अनेक संकटे येऊ लागली आहेत. यामध्ये बर्ड फ्ल्यू, खांद्याची दरवाढ व धार्मिक सण इत्यादीमुळे या व्यवसायाकडे लोक दुर्लक्ष करू लागले आहेत.[१७]

## ९) इतर व्यवसाय

वरील सर्व व्यवसाय सोडून इतर व्यवसायातही शहरातील लोक काम करतात. इतर व्यवसायात असणाऱ्या कामगारांची संख्या सन १९६१, १९७१, १९८१ व १९९१ या काळात अनुक्रमे १००, १५५, ४२३ व ७०० इतकी होती.[१८] यावरून या व्यवसायात काम करणाऱ्यांची संख्या वाढताना दिसते. घोंगडी विणणे, घायतापासून दोरखंड तयार करणे, द्राक्षांपासून बेदाणे तयार करणे, हातमाग व यंत्रमागावर कापड विणणे, तेल गाळणे, सिमेंट पाईप बनविणे, यंत्राचे सुटे भाग तयार करणे इ. तसेच मोठे उद्योग सांगली जिल्ह्यात किर्लोस्करवाडी या ठिकाणी लोखंडी सामानाचा कारखाना आहे. तर इतर लोखंडी वस्तू तयार करण्याचे कारखाने सांगली येथे आहेत. या व्यवसायातही काम करताना दिसतात.

## ६.३ तासगाव परिसरातील द्राक्षशेती

ब्रिटीश राजवटीत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत शेतमहसूल हेच सरकारचे महत्वाचे उत्पन्न होते. नेपोलियन बोनापार्टने इंग्रजांना व्यापारी म्हणून उल्लेख केला आहे. सन १९१० मध्ये कृषि

महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. अद्ययावत शेती व नवनवे प्रयोग होऊन, भारतात नगदी पिके घेण्यास जास्त प्रोत्साहन मिळाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात किर्लोस्करवाडी येथे भोकरी वाणाची द्राक्ष बाग होती. त्याची माहिती घेऊन एम. सी. मेहता यांनी तासगाव येथील गुजर वकील यांच्या शेतात द्राक्ष बागेची उभारणी केली. या बागेतून पंधरा महिन्यानंतर उत्पन्न मिळू लागले. त्यानंतर गणपतराव म्हेत्रे यांनी द्राक्ष बागेची लावण केली. पुढील काळात द्राक्षबागाचे प्रमाण वाढू लागले.[१९]

स्वातंत्र्योत्तर काळात पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्षबागायतीच्या इतिहासात तासगावला महत्त्वाचे स्थान आहे. सन १९६५ नंतर तासगाव तालुक्यात द्राक्षपिकाचे क्षेत्र वाढू लागले. तासगाव येथील 'तासगाव चमन' या द्राक्षाच्या वाणाने द्राक्षामध्ये मोठी क्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या वेगवेगळ्या भागातून शेतकरी, शास्त्रज्ञ व व्यापारी वर्ग तासगाव भागातील द्राक्षपिकाबाबत केलेल्या नव्या प्रयोगाची माहिती घेऊ लागले आहेत. परिणामी द्राक्ष पिक घेण्याच्या संदर्भात 'तासगाव पद्धत' आदर्श मानली जाते. पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असताना आणि दुष्काळाचे संकट सतत असताना द्राक्ष लागवडीद्वारे तासगाव तालुक्याचा चेहरा मोहरा बदलला आहे.[२०]

द्राक्ष पिकासाठी पैसा अधिक प्रमाणात लागतो. शेतकऱ्यांना कर्जाशिवाय आपली द्राक्षांची बाग उभारणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष गुलाबराव पाटील यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून एकरी पंधरा हजाराचे कर्ज उपलब्ध करून दिले. त्यामुळे द्राक्षबागाची उभारणी करणे शक्य झाले. विशेष म्हणजे त्या काळात द्राक्षासारख्या पिकास कर्ज न देणे असे बँकेचे धोरण होते. पुढे १९७५ सालानंतर सर्वच बँकांनी द्राक्ष शेतीसाठी कर्जे उपलब्ध करून दिली. विशेषत: तासगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडियाने याबाबत पुढाकार घेतला होता.[२१]

सन २००९ मध्ये द्राक्षास रेसेडयूचा अंश आढळल्याने हजारो टन द्राक्षे युरोपमधून परत आली होती. दुष्काळी भीषण स्थिती नैसर्गिक व मानवी आपत्तीमुळे हजारो रूपयाचा फटका द्राक्ष बागायतदारांना बसतो. तरी सुद्धा प्रयोगशील ७२१ शेतकऱ्यांनी २०१२ मध्ये ६ हजार २५१ टन द्राक्षे युरोपीय देशात निर्यात केली. तर पाच हजार टन बेदाणा निर्यात झाला आहे. त्यामुळे ७०० कोटी रूपयांचे परकीय चलन देशाला मिळाले आहे.[२२]

देशात द्राक्षे निर्यातीत सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा आहे. त्यात सांगली जिल्हा आघाडीवर आहे. अनेक लहान शेतकरी स्वत: किंवा कंपन्यांमार्फत धाडस करून नेदरलँड, इंग्लंड, बेल्जियम, जर्मनी, नॉर्वे,

डेन्मार्क, हंगेरी, इटली, पोलंड, स्वीडन, फिनलँड, ऑस्ट्रीया व रोमानिया देशातील बाजारपेठेत पोहोचले आहेत. येथील द्राक्ष निर्यातीत वाढ होत आहे. गुणवत्तेची द्राक्षे असल्याने दरही चांगला मिळाला आहे.[२३]

**तक्ता क्र.३ सांगली जिल्ह्यातून पाच वर्षात निर्यात.**[२४]

| अ.क्र | वर्ष | शेतकरी | क्षेत्र(हेक्टर) | कंटेनर | वजन (टन) |
|---|---|---|---|---|---|
| १) | २००५-०६ | २३०४ | १०४५ | ५५० | ७७७० |
| २) | २००६-०७ | १२८० | ७२८ | ५४६ | ७२३२ |
| ३) | २००७-०८ | १७९० | ७३८ | ४३० | ५३०१ |
| ४) | २००८-०९ | १५६० | ६४३ | ४८१ | ५८९९ |
| ५) | २००९-१० | १२७० | ४८८ | १४० | ६७६५ |
| ६) | २०१०-११ | ९०० | ४३४ | ३८० | ४७०० |
| ७) | २०११-१२ | ७२१ | ३५० | ५०२ | ६२२५२ |

## ६.३.१ 'वैज्ञानिक द्राक्षेकुल' संस्थेचे योगदान

तासगाव परिसरात द्राक्षबाग उभारणीस प्रारंभ १९६९ नंतर झाला. प्रारंभीच्या काळात द्राक्ष बागायतदारांना योग्य असे मार्गदर्शन मिळणे कठीण होते. द्राक्ष पिक हे अत्यंत नाजूक असल्याने आणि त्यासाठी वेळोवेळी रासायनिक द्रव्यांचा उपयोग करणे आवश्यक असते. त्यासाठी योग्य असे मार्गदर्शन नवोदित द्राक्ष बागायतदारांना होणे अत्यंत गरजेचे होते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून द्राक्ष पीक घेणे शेतकऱ्यांच्या हिताचे होते. अन्यथा द्राक्ष बागेसाठी केली जाणारी आर्थिक गुंतवणूक शेतकऱ्यांना कर्जबाजारी करते. त्यासाठी शेतकऱ्यांना शास्त्रीय दृष्टिकोन प्राप्त करून देण्यासाठी १९६७ साली 'वैज्ञानिक द्राक्षेकूल' नावाची शासन दरबारी नोंद नसलेली संघटना तासगाव भागातील द्राक्ष बागायतदारांनी स्थापन केली.[२५] यामध्ये तासगावचे श्री. गणपतराव म्हेत्रे, बोरगावचे श्री. वसंतराव आर्वे आणि विट्याचे श्री. भगवानराव पवार यांचा वाटा महत्त्वाचा समजला जातो. ही संघटना द्राक्षपिकांच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या बहुतेक प्रश्नाबाबत बारकाईने अभ्यास करीत असे आणि त्याबाबत द्राक्षपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत असे. या संघटनेचे कार्यालय तासगाव परिसरातील बोरगाव येथे होते. याचे अध्यक्ष एम. एम आर्वे काम पहात असत.

या संघटनेच्या माध्यमातून द्राक्षाच्या नवीन वाणाबाबत बारकाईने अभ्यास करण्यात आला. नव्या तंत्राच्या मदतीने दर्जेदार द्राक्षे कशी पिकवता येतील याबाबत प्रयोगाद्वारे संशोधन करण्यात आले. या संघाच्या प्रयोगशील द्राक्ष बागायतदारांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून 'तासगाव चमन' सारखा तासगावचा

नवीन वाण विकसित केला. या द्राक्षास बाजारपेठेत मोठी मागणी होते. त्यामुळे अशा द्राक्षाचे पीक घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढलेले दिसते. त्यामुळे द्राक्षकुलास अधिक चांगल्या प्रकारे आणि प्रभावीपणे काम करणे आवश्यक झाले.

त्यासाठी 'वैज्ञानिक द्राक्षकुलाची' जबाबदारी आणखी वाढविण्यात आली. या संघातील सभासदांनी १९ ऑक्टोबर १९७६ रोजी तासगाव वैज्ञानिक शेती सेवा आणि द्राक्षकूल मर्यादित कंपनी सरकारी दरबारी नोंद केली.[२६] या संघात द्राक्षपीक घेणाऱ्या अर्धा एकरपासून ते सहा एकर बाग असणाऱ्या बागायतदारांना सदस्य म्हणून घेतले होते. हा संघ द्राक्ष पिकाच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उकल करीत असतो. त्याचबरोबर द्राक्ष पिकाबाबत नव्या संशोधनास प्राधान्य देत असतो. या संघाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे 'तास-ए-गणेश' या बी विरहित द्राक्षाचे संशोधन होय. हे द्राक्षफळ 'थॉमसन सीडलेस' पेक्षा सर्व बाबतीत गुणवत्तेत अधिक श्रेष्ठ दर्जाची समजली जातात. तसेच द्राक्षे अधिक चांगली टिकावू व ताजेपण कसे दीर्घकाळ टिकून राहील याचे संशोधन केले तसेच या संशोधनास सातत्याने कृतीचा आधार प्राप्त होण्यासाठी प्रयत्न असतो. विशेष म्हणजे द्राक्षाची निर्यात कशा प्रकारे करता येईल याचा अभ्यास संघाच्या मदतीने होत असतो.[२७]

त्याचबरोबर द्राक्ष उत्पादित मालाची अधिकाधिक भागात विक्री, योग्य ठिकाणी वाहतूक व अनेक छोट्या छोट्या शेतकऱ्यांची द्राक्षे एकत्रित करून द्राक्षाच्या लहान लहान पेट्या वेगवेगळ्या बाजार पेठेत पाठविणे, त्यासाठी अचूक मार्गदर्शन व योग्य तंत्रज्ञान विकसित करणे गरजेचे बनले. अधिकाधिक भागात विक्री आणि द्राक्ष बागासाठी लागणाऱ्या वस्तू स्वस्त दरात मिळवून देण्याचा प्रयत्न यामुळे शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक अशा तिघांचाही विश्वास संपादन करण्यात ही संघटना यशस्वी झाली.

'वैज्ञानिक द्राक्षकुलाच्या' प्रयत्नातून द्राक्षाची गुणवत्ता वाढली त्यामुळे या संघटनेच्या मदतीने मुंबई बाहेरील युरोप, अमेरिका, रशिया व फ्रान्स या सारख्या एकोणिस परकीय बाजार पेठाही काबीज करता आल्या. तसेच आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत तासगाव येथील द्राक्षे उपलब्ध करून देण्याचा मानही भारतामध्ये वैज्ञानिक शेती सेवा आणि द्राक्षकुल मर्यादित कंपनी यांनी संपादन केली. द्राक्षासारखी नाशवंत वस्तू अधिक काळ कशी टिकविता येईल याचा अभ्यासही करण्यात आला.

पुण्याला झालेल्या 'ऑल इंडिया ग्रेप्स शो' नावाच्या अखिल भारतीय द्राक्ष प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट द्राक्षे असलेला स्टॉल म्हणून तासगावच्या वैज्ञानिक द्राक्षकुलास पहिला पुरस्कार प्राप्त झाला होता.[२८]

### ६.३.२ महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघ, पुणे यांचे योगदान

हा संघ महाराष्ट्र पातळीवर कार्य करत असून याची स्थापना १९६१ साली झाली. या संघाची सभासद संख्या चार हजारपेक्षा अधिक आहे. या संघाचे कार्य प्रभावीपणे व्हावे म्हणून त्याच्या नाशिक, सांगली व सोलापूर येथे शाखा स्थापन केल्या आहेत. या संघाच्या वतीने प्रत्येक वर्षी दोन दिवसांचे चर्चासत्र वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केले जाते. त्यासाठी द्राक्षशेतीच्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना पाचारण केले जाते. या चर्चासत्रात ठराविक विषयावर साधक बाधक स्वरूपाची चर्चा केली जाते. तज्ञ मंडळी व द्राक्ष बागायतदार यांच्यात प्रत्यक्ष संवाद साधला जातो.[२९]

हा संघ सतत शासनाशी संपर्क ठेवून द्राक्ष बागायतदारांना भेडसावणारे प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतो. त्याचप्रमाणे द्राक्ष बागासाठी परदेशातून आवश्यक अशा वस्तू आयात करण्यासाठी प्रयत्नशील असतो. कारण काही रासायनिक द्रव्ये भारतात उपलब्ध होत नाहीत. कारण द्राक्ष पीक हे अत्यंत नाजूक असल्याने त्याचे चांगल्या प्रकारे संवर्धन करण्यासाठी बारकाईने लक्ष देणे गरजेचे असते. त्याचबरोबर अशी औषध द्रव्ये उपलब्ध करून देणे शेतकऱ्यासाठी महत्वाचे असते.[३०]

या संघाचे आणखी एक महत्वाचे कार्य म्हणजे "Viticulture" या नावाचा Dr. Winkler (अमेरिका) यांनी लिहिलेला द्राक्षाबाबत सर्व बारकावे विशद करणारा ग्रंथ मराठीमध्ये भाषांतरीत करण्यात आला. यासाठी प्रा. एस. ए. दाभोळकर यांचे कार्य महत्वाचे ठरले. त्याचप्रमाणे हा संघ 'द्राक्ष वृत्त' हे मासिक व वृत्तपत्रातून आपली अद्ययावत माहिती प्रकाशित करीत असतो. हा संघ नावारूपास आणण्यात श्री. आप्पासाहेब शेंबेकरांचे कार्य म्हत्त्वाचे आहे. हे सर्व प्रकारचे घटक द्राक्ष पिकासाठी उपयुक्त ठरल्याने १९६३ च्या तुलनेत पुढील पाच वर्षात द्राक्ष शेतीची वाढ १३% ने झाली आहे.[३१]

### ६.३.३ बेदाणा उद्योग

द्राक्ष बेदाण्याचे तासगाव म्हणून तासगावची नवी ओळख निर्माण झाली आहे. येथे मोठ्या प्रमाणात द्राक्ष उत्पादन होत असल्यामुळे सुरूवातीला द्राक्षे सूर्य प्रकाशात वाळवून बेदाणा तयार करू लागले. त्यानंतर त्यामध्ये सुधारणा करून विशिष्ट केमिकलच्या साह्याने व बेदाण्यावर प्रक्रिया करून माल रॅकवर टाकून बेदाणा तयार करू लागले. त्याची सुरूवात सन १९८०-८१ सालामध्ये झाली. त्यावेळी महाराष्ट्रात ५ हजार टन माल तयार झाला.[३२] शेतकऱ्यांने तयार केलेल्या मालाची विक्री व्यवस्था नसल्याने शेतकरी त्यांचा बेदाणा खाजगी व्यापारी यांच्याकडे नमुना (सॅम्पल) पुडी घेऊन पुडीवर व्यापार करीत असे. शेतकऱ्याकडून व्यापारी एकाच फिक्स दराने वर्षभर माल खरेदी करत असे दरामध्ये चढ उतार याचा लाभ फक्त व्यापारी यांनाच मिळत असे. शेतकऱ्यांना त्याचा काहीही फायदा मिळत नाही. हे ओळखून

तासगाव शहरात कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये आर. आर. (आबा) पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने प्रसिद्ध द्राक्ष उत्पादक शेतकरी श्री. वसंतराव आर्वे (आण्णा) व श्री. गणपतराव म्हेत्रे (आबा) व इतर बेदाणा उत्पादक शेतकरी यांच्या सहकार्याने चर्चा करून तासगाव येथे भारत देशातील पहिले बेदाणा मार्केट दिनांक १३/०३/१९९४ रोजी उघड लिलावाने बेदाणा विक्री व्यवस्था सुरू केली.[३३] त्यावेळी प्रति किलो ३५ रू. ते ८५ रूपये दराने विक्री होऊ लागली. त्याचा शेतकऱ्यांना मोठा लाभ झाला. त्यानंतर बेदाण्यावरील सेल्स टॅक्स कराचा व्यापारी यांना त्रास होऊ लागला. व्यापारी आणि शेतकरी यांनी आर. आर. (आबा) पाटील यांची भेट घेऊन या सर्व गोष्टींची माहिती दिली. आबांनी शासन दरबारी बैठका घेऊन हा विषय लावून धरला. सन १९९४-९५ ते २००८-०९ पर्यत बेदाण्यावरील सेल्स टॅक्स पूर्णपणे माफ करून घेतला. त्याचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झाला.[३४]

महाराष्ट्र शासनाने सन २००८-०९ बेदाणा या मालावर सेल्स टॅक्स ऐवजी व्हॅट टॅक्स लागू केला. त्याचा परिणाम बेदाणा या मालाच्या दरावर झाला. त्याचा फटका शेतकरी यांना बसला. त्यानंतर तासगाव व सांगली बाजार समितीच्या वतीने आर. आर. (आबा) पाटील, संजय (काका) पाटील व अजितराव घोरपडे व देशाचे कृषिमंत्री शरद पवार साहेब यांना भेटून व्हॅट बाबत कर्नाटक राज्याची भूमिका कथित केली. पवार साहेबांना हे पटल्यावर त्यांनी अजितदादा पवार व अर्थमंत्री सुनिल तटकरे यांना समक्ष बोलवून व्हॅट माफ करणेसंबंधी सूचना केल्या. अजितदादा पवार यांनी धाडसाने निर्णय घेवून सन २००९-१० पासून बेदाण्यावरील व्हॅट कर पूर्णपणे माफ केला. याचा महाराष्ट्रातील बेदाणा उत्पादक शेतकरी यांना मोठा फायदा झाला.[३५]

बेदाणा शीतगृहात ठेवण्यासाठी तासगावमध्ये २६, सांगली २३, पंढरपूर ७, नाशिक १० अशी एकूण महाराष्ट्रात ६६ कोल्ड स्टोअरेज असून त्याची साठवणूक क्षमता ९५,००० टनापर्यत आहे. तासगाव शहरात १३० हून अधिक बेदाणा ट्रेडिंगची दुकाने आहेत. तर तासगावमध्ये शीतगृहाची साठवणूक क्षमता ४०,००० टनापर्यत आहे. यामुळे शेकडो हाताना काम मिळाले आहे. बाजार पेठेचे खुले सौदे हे वैशिष्ट्ये आहे. यासाठी ६% दराने बेदाने तारण कर्ज पुरवठा केला जातो.[३६]

**तक्ता क्र. ४ बेदाण्याची माहिती सन.** १३/०३/१९९४ ते २९ फेब्रुवारी २०१२ अखेर.[३७]

| सन | महाराष्ट्रातील उत्पादन टना मध्ये | तासगाव बाजारातील विक्री टना मध्ये | तासगाव बाजारातील विक्री बॉक्स मध्ये | तासगाव बाजारातील दर | | तासगाव बाजारातील दर | | उलाढाल कोटी मध्ये | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हिरवा | | पिवळा | | | |
| | | | | जास्तीत जास्त | सर्व साधारण | कमीत कमी | जास्तीत जास्त | सर्वसाधारण | |
| १९९४-९५ | ७० | ७००० | ५ | ५ | ५ | ४० | ७० | ५५ | ४२ |
| १९९५-९६ | १३००० | १३००० | ८ | ९० | ६२ | ४० | ७२ | ५८ | ७० |
| १९९६-९७ | १८००० | १८००० | १२ | ९५ | ६५ | ३८ | ८० | ६२ | ९० |
| १९९७-९८ | २२००० | २२००० | १४ | १०५ | ७० | ४० | ९५ | ६५ | ९५ |
| १९९८-९९ | २६००० | २६००० | १७ | ११० | ६८ | ४२ | १०० | ७० | १०० |
| १९९९-०० | २८००० | २८००० | १९ | १३५ | ८० | ४० | ११० | ७५ | १२० |
| २०००-०१ | ३२००० | १५००० | १० | १२२ | ६५ | ४० | ८५ | ६० | ७५ |
| २००१-०२ | ५५००० | २७४५० | १८ | ९० | ५५ | ४० | ६५ | ५० | ९० |
| २००२-०३ | ५७००० | २४००० | १६ | ७० | ५५ | ४० | ६० | ५० | ६० |
| २००३-०४ | ४८००० | २३००० | १५ | ९० | ५८ | ४० | ७० | ५५ | ६८ |
| २००४-०५ | ३८००० | १९००० | १३ | ९८ | ५५ | ४० | ७२ | ५० | ७० |
| २००५-०६ | ५६००० | २१००० | ४ | ११० | ५ | ४० | ९५ | ५० | ९० |
| २००६-०७ | ५०००० | २२००० | १५ | १५५ | ७२ | ४० | १२५ | ८० | ११५ |
| २००७-०८ | ९०००० | १७००० | ११ | १३१ | ६० | ४५ | १०० | ७० | ८० |
| २००८-०९ | ९५००० | ३०००० | २० | ९५ | ५५ | ४५ | ८५ | ६५ | १४६ |
| २००९-१० | ८५००० | २८००० | २८ | १४३ | ७० | ७० | १६२ | ९५ | १७० |
| २०१०-११ | ९०००० | २६२०० | १७ | १९० | १२५ | ९० | १५५ | ११० | २१० |
| २०११-१२ | १०५००० | २८८५० | ११ | २५४ | १४० | १३५ | १८० | १३५ | ३४६ |

## ६.४ जमीन सुधारणा

महाराष्ट्रातील भू-सुधारणांतर्गत जमिनदारी, महलवारी, इनामदारी अशा पद्धतीची उच्चाटन करून जमिनीची मालकी वहिवाटदारांना देणे, कुळांना संरक्षण देऊन मालकी हक्क प्रदान करणे, तुकडीकरणास प्रतिबंध करून एकत्रिकरणास प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने राबविले.

महाराष्ट्रात शेती व्यवसायात जमिनदारी, महलवारी व रयतवारी पद्धत होती. तसेच खोत, इनामदार, जहागिरदार अशा मध्यस्थांमुळे कसणाऱ्यांना जमिनीची शाश्वती नव्हती. शिवाय उत्पादनातील किती वाटा मध्यस्थास द्यावा याचे बंधन नव्हते. म्हणून सन १९५०-५१ मध्ये शेतकरी व सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. सर्व राज्यांना जमीन महसूल कोड एकच करण्यात आले. महाराष्ट्रात १९६५ मध्ये याबाबत कायदा करण्यात आला. त्याचप्रमाणे मध्यस्थांचे उच्चाटन करून शेतकऱ्यांना तलाठ्यामार्फत खाते पुस्तिका देण्यात आली आहे. १ एप्रिल १९५७ मध्ये कसेल त्याची जमीन असा कायदा करण्यात आला.[३८] पुढे यात सुधारणा होऊन कमाल जमीनधारणा कायदा अस्तित्त्वात आला. त्यानुसार बागायत क्षेत्रात ७.२८ हेक्टर व कोरडवाहू जमिनीवरील कमाल धारणा मर्यादा २१.७५ इतकी ठरविण्यात आली.[३९]

## १. कमाल जमीन सुधारणा

महाराष्ट्रात कमाल जमीन धारणा कायद्याने २६ जानेवारी १९६२ मध्ये मर्यादा घातली आहे. या कायद्याने अतिरिक्त जमीन शेती महामंडळ, सहकारी शेती संस्था व भूमिहिनांना वाटप करण्यात आली.

## २. इनाम पद्धती

स्वातंत्र्यपूर्व काळात इनामदारी पद्धत अस्तित्त्वात होती. या पद्धतीचे वैयक्तिक किंवा जात इनाम, राजकीय इनाम, देवस्थान इनाम व वतने इनाम इत्यादी प्रकार अस्तित्त्वात होते. स्वातंत्र्योत्तर काळात जमीन सुधारणेच्या निरनिराळ्या उपाय योजनान्वये देवस्थान इनामाव्यतिरिक्त इतर सर्व इनाम नष्ट करण्यात आली असून, इनाम जमिनीचे कब्जे हक्क भूधारकांना, अगर कुळांना देण्यात आली.[४०] तासगाव शहरात पैलवान व बौद्व किंवा मांग लोकांना जमिनी इनाम दिल्या आहेत. ती जमीन विकता येत नाही. ९९ वर्षाच्या कराराने दुसऱ्याला दिली जाते.[४१]

## ३. तुकडीकरण प्रतिबंध व एकत्रिकरण अधिनियम १९४७ (तुकडे जोड योजना)

लोकसंख्या वाढीमुळे कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढून, तसेच इतर कारणामुळे शेतीचे लहान तुकडे होऊन ते इतरत्र विखुरलेले होते. यामुळे शेतकऱ्यांना लहान तुकडे कसण्यास अनेक अडचणी येत होत्या. परिणामतः शेती उत्पादनात घट होत होती. हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने तुकडे बंदी व तुकडे जोड अधिनियम १९४७ हा कायदा मंजूर केला. हा अधिनियम जिल्ह्यात १९४९ मध्ये अंमलात आला. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ जुलै १९५४ पासून सुरू झाली. परंतु तासगाव शहरात १९७१ पासून 'तुकडे जोड योजना' सुरू करण्यात आली.[४२]

## ४. जमीन

सांगली जिल्ह्यामध्ये लागवडीस उपयुक्त ठरणारी जमीन ६७.३६% इतकी आहे. या जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण केवळ ५.५३% इतके आहे. तासगाव तालुक्यात लागवडीस योग्य अशा जमिनीचे प्रमाण ७६.५४% इतके आहे. जंगलाचे प्रमाण ४.४६% इतके आहे.[४३]

तासगाव शहराचे क्षेत्र ४,३४२ हेक्टर असून लागवडीखालील जमीन १६.४३ हेक्टर आहे. वन क्षेत्र ७९.८६ हेक्टर आहे. कुरण क्षेत्र ५४.८७ तर पोट खराब क्षेत्र ६२.६९ हेक्टर इतके आहे. एकूण खातेदार ४,५०० आहेत. या क्षेत्राचा एकूण जमीन महसूल १६,८१८.६९ मिळतो.[४४]

## ५. पिके

महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळे हवामान आहे. या हवामानाचा पीक लागवडीवर परिणाम होत असतो. महाराष्ट्रात जमिनीचे क्षेत्र ३०८ लाख हेक्टर्स इतके आहे. यापैकी १९८ लाख हेक्टर्स इतके लागवडी खालील आहे. पाटबंधाऱ्यांची योजना १४% इतकी आहे. येथील बहुसंख्य पिकांना पावसावर अवलंबून रहावे लागते. महाराष्ट्रात संकरित ज्वारीचे उत्पादन घेण्यात दुसरा क्रमांक लागतो. त्याच बरोबर गहू, ज्वारी, बाजरी ही प्रमुख पिके आहेत. अन्नधान्याच्या वाढीसाठी राज्य सरकार विविध प्रकारच्या योजना राबवित असल्याने अन्न धान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे.[४५]

तासगाव परिसरात प्रामुख्याने ज्वारी (हायब्रीड व शाळू) गहू, बाजरी, हरभरा, मका, तूर, मटकी, चवळी, राजगीरा इत्यादी तृणधान्ये आणि द्राक्षे, ऊस, कापूस, केळी इत्यादी नगदी पिके तर भुईमुग, सोयाबीन, सुर्यफूल, मोहरी, करडई, जवस, तिळ, काराळे, आंबाडी इत्यादी तेलबिया पिके घेतली जातात. पण या पिकामध्ये रोगांचे प्रमाण जास्त असल्याने तसेच योग्य प्रशिक्षण व अद्यावत तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने लोकांना शेती फायदेशीर ठरत नाही.

भाजीपाला बटाटे, रताळी, कांदे, लसूण, मिरची, वांगी, भेंडी, भोपळा, लाल टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, मेथी, कोथींबीर, शेपू, पालक, कारली, गवारी, पावटा, दोडका, पडवळ, ढबू मिरची, आळू, गोसावळी, बीट, शेवग्याची शेंग इत्यादी भाज्या मोठ्या प्रमाणात घेतल्या जातात. पण योग्य प्रशिक्षण व अद्यावत तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने परदेशी भाज्यांची लागवड येथे केलेली दिसून येत नाही.[४६] फळामध्ये डाळिंब, पेरू, केळी, लिंबू, मोसंबी, आंबे, नारळ, चिक्कू इत्यादी उत्पादने काढली जातात.

## ६.५ **धारण क्षेत्र व भूमि उपयोजन**

भूमि उपयोजन म्हणजे जमिनीचा विविध कार्यासाठी झालेला वापर होय. भूमि उपयोजनमध्ये एकूण भौगोलिक क्षेत्र, वन क्षेत्र, लागवडी खालील क्षेत्र, कुरणक्षेत्र, पोट खराब क्षेत्र इत्यादींचा समावेश होतो.

तासगाव शहराचे क्षेत्र ४,३४२ हेक्टर असून लागवडीखालील जमीन १६.४३ हेक्टर आहे. वन क्षेत्र ७९.८६ हेक्टर आहे. कुरण क्षेत्र ५४.८७ तर पोट खराब क्षेत्र ६२.६९ हेक्टर इतके आहे. एकूण खातेदार ४५०० आहेत. या क्षेत्राचा एकूण जमीन महसूल १६८१८.६९ मिळतो.[४७]

## ६.६ उद्योगधंदे

उद्योगधंद्याना तासगाव शहराच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. शहरातील विविध उद्योग धंद्यामुळे शहराचा आर्थिक सामाजिक स्तर उंचावला आहे.

### ६.६.१ कुटिरोद्योग

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक कुटीर उद्योग तासगाव परिसरात सुरू आहेत. कुटिरोद्योगामध्ये कातडी कमावणे, पादत्राणे बनविणे, दोर वळणे, बांबू व वेतापासून वस्तू तयार करणे, लोहार व सुतार काम करणे इत्यादी उत्पादन तयार करण्याचा समावेश होतो.

**१) तेलघाणा** (गळीतधान्य उद्योग)

तासगाव परिसरात भुईमूग, सोयाबीन, तीळ, करडई, सुर्यफूल, जवस, आंबाडी व एरंडी इत्यादी गळीत धान्यापासून तेल काढण्याचा उद्योग पूर्वीपासून असून, हा एक मोठा कुटिरउद्योग आहे. तसेच जनावरांना या उत्पादनापासून पेंडही निघते. त्यामुळे लोक आपापल्या शेतातील गळीत धान्यांचा घाणा काढण्यासाठी जात. पूर्वी दिवाळीच्या सणाला तर घाण्यावर चार चार दिवस नंबर येत नसे.[४८] सुरूवातीला तेल घाण्या, आईल निर्मित इंजिन पंपावर सुरू होत्या. सन १९५० नंतर विद्युत निर्मितीची सोय झाल्यानंतर विजेवर चालणाऱ्या तेलघाण्या सुरू झाल्या. पूर्वी तेलघाणे चार होते तर सध्या दोन चालू आहेत. या व्यवसायात साधारण २२ कारागीर आहेत.[४९]

## २) चिरमुरे व फुटाणे व्यवसाय

चिरमुरे व फुटाणे तयार करण्याचा व्यवसाय हा शहरात फार पूर्वीपासून सुरू होता. चिरमुरे व्यवसाय करण्यासाठी कोकणातून 'भडेभुजे' जमातीची लोक १९९० च्या आसपास तासगावमध्ये आली आहेत. सध्या ही भट्टी वरचेगल्लीहून सध्या दत्तमाळावर गेली आहे. हे चिरमुरे 'हावळ्या' भातापासून तयार केले जातात.[५०] तर फुटाण्याच्या भट्ट्या शहरात मस्के व लुगडे या मराठा जातीच्या लोक चालवीत असून त्यांच्या दोन भट्ट्या अनेक वर्षापासून सुरू आहेत. हरभरे, वाटाणे व शेंगदाणे यांना भट्टीमधून काढून ते मार्केटमध्ये पाठविले जातात. तसेच काही लोक वैयक्तिक स्वरूपात चणे व फुटाणे करून आणतात. या व्यवसायात साधारण २५ कारागीर आहेत.[५१]

## ३) बांबु व वेतकाम

बांबूपासून निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू बनविण्याचा उद्योग प्रामुख्याने बुरूड लोक करतात. हे लोक शेतकऱ्यांना सुगीच्या काळात व वर्षभर धान्याचा साठा सुरक्षित रहावा म्हणून शेतकऱ्यांना उपयुक्त अशा कणग्या, टोपली, सुप, तट्टया, बुट्टी, करंडी व शोभेच्या वस्तू बनविण्याचे काम करतात. पूर्वी हा व्यवसाय बलुतेदारी पद्धतीने सुरू होता. सध्या हे लोक बुरूड गल्लीला राहतात. सध्या हे लोक आपल्या वस्तू आठवडा बाजार व दररोज घिसाडी पुलावर विकण्यासाठी बसलेले आढळतात. [५२]

परंतु सध्या प्लॅस्टिकपासून टिकाऊ वस्तू बाजारात आल्याने या वस्तूंची मागणी घटली आहे. या व्यवसायास खादी ग्रामोद्योग महामंडळ आर्थिक मदत व कर्जपुरवठा करते.

## ४) दोरखंड वळणे

दोरखंड वळणे हा उद्योग पूर्वीपासून चालत आलेला व्यवसाय असून तो बलुतेदारी पद्धतीने चालत होता. दोरखंड म्हणजे शेती व जनावरे यांना बांधण्यासाठी लागणारे विविध प्रकारचे कासरे होय. दोरखंड तयार करणाऱ्यांना नाडेमांग म्हटले जाई. दोरखंड तयार करण्याचे काम मांग जातीतील लोक करतात. दोरखंड तयार करण्यासाठी आंबाडी, ताग व केकतीच्या वाकाचा उपयोग केला जाई. हा उद्योग हंगामी असून, तो आठ महिने चालतो. पण १९८० च्या दशकानंतर बाजारात नॉयलॉन दोऱ्या, दोरखंड आल्याने हा व्यवसाय कमी झालेला दिसून येतो.[५३]

## ५) बांगडी उद्योग

स्त्रिया पूर्वीपासून आपल्या दोन्ही हातामध्ये बांगड्या घालत. स्त्री जीवनात व धार्मिकदृष्ट्या बांगड्यांना असाधारण महत्त्व आहे. त्यामुळे हा उद्योग पूर्वीपासून सांगली जिल्ह्यात व तासगावमध्ये सुरू होता. ६० च्या दशकानंतर राज्याबाहेरील ठिकाणाहून सुबक, आकर्षक व टिकाऊ बांगड्याचा माल येऊ लागल्याने येथील स्थानिक उद्योग बंद पडला. सध्या शहरात कासार व मुस्लिम लोक बांगड्या आणून विकण्याचे काम करतात. अलिकडे मुली पूर्वीसारख्या बांगड्या घालत नसल्यामुळे हा व्यवसाय पूर्वी सारखा तेजीत असल्याचे दिसून येत नाही.

## ६) सुतारकाम

कृषि व्यवस्थेतील महत्त्वाचा बलुतेदार म्हणून सुतारांची ओळख होती. सुतार लोक पूर्वीपासून सुतारकीचे काम बलुते पद्धतीने करत होते. बलुतेदारी व्यवस्थेमध्ये सुतार लोक शेतीसंबंधी लागणारी अवजारे वर्षभर पुरवत, शेतकरी लोक त्याचा मोबदला म्हणून सुगीच्या काळात त्यांना धान्यांचा पुरवठा करत होते. पण सध्या हे लोक फर्निचरचे काम मोठ्या प्रमाणात करतात. त्यांनी आपल्या व्यवसायात आधुनिक साहित्याचा वापर सुरू केला आहे. परिणामी या व्यवसायात लागणाऱ्या कामगारांची संख्या कमी झाली आहे.[५४]

## ७) चर्मोद्योग

जनावरांच्या कातड्यापासून तयार केल्या जाणाऱ्या वस्तूंचा समावेश चर्मोद्योगात होतो. अशा वस्तू तयार करण्याचे काम पूर्वीपासून चांभार लोक करत होते. कमावलेल्या कातड्यापासून चांभार लोक जाडे, चप्पल, बैलाच्या मोटारीच्या भुशिंग्या बनविण्याचे काम करीत होते. अलिकडे यांत्रिक पद्धतीवर सहज सुलभ वस्तू तयार होत असल्याने, या व्यवसायातील कामगारांची संख्या कमी झाली आहे. सध्या हे लोक चपला बनविण्याचे काम करतात तर काही लोक तयार मिळणाऱ्या चपलासंबंधी व इतर चामडी वस्तू विकण्याचे काम करतात. 'संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळाकडून' काही लोकांनी कर्जे घेऊन व्यवसाय सुरू केल्याचे दिसून येते.[५५]

## ८) कुंभार उद्योग

कुंभार उद्योग हा परंपरेनुसार चालत आलेला व्यवसाय असून तो बलुतेदारी पद्धतीने चालत होता. बलुतेदारी पद्धतीमध्ये कुंभार लोक शेतकऱ्यांना मातीची भांडी, त्या उत्सवात लागणाऱ्या देवतांच्या मूर्त्या पुरवत होते. तर विटा, कौले व्यावसायिक पद्धतीने विकत होते. बलुतेदारी पद्धतीच्यावेळी शेतकरी त्यांना

त्यांचा मोबदला म्हणून धान्याचा पुरवठा करत होते. पूर्वी हा व्यवसाय लाकडी चाकावर केला जात होता. परंतु अलिकडे विजेवर चालणाऱ्या शैला नावाच्या सुधारित चाकावर हा व्यवसाय चालतो. या उद्योगामध्ये आधुनिक अवजारे व तंत्राचा विकास झाल्यामुळे १० कारागिराचे काम एक कारागिर करू लागल्याने कारागिरांच्या संख्येवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येते.[५६]

## ९) साप्ताहिक बाजार

साप्ताहिक बाजाराची पद्धत भारतात फार प्राचीन काळापासून सुरू आहे. या साप्ताहिक बाजारात अन्नधान्य, डाळी, मिरची, मसाले, कापड, भाजीपाला, फळे, कडधान्ये इत्यादी वस्तू बाजारात विकल्या जातात. तासगाव शहरात आठवड्यातून दोनवेळा सोमवार व गुरूवारी बाजार भरतो. या बाजारात पंचक्रोशीतील अनेक गावचे लोक येतात. तसेच भाजीमार्केट मध्येही रोज दैनंदिन व्यवहार होतात. या बाजारात लाखो रूपयाची उलाढाल होत असून, नगरपालिकेला बाजारी महसूल मिळतो.[५७]

## ६.७ तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती

कृषि उत्पन्नास योग्य भाव मिळण्यासाठी मुंबई राज्य शासनाने सन १९२७ मध्ये 'मुंबई कापूस बाजार अधिनियम' संमत केला. या अधिनियमामध्ये बऱ्याच उणिवा राहिल्याने व त्यामध्ये बऱ्याच कृषिमालाचे विनियमन झालेले नसल्यामुळे मुंबई राज्य शासनाने सन १९३९ मध्ये 'मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम' संमत केला. या अधिनियमाध्ये शेतीमालाचे बाजारभाव ठरविण्याबाबत काही उणिवा राहिल्याने, महाराष्ट्र राज्य शासनाने सन १९६३ मध्ये मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम संमत करून त्याची अंमलबजावणी १९६७ पासून केली.[५८]

तासगाव कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना दिनांक २७ जानेवारी १९४८ झाली. कार्यक्षेत्र तालुक्यातील ६८ गावे आहेत. बाजार स्वत:च्या मालकीचा आहे. तसेच तासगाव कृषि उत्पन्न बाजार समितीने ३० एकर जागा संपादन केलेली आहे.[५९]

## १. कृषि उत्पन्न बाजार समितीची सांपत्तीक स्थिती

बाजार फीच्या उत्पन्नामध्ये जी वाढ होत आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे

१. नियमित शेतमालाची वाढती उलाढाल.
२. लोकसंख्या वाढीची गरज भागविण्यासाठी आयात शेतीमालामध्ये वाढ.
३. शेतमालाचे वाढते बाजारभाव.
४. फळभाज्या व पालेभाज्या यांचे वाढते उत्पादन.

५. बाजार फी वसुलीबाबत बाजार समितीने राबविलेले काटेकोरपणाचे धोरण व त्या कामी व्यापाऱ्याकडून मिळालेले सहकार्य होय.[६०]

## ६.८ सावकारी व्यवसाय

प्राचीन काळापासून भारतात विविध प्रकारच्या देवघेव करणाऱ्या संस्था अस्तित्वात होत्या. महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागामध्ये शिवपूर्व काळात किंबहूना त्याही बऱ्याच आधीपासून लहान प्रमाणामध्ये व्यापार वाणिज्य व तत्सम व्यवसायावर उपजिविका करणारे लोक होते.[६१] साधारणत: पटवर्धन काळापासून तासगाव शहरात सावकारी व्यवसाय चालू असून, हे सावकारी लोक कर्ज पुरवठ्या व्यतिरिक्त सरकारी महसूल गोळा करणे, नाणी बदलून देणे, शेतीसाठी शेतकऱ्यांना पैसा उपलब्ध करून देणे इत्यादी कामे करीत असत. सावकार लोक शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करत असत. पावसाळ्यापूर्वीच शेतकरी सावकारांकडून कर्ज रूपाने धान्य घेत होते व त्याची परतफेड व्याजासह हंगाम काळात करीत होते. त्या व्यवहारात सावकार शेतकऱ्यांकडून वसुली सवाई व्याजाने धान्य वसूल करीत होते.[६२]

तासगाव ब्रिटीश राजवटीखाली आल्यानंतर व्यापारामध्ये व साधनसामग्रीमध्ये वाढ झाली. ब्रिटीश राजवट सुरू झाल्यानंतर जिल्ह्यात महसूल जमाबंधी कायदा लागू करण्यात आला व त्यामुळे महसुलाच्या मागणीत ३० ते ४०% घट होऊन जमीन मालकाची पत वाढली.[६३]

जिल्ह्यात मुंबई सावकार अधिनियम (१९४६) मे १९४९ पासून लागू करण्यात आला. या अधिनियमाखाली १९४९-५० मध्ये जिल्ह्यात सावकारी व्यवसाय करणाऱ्यांनी परवाना धारण करणे, परवाना संपताच त्याचे नूतनीकरण करून घेणे, सरकारने ठरवून दिलेल्या दराने व्याज आकारणी व त्याप्रमाणे प्रत्यक्ष वसुली करणे, कर्ज वसुलीची जमापावती कर्जधारकास देणे, कर्जव्यवहार ठराविक मुदतीत सहकारी खात्यास कळविणेची बंधने शासनाने घातल्यामुळे या व्यवसायावर नियंत्रण आले. सावकारी कर्जाची नोंद सरकार दप्तरी द्यावी लागत असल्याने, अधिकृत सावकारांची नोंद दिसून येत नाही. त्याचबरोबर बँका, शेतकी पतसंस्था, इत्यादी संस्थाकडून कर्ज उपलब्ध होत असल्याने सावकारांना वरील संस्था पर्याय म्हणून उभ्या राहिल्या. त्यामुळे सावकारांची संख्या कमी होताना दिसून येते.

**तक्ता क्र. ५ तासगावमध्ये परवानाधारक सावकारांची संख्या व त्यांनी दिलेली कर्जे** (संदर्भ वर्ष २००९-१०)

| | | |
|---|---|---|
| १) | परवानाधारक सावकारांची संख्या | २५ |
| २) | व्यापाऱ्यांना दिलेली कर्जे (रूपये) | ९६७ |

| | | |
|---|---|---|
| ३) | सावकारांनी इतरांना दिलेली कर्जे (रूपये) | ९०५ |
| | एकूण(४+५)(रूपये) | १८७२ |

संदर्भ- *जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली.*

तासगाव शहरात बँक ऑफ इंडिया, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक, दि. रत्नाकर बँक लि., पलूस सहकारी बँक, युको बँक इत्यादी बँका आहेत. या बँकांच्या माध्यमातून शेती उद्योगधंदे, छोटे-मोठे व्यवसाय यांना कर्ज पुरवठा केला जातो.

## ६.९ सहकार चळवळ व सहकारी संस्था

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात इग्लंडमध्ये सहकार चळवळीचा जन्म झाला. भारतात १९०४ पासून सहकार चळवळीस सुरूवात झाली. महाराष्ट्रात ६० च्या दशकांत सहकार चळवळीस भरीव स्वरूप आले. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ,' हे सहकाराचे ब्रीद बनले. तालुका शेतीप्रधान असल्याने शेतीस लागणारा पतपुरवठा, खते, बी-बियाणे याचा पुरवठा करण्यात सहकाराचा वाटा महत्त्वाचा आहे. गरजेच्या वेळी कर्ज आणि जीवनोपयोगी वस्तू मिळण्याची व्यवस्था हा सहकारातील महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी सहकारी संस्था उदयास आल्या.[६४]

इंटरनॅशनल को-ऑप. असोसिएशनचे माजी संचालक वॅटकिन्स यांनी म्हटले होते की, एकात्मता, काटकसर, लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वावर आधारित सामाजिक संघटना असलेली व्यवस्था म्हणजे सहकार होय. सहकारी संस्था चालविणे हा उद्योग आहे आणि तो अनेकांनी एकत्र उभारलेला उद्योग आहे. हुकुमशाही ऐवजी लोकशाही, बेबंदशाही ऐवजी नियोजन, नफ्याऐवजी सेवा, विषमते ऐवजी समता, संकुचितते ऐवजी वैश्विकता ही वैशिष्ट्ये धारण करणारी सहकार ही एक सामाजिक व आर्थिक चळवळ आहे.

## ६.९.१ दुग्ध व्यवसाय व सहकारी संघ

पशुपालन हा शेती व्यवसायाला पूरक व्यवसाय असून त्याला कृषिक्षेत्रात महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे तो शेती उद्योगाचा अविभाज्य भाग बनला आहे. शेती व्यवसायावर पूर्ण कुटुंब चालत नसल्यामुळे त्याचप्रमाणे कुटुंबाचा आहार, पोषण व आरोग्य टिकविण्याकरिता दुग्ध व्यवसाय महत्वाचा मानला जातो. त्याचप्रमाणे दुग्ध व्यवसायाकरिता कच्चा माल शेतीतून मिळतो. जनावरांचे खाद्य बहुतांशी प्रमाणात विकत आणावे लागत नाही. तसेच शेतीला आवश्यक शेणखताचा पुरवठा होऊन शेतीची उत्पादकता वाढते. त्यामुळे कृषिक्षेत्रातील या व्यवसायाचे महत्व ओळखून शासनाने तृतीय पंचवार्षिक योजनेत ३१ मार्च १९६१ रोजी कोल्हापूर येथे शासकीय दूध योजना सुरू केली.[६५]

डॉ. वसंतरावदादा पाटील यांनी ही योजना संपूर्ण महाराष्ट्रभर राबविली. शासकीय दूध योजनेमुळे शहरात दूध संघ सहकारी तत्वावर स्थापन करण्यास प्रोत्साहन मिळाले. त्यातून गरीब सुशिक्षित बेरोजगार यांना दूध व्यवसायातून आर्थिक लाभ होण्यासाठी आणि त्याद्वारे कुटुंबाची सर्वांगीण प्रगती होण्याच्या उद्देशाने खा. प्रकाशबापू पाटील यांनी श्री. वसंतदादा दुग्ध व्यवसाय विकास जिल्हा सहकारी संघ मर्यादित, तासगाव या संघाची स्थापना ६/८/१९८४ रोजी केली. तासगाव परिसर दुष्काळी असल्याने जनावरांना चारा मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आहे त्या किंमतीत जनावरे विकली याचा परिणाम संघावर झाला. दूध संकलन फार कमी झाले. दुध वाहतूक खर्च व प्रकल्पावरील वीज व इतर खर्च वाढला. त्यामुळे संघाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या डेअरी प्रकल्पाची हाताळणी क्षमता १ लाख लिटरची आहे. त्यामुळे १ लाख लीटरच्या दुधाच्या प्रक्रियेसाठी होणारा खर्च हा कमी दुधासाठीही प्रक्रिया करणेस होऊ लागला.[६६]

पूर्ण क्षमतेने संघाचा वापर न होऊ शकल्याने संघाचे नुकसान झाले आहे. श्री. वसंतदादा दुग्ध व्यवसाय विकास जिल्हा सहकारी संघ मर्यादित, तासगाव प्रगती अहवाल खालीलप्रमाणे

**तक्ता क्र .६ श्री वसंतदादा दुग्ध व्यवसाय विकास जिल्हा सहकारी संघ मर्यादित, तासगाव. २१ वा वार्षिक अहवाल सन २००४-०५.अखेर.**[६७]

| | १९९८-९९ | १९९९-०० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सभासद संख्या | ३४१ | ३४१ | ३४१ | २१८ | २१८ | २१८ | २१८ |
| २. भागभाडवल | ३६४६९०० | ४१२२२०० | ४५५४७०० | ४४१७६०० | ४८१९१०० | ५०५२७०० | ५२२१५०० |
| ३. राखीव नीधी | २०७३७०६९ | २०७३७०६९ | २४६०३८५३ | ३२१२७०७३ | ३१३६१२४४ | ३१४४२२५४ | ३५१८०००१ |
| ४. खेळते भांडवल | ७८४३४८३० | ८१६०५३२५ | ८७३०२२३३ | ९२२७६४६ | ९८११४०३८ | ९९३३००९६ | १११०९०५१७ |
| ५. गुंतवणूक | ९५७१८२० | ८२३०३१४ | ११३५१३१४ | ११३५१३१४ | ८००७२१४ | ७९७२१६४ | ७८०७०५६ |
| ६. निव्वळ नफा | ३९७४१५ | २४९२९० | १६२५६७ | ६४३११ | ८१०१० | ५५१९३० | १५१९८१ |
| ७. घेतलेले कर्ज | २२१४५४० | २०६७३४९५ | २०५२५१८८ | २००७०५३५ | १९९२३८३९ | २०९०४६८६ | २५३१९३८३ |
| ८. एकूण उपन्न | १४०६६५४ | ६३६६६०७ | ७१३१२०० | ६८८३५८९ | ७५२२५७४ | १८४९७२१ | १२७०९४४ |
| ९. एकूण खर्च | १३६६९१९ | ६११७३१६ | ६९६८६३३ | ६८१९२७८ | ७४४१५६४ | ७१८५८८५ | १०५१९२७६ |
| १०. दुध खरेदी | १८०४४५२ | १९०६३०४५४ | २१६५६९०४७ | २४९६६८३ | २४०७४८१४७ | १६५११११३९८ | २२२४६१४७४ |
| ११. दुध विक्री | २०७००७९८२ | २१५४७५९०४ | २४६६४२३४४ | २६९०८१९७० | २९८३६०५१२ | १९७९११६२० | २०६९७१०६३ |
| १२.पशु खाद्या | ४३२९०२० | ५१८९९२९ | ६१५६००७ | ९६३७७२२ | ४९१६७३३ | ४२२९२०३ | ७०४५६५६ |
| १३. बर्फ खरेदी | ३९२५७७ | ३२८०१६ | ५१३९४५ | ४०६६२५ | ३८९९१६ | ५०३८६१ | ८४१०८६ |
| १४. वसंत दुध विक्री | १०४८४२०९ | ११२५६८३९ | १३६४६७६० | १४०३९०६४ | १७४९१५२१ | २२०८८३४६ | ४६२५८११४३ |
| १५. दुधवाहतूक भाडे | ९२४७२४६ | १०६६०९०३ | १२७११३११ | १५०३२७४० | १६२८४७८२ | १२९८१२६८ | १६७२२४२४ |
| १६. पगार व मजुरी | ४७५८९७८ | ५३१३८४७ | ५४२४९३९ | ६८६५१९९ | ७०३८८८८ | ७०३४६०९ | ७०८९०७४ |
| १७. मालमत्ता | ५५१११५६६ | ६०२१७१२४ | ६२४०१२२ | ६४१०२२३४ | ६५३९९१०६ | ६५७४६८३१ | ६५३५५०६२ |
| १८. दैनंदिन स. दुध | ५५१०३ | ५६३५९ | ६२१६२ | ६९८९५ | ७०३८१ | ४५१७४ | ५९९८२ |

## ६.१० बँकिंग सुविधा व विकास

शहराच्या आर्थिक विकासामध्ये त्या शहरातील बँक व्यवसाय विकसित होणे अत्यावश्यक असते. सर्व विकसित शहरात बँक व्यवसाय पद्धतीही विकसित असल्याचे आढळून येते. बँक व्यवसाय पद्धतीत साधनसामग्री गोळा करण्याच्या बाबतीत आणि दीर्घ मुदतीची, मध्यम मुदतीची व अल्प मुदतीची कर्जे उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत महत्वाची भूमिका पार पाडते.

तासगाव शहर परिसराच्या आर्थिक विकासामध्ये बँकांचा हातभार मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. सध्या तासगाव शहरामध्ये विविध प्रकारच्या राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. त्याचबरोबर पतसंस्थाही शहरात कार्यरत असून त्याही अर्थकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

### ६.१०.१ सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तासगाव (शहर)

समाज परिवर्तनामध्ये अर्थकारण हा एक मुलभूत आणि महत्त्वाचा घटक आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तासगावच्या ग्रामीण परिसरात पर्यायाने शहराच्या व राज्याच्या अर्थकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वैचारिक दृष्ट्या संपन्न असलेल्या महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जिल्हा मध्यवर्ती बँक असावी, अशी कल्पना मांडली.[६८] त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात मध्यवर्ती बँक व त्याच्या आवश्यक तेथे शाखा आहेत. त्याप्रमाणे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., तासगाव (शहर) बँकेची स्थापना १९५५ मध्ये झाली. इ.स. १९५६ मध्ये बँकेची आर्थिक स्थिती बिघडल्यामुळे शासनाने बँकेचा कारभार पाहण्यासाठी प्रशासकाची नेमणूक केली होती.[६९]

तासगाव शहराची भूषण असलेली तळागाळातील गोरगरिबांचे आदराचे स्थान असलेल्या या बँकेने गेल्या ६० वर्षाच्या इतिहासात लक्षणीय ऐतिहासिक अशी प्रगती केली आहे. शहराच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व सहकारी वैभवशाली सर्वांगीण विकासात या बँकेचे महत्वाचे योगदान असून शहराचा विकासात या बँकेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. बँकेच्या उत्कर्षाच्या पायावर मान्यवर नेतृत्त्वाचे आशिर्वाद, विविध टप्प्यावर मिळालेले उत्कृष्ट नेतृत्त्व आणि त्यांचे सहकारी बँकेच्या सेवकांनी दिलेले योगदान, उज्वल विचारांची जोपासना यामुळे गेल्या ६० वर्षात लक्षणीय प्रगती केली आहे.[७०]

**तक्ता क्र. ७ सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तासगाव बँकेची प्रगती दर्शविणारे आकडे सन २०१०-२०११.[७१]**

| अ.न | तपशील | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सभासद व्यक्तिश: | ३६३ | ३६३ | ३६३ | ३६३ | ३६३ | ३६३ |
| २) | सोसायट्या | ३७७० | ३८१३ | ३८३१ | ३८४८ | ३८८१ | ३९२८ |
| ३) | शेअर भांडवल | ४७०६.३१ | ४८६८.९१ | ५१३१.४१ | ५३४६.४९ | ५६४७.१० | ६८१४.७८ |
| ४) | रिझर्व्ह व इतर फंडस् | १०३२२.६ | ११०६४.९९ | १२६५६.३६ | १४७४३.६७ | १६७१२.२३ | १६५७३.८४ |
| ५) | ठेवी | १२३२०६.८९ | ११४४४८.३८ | १२३९३७.१५ | १४३७७८.४६ | १८७६६४.६७ | २११९४७.८२ |
| ६) | बाहेरील कर्जे | १७९३५.२१ | २१६०३.०८ | १९६६४.३४ | १५४५५.८९ | ४४६२.४४ | ३३८४३.१० |
| ७) | गुंतवणूक | ५७५६३.३० | ४३१४१.२४ | ५४१५६.८४ | ८१८३७.९६ | ९७९५९.६८ | ९८३३४.५४ |
| ८) | दिलेली कर्जे | १००३७२.६० | १०८८८६.६२ | १०४७५३.९३ | ९४१४२.७२ | १०५८५२.८८ | ६०५९६.७८ |
| ९) | खेळते भांडवल | १७२०४०.२२ | १६४९२३.८१ | १७३८८१.४१ | १९६९६३.५५ | २२८१७२.२८ | २८२२२२.७१ |
| १०) | नफा | १२२०.९४ | ११६५.७६ | १७८३.४६ | १४१७.३१ | ८८६.३९ | १८३०.४८ |

### ६.१०.२ दि तासगाव अर्बन को-ऑफ. बँक लिमिटेड तासगाव

दि तासगाव अर्बन को-ऑफ. बँकेची स्थापना ६/२/१९३६ रोजी स्थापन झाली. २०११ मध्ये या बँकेने ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. तासगाव शहराचे विकासाचे स्वप्ने पाहणाऱ्यांचे स्थान (विकसनशील) म्हणून कार्यरत आहे. बँकेचे संस्थापक कै. रावबहाद्दूर सदाशिवराव बाबाजी शेटे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ३ फेब्रुवारी १९३६ मध्ये सहकारी पतपेढी म्हणून स्थापन केली. त्यावेळी त्या पतपेढीचे शेअर भांडवल अवघे १९०० रू. होते.[७२] व्यापारी क्षेत्रास चालना देणे व हलाखीत असणाऱ्या स्थानिक नागरिकांना सोयी उपलब्ध व्हाव्यात, त्यांना सावकाराकडे जावे लागू नये या विचारातून ही संस्था स्थापन झाली. यानंतर शहरातील प्रतिष्ठीत कै. तुकाराम वालचंद शहा संचालक मंडळ व बोर्ड ऑफ कंट्रोलच्या निवडणुका बिनविरोध होऊन श्री शहा बँकेचे अध्यक्षपद आले. बँकेच्या विकासात कै. रावबहाद्दूर शेटे, कै. कुत्ते वकील, कै. तुकाराम शहा, कै. दगडूलाल बोथरा, कै. बळवंत शंकर पाटील, कै. रामचंद्र लुगडे, कै. शिवरूद्र पैलवान व कै. भगवान कदम इत्यादी माजी अध्यक्ष होऊन गेले.[७३]

सध्या बँकेची तीन मजली इमारत सर्व शाखांचे संगणकीकरण, नियमित वार्षिक सर्वसाधारण सभा, डिव्हीडंट वाटप, सामाजिक व शैक्षणिक संस्थांना भरीव मदत, संकट प्रसंगी मदत निधीस सहाय्य, गुणवंतांचा गौरव इत्यादी प्रगत टप्प्याने ही बँक सर्व सामांन्याकडून लौकिकास पात्र ठरली आहे. स्वच्छ पारदर्शी कारभार, प्रशासनात सुसूत्रता, सभासदांना आपुलकी व जिव्हाळा देऊन त्यांना जास्तीत जास्त लाभांश बँकेने दिला आहे. बँकेचा वार्षिक व्यवसाय ५५ कोटी रूपये पेक्षा जास्त असून कर्मचाऱ्यांची संख्या ५१ इतकीच मर्यादित आहे.[७४]

**तक्ता क्र. ८ दि तासगाव अर्बन को-ऑफ. बँकेची प्रगती दर्शविणारे आकडे.**[७५]

| अ.नं. | तपशील | १९४० | १९५० | १९६० | १९७० | १९८० | १९९० | २००० | २०१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सभासद संख्या | २२७ | ३६१ | ६३० | १०५९ | १२०४ | २७९८ | ५०२९ | ७००९ |
| २) | शेअर भांडवल | ०.१० | ०.२७ | ०.३७ | १.०१ | २.७३ | ८.६६ | ३५.३६ | ८३.५१ |
| ३) | रिझर्व्ह व फंडस् | ०.०१ | ०.०८ | ०.५५ | १.३७ | ४.९२ | ४१.१६ | २८७.९८ | ७०३.५३ |
| ४) | ठेवी | ०.२९ | २.५३ | ४.५७ | ८.३८ | ४३.८२ | ३५३.२९ | २०५६.०२ | ४४२६.६४ |
| ५) | गुंतवणूक | ०.०१ | ०.०६ | ०.४३ | ०.६३ | ०.४४ | ५९.१५ | १२१९.९६ | २२४६.१८ |
| ६) | दिलेली कर्जे | ०.२७ | १.६३ | २.८५ | ७.३४ | ३५.०३ | २६६.३७ | १०६९.९३ | २८६७.७४ |
| ७) | खेळते भाडवल | ०.४५ | ३.०७ | ५.८२ | ११.२६ | ५४.०३ | ४१९.८० | २५१७.९३ | ५५१७.८५ |
| ८) | शाखा | १ | १ | १ | १ | १ | ३ | ६ | ७ |
| ९) | नफा | ०.०१ | ०.१३ | ०.०७ | १.०८ | १.८८ | ८६५ | ३८.३८ | २४.८६ |
| १०) | डिव्हीडंडचा दर | ५०३% | ६% | ३% | ६% | १२% | १२% | २०% | १०% |

तासगाव शहरात बँक आँफ इंडिया, भारतीय स्टेट बँक, बँक आँफ महाराष्ट्र, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक, दि रत्नाकर बँक लि. पलूस सहकारी बँक, युको बँक इत्यादी बँका आहेत. या बँकांच्या माध्यमातून शेती उद्योगधंदे, छोटे-मोठे व्यवसाय यांना कर्ज पुरवठा केला जातो.

## ६.११ आयुर्विमा

विम्याची कल्पना ही हिंदुवासियांना स्वातंत्र्यपूर्व काळात अपरिचित होती. काही पाश्चात्य कंपन्यांनी येथे चालविलेले विम्याचे व्यवहार पाहून एतदेशीय लोकांनाही विम्याचे महत्त्व पटू लागले व विम्याबाबतीत तरी परकीय कंपनीवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वदेशी विमा कंपन्या असाव्यात असे विचार लोकांच्या मनात घोळू लागले. या कल्पनेला मूर्त स्वरूप स्वदेशाच्या चळवळीने प्राप्त झाले व स्वदेशाच्या भावनेने प्रेरित होऊन साताऱ्यातील काही प्रमुख नागरिकांनी व आण्णासाहेब चिरमुले यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील भारतीय आयुर्विमा महामंडळ या पहिल्या विमा कंपनीची स्थापना १३ ऑगस्ट १९१३ रोजी केली.[७६]

आज महाराष्ट्रात पहिली विमा कंपनी आणि इतर विमा कंपनीत श्रेष्ठ म्हणून जो मान वेस्टर्न इंडिया कंपनीस मिळाला आहे. त्याचे श्रेय आण्णासाहेब चिरमुले, भाऊसाहेब सोमण, दादासाहेब करंदीकर, गणपतदास देवी या सर्व मंडळींना दिला पाहिजे. बँकेचे आँफीस सन १९२५ साली पुणे येथे उघडले व बघता बघता कंपनीच्या शाखा मुंबई, नाशिक, बेळगाव, बागलकोट, दिल्ली, अहमदनगर, कलकत्ता, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, बडोदा, इंदूर, हैद्राबाद, हुबळी इत्यादी सर्व भारतभर शाखा विस्तार झाला. सन १९५२ मध्ये कंपनीचे भागभांडवल २० कोटीच्यावर होते.[७७]

लाईफ इनश्युरन्स (इमरर्जन्सी प्रोव्हिजनल) ऑर्डिनल, १९५६ अनुसार आयुर्विम्याचे राष्ट्रीयकरण झाल्यापासून 'आयुर्विमा महामंडळ' ही एकमेव संस्था हा व्यवसाय करीत आहे. लाईफ इन्श्युरन्स कार्पोरेशन ॲक्ट, १९५६ अनुसार भारत सरकारने १ सप्टेंबर १९५६ रोजी आयुर्विमा महामंडळाची स्थापना केली. सन १९५६ मध्ये चिंतामणराव देशमुख यांनी कोल्हापूर येथे डिव्हीजन ऑफीस न देता ते सातारा येथे ठेवले. विभागीय कार्यालयांतर्गत सन १९६० पासून सातारा जिल्ह्यात सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समावेश होता.[७८]

## ६.१२ साखर उद्योग

साखर उद्योग हा सांगली जिल्ह्यातील एक महत्त्वाचा उद्योग असून तासगाव परिसरातील तरूणांना यामुळे रोजगाराची संधी मिळाली आहे. तसेच या साखर कारखान्यामुळे स्थानिक आर्थिक विकासात भर पडली आहे.

### ६.१२.१ तासगाव सहकारी साखर कारखाना लि. तूरची ता. तासगाव.

तासगाव शहराच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासामध्ये तासगाव सहकारी साखर कारखान्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. हा साखर कारखाना शहरापासून १० कि.मी अंतरावर आहे. कारखाना स्थापनेसंबंधी मा. आमदार दिनकर (आबा) पाटील या परिसरातील शेतकऱ्यांचा सहभाग आहे. सुरूवातीला या कारखान्याची गाळप क्षमता २७५० मेट्रिक टन होती.[७९] ती उत्तरोत्तर वाढत गेली. कारखाना कार्यक्षेत्रात ऊसाचे प्रमाण वाढताच गाळप क्षमता ३,२०,००० मेट्रिक टन इतकी करण्यात आली. पुढे पुन्हा गाळप क्षमतेत वाढ करून ती ३,५२,७१३ मेट्रिक टन इतकी करण्यात आली. २०१० मध्ये तासगाव सहकारी साखर कारखाना आ. संजय पाटील यांच्या गणपती संघाने १४ कोटीच्या लिलावात चालविण्यास घेतला आहे.[८०]

साखर कारखान्यांचे ऊस पिकाचे संवर्धन व्हावे व त्यातून सभासदांची उन्नती व्हावी, यासाठी विविध योजना सुरू केल्या. त्यातील योजना पुढीलप्रमाणे

#### १. गांडुळ खत प्रकल्प

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी सेंद्रीय खताचा पुरवठा व्हावा या उद्देशाने गांडुळ खत निर्मिती प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पातून उत्पादित होणारे गांडुळ खत शेतकऱ्यांना माफक दरात दिले जाते.

## २. ऊस संवर्धन

शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादनामध्ये वाढ होऊन उसाच्या प्रतीत सुधारणा व्हावी व कारखान्याचा सरासरी साखर उतारा वाढावा या हेतूने कोसी ६७१, को ८६,०३२, को ९४,०१२ या ऊस जातीचे निरोगी व शुद्ध बियाणे सन २००० पासून शेतकऱ्यांना वाटण्यात आले.[८१]

**तक्ता क्र. ९ तासगाव सहकारी साखर कारखाना** (२०१०-११)[८२]

| | | |
|---|---|---|
| १) | कामगार संख्या अ) नियमित | १९८ |
| २) | ब) हंगामी | ५१० |
| ३) | गळीत क्षमता मे. टन | २,७५० |
| ४) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | ३,५२,७१३ |
| ५) | साखरेचे उत्पादन क्विंटलमध्ये | ४,१०,१२५ |
| ६) | इतर उत्पादने अ) इथेनॉल मे. टन | ० |
| ७) | ब) पेपर मे. टन | ० |
| ८) | क) वीज मे. टन | ० |
| ९) | ड) मद्यार्क हजार लि. | ० |

## ६.१३ बचत गट

आत्मसन्मान मिळविण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरून जावे लागते याचे आत्मभान तळागाळातील महिलांना दिले ते बचतगटांनीच. अशिक्षीत, अल्पशिक्षित बायकांना स्वावलंबी बनविण्याचे काम बचतगटाच्या माध्यमातून झाले. छोट्या बचतीतून पापड-लोणचे आणि मसाल्याच्या पदार्थापासून सुरू झालेला त्यांचा उद्योजगतेचा प्रवास आज प्रचंड विस्तारला आहे.

बचतगटाच्या माध्यमातून सामाजिक अभिसरणाची प्रक्रियाही वेग घेत आहे. विकासापासून दूर असलेल्या घटकाला मुख्य प्रवाहात आणतांना बचतगटांनी हुंडाबंदी, स्त्री-भ्रूण हत्या, दारूबंदी, कुपोषण निर्मुलन, कौटुंबिक अत्याचारातून सुटका इत्यादी ज्वलंत प्रश्न यशस्वीपणे हाताळले आहेत.[८३]

बांगला देशाच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम करणाऱ्या बचतगटांची सुरूवात भारतात ही करण्यात आली. केंद्र सरकारने दारिद्र्य विविध योजना राबवून गरीबीचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे कमी झाल्याचे दिसून आले नाही. तेव्हा ‘सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना’ शासनाने सुरू केली.[८४] ग्रामीण भागात लघुउद्योग व्यवसाय स्थापन करून त्याद्वारे गरीबांना कायमस्वरूपी रोजगार मिळवून त्याची आर्थिक उन्नती

करणे हा या योजनेचा मूळ उद्देश होय. या योजनेत वैयक्तिक कर्जापेक्षा स्वयंसहाय्यता बचतगटाला कर्ज दिले जाते. दहा ते वीस लोकांनी एकत्र येऊन महिन्याला ठराविक अल्प रक्कमेची (रू.२५ ते २००) बचत करणे, या बचतीच्या आधारे गटांतर्गत गरजेनुसार एकमेकींना कर्ज देणे तसेच बँक किंवा दुसऱ्या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन गटातील सदस्यांच्या व्यक्तिगत अथवा सामुदायिक अर्थाजनासाठी उपयोग करणे असे सर्वसाधारणपणे बचतगटाच्या कार्याचे स्वरूप राहिले आहे.[८५]

## स्वयंसहाय्यता गट

शहरातील ग्रामीण शेतमजूर व रोजंदारीवर काम करणाऱ्या महिलांच्या उन्नतीसाठी सहकार खाते व जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्यामार्फत शहरात एकूण ५०० स्वयंसहाय्यता बचतगट निर्माण केले असून ६००० इतक्या महिला सभासद सामील आहेत. वरील महिलांनी या गटामार्फत (स्वयंसहाय्यता) २५, ५०, १००, २०० इतका मासिक निधी जमा केला जातो. तसेच व वरील कर्जास ४% व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते व उर्वरित ७% पर्यतचे व्याज राज्यशासन भरत आहे. आतापर्यत शासनाने ४.३० कोटी रूपयाचे अनुदान वितरित केले आहे. तसेच कर्जाची परतफेड महिला सभासदांनी केली. या कर्जातून म्हैस प्रकरण, सामूहिक शेती, पाळणा घरे, शेळ्या मेंढीपालन, तसेच छोटे-छोटे गृहोपयोगी उद्योग स्थापन केले. त्यामध्ये पापड तयार करणे, लोणचं, लाडू वगैरे तयार करून स्वयंरोजगार निर्माण करण्यात स्वयंसहाय्य गटाला यश प्राप्त झाले आहे.

स्वयंसहाय्यता गटातून शहरातील शालेय पोषण आहाराचे ७५% ठेके स्वयंसहाय्य महिला बचत गटाने घेतले आहेत. दुध डेअरी, लाईट बिल वाटप करण्याचे काम महिला करतात.[८६]

बचतगटांना व्यापक बाजार पेठ प्राप्त व्हावी म्हणून दरवर्षी विभागीय तसेच जिल्हा स्थरावर बचतगटांच्या वस्तूंची प्रदर्शने भरविली जातात. या योजनेमधून विभागीय प्रदर्शनासाठी प्रत्येकी २५ लाख रूपये व जिल्हा प्रदर्शनासाठी प्रत्येकी १० लाख रूपये निधी देण्यात येत आहे. तसेच बचत गटाच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी तालुका आणि जिल्हास्तरावर कायमस्वरूपी विक्री केंद्रे बांधण्यासाठी जिल्हा स्तरावर ५० लाख रूपयाचा तालुका केंद्रासाठी २५ लाख निधी देण्यात येत आहे.[८७]

## ६.१४ सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची आर्थिक उन्नती व्हावी, त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून ही योजना केंद्र सरकारने एप्रिल १९९९ रोजी सुरू केली. पूर्वी सुरू असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, ग्रामीण महिला व

बाल विकास कार्यक्रम इत्यादी सर्व योजना एकत्रित करून 'सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' हा नवीन कार्यक्रम सुरू करण्यात आला.[८८] ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या क्षमतेवर आधारित मोठ्या प्रमाणात लहान व्यवसाय व उद्योग स्थापन करून त्याद्वारे तेथील गोरगरिबांना स्थिर व कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणे, प्रत्येक सहाय्यीत कुटुंबाला तीन वर्षामध्ये दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, स्वयंरोजगाराला प्रशिक्षण देणे, विपणनासंबंधी सहकार्य करणे, इ. उद्देश या योजनेचे होते. योजनेमध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे हे प्रमुख लाभार्थी असून, किमान ५०% अनुसूचित जाती व जमाती, ४०% महिला व ३% अपंग स्वयंरोजगारांना लाभ देणे बंधनकारक आहे. या योजनेत ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासन निधीचा पुरवठा करते.[८९]

या योजनेच्या माध्यमातून तासगाव शहरातील बचत गट स्थापून या गटांनी राष्ट्रीय बँकामार्फत अल्पदरात कर्ज पुरवठा केला जातो. तसेच त्यांच्या मार्फत छोटे छोटे लघु उद्योग सुरू करण्यात आले आहेत. या योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील किमान १० व जास्तीत जास्त २० व्यक्तींना एकत्र येऊन बचत गट स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले आहे. विशेषतः महिला बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. या बचतगटातून महिलांचे सबलीकरण करणे, त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करणे हा हेतू या योजनेचा आहे. त्यानुसार सन २००१ ते २००९ या काळात दारिद्र्यरेषेखालील एकूण ५० महिला बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी ३० बचत गटांना खेळते भांडवल पुरविले आहे.[९०]

## ६.१५ शहरातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची स्थिती

वार्षिक उत्पन्न १२,००० रू. पेक्षा कमी असणाऱ्या कुटुंबाचा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात समावेश होतो. शहरात १९९१ च्या जनगणेनुसार २९,००० लोकसंख्येपैकी तासगाव शहरातील ६,४३२ कुटुंबापैकी दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती १७७ कुटुंबे व अल्पसंख्यांक १६७ एकूण १,३१७ कुटुंबे आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची टक्केवारी २५.८२ आहे.[९१]

## ६.१६ धान्य पुरवठा संस्था

तासगाव तालुक्यात २००१ च्या जनगणनेनुसार रास्तभाव दुकानाची संख्या ९४ इतकी होती. शहरात १४ रास्तभाव दुकाने आहेत. शहरात धान्य गोडावून असून, शहराला पुरेल एवढे धान्य या गोदामात असते. या धान्य गोदामातून तालुक्यात धान्यसाठा वितरीत होत असतो.

## ६.१७ वाहतूक व दळणवळण

दळणवळण साधनाच्या आर्थिक विकासावर फार मोठा परिणाम होतो. विविध ठिकाणच्या आर्थिक गरजांची पूर्तता या साधनांमुळे होते. आर्थिक विकासाचा समतोलपणा साधण्यासाठी दळणवळण उपयोगी पडते. तसेच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने दळणवळणाला महत्त्वाचे स्थान आहे.

तासगाव परिसर ग्रामीण भागात मोडत असल्याने शेती व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अशा ग्रामीण भागाचा आर्थिक विकास हा शेतमालाचे उत्पादन वाढविणे आणि त्यास किफायतशीर बाजारपेठा उपलब्ध करून देणे यावर अवलंबून आहे. शेतमालाचे अधिक उत्पादन, सुधारित बी-बियाणे, खते, अवजारे, शेतीच्या नवनवीन शास्त्रीय पद्धती यांच्या साह्याने करता येते. परंतु बाजारपेठा जरी उपलब्ध केल्या तरी त्या बाजारपेठापर्यंत शेतमाल घेऊन जाण्यासाठी दळणवळणाच्या दृष्टीने वर्षभर उपयोगी पडतील, अशा रस्त्यांची नितांत गरज असते. याच जाणिवेतून स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागातील ररत्याच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले गेले.[९२]

तासगाव तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे सांगली हे जिल्ह्याचे ठिकाण २८ कि. मी. अंतरावर आहे. तसेच विटा, आटपाडी, खानापूर अशा विविध तालुक्यांना हे शहर पक्के व कच्च्या रस्त्यांनी जोडलेले आहे. शहरापासून ७ कि. मी. अंतरावर भिलवडी रेल्वे स्टेशन आहे. तर अवघ्या २८ कि. मी अंतरावर मिरज जंक्शन रेल्वे स्टेशन आहे. तसेच ४० कि.मी. अंतरावर राज्य महामार्ग असून तो पूर्वेला पूणे-बेंगलोर महामार्गाला व पश्चिमेला मुंबई-गोवा महामार्ग जोडला गेला आहे.[९३]

# संदर्भग्रंथ


१. पाडळकर विजय विष्णू 'स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास' पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,डिसेंबर २००८, पृष्ठ. ४८८.

२. वरेकर एस. ए., 'सातारा शहराचा वाढ विस्तार' पीएच. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डिसेंबर २००७ ,पृष्ठ. १३०.

३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३१.

४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र सांगली व A socio-economic review abstract, Sangli district, 2011, Page 64.

५. 'लोकराज्य' मासिक एप्रिल २०१२, पृष्ठ. ५.

६. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई,१९८९ पृष्ठ १९१.

७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३९.

८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २४०.

९. मजुर सोसायटी तासगाव मजुर दर वार्षिक फाईल नं. ४.

१०. मुलाखत, कलावती दामू यादव, वय ८० दि. १२/८/२०११, सकाळी १० वा.

११. A socio-economic review abstract, Sangli district, 2010, Page 143.

१२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १४४.

१३. मुलाखत, श्री. पाटील पी. डी. माजी अध्यक्ष मजूर सोसायटी तासगाव.

१४. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९,पृष्ठ. ५३३, ५३४.

१५. मुलाखत, सौ. रजनीगंधा धनपाल लंगडे माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष तासगाव. दि. २१/१२/२०११, दुपारी ३ वा.

१६. मुलाखत, श्री. संतोष सदाशिव साठे वय ४५, दि.२३/५/२०११, दुपारी २ वा.

१७. मुलाखत, श्री.पाटील एस.डी. पोट्री व्यवसायिक तासगाव दि. १/२/२०१०, दु. १२ वा.

१८. A socio-economic review abstract, Sangli district, 2011,Page 100

१९. 'तासगाव तालुक्याचा द्राक्ष शेतीचा आर्थिक इतिहास,' चंद्रकांत गोविंद पाटील पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डिसेंबर २००७, पृष्ठ ९.

२०. कृषिभूषण प्र. श. ठाकूर, गौरवग्रंथ भूमिपूत्राचा सांगली, जनशक्ती प्रकाशन सांगली ,पृ. ५५.

२१. उपरोक्त कित्ता.

२२. दै. सकाळ, सांगली TODAY बुधवार, दिनांक १६ मे २०१२, पृष्ठ १.

२३. उपरोक्त कित्ता.

२४. उपरोक्त कित्ता.

२५. P.S.Thaker‘ Project proposrd for improving Grape industry in Maharastra, P.2

२६. उपरोक्त कित्ता.

२७. कृषिभूषण ठाकूर, प्र. श. गौरवग्रंथ भूमिपूत्राचा सांगली, जनशक्ती प्रकाशन सांगली, पृ. ६०.

२८. उपरोक्त कित्ता.

२९. द्राक्षमहर्षि, ‘कृषिभूषण’ वसंतराव आर्वे(आण्णा) षष्ठाब्दिपूर्ती गौरव अंक ५ जून २००३, पृष्ठ. १.

३०. उपरोक्त कित्ता.

३१. ‘तासगाव तालुक्याचा द्राक्ष शेतीचा आर्थिक इतिहास,’ चंद्रकांत गोविंद पाटील पीएच्. डी प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डिसेंबर २००७, पृष्ठ ९.

३२. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयीन कागदपत्रे व वार्षिक अहवाल २००९.

३३. उपरोक्त कित्ता.

३४. उपरोक्त कित्ता.

३५. उपरोक्त कित्ता.

३६. दैनिक, सकाळ २२ फेब्रुवारी, २०१२, पृष्ठ. ५

३७. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयीन कागदपत्रे व वार्षिक अहवाल २००९.

३८. चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९ पृष्ठ. २३८.

३९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३८.

४०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३९.

४१. मुलाखत, श्री. पाटील पी. डी., माजी अध्यक्ष मजुर सोसायटी तासगाव, वय ७०, दि. १२ सप्टे २०११, सकाळी ११ वाजता.

४२. भूमि अभिलेख कार्यालय सांगली, तुकडे जोड योजना फाईल १ ते १३, १९७४.

४३. A socio-economic review abstract, Sangli district, 2011 Page 126.

४४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १२६

४५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १२७.

४६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १२७.

४७. जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग कार्यालयीन टिप्पणी व तासगाव तलाठी कार्यालयातील बोर्डावरील माहिती.

४८. जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग कार्यालयीन टिप्पणी.

४९. चौधरी कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सांगली जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९ पृष्ठ.१.

५०. जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग कार्यालयीन माहिती पुस्तिका सन २०११.

५१. मुलाखत, राजा लुगडे चिरमुरे व फुटाणे व्यावसायिक तासगाव दिनांक २२ एप्रिल २०१२.

५२. जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग कार्यालयीन माहिती पुस्तिका.

५३. दिवाकर वा. द. 'पेशवेकालीन महाराष्ट्र आर्थिक जीवन मराठ्यांचा इतिहास' खंड २. १९८५ पृष्ठ. ३४५.

५४. A socio-economic review abstract, Sangli district, 2011 Page 123.

५५. जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग कार्यालयीन माहिती पुस्तिका.

५६. उपरोक्त कित्ता.

५७. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल २००९.

५८. दिवाकर वा. द. 'पेशवेकालीन महाराष्ट्र आर्थिक जीवन मराठ्यांचा इतिहास' खंड-२, १९८५ पृष्ठ. ३५६, ३५७.

५९. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल २००९.

६०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. ३७.

६१. दिवाकर वा. द. 'पेशवेकालीन महाराष्ट्र' आर्थिक जीवन मराठ्यांचा इतिहास खंड-२, १९८५ पृष्ठ. ३१४.

६२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. ३२७.

६३. चौधरी, कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ. २२९.

६४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली व सामाजिक आर्थिक समालोचन, सांगली जिल्हा २०११, पृष्ठ १२०.

६५. श्री. वसंतरावदादा दुग्ध व्यवसाय विकास जिल्हा सहकारी संघ मर्यादित तासगाव २१ वा वार्षिक अहवाल सन २००४-०५ पृष्ठ. ३.

६६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १०.

६७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. १०.

६८. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सांगली.

६९. २७ वा वार्षिक अहवाल सन २००६-२००७ सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा, पृष्ठ. २१.

७०. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तासगाव ८४ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन २०१०-२०११, पृष्ठ. ५.

७१. उपरोक्त कित्ता.

७२. दि. तासगाव अर्बन को-ऑफ. बँक लि. तासगाव अमृत महोत्सव स्मरणिका २००१, पृ. ३.

७३. मुलाखत, महादेवराव हिंगमेरे चेअरमन, दि. तासगाव अर्बन को-ऑफ. बँक लि. तासगाव.

७४. उपरोक्त कित्ता.

७५. दि तासगाव अर्बन को-ऑफ. बँक लि. तासगाव अमृत महोत्सव स्मरणिका २००१, पृ. ४.

७६. एल. आय.सी ऑफ इंडिया तासगाव माहिती पुस्तिका.

७७. मुलाखत, बक्षी मिलिंद शाखाधिकारी एल.आय.सी ऑफ इंडिया तासगाव, वय ४०, दि. १२/८/२०११, सकाळी १० वा.

७८. उपरोक्त कित्ता.

७९. साखर आयुक्तालय पुणे व A socio-economic review abstract, Sangli district, 2010 ,Page 199.

८०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २०.

८१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २१.

८२. A socio-economic review abstract, Sangli. district, 2010 ,Page 199.

८३. महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना माहिती पुस्तिका २००१.

८४. उपरोक्त कित्ता.

८५. A socio-economic review abstract, Sangli district, 2008, Page 199.

८६. चौधरी; कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सांगली जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९, पृष्ठ. १२१.

८७. उपरोक्त कित्ता,

८८. 'लोकराज्य' मासिक, एप्रिल २०१२ पृष्ठ. ६०.

८९. A socio-economic review abstract, Sangli district, 2008, Page 190.

९०. मुलाखत, सौ. लंगडे रजनीगंधा धनपाल माजी नगराध्यक्ष नगरपालिका तासगाव, वय ८०, दि. १२.८.२०११, सकाळी ११ वा.

९१. पाडळकर विजय विष्णू स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास' पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसें. २००८, पृ. २५६.

९२. 'लोकराज्य' मासिक, एप्रिल २०१२, पृष्ठ. ६०.

९३. पाडळकर विजय विष्णू 'स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास' पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसें. २००८ पृ. २५६.

**प्रकरण सातवे**

# तासगाव शहरातील राजकीय स्थिती

७.१ प्रस्तावना

७.२ विविध राजकीय पक्षाची स्थिती

७.२.१ काँग्रेस पक्ष

७.२.२ शेतकरी कामगार पक्ष

७.२.३ समाजवादी पक्ष

७.२.४ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन

७.२.५ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

७.३ स्वातंत्र्य चळवळीतील तासगावचे योगदान

७.३.१ तासगावची गजानन व्यायामशाळा

७.३.२ युथ लिगचा प्रभाव

७.३.३ झेंडा चळवळ

७.४ १९३० चा तासगावमधील मिठाचा सत्याग्रह

७.५ तासगावमधील वैयक्तिक सत्यागृह

७.५.१ स्वदेशीचा वापर

७.५.२ सूत कताईचा प्रचार

७.६ मानवेंद्रनाथ रॉय यांची जाहिर सभा उधळली

७.७ रॉयिस्टांची सभा उधळली

७.८ ३, सप्टेंबर १९४२ रोजी तासगावचा मोर्चा

७.९ महात्मा गांधीजींची हत्या.

७.१० जयप्रकाश नारायण यांची तासगावला सभा

७.११ विठ्ठल सखाराम पागे तथा वि. स. पागे यांचे योगदान

७.११.१ राष्ट्रीय चळवळ व शिक्षण

७.११.२ सत्याग्रह, आंदोलने व शिक्षा

७.११.३ सामाजिक कार्य

७.११.४ काँग्रेसचे प्रचारक व शैक्षणिक कार्य

७.११.५ साहित्यातील योगदान

७.११.६ रोजगार हमी योजनेचे जनक

७.११.७ विधान परिषदेचे सभापती

७.१२ स्वातंत्र्य सैनिक, माजी आमदार भाई गणपतराव कोळी

७.१२.१ स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारक

७.१२.२ राजकारणातील दबदबा

७.१३ ना. आर. आर. (आबा) पाटील तथा रावसाहेब रामराव पाटील

७.१३.१ जन्म, बालपण व शिक्षण

७.१३.२ काँग्रेसचे प्रचारक व राजकारणात प्रवेश

७.१३.३ डांन्सबार बंदी

७.१३.४ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

७.१३.५ तंटामुक्त गाव योजना

७.१३.६ विकास योजनेत योगदान

१. आरफळ कालवा

२. ताकारी म्हैशाळ योजना

३. टेंभू योजना.

४. सुसज्ज प्रशासकीय इमारती व क्रीडा संकुलाची उभारणी.

५. पोलिस दल व पोलिस प्रशिक्षण केंद्राची उभारणी.

६. वीज वितरण उपकेंद्राची निर्मिती.

७. महिला इंजिनिअरिंग कॉलेज.

८. बेदाणा व्यापाराला चालना

७.१३.७ तासगाव शहराचा विकास

**प्रकरण सातवे**

# तासगाव शहरातील राजकीय स्थिती

## ७.१ प्रस्तावना

मराठेशाही कालखंडात अनेक सरदार राष्ट्रप्रेमाने व सामाजिक बांधिलकीने भारावलेले होते. त्यांनी अनेक संस्थान व परकीय शत्रू विरोधात लढा दिला. त्याला तासगाव अपवाद नव्हते. त्यामध्ये तासगावचे कर्तव्यदक्ष सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या पराक्रमाने उत्तरेकडे दिल्लीपर्यंत व दक्षिणेकडे श्रीरंगपट्टणपर्यंत मराठी साम्राज्याचा दबदबा निर्माण झाला.[१] तासगावमध्ये स्वातंत्र्य प्रेमाने व गांधीजीच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक कार्यकर्ते तयार झाले व ब्रिटीश सत्तेच्या विरोधात अनेक चळवळी झाल्या. तासगाव शहरातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी व राष्ट्रसेवादलातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. वि. स. पागे यांच्या नेतृत्वाखाली अनेक मोर्चे निघाले. अशा तासगाव शहराचा राजकीय  इतिहास सर्वांना परिचित आहे.

प्रस्तुत, प्रकरणात तासगाव शहरातील विविध चळवळी, मोर्चे, राजकीय पक्ष, स्वातंत्र्य चळवळ, सत्याग्रह, वि. स. पागे यांचे योगदान, स्वातंत्र्य सैनिक, माजी आमदार भाई गणपतराव कोळी यांचे कार्य, गृहमंत्री ना. आर. आर. (आबा) पाटील यांचे कार्य, तासगाव शहराचा विकास इत्यादी घडामोडींचा समावेश केला आहे.

## ७.२ विविध राजकीय पक्षांची स्थिती

भारतीय संघराज्यात तासगाव संस्थान १९४९ मध्ये विलीन झाल्यानंतर येथे संघराज्य शासन पद्धतीचा अंमल सुरू झाला.[२] त्याचवेळी तासगावमध्ये राष्ट्रसेवादलात काम करणाऱ्या तसेच सामाजिक बांधिलकीने भारावलेले अनेक कार्यकर्त्यांनी विविध राजकीय पक्षात प्रवेश केला. सुरूवातीच्या काळात प्रामुख्याने तासगाव शहरात काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन इत्यादी प्रमुख पक्ष होते. पुढे एस काँग्रेस, जनता दल, भारतीय जनता पक्ष (भाजप), शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस इत्यादी पक्ष निर्माण झाले. त्यातील काही पक्षाचे अस्तित्व कालांतराने संपुष्टात आले.

## ७.२.१ काँग्रेस पक्ष

१८८५ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व केले. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस हा एक राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वात आला. राष्ट्र सेवादलात काम करणाऱ्या तसेच राष्ट्र प्रेमाने व सामाजिक बांधिलकीने भारावलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात थांबणे पसंत केले.[३]

काँग्रेसने भारताला संपूर्ण स्वराज्य मिळवून देण्याचा व शेतकऱ्यांच्या, कामकऱ्यांच्या हिताचे अनेक कार्यक्रम जाहीर केले होते. म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाने प्रभावित होऊन अनेक उत्साही तरूण पक्षात येत होते. तासगाव तालुक्यात अंकलखोप येथील दत्तोबा सुर्यवंशी, धुळाप्पाण्णा नवले हे बहुजन समाजातील काँग्रेस कार्यकर्ते तयार होत होते. गावागावात काँग्रेस कमिट्या स्थापन करण्यात आल्या. तासगावमध्ये वि. स. पागे, चिंत्तोपंत काळे, धोंडीरामबापू माळी, शं. ज. कुत्ते, श्री. आकाराम थोरबोले, बाबूराव थोरबोले, गणपतराव कोळी, गंगारामबापू पवार, अल्लाबक्ष मुजावर, डॉ. य. कू. जोगळेकर, आर. पी. पाटील, बाबुराव पेंडकर, जोग वकील, दत्ताजीराव सुर्यवंशी इत्यादी कार्यकर्त्यांचा समावेश होता.[४]

१९३८ मध्ये तासगाव तालुक्याचे नेतृत्व वि. स. पागे यांच्याकडे आले. त्यांनी तालुक्यात काँग्रेसची बांधणी केली. काँग्रेस पक्षाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ते सायकलवरून गावोगावी फिरत असत. तसेच काँग्रेस पक्षाचे दैनिक लोकशक्ती पुण्याहून निघत असे. त्याचे संपादक आचार्य श. द. जोगळेकर होते. सर्व तरूणांना एकत्रित बोलवून लोकशक्तीचे अंक जमवून त्याचे वाचन स्वतः पागेसाहेब करीत असत.[५]

काँग्रेस पक्षाची शहरात वाढ खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य व असहकार चळवळीच्या माध्यमातून झाली व पुढे पंचायतराज व्यवस्था निर्माण झाल्या. मध्यवर्ती काँग्रेस पक्षात घडणाऱ्या घडामोडीचे उलथा पालथीचे पडसाद शहरात काँग्रेस शाखेत उमटत होते. त्यावेळी हा तासगाव शहरात एक प्रमुख पक्ष होता.

## ७.२.२ शेतकरी कामगार पक्ष

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस नेतृत्वात सत्ता प्राप्तीसाठी स्पर्धा सुरू झाली. काँग्रेस पक्षावर भांडवलदार, जमीनदार व उच्च कुलीन घराण्यातील लोकांची पकड असल्यामुळे या पक्षात शेतकरी, कामगार व भूमिहीन यांना फारसे स्थान नाही. ही भावना महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या नेत्यात निर्माण झाल्यामुळे त्यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडून १३ जून १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.[६] या पक्षाच्या स्थापनेत केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख, भाऊसाहेब

राऊत, यशवंतराव मोहीते इत्यादी प्रमुख नेत्यांचा समावेश होता.[७] वरील नेत्यांच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या तासगाव परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला.

### ७.२.३ समाजवादी पक्ष

१९३४ सुमारास कॉंग्रेसमध्ये समाजवादी गट निर्माण झाला होता. तो सर्व गट १९४८ मध्ये जयप्रकाश नारायण, अशोक मेहता यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी पक्षात आला व समाजवादी पक्षाची स्थापना झाली. 'समतावादी समाजाची स्थापना करणे' हे या पक्षाचे ध्येय होते.[८] जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या व या गटात तासगावमधील राष्ट्रसेवादलातील अनेक कार्यकर्ते होते. तसेच स्वातंत्र्यसैनिक, माजी आमदार भाई गणपतराव कोळी हे समाजवादी पक्षातर्फे सहा वर्षे आमदार होते.[९]

### ७.२.४ शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्यामप्रसद मुखर्जी यांनी मंत्रिमंडळातून बाहेर पडून १८ जुलै १९४२ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना केली. या पक्षामध्ये दलित कार्यकर्त्यांचा समावेश होता. त्यामुळे या पक्षास मर्यादा होती. पुढे १९५६ नंतर या पक्षाचे रूपांतर रिपब्लिकन पक्षात झाले.[१०] त्यास शहरात अल्प प्रतिसाद मिळाला. पण या येथे प्रामुख्याने अन्नधान्य व सिंचनाच्या व पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर होते. त्यामुळे हा प्रश्न रिपब्लिकन पक्षाने उचलून धरला. त्यातून अनेक राजकीय चळवळी उभ्या राहिल्या. तासगावमध्ये अनेक कार्यकर्ते 'रिपब्लिकन पक्षा'च्या विचारांने प्रभावित होते.[११]

### ७.२.५ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष

कॉंग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजीला कंटाळून शरद पवारांना कॉंग्रेस पक्षामधून काढून टाकले. शरद पवार, पी. ए. संगमा व तारिक अन्वर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची १० जून १९९९ रोजी स्थापना झाली. गेल्या १२ वर्षात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या राजकारणात पक्षाचा प्रचार व प्रसार केला आहे.[१२] राज्यातील अनेक ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच सहकार क्षेत्रातील संस्था राष्ट्रवादीच्या ताब्यात आहेत. सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा महाराष्ट्राच्या राजकारणात अर्धा हिस्सा आहे.

महिलांना प्रथम ३३% आरक्षण नंतर ५०% आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, दुष्काळ, गुटखा व मटका बंदी स्त्री-भ्रूण हत्या, खासदार सुप्रिया सुळे यांचे 'कन्या वाचवा' अभियान, पाणी प्रश्न तसेच अलिकडे 'देऊ उभारी, घेऊ भरारी' हे ब्रीद घेऊन युवती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संघटना निर्माण केली

आहे. यामुळे आगामी काळात युवती व महिला समाजकारण व राजकारणात येऊन महाराष्ट्राच्या राजकारणाची कुस बदलेल अशी अपेक्षा आहे. एकूण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ज्वलंत प्रश्न उचलून धरलेले दिसून येत आहेत.[१३]

## ७.३ स्वातंत्र्य चळवळीतील तासगावचे योगदान

१९२० ते १९३० च्या कालखंडामध्ये काँग्रेस चळवळीचे स्वरूप बदलून महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीस अहिंसक मार्गाने दिशा प्राप्त झाली. महात्मा गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाने आणि दांडी यात्रेच्या ऐतिहासिक पदयात्रेमुळे इंग्रजी राजवटीबद्दलच्या असंतोषाने उच्चांक गाठला.[१४] तासगाव परिसरात वसंतरावदादा पाटील व वि. स. पागे यांच्या नेतृत्वाखाली का. दि. पोक्षे, चिंतोपंत काळे, बाबूराव थोरबोले, आबासाहेब जोग, आकाराम थोरबोले, अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी व राष्ट्रसेवादलातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. या दरम्यान चळवळीमध्ये जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले.[१५] १९३० मध्ये गावकामगार श्री. रा. वि. कुलकर्णी यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन चळवळीत सहभाग घेतला होता.[१६] काही उत्साही कार्यकर्त्यानी केसरीच्या धर्तीवर प्रकाशन संस्था, साप्ताहिक काही काळ चालविली.[१७] १९४२ नंतर क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारच्या प्रतिसरकारचे कार्य प्रभावी होते. सातारच्या प्रतिसरकारचे मूळ केंद्र तासगाव परिसरातील 'कुंडल' हेच होते.

### ७.३.१ तासगावची गजानन व्यायामशाळा

सातारा जिल्ह्यातील तासगाव हे स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख केंद्र होते. या स्वातंत्र्य चळवळीचे बाळकडू देणारी तासगावची गजानन व्यायामशाळा ही आबासाहेब जोग यांनी चालविलेली व्यायामशाळा आहे. या व्यायामशाळेत बलसंवर्धनाच्या प्रशिक्षणाबरोबरच राष्ट्रीय विचारांचे बाळकडू दिले जात होते. तसेच या शाळेचा राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या, राष्ट्रीय विचाराचे तरूण कार्यकर्ते निर्माण करण्यात मोठा वाटा आहे. आबासाहेब जोग यांनी गजानन व्यायामशाळेच्या माध्यमातून राष्ट्रवादी तरूणांचे संघटन केले.[१८] या शाळेत तयार झालेल्या अनेक कार्यकर्त्यांमध्ये वि. स. पागे, का. दि. पोक्षे, चिंतोपंत काळे, बाबुराव थोरबोले, आकाराम थोरबोले, गणपतराव कोळी इत्यादी अनेक कार्यकर्ते तयार झाले. त्यांच्यावरती इंग्रजांची करडी नजर होती. पुढे ही व्यायामशाळा ब्रिटीश सरकारने बेकायदेशीर ठरवून बंद केली व आबासाहेब जोग यांना अटक केली.

## ७.३.२ युथ लिगचा प्रभाव

१९२८ साली भारतात ब्रिटीश सरकारचे सायमन कमिशन आले होते. त्यावर काँग्रेसने बहिष्कार घातला. युथलिगच्या चळवळीच्या प्रभावाने सायमन कमिशनसमोर निदर्शने करण्याची चळवळ सुरू झाली. 'सायमन गो बॅंक' च्या घोषणा घुमू लागल्या, लाहोर येथे लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या प्रचंड मोर्चावर 'सॅण्डर्स' नावाच्या पोलिस अधिकाऱ्यांने निर्घृण लाठीमार केला. त्यामध्ये लाला लजपतराय गंभीर जखमी झाले व पुढे त्यांचे निधन झाले. या घटनेचा तरूणांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. शहिद भगतसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी 'सॅण्डर्स' ची हत्या केली. त्याच पार्श्वभूमीवर तासगाव सांगली येथे एक दिवस बंद पाळण्यात आले. तासगावमधील 'तासगाव हायस्कूल तासगाव'च्या विद्यार्थ्यांनी शाळा बंद ठेवून आपला निषेध व्यक्त केला होता. १९२९ मध्ये लाहोर येथे काँग्रेस अधिवेशन भरले. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतात संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. '२६ जानेवारी' हा दिवस भारतीयांनी स्वातंत्र्यदिन पाळावा असा ठराव पास केला.[१९]

## ७.३.३ झेंडा चळवळ

१९३० च्या लाहोर अधिवेशनानंतर झेंडा चळवळीला सुरूवात झाली. मुंबई मध्ये डॉ. युसुफ मोहोर यांनी उग्र निदर्शनाची चळवळ सुरू केली. पुण्यात श्री. एस. एम. जोशी, काकासाहेब गोरे, आर. खाडीलकर या तरूणांनी फर्ग्युसन कॉलेजवर तिरंगा ध्वज फडकवला. त्यानंतर तासगावमध्ये २६ जानेवारी १९३० रोजी पी. ए. काळे आणि महाविद्यालयातील तरूण विठ्ठल पागे यांनी स्वातंत्र्यदिन साजरा केला.[२०] त्यामध्ये विठ्ठल पागे या विद्यार्थ्याला शिक्षा झाली. या हुशार विद्यार्थ्याला शिक्षा देताना मॅजिस्ट्रेटला फार वाईट वाटले. तसे त्यांनी बोलून दाखविले. त्यावेळी त्यांना २१ दिवसाची शिक्षा अथवा १०० रूपये दंड अशी शिक्षा केली. पण थोड्या दिवसांनी एका दयाळू गृहस्थाने त्यांचा दंड भरून सुटका केली.[२१]

सातारा येथे स्वयंसेवक प्रशिक्षण झाले. त्यामध्ये २,००० कार्यकर्ते हजर होते. शाहीर मंडळाच्या वतीने कार्यक्रम झाला. त्यातून झेंडा चळवळीला आणखी वेग आला.[२२] १९३० ला सर्वानुमते ठराव करून तासगावच्या नगरपालिकेवर राष्ट्रीय ध्वज लावण्यात आला. तत्कालीन नगराध्यक्ष श्री. मनोळकर यांनी सहकाऱ्यांच्या मार्फत नगरपालिकेवर तिरंगा फडकावण्याचा ठराव पास केला व अब्दुल कादरभाई मोमीन यांच्या हस्ते तासगाव नगरपालिकेवर तिरंगा फडकवला.[२३] त्याचदिवशी विठ्ठल पागे यांची तासगाव मधील सिद्धेश्वर मंदिरात सभा झाली. तरूण पोरे पेटून उठली. गावातील सिद्धेश्वर मंदिर व हटकेश्वर मंदिरावर राष्ट्रीय ध्वज लावले. दुसऱ्या दिवशी पोलिसांकडून ध्वज काढण्यात आले. गावातील ठिकठिकाणी लावलेली कंदील फोडून टाकाले आणि निषेध केला. या पाठीमागे विठ्ठल पागे यांची प्रेरणा

होती. तासगावमध्ये का. दि. पोंक्षे व तरूणांनी नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा उभारला. त्याचवेळी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजवरती विठ्ठल पागे व सहकाऱ्यांनी तिरंगा ध्वज उभारला. त्यावेळी त्यांना १ महिना साधी कैद आणि १०० रूपये दंड झाला होता. ब्रिटीश सरकारने ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.[२४]

## ७.४ १९३० चा तासगावमधील मिठाचा सत्याग्रह

महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली होती. ब्रिटिशांचे राज्य गरिबांकरिता नाही व गरिबांना जाचक असे कायदे ब्रिटिशांनी केले आहेत ते मोडल्यावर झालेली शिक्षा शांतपणे भोगणे म्हणजे सविनय कायदेभंग, परवाना घेतल्याशिवाय खाजगी रितीने कोणी मीठ बनवू नये असा कायदा होता. महात्मा गांधीजींच्या चळवळीच्या कार्यक्रमामध्ये हा कायदा मोडून कारागृहावास प्रतिकार न करता किंवा बचाव न करता पत्करायचा हा मुद्दा अंतर्भूत केलेला होता. हा कायदेभंग प्रतिकात्मक होता. ही चळवळ देशभरात पसरली. गावोगावी शहरोशहरी मोर्चे व प्रचाराच्या सभा व्हायच्या. सातारा जिल्ह्यातील तासगाव हे तालुक्याचे आणि राष्ट्रीय चळवळीचे मुख्य केंद्र म्हणून ओळखले जात होते. राष्ट्रीय चळवळीमध्ये तासगाव अग्रेसर होते.[२५]

१२ मार्च १९३० ला गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहास सुरूवात केली. या पार्श्वभूमीवर ८ ऑगस्ट १९३० रोजी ऋषीपंचमीच्या मुहूर्तावर हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करून ब्रिटीश सत्तेचा निषेध केला.[२६] तासगावात तरूण विद्यार्थी असलेल्या वि. स. पागे यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. त्यासाठी त्यांनी प्रचार सभा घेतल्या. तासगावमध्ये मिठाचा सत्याग्रह करण्याचे आयोजन केले. त्यामध्ये तासगावचे स्वातंत्र्य सैनिक का. दि. पोक्षे यांनी सभेत मीठ विकले व दुसरे सत्याग्रही दत्तात्रय अभ्यंकर यांनी ते विकत घेतले आणि त्यानंतर त्यांना अटक झाली. त्या घटनेनंतर सरकारने सभाबंदी जाहीर केली. पुढील काळात त्यानंतरच्या सभेचे अध्यक्ष होण्यास कोणीच तयार होईना, अशी समस्या अनेक कार्यकर्त्यांनी विठ्ठल पागे याच्या समोर मांडली.[२६] त्यामध्ये श्री. आकाराम थोरबोले, श्री. गणपतराव कोळी ह्या तरूणांचा समावेश होता. त्यानंतर विठ्ठल पागे यांनी सिद्धेश्वर मंदिर (तासगाव) येथे दमदार भाषण केले. त्या भाषणाने प्रभावित होऊन उपस्थित असलेल्या तरूणांपैंकी १०१ तरूण पुढे आले आणि विठ्ठल पागे यांनी मांडलेली १०१ अध्यक्षांची कल्पना उचलून धरली. १०१ तरूण हे त्या दिवशीच्या सभेचे अध्यक्ष होण्याच्या रांगेत उभे राहिले आणि पुन्हा एकदा मिठाचा सत्याग्रह त्या सभेमध्ये केला. त्यावेळच्या सत्याग्रहामध्ये राम जोगळेकर, गणपत शंकरराव खात्री, आकाराम थोरबोले, गणपतराव कोळी, बाबुराव थोरबोले, दत्तात्रय अभ्यंकर, रामचंद्र बोडके वकील इ. स्वातंत्र्य चाळवळीतील तरूण होते.[२७]

या सत्याग्रहाबाबत लोकांच्यात प्रचंड उत्सुकता आणि भितीचे वातावरण होते. आता अटक होणार, समोर पोलिसांचा पहारा होता. या सभेसाठी एक ते दीड हाजार लोकांची उपस्थिती होती. तरूणांचा उत्साह व लोकांची असलेली उपस्थिती यामुळे कोणीही पोलिस सत्याग्रहींना अटक करण्यासाठी पुढे आला नाही. कोणासही अटक न होता सत्याग्रह पार पडला. परंतु काही दिवसांनी कायदेभंगाच्या गुन्ह्याखाली सभा घेणे, मिरवणुकीत सहभागी होणे या गुन्ह्याबद्दल विठ्ठल पागे यांना दोन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. तासगावमधील तरूणांचे नेतृत्व विठ्ठल पागे यांच्याकडे आले होते. तुरूंगातून आल्यावर त्यांनी गजानन व्यायाम शाळेतील तरूणांना कुस्तीमध्ये प्रोत्साहन दिले, लाठी प्रचाराला प्रोत्साहन दिले आणि दारू गुत्यावर पिकेटिंग करणे यासारख्या चळवळीला प्रोत्साहन दिले.[२८] तसेच तासगावचे माळी, अल्लाबक्ष लतीफ, चित्तोपंत काळे, दत्तात्रय अभ्यंकर, श्री. का. दि. पोक्षे, आबासाहेब जोग इत्यादी कार्यकत्यांनी गावातून घोषणा देत प्रभातफेऱ्या काढत असत. या प्रभात फेऱ्यामध्ये शाळेतील मुले व मुलींना सहभागी करून घेत. गावातील लोकांना सुर्योदयापूर्वी स्वराज्याची हाक देत. अशा प्रभात फेऱ्यात राष्ट्रीय सभेच्या झेंड्याचे वंदन करणे हा तर प्रभात फेऱ्यांचा नित्य कार्यक्रम होता.[२९]

## ७.५ तासगावमधील वैयक्तिक सत्यागृह

भारतात वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही विनोबा भावे यांनी 'पवनार' येथे युध्दविरोधी भाषण करून सत्याग्रह केला. शंकरराव देव त्यावेळी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष होते. सातारा जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह करण्यास पात्र असलेल्या सत्याग्रहींच्या नावाची यादी महात्मा गांधींना सादर केली. वैयक्तिक सत्याग्रह करणारा काँग्रेसचा क्रियाशील सदस्य असावा, तो खादीचा वापर करणारा, खोटे न बोलणारा, दारू न पिणारा, जेलमध्ये नियमाप्रमाणे वागणारा असावा व अशाच कार्यकर्त्यांची निवड केली जाई.[३०] वि. स. पागे यांनी तासगाव तालुक्याची काँग्रेस पक्षाची बांधणी मजबूत केली. तालुक्यातील गावागावातील तरुण कार्यकर्ते शोधून त्यांना संघटित केले व अनेक तरूण सत्याग्रहींची नावे जिल्हा काँग्रेस कमिटीने मंजूर करून घेतली. सातारा येथे भाऊसाहेब सोमण व तात्यासाहेब साठे यांनी सत्याग्रह केला. कुपवाडला आर. पी. पाटील यांनी धामणी येथे, गंगाराम पवार यांनी येळावी येथे, वसंतदादा पाटील यांनी बिसूर येथे, धुळाप्पाण्णा नवले यांनी भिलवडी येथे तर वि. स. पागे यांनी तासगावला सत्याग्रह केला.[३१] सत्याग्रहाच्या सुरूवातीला पागे यांनी एक तास आवेशपूर्ण भाषण दिले. त्यामध्ये अहिंसा, काँग्रेसचे धोरण स्पष्ट केले. त्यांचे हे भाषण तरूणांना स्फूर्तिदायक होते. त्यानंतर तासगावचा सत्याग्रह त्यांनी सिद्धेश्वर मंदिरात सभा घेऊन केला. सत्याग्रहानंतर लगेचच त्यांना अटक झाली. एक उच्च विद्याविभूषित वकील देशसेवेचे वृत घेऊन स्वेच्छेने कारावास स्विकारतो, ही घटना तासगावकरांना प्रेरणादायी होती.[३२] वैयक्तिक सत्याग्रहींना अटक

झाल्यानंतर वि. स. पागे, स्वामी रामानंद भारती, वसंतरावदादा पाटील, धुळाप्पाण्णा नवले, गंगाराम पवार, आर. पी. पाटील या सर्वांना कराडच्या एकाच तुरूंगात ठेवले होते. त्यावेळी त्यांना सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.[३३]

श्री. वि. स. पागे, वसंतरावदादा पाटील, गंगाराम पवार, धुळाप्पाण्णा नवले, आर. पी. पाटील यांनी तालुकाभर तासगाव, बिसूर, येळावी, भिलवडी, धामणी येथे वैयक्तिक सत्याग्रह केले.

## ७.५.१ स्वदेशीचा वापर

महात्मा गांधीजींनी देशभर परदेशी वस्तूंचा वापर करू नये यासाठी आंदोलन चालू केले. वि. स. पागे, का. दि. पोंक्षे, गंगाराम बापू पवार, चिंतोपंत काळे, गणपतराव कोळी यांनी दिनांक ६/५/१९३० रोजी तासगावमध्ये घोषणा देत मिरवणूक काढून विदेशी कापडाची लादी व काही परदेशी वस्तू एका गाढवावर लादून त्यांची मिरवणूक काढून कापूर ओढ्यात नेली. तेथे परांजपे वकीलांनी डोक्याला टोपीमध्ये लावलेल्या काळ्या फिती होळीत जाळून टाकल्या.

वि. स. पागे, का. दि. पोंक्षे, गंगाराम बापू पवार, चिंतोपंत काळे, गणपतराव कोळी, गंगाराम कुंभार यांच्या मदतीने तासगावमध्ये घरोघरी खादीचा प्रचार केला. त्यामुळे कायदेभंगाचे प्रचारक गावोगावी निर्माण झाले.[३४]

## ७.५.२ सूत कताईचा प्रचार

यावेळी देशभर राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी तरूणांत चढाओढ लागली. शालेय विद्यार्थ्यांचा मोठा गट तयार होत होता. १९३८ मध्ये सातारा येथे वीर नरीमन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी परिषद झाली. त्यावेळी विद्यार्थी परिषदेमध्ये स्वावलंबनाने स्वराज्य मिळविण्यावर भर देण्यात आला. सूत कताईचा उपक्रम स्वावलंबनासाठी योग्य असल्याचे सांगितले. तासगाव तालुक्यात राजकीय परिषद कार्यक्रम जाहीर केला. तासागाव येथे लोक संघाच्या उपक्रमाद्वारे सूत कताईची मोहिम सुरू केली. सुतकताईचा प्रयोग करून दाखवण्यापासून ते त्यांच्या गावोगावी जाऊन प्रचार व प्रसार करण्यावर भर देण्यात आला होता. सत्याग्रह चळवळीचे प्रमुख बुवासाहेब गोसावी होते. गावागावात कधी सायकलवरून तर कधी पायी फिरून प्रचार केला जात होता. यामध्ये वि. स. पागे, का. दि. पोक्षे, चिंतोपंत काळे, इत्यादी नेत्यांचा समावेश होता.[३५]

## ७.६ मानवेंद्रनाथ रॉय यांची जाहीर सभा उधळली

बिहार प्रांतातील जागतिक किर्तीचे नेते मानवेंद्रनाथ रॉय यांची जाहीर सभा सन १९३९ साली तासगाव येथे आयोजित केली होती. रशिया आणि चीन या देशामध्ये झालेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट क्रांतीचे नेते लेनिन, स्टॅलीन व माओ यांच्याबरोबर मानवेंद्रनाथ रॉय यांचा सहभाग होता. या दोन देशात क्रांती झाल्यानंतर रॉय भारतात आले आणि कॉंग्रेस पक्षात राहून स्वातंत्र्य लढ्याचे काम करू लागले. कॉंग्रेस पक्षात भांडवलदार व पुरोगामी असे दोन विचार प्रवाह होते. परंतु मानवेंद्रनाथ रॉय पुरोगामी, डाव्या विचाराचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळे कॉंग्रेस पक्षात आणि जनतेत ते आपले पुरोगामी विचार मांडत. त्याचबरोबर कॉंग्रेस पक्षात पुरोगामी विचार प्रवाह तयार झाला. महाराष्ट्रात लक्ष्मणशास्त्री जोशी, यशवंतराव चव्हाण, बाबुराव शेंडगे, लोकसत्ताचे संपादक ह. रा. महाजन व आत्मारामबापू पाटील हे रॉय यांच्या विचाराचे होते.[३६]

तासगाव येथे पटवर्धन वाड्यात मानवेंद्रनाथ रॉय यांची सभा होती. ज्या दिवशी सभा होती त्यादिवशी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्टेजवर लक्ष्मणशास्त्री जोशी, यशवंतराव चव्हाण व आत्मारामबापू पाटील होते. मानवेंद्रनाथ रॉय यांनी भाषणाला सुरूवात केली. भाषणात त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी गांधीजींचे नेतृत्त्व आणि त्यांचा अहिंसेचा मार्ग याबद्दलचे आपले मतभेद मांडले. गांधीजींबद्दलचे रॉय यांचे बोलणे बहुसंख्य शेतकऱ्यांना आवडले नाही. नाना पाटील संतापून उठले आणि स्टेजच्या बाजूने सरासर वर चढून रॉय यांच्या अंगावरून धावून गेले. स्टेजवरील इतर पुढाऱ्यांनी रॉय यांना गराडा घातला व नाना पाटलांना दूर करण्याचा प्रयत्न केला. नाना पाटलांचा संताप पाहून स्टेजवरील नेत्यांनी रॉय यांना गाडीत घालून जी. आर. गुजर वकील यांच्या घरी नेले. अशा रीतीने त्यांची सभा उधळली गेली.[३७]

मानवेंद्रनाथ रॉय या जागतिक किर्तीच्या नेत्याच्या जीवनाला तासगावच्या सभेपासून उतरती कळा लागली आणि पुढील काळात त्यांनी कॉंग्रेस पक्ष सोडून 'नवमानवतावादी पक्ष' स्थापन केला.

## ७.७ रॉयिस्टांची सभा उधळली

एप्रिल १९४० च्या रायगड अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्यासाठी घटना परिषदेची मागणी केली गेली. 'दुसरे महायुद्ध हे लोकशाहीच्या रक्षणासाठी आहे' अशी समज कॉंग्रेसला देऊन ब्रिटीशांनी कॉंग्रेसच्या मागण्यास बगल दिली होती. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रवादी तरूण कायदेभंग करण्यास उत्सुक झाला होता. जून १९४० मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनी सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यात कॉंग्रेसच्या आग्रही भूमिकेचा

पुरस्कार केला. त्याचवेळी रावसाहेब पटवर्धन यांना कायदेभंगाबद्दल एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली.[३८]

देशात महात्मा गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. परिस्थिती चिघळू नये म्हणून व्हॉईसरॉय यांनी वसाहतीच्या स्वराज्याची घोषणा केली. परंतु तिचा काहीही उपयोग झाला नाही. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ पडला होता. त्यामुळे शेतकरी चिंतेत होता. त्याच सुमारास युरोपमध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. या महायुद्धाबद्दल काँग्रेसमध्ये दोन विचार प्रवाह होते. काँग्रेसमधील रॉयवादी गटाला या महायुद्धाबद्दलचे काँग्रेसचे धोरण नापसंत पडल्यामुळे तो गट काँग्रेसमधून बाहेर पडला. त्याकाळात अनेक तरूणांच्या मनावर रॉयवादी मंडळीचा प्रभाव होता. परंतु रॉयवादी विचाराला विरोध करणारे अनेक तरूण होते. त्यामध्ये वि. स. पागे व यशवंतराव चव्हाण होते.[३९] युद्धास मदत करावी म्हणून रॉयिस्ट प्रयत्नशील होते. तासगावमध्ये रॉयिस्टांच्या वतीने बोलविलेली सभा नाना पाटील, वि. स. पागे यांनी उधळून लावली.[४०]

## ७.८ ३ सप्टेंबर, १९४२ रोजी तासगावचा मोर्चा

१९४२ च्या 'छोडो भारत' या राष्ट्रीय चळवळीला भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात महत्वाचे स्थान आहे. १९४२ च्या आंदोलनात सातारा जिल्ह्याचा आक्रमक होता. त्याचाच एक भाग म्हणून मोर्चात संपूर्ण सातारा जिल्हा चळवळीत सहभागी झाला. ही चळवळ ग्रामीण भागात घराघरात पोहचली. तासगावचा मोर्चा हा स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक घटना होती. तासगावचा मोर्चा गांधी तत्त्वज्ञानाप्रमाणे अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झालेला मोर्चा होय.[४१] या मोर्चाचे नेतृत्व कोणी एका व्यक्तीने केलेले नसून जनतेचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसाद हा देखील तितकाच महत्वाचा आहे. या घटनेचे दूरगामी परिणाम ब्रिटिश सत्तेवर झाला. या मोर्चामुळे ब्रिटीश प्रशासनाला सतर्कतेच्या धोरणाबाबत बदल करावे लागले. या मोर्चात ब्रिटीश अधिकाऱ्यांना गांधी टोपी घालून तिरंगा ध्वज फडकवला होता व युनियन जॅक खाली उतरवला गेला होता.

तासगावच्या मोर्चात वि. स. पागे यांचे योगदान महत्वाचे होते. त्यांनी आपल्या बौद्धिक कौशल्याचा पुरेपूर वापर केला आहे. इंग्रजी सत्तेला या मोर्चाने आव्हान दिले होते. या मोर्चामध्ये अनेक वीर हुतात्मा झाले. तासगावच्या मोर्चाची प्रेरणा घेऊन पाटण, कराड, वडूज व इस्लामपूर येथेही मोर्चे निघाले. येथील मोर्चाच्या तुलनेत तासगावचा मोर्चा हा सर्वाधिक यशस्वी, अभूतपूर्व व शांततेने पार पडलेला मोर्चा म्हणून इतिहासात त्याचा वेगळेपणाचा ठसा आहे.[४२]

## ७.९ महात्मा गांधीजीची हत्या

१९४७ साली भारत स्वतंत्र होऊन भारताची संविधान समिती स्थापन झाली. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि संविधान समितीचे (घटना समिती) सभापती डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते. स्वातंत्र व एकात्मता जोपासणारी भारताची लोकशाही प्रधान घटना निर्माण केली. आशिया खंडात अशी विशाल संसदीय लोकशाही म्हणजे भारताची लोकशाही ठरली. राजकीय दृष्ट्या अखंड भारत म्हणून राहू शकला नाही. कारण हिंदुस्थानच्या उपखंडाची पाकिस्तान आणि भारत अशी विभागणी झाली. ती होत असताना काही देवघेवीचे प्रश्न निर्माण झाले. त्यामध्ये महात्मा गांधी पाकिस्तानला सोयीचे होईल अशा रितीने देवघेव करून प्रश्न सोडविण्यात भारत सरकारला मदत केली. हिंदुत्त्ववाद्यांना नेहमीच वाटत होते की, गांधीजीचा कल हा मुसलमान धार्जिणा आहे. या गैरसमजामध्ये थोडी भर पडून एका हिंदुत्त्ववादी नथुराम घोडसे या अतिरेक्याने महात्मा गांधीजीची हत्या केली. सारे जग हादरले. त्याची भयंकर प्रतिक्रिया महाराष्ट्रात उफाळून आली. अनेक वर्षाचा जुना ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाने हिंसक व विध्वंसक रूप घेतले. देशभर ब्राह्मणाची घरे जाळण्यात आली. जवळजवळ सहा महिने या संहारक घटनांची मालिका सुरू होती. सांगली, कोल्हापूर व सातारा या भागात उग्ररूप धारण केले होते.[४३] स्वातंत्र्यानंतरचा हिंदु-मुस्लिम हिंसाचार तसेच गांधी हत्येनंतर जी सामाजिक परिस्थिती निर्माण झाली, त्यावर तासगावमध्ये वि. स. पागे यांनी जी प्रतिक्रिया दिली, ती या काव्यातून व्यक्त झाली आहे. त्या ओळी आजही स्फूर्तीदायक आहेत. काही ओळी अशा..

*एकच देठ तयावर माझी फुलली दोन फुले,*

*हिंदू आणि मुसलमान ही भारतभूस मुले ।।धृ ।।*

*मुसलिम त्याचा नयनमणि तर, हिंदू त्याचा प्राण,*

*एक आकाशाची मांडी, रविशशि वर हे जाण ।।१।।*

*दोन ह्दयामधी एकच रक्त नि एकच नाडीस्पंद*

*एकच देश, हवा, जल, फल, फुल एक दोघा छंद ।।२।।* [४४]

*कबरस्तान स्मशानही एकच, दोघा एकच माती रान,*

*हाक एक द्या 'आई' म्हणोनी एकत्वे गा गान ।।३।।*

३० जानेवारी १९४८ रोजी निमणी (तासगाव) येथे शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित केला होता. गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी नामदार श्री. यशवंतराव चव्हाण आणि पी. के सावंत हे प्रमुख पाहुणे होते. येरळा नदीच्या वाळवंटात बसलेल्या शेतकऱ्यांसमोर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबधी स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकार कोणते कार्यक्रम हाती घेणार, याबाबत यशवंतराव चव्हाण भाषणात सांगत होते. तेवढ्यात तासगावच्या दिशेने वाळवंटातून स्वातंत्र्य सैनिक श्री. तुकाराम वालचंद शहा व आणखी एक कार्यकर्ता धावत, धापा टाकीत सभेजवळ आले आणि वि. स. पागेजींना म्हणाले, वकील साहेब घात झाला, ‘दिल्लीमध्ये महात्मा गांधीजींची हत्या झाली’ ही बातमी ऐकल्यावर जवळ असलेले श्री. गणपतराव कोळींनी धावत जावून यशवंतराव चव्हाण यांच्या कानात ही बातमी सांगितली. यशवंतरावांनी क्षणात भाषण थांबविले व स्टेजवरून खाली उतरून सोबत पी. के सावंत व इतर प्रमुख कार्यकर्ते तातडीने मोटारीतून मुंबईला रवाना झाले.

अशा थोर महात्म्यांच्या हत्येमुळे जग हादरून गेले होते व तासगावमधील विचारवंतांना जबरदस्त धक्का बसला होता. सर्व कार्यकर्ते आपापल्या घरी परतले. गांधी हत्येपासून तीन दिवस तासगावमध्ये कोणताच अनुचित प्रकार घडला नाही. पण वि. स. पागे जेव्हा सातारा जिल्ह्यामध्ये असंतोष शांत करण्यासाठी बाहेरगावी गेले असताना, तासगावमध्ये काही ठिकाणी जाळपोळ व ब्राह्मण समाजाविरूद्ध असंतोष सर्वत्र पसरला होता. सर्वत्र जाळपोळ, क्रोधाचे व भितीचे वातावरण होते. ही बातमी गणपतराव कोळी व इतर कार्यकर्त्यांनी विठ्ठल पागेजीना जावून सांगितली. वि. स. पागे तातडीने तासगावला परतले. त्यांनी घडलेल्या घटनांची माहिती घेतली व अशा घटना तात्काळ थांबाव्यात म्हणून प्रयत्न केले. ते लोकांना म्हणाले, गांधीजींची हत्या कोणी केली असली तरी त्यात हिंसक मार्गाने आणि अविचारी मार्गाने रागाच्या भरात जे लोक ब्राह्मणांच्यावर हल्ले करतात ते अत्यंत चुकीचे आहे.[४५] कारण हत्येला बळी पडलेले महात्मा गांधी हे अहिंसावादी, शांततेचे पुजारी होते. तेव्हा त्यांच्या जीवनभराच्या तत्त्व निष्ठेविरूद्ध रागाच्या भरात सुडाच्या भावनेने लोक जाळपोळ आणि हिंसाचार हे कृत्य करणे हे गांधीजींच्या अहिंसावादी तत्वज्ञानाला डांबर फासण्यासारखे आहे.

वि. स. पागे यांनी तासगावमध्ये शांतता कमिटी स्थापन केली आणि असे प्रकार थांबावेत यासाठी ते उपोषणाला बसले, तेव्हा गावामध्ये राष्ट्रसेवादलाच्या कार्यकर्त्याच्या सहकार्याने शांतता पथके तयार करण्यात आली. त्यामध्ये तासगावातील चिंतोपंत काळे, सदाशिव कराडे, बाबू परीट, अमृतभाई शहा, आकाराम थोरबोले, बाबुराव थोरबोले, गणपतराव कोळी, मारूती जाधव इत्यादी लोकांचा समावेश होता. यामध्ये सर्वांनी शांतता राखण्यासाठी प्रयत्न केले.

एके दिवशी तासगावच्या दक्षिण बाजूने ब्राह्मणांची घरे जाळण्यासाठी कवठेएकंद या खेड्यातील चाळीस-पन्नास लोक हातात भाले, कुऱ्हाडी व रॉकेलचे डबे घेऊन तासगावकडे येत असल्याचे रात्री गस्त घालणाऱ्या अमृतलाल शाहा, आकाराम थोरबोले, गणपतराव कोळी या राष्ट्रसेवादलातील कार्यकर्त्यांना कळले. तासगावच्या दक्षिणेकडे ओढ्यालगत असलेल्या डॉ. कालगावकर यांच्या वाड्यात ही मंडळी आली. ती सर्वजण चोरीच्या उद्देशाने आली होती. त्या सर्वांना राष्ट्रसेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी अटकाव केला परंतु 'वाड्यातील माणसे बाहेर काढून वाडा जाळावा' असे ठरले. सर्व माणसे घराबाहेर काढली आणि त्यांनी घरातील मौल्यवान वस्तूंचा शोध घेतला.[४६] परंतु त्यांना काही मिळाले नाही. त्यांनी कडब्याच्या पेंड्या दोन खुंटीवर ठेवल्या आणि पेटविल्या व ती सर्व मंडळी लगेच वाड्यापासून दूर निघून गेली. जाताच क्षणी तिथे उपस्थित असलेल्या राष्ट्रसेवा दलातील कार्यकर्त्यांनी कडब्याच्या पेंड्या विझविल्या आणि तो वाडा जाळपोळ व हिंसाचारापासून वाचविला. ही बातमी पागेसाहेबांना जेव्हा समजली तेव्हा 'आपले उपोषण हे सर्व प्रकार थांबल्याशिवाय मागे घेणार नाही.' असे जाहीर केले. ते अतिशय दुःखी झाले. सर्व ब्राह्मण कुटुंबांना मामलेदार कचेरीत सुरक्षित ठेवण्यात आले. तशी व्यवस्था वि. स. पागे यांच्या सांगण्यावरून करण्यात आली. पुढे दोन दिवस उपोषण झाले. तिसऱ्या दिवशी सरकारकडून पाहणी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण हे पार्लमेंटरी बोर्डाचे सेक्रेटरी आणि मोरारजी देसाई तासगावला आले. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते वि. स. पागे यांनी आपले उपोषण सोडले. सर्व तासगाव तालुक्यात शांतता निर्माण झाली. वि. स. पागे व राष्ट्रसेवा दलातील कार्यकर्त्यांमुळे तासगावमध्ये कोणतीही जीवीत आणि वित्तहानी होऊ शकली नाही.[४७]

## ७.१० जयप्रकाश नारायण यांची तासगावला सभा

भारत स्वतंत्र झाल्यानंतर कॉंग्रेस पक्षात पंडित नेहरूशिवाय सर्व भांडवलदारी विचारांचा प्रवाह असल्यामुळे कॉंग्रेस पक्ष सोडून स्वतंत्र अखिल भारतीय समाजवादी पक्ष स्थापन करण्याच्या विचारांचा प्रचार करण्यासाठी जयप्रकाश नारायण यांनी भारत देशाचा दौरा सुरू केला. या दौऱ्यामध्ये गणपतराव कोळी यांनी तासगाव येथे जाहीर सभा आयोजित केली. त्यावेळी तासगावमधील सेवादलातील कार्यकर्ते अरविंद शहा यांनी सायकलवरून फिरून पत्रके वाटली. जयप्रकाश नारायण यांच्या सभेला प्रचंड जनसमुदाय जमणार असल्यामुळे परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या राजवाड्यात सभा आयोजित केली होती.[४८] जयप्रकाश नारायण सभास्थानी आल्यावर त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी प्रभादेवी, नानासाहेब गोरे, तासगावमधील वि. स. पागे, धुळाप्पा नवले, चिंतोपंत काळे, बाबुराव थोरबोले, गणपतराव कोळी व तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष आदमसाहेब पैंलवान व कोल्हापूरचे रत्नाप्पा कुंभार इ. नेते होते. या सभेत भारतात शेतकरी, कामगार व श्रमिक जनतेच्या हितासाठी समाजवादी व समतावादी सरकार सत्तेवर आले

पाहिजे आणि हे सरकारच देशातील आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करू शकेल. आजच्या कॉंग्रेसमध्ये भांडवलदारांच्या पाठीराख्यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे पुरोगामी विचारांच्या कॉंग्रेसमधील कार्यकर्त्यांला समाजवादी समाज व्यवस्था स्थापन करता येणार नाही. म्हणून पक्षाचे सरकार का आले पाहिजे या संबधी जयप्रकाश नारायण यांनी आपले प्रभावी मत प्रकट केले.[४९]

सभा संपल्यावर तासगाव येथे स्वातंत्र्य भवनाची इमारत बांधण्यासाठी गणपतराव कोळी व इतर कार्यकर्त्यांनी पटवर्धनांना विनंती केली. नारळीच्या बागेजवळची जागा द्यावी. त्यांनी ते मान्य केले व त्यावेळी जयप्रकाश नारायण यांच्या हस्ते सदर नारळीच्या बागेजवळील जागेवर स्वातंत्र्य भवनाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले. त्यासाठी एका समारंभात चांदीच्या लहानशा कुदळीचा जाहीर लिलाव करण्यात आला. सदर कुदळ परशुराम लायन सर्कसचे मालक श्री. विश्वनाथराव माळी यांनी सात हजार रूपयांना घेतली.[५०]

## ७.११ विठ्ठल सखाराम पागे तथा वि. स. पागे यांचे योगदान

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या कालपटलावर ज्याचे ठसे उमटतात ज्याचे कर्तव्य अनन्यसाधारण असते. ज्यांची कर्मभूमी तासगाव असलेली वि. स. पागे हे अशा असामान्यापैकीच एक होते. आधुनिक महाराष्ट्राच्या समाज सुधारकापैकी वि. स. पागे एक होते. महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, साहित्यिक, वारसा त्यांनी पुढे नेण्याचे काम त्यांनी केले. राजकीय जीवनात त्यांनी महाराष्ट्राला उच्च स्थानी नेले. राष्ट्रीय मुल्यांवर त्यांची डोळस श्रद्धा होती. गरीब, मागास अशा सामान्य जनतेलाही आत्मविश्वास जागविण्याचे आणि त्यांच्या जागृत कर्तृत्वातून आधुनिक महाराष्ट्राची पाया भरणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले. २० व्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रगतीच्या क्षेत्रात त्यांच्या विचारांचा ठसा उमटलेला दिसतो. त्यांच्या महान कर्तृत्वाचा ठसा भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत उमटलेला आहे. त्यांनी आर्थिक, सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न केले. वि. स. पागे हे प्रखर देशाभिमानी, स्वातंत्र्य सेनानी, सुसंस्कृत राजकारणी, गांधीवादी विचारांचे जेष्ठ प्रणेते, क्रियाशील विचारवंत, 'नाहिरे आणि आहे रे' च्या वर्गातील दरी कमी करण्यासाठी प्रयत्नपूर्वक यश मिळविले. 'नाही रे' च्या वर्गाला भाकरीची हमी देणाऱ्या व साऱ्या देशाला आज पथदर्शी व आदर्शवत असलेली रोजगार हमी योजनेचे जनक, स्वातंत्र्य सैनिकांच्या समस्या सोडविणारे पितृतुल्य पालक, तळागाळातील जनतेची दुःखे जाणून ती हलकी करणारे संवेदनाक्षम नेते, संसदीय मूल्यांची जपणूक करणारे निष्णात संसदपटू, जेष्ठ पिठासन अधिकारी, ज्ञानेश्वरी आणि संत वाङम्याचे भाष्यकार, संस्कृत भाषेचे भारतीय तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, सिद्धहस्त शिक्षक, प्रखर बुद्धीमत्ता असलेले विद्वान वि. स. पागे होते. मराठी, हिंदी, संकृत, इंग्रजी, बंगाली भाषेवर प्रभुत्व असलेले बहुभाषिक व्यक्तिमत्त्व म्हणजे वि. स. पागे होते.[५१]

महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या आर्थिक, सामाजिक, वैचारिक क्षेत्रात महत्वपूर्ण ठसा उमटवला होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची त्यांनी आयुष्यभर जोपासना केली. राजकारणाला विशेष महत्व न देता समाजकारणाला महत्व दिले. त्यासाठी लोक जागृती व लोकशिक्षण घडवून आणले.

## ७.११.१ राष्ट्रीय चळवळ व शिक्षण

राष्ट्रीय चळवळीमध्ये शिक्षण घेत असताना उडी घेतली होती. शिकत असताना त्यांनी अनेक खडतर परिस्थितीशी झुंज देत आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठी अनेक ठिकाणी जावे लागले. परंतु शिक्षणाचे आणि देश सेवेचे  व्रत अखंड जोपासले. शैंक्षणिक कारकिर्दीत अनेकवेळा तुरूंगवास भोगावा लागला. विलक्षण बुद्धीमत्ता असलेला विद्यार्थी म्हणूत ते शिक्षक प्रिय, विद्यार्थी प्रिय होते. त्यांच्यातील गुणाला शैंक्षणिक वयातच सुरूवात झाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये प्रामुख्याने त्यांचे वडिल सखाराम पागे, आई सरस्वती पागे, वडील व बंधू यांचा मोठा वाटा होता.[५२] त्यांच्या संस्कारांचा आणि आदर्श विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्याबरोबर आयुष्यात सचोटी, प्रामाणिकपणा, काटकसर, निर्भयता, ज्ञानसंचय व अध्यायनाची आवड, साहित्य निर्मितीत पारंगत अशा विविध पैलू व कलागुणांनी समृद्ध त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये जडणघडण होत गेली.

वि. स पागेच्या शालेय जीवनापासून राष्ट्रीय चळवळीचे बाळकडू मिळाले. ते कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये असताना लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय चळवळीचा व त्यांच्या चरित्राचा विलक्षण प्रभाव त्यांच्यावर पडला होता. परंतु १९२० नंतर गांधी युगास प्रारंभ झाला आणि पुन्हा म. गांधीजींच्या राजकीय चळवळीकडे विठ्ठल पागे वळले आणि राष्ट्रीय चळवळ ही त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. वि. स. पागे यांनी बिकट परिस्थितीत वकिलीचे शिक्षण घेतले. जम बसलेल्या वकिली व्यवसायात त्यांचे मन रमले नाही. पुन्हा ते राष्ट्रीय कार्यासाठी स्वातंत्र्य चळवळीत उतरले. त्यामुळे त्यांची दारिद्र्याने पाठ सोडली नाही. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून वि. स. पागे घडले.[५३]

## ७.११.२ सत्याग्रहे, आंदोलने व शिक्षा

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या विचाराने भारावलेले व त्यांच्या प्रभावाने प्रेरित झालेले विठ्ठल पागे महाविद्यालयात असताना १९३० मधील झेंडा चळवळीमध्ये सहभाग घेतला आणि विलिंग्डन महाविद्यालयावरती तिरंगा ध्वज फडकवून त्यांनी आपले देशप्रेम व्यक्त केले.[५४] त्यासाठी त्यांना शिक्षा झाली. विठ्ठल पागे यांनी मिठाच्या सत्याग्रहामध्ये सहभाग घेतला आणि सभेसाठी एकशे एक तरूण अध्यक्षांची कल्पना यशस्वी केली. काँग्रेसचे प्रचारक विठ्ठल पागे यांचा संपर्क जिल्ह्यातील काँग्रेस नेत्याशी

आला. त्यानंतर विठ्ठल पागे तासगाव काँग्रेसचे नेतृत्त्व करू लागले. वैयक्तीक सत्याग्रहातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

तासगाव येथे वैयक्तिक सत्याग्रह केला. यासाठी त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली. १९४२ च्या आंदोलनात विठ्ठल पागे यांचा तासगाव मोर्चात महत्वपूर्ण सहभाग असल्याने ब्रिटिशांची करडी नजर त्यांच्यावर होती.[५५] त्यामध्ये त्यांची कामगिरी ही कुशल संघटक, वैचारिक नेतृत्त्व देणारी होती. त्यांच्या योगदानामुळे तासगावचा मोर्चा यशस्वी झाला. त्यासाठी त्यांना साडेतीन वर्षाची शिक्षा झाली. स्वातंत्र्यासाठी कार्य करीत असताना त्यांच्या कुटुंबियांना खूपच हाल अपेष्टांना सामोरे जावे लागले. परंतु पत्नी प्रभावती पागे यांनी त्यांच्या कार्यासाठी पाठिंबा दिला. तुरूंगात असताना त्यांनी गांधीवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. गांधीवादी नेते म्हणून सर्वत्र परिचित झाले व गांधीवादाचे व्रत त्यांनी आयुष्यभर जोपासले.

## ७.११.३ सामाजिक कार्य

स्वातंत्र्योत्तर काळात विठ्ठल पागे यांनी समाजकारणासाठी खूप मोठे योगदान दिले. त्यांनी सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले. पंढरपूरच्या मंदिर प्रवेशामध्ये सहभाग घेतला. गांधी हत्येनंतर तासगाव शहरातील शांतता राखण्यामध्ये महत्वाचे कार्य केले. त्यासाठी त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबून शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जातीभेद व अस्पृश्यता याविषयीचे त्यांचे विचार परखड असल्याचे दिसून येतात. राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्व दिले. तासगाव नगरपालिका क्षेत्रामध्ये त्यांनी बिनविरोध निवडणुकीचा पायंडा घातला व बिनविरोध नगराध्यक्ष निवड करून एक नवा आदर्श महाराष्ट्रात प्रथम घातला.[५६] तासगावात बापूचीवाडी स्वतंत्र्य वसाहतीची निर्मिती केली. सहकार तत्त्वामध्ये अग्रभागी असलेले विठ्ठल पागे यांनी महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वच्छता व श्रमदानाचे काम जिल्ह्यात राबविले.

## ७.११.४ काँग्रेसचे प्रचारक व शैक्षणिक कार्य

विठ्ठल पागे काँग्रेसचे एक निष्ठावंत नेते म्हणून ओळखले जातात. शेतकरी कामगार पक्षाच्या निर्मितीनंतर काँग्रेसमध्ये फूट पडली तरीसुद्धा वि. स. पागे यांनी काँग्रेस पक्षात राहून आपली निष्ठा अखंड जोपासली. राजकारणातील झगमगटापेक्षा त्यांचा समाजसेवा, देशसेवा करण्याकडे अधिक कल होता. काँग्रेसच्या निवडणूक प्रचारात वि. स. पागे अतिशय महत्वपूर्ण कार्य करीत होते.

वि. स. पागे यांनी शैक्षणिक क्षेत्रातील विचार मांडून महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राला दिशा देण्याचे त्यांनी काम केले. तसेच शैक्षणिक क्षेत्रात कृषीविषयक शिक्षणाचा आग्रह धरला. पारंपरिक शिक्षणापेक्षा व्यावसायिक शिक्षणाला अधिक महत्व दिले.[५७] 'जे शिक्षण चांगले जीवन जगायला शिकविते त्यालाच शिक्षण म्हणतात'. देशात कृषी माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये, कृषी विद्यापीठाची आवश्यकता असल्याचे त्यांचे मत होते. व्यावसायिक शिक्षण हे नव्या पिढीला नवीन दृष्टिकोन देईल असे त्यांचे मत होते. त्यांना मिळालेल्या अवधीत त्यांनी अनेक शिक्षण संस्था, कृषी शिक्षण संस्थांना योगदान दिले.

## ७.११.५ साहित्यातील योगदान

वि. स. पागे यांनी आध्यात्मिक तत्वज्ञानाची सांगड राजकारणाशी घालून, आपले राजकीय जीवन स्वाभिमानाने जगले. 'कर्मण्येवाधिकारास्ते मा फलेषु कदाचन' या तत्वाचा नेहमी पाठपुरावा केला.[५८]

साहित्याच्या क्षेत्रामध्ये वि. स. पागे यांनी महाराष्ट्राला विचारधन दिलेले आहे. साहित्यातील गद्य आणि पद्य क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे. त्यांची काव्य प्रतिभा उत्स्फूर्त होती. तितकीच ती तरल आणि भावस्पर्शी होती. शिक्षण घेत असताना काव्य लेखनाला सुरूवात केली. नाटके, वैचारिक लेखन, आध्यात्मिक, तात्विक असे विचारधन त्यांनी महाराष्ट्राला दिले. त्यांचे अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. संवेदनशील कवी, तत्वज्ञानी कवी, राष्ट्रीय कवी यासारख्या प्रतिमा त्यांनी निर्माण केल्या. त्यांचे काव्य हे राष्ट्रीय विचारातून निर्माण झालेले काव्य होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात त्यांच्या कार्याचे स्वरूप बदलेले दिसते. त्यामध्ये राष्ट्र सेवादलासाठी, समाज प्रबोधनासाठी काव्य रचना केलेल्या होत्या.[५९] त्यांनी काँग्रेस पक्षाच्या प्रचारासाठी अनेक काव्य रचना केल्या. कला पथकासाठीही रचना केल्या. वि. स. पागे विद्वान पंडित, लोकनेते, शीघ्र कवी, सिद्धहस्त लेखक, सुसंस्कृत राजकारणी, समाजसेवक, गांधीवादी नेते यासारख्या विविध पैलूंचा मनोज्ञ संगम त्यांच्यामध्ये होता.[६०]

## ७.११.६ रोजगार हमी योजनेचे जनक

सामान्य तळागाळातील माणसाची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी त्यांनी अहोरात्र ध्यास घेतला. त्यांच्या या ध्यासातून 'रोजगार हमी योजने'चा उदय झाला. त्यांनी रोजगार हमी योजनेचा शुभारंभ तासगाव तालुक्यातील 'विसापूर' या गावी केला व ती योजना आज जगाने स्विकारली आहे.[६१] म्हणून महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे जनक म्हणून वि. स. पागेजींना ओळखले जाते. महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या रूपाने नवा प्रकाश आणला. रोजगाराची हमी देणारे महाराष्ट्र राज्य हे भारतातील पहिले राज्य होय. रोजगार हमी योजनेच्या बैठकीला नवा अर्थशास्त्राचा संदर्भ होता.

वास्तवतेचा संदर्भ होता. त्यांची ही योजना म्हणजे कायमस्वरूपी रोजगाराची हमी देण्याची संधी होय. अंग मेहनतीची, अकुशल कामे करणाऱ्या माणसाला जीवनात नवी दिशा या योजनेतून मिळाली. अनेक राज्यांनी या योजनेचा स्विकार केलेला होता.[६२]

सध्या भारतभर या योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. ही योजना देशपातळीवर गेल्याने या योजनेचे महत्व वाढले आहे. नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी ही योजना प्रभावी अस्त्र आहे. या योजनेमुळे सामाजिक विषमता दूर झाली आहे. आर्थिकदृष्ट्या मागास घटकास ही योजना सामाजिक स्थैर्य देणारी आहे. आदिवासी समाजातील लोकांना ही योजना म्हणजे वरदान ठरली आहे. रिकाम्या हाताला काम मिळाल्याने सामाजिक स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होते. आदिवासी आणि स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लावणारी ही योजना आहे हे स्पष्ट होते. या योजनेतील स्वतंत्र अनुदान, बेकार भत्ता ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. या योजनेत मजुरांसाठी अनेक सोयी व सवलती आहेत. पगारी रजा, सानुग्रह कामाप्रमाणे दाम, एक दिवस आराम हे तत्व या योजनेत स्विकारलेले आहे.[६३]

## ७.११.७ विधान परिषदेचे सभापती

वि. स. पागे हे रोहयो परिषदेचे पहिले अध्यक्ष होते. त्यांनी ते काम अगदी देशसेवा समजून केले. त्यानंतर विधान परिषदेचे सदस्य म्हणून १९५२ मध्ये त्यांची निवड झाली व ते १९८० पर्यत कार्यरत होते. त्यांनी त्याकाळात मांडलेले विचार हे समाजाच्या आर्थिक, औद्योगिक, कायदे विषयक, शेतीविषयक, व्यावसायिक क्षेत्राला दिशा देणारे व त्यांनी मांडलेले प्रश्न सामाजिक समस्येवर प्रकाश टाकणारे आहेत.[६४]

विधान परिषदेचे सभापती म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. १९६० ते १९९७ पर्यत त्यांनी सभापती म्हणून कार्य केले. त्यांनी सभापती पदाची शान वाढविण्याचे काम व त्या पदाला एक महत्वपूर्ण स्थान असल्याचे त्यांनी सिद्ध केले. या काळात त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून संसदीय कार्यपद्धतीत अनेक दुरुस्त्या केल्या. कोणतेही बील पास करताना विधान परिषदेच्या सभागृहाची संमत्ती असल्याशिवाय ते बिल पास होऊ नये, अशी तरतूद करून विधानपरिषद या सदनाची लोकशाहीमधील महत्वपूर्ण सहभाग दाखवून दिला.[६५] या सभागृहातील सदस्यांना लोकशाहीच्या प्रक्रियेतील महत्वाचे स्थान मिळाले. वि. स. पागे यांनी या काळात सभागृहाला शिस्त लावण्यासाठी काटेकोर प्रयत्न केले. वि. स. पागे यांच्या नंतरची सभापतीपदाची परंपरा लक्षात घेता वि. स. पागे यांची कारकिर्द ही पारदर्शक, शिस्तप्रिय सचोटीची आणि यशस्वी म्हणून पाहिले जाते. कामकाजातील असणारी संसदीय कार्यपद्धती, निर्णय देताना कायदेशीर बाबींचा आधार घेऊन ते निर्णय देत असत. यामध्ये कोणताही पक्षपातीपणा होत

नव्हता. सभापती म्हणून काम करत असताना ते काँग्रेसच्या शिबिरांना ते मार्गदर्शक म्हणून उपस्थित असत. अनेक प्रचार सभेत ते काँग्रेसचे प्रचाराचे कार्य करीत असत.[६६]

सभापती असलेले वि. स. पागे यांनी अनेक देशाच्या संसदीय कार्यपद्धतीचा अभ्यास करून त्यांनी त्यातील त्रुटींचा अभ्यास करून अहवाल तयार केला होता. या अहवालामध्ये त्यांनी अनेक त्रुटीवर उपाय सुचविले होते. हा अहवाल आजही अनेक राज्यातील संसदीय संकेतांची जपणूक करण्यासाठी आजही उपयुक्त ठरत आहे. लोकमान्य टिळक आणि म. गांधी यांच्या तत्वज्ञानातील अध्यात्माची सांगड राजकारणातील तत्वाशी घालत असत. ते लोकमान्य टिळकांचा कर्मयोग व महात्मा गांधीजींच्या अनासक्तीयोग याचाही पाठपुरावा करत असत. वि. स. पागे यांनी व्यक्तिपूजा किंवा स्वत:चे नाव कोणत्याही संस्था अगर योजनेस दिले नाही. ग्रंथालय चळवळीसाठी ही भरीव योगदान दिले. त्यांनी स्वातंत्र्य सैनिकाचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्य केले. त्यांनी अनेक संस्थांचे अध्यक्ष, चेअरमन, संचालक म्हणून काम केले. परंतु निवृत्तीनंतर त्यांनी कोणत्याही पदावरील मानधन केवळ १ रूपया घेऊन एक नवा आदर्श ठेवला आहे.[६७]

१९७८ साली वि. स. पागे विधानपरिषद सभापती पदावरून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी राजकारणात संन्यास घेतला. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला परंतु सत्तेच्या राजकारणापासून नेहमी लांब राहिले. तत्त्वासाठी झगडले तात्विक मतभेद काही वेळा होत असत. परंतु ते शेवटी गांधीवादी असल्याने त्यांनी नेहमी बेरजेचे राजकारण न करता, सुडाचे राजकारण न करता सहकार्याचे राजकारण केले. देशाच्या अर्थव्यवस्थेत रोजगार हमी योजनेच्या रूपाने जो बदल झाला आहे, त्यांच्या माध्यमातून आजच्या पिढीला चांगले दिवस मिळाले. विधायक कामाचे डोंगर उभे केले.[६८] महाराष्ट्राच्या प्रगतीला दिशा देण्याचे काम केले. महाराष्ट्राला वैचारिक नेतृत्व दिले. आयुष्यभर पैसा, प्रसिद्धी, संपत्ती, सत्ता यापैकी कशाच्याही मागे न लागता सतत विधायक कामाचा पाठपुरावा केला. ज्ञान साधना, लोकसंग्रह वाढविणे, जतन करणे, आध्यात्मिक क्षेत्रात सतत मनन व चिंतन करणे. सामान्य जनतेच्या योजना तयार करून त्या सरकारपुढे मांडणे व त्या सरकारला राबविण्यासाठी पाठपुरावा करण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. अखेरच्या दिवसातसुद्धा आपले सामाजिक, आध्यात्मिक कार्य चालूच ठेवले.[६९] लोकमान्य टिळक व महात्मा गांधी हे भगवतगीतेवर आधारित आपल्या राजकारणाची सांगड घालत असत. त्याप्रमाणे वि. स. पागे यांच्या राजकीय जीवनावर अध्यात्माचा प्रभाव होता.[७०]

## ७.१२ स्वातंत्र्य सैनिक, माजी आमदार भाई गणपतराव कोळी

भाई गणपतराव कोळी हे नि:स्वार्थी, प्रमाणिक आणि तत्त्वनिष्ठ स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या तुफानी योगदानाचे त्यांनी कधीही भांडवल केले नाही. त्यांच्या बरोबरीचे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. अनेक सहकारी उच्च पदस्त, केंद्रीय मंत्री, खासदार-आमदार झाले. कोळी मात्र शेवटपर्यत इंदिरा गांधीजींसोबत राष्ट्रीय राजकारणात राहूनही व दोन वेळा आमदार होऊनही मोडक्या झोपडीतच राहिले. सदैव गरिबांकरिता झटणाऱ्या गणपतराव कोळींना प्रेमाने लोकांनीच वर्गणी जमवून एका खोलीचे घर बांधून दिले.[७१] आमदार झाले तेव्हा त्यांचे फाटके कपडे पाहून त्यांना मित्रानेच चार रूपयांचे कपडे आणून दिली. एस. टी. च्या प्रवासासाठीही प्रसंगी चार दोन आण्याची उधारी असायची. गणपतराव कोळींच्या लग्नातही पत्नी सौ. पद्मा यांना वसंतदादा पाटील यांनी साडी घेतली. (त्यापुढे सांगली जिल्ह्यातील पहिल्या महिला तासगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्षा (१९६७) म्हणून निवडून आल्या.)[७२] सन १९७४ साली चीनने भारतावर हल्ला केल्यावर पंडीत नेहरूंनी भारतीय जनतेला आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. तासगावात वि. स. पागेजींनी जाहीर सभेत युद्ध खर्चासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. त्यावेळी सर्व प्रथम सौ. पद्मा गणपतराव कोळी यांनी आपल्या गळ्यातील, कानातील दागिने काढून पागेंच्या हातात दिले.[७३]

भाई गणपतराव कोळी यांचे गेल्या पाच सहा दशकातील सार्वजनिक आयुष्य दुरूनसुद्धा पाहिलेले लोक त्यांच्या स्वभावातील धग कधी विसरू शकणार नाहीत. गणपतराव कोळींनी सहा वर्षे समाजवादी पक्षातर्फे व सहा वर्षे काँग्रेस पक्षातर्फे विधान परिषदेचे आमदार झाले.[७४] नंतर त्यांनी राज्य, देश व जागतिक पातळीवर पंतप्रधान इंदिरा गांधी सोबत कार्य केले.

### ७.१२.१ स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारक

भाई गणपतराव कोळी यांचा जन्म सांगली जिल्ह्यात कवठेमहंकाळ तालुक्यातील 'कोकळे' या गावी झाला. पुढे तासगाव येथे इंग्रजी चौथीपर्यत शिक्षण पूर्ण केले. त्यावेळी राष्ट्रसेवादलात काम करत होते. महात्मा गांधीजींनी इंग्रजाविरूद्ध स्वातंत्र्यलढा पुकारल्यावर गणपतराव कोळी यांनी शिक्षण अर्धवट सोडले आणि स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात तासगावच्या फौजदाराच्या घरावर त्यांनी बाँब टाकले. वसंतदादा पाटील यांच्या बरोबरीने विश्रामबाग रेल्वे स्टेशन, चावडी, बंगले जाळले.[७५] त्यानंतर ते भूमिगत असताना लता मंगेशकर यांच्या घरी अटक होऊन सर्व स्वातंत्र्य सैनिकांना सांगलीच्या तुरूंगात ठेवले. तुरूंगात असताना भाई गणपतराव कोळी, वसंतदादा पाटील व राष्ट्रसेवा दलातील कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या हातातील बंदुका हिसकावून घेऊन सांगलीचा तुरूंग फोडला. तेथील

बंदुका पळविल्या, पुराने दुथडी भरून वाहणाऱ्या पुरात पोलिस बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव करीत असताना उड्या मारल्या. दादांच्या खांद्याला गोळी लागून ते पडले. त्यावेळी अण्णा पत्रावळे व बाबू जाधव गोळ्या लागून हुतात्मा झाले. पोहत पैलतीर गाठले; पण पोलिसांनी वेढा घालून, छातीवर बंदुका रोखून त्यांना पकडलेच. गणपतराव कोळीनी तीन वर्षे तुरूंगवास भोगला.[७६]

## ७.१२.२ राजकारणातील दबदबा

भाई गणपतराव कोळी यांना समाजकारण व राजकारण याची चांगली जाण होती. निरीक्षण भेदक आणि बोलणे रोखठोक, सदसद्विवेक बुद्धीला पटेल ते करायचे. गरिबांसाठी आयुष्यभर भांडत राहणे हेच त्यांचे जणू ध्येय. १९६० ते १९८० दशकामध्ये ज्यांनी महाराष्ट्राचे राजकारण जवळून पाहिले आहे किंवा मुंबईत पत्रकारिता केली, त्यांना गणपतराव कोळी नावाचा दणका चांगलाच माहित असणार! कोळी क्वचितच थापा मारतात, हे ज्या वार्ताहरांना ठाऊक झाले होते त्यांना पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रवाहाचे चांगले आकलन होते, असे सांगावयास हरकत नाही.[७७]

मुंबईत आपल्या कोळी समाजाला राहण्यासाठी जागा मिळण्यासाठी तत्कालीन महसूल मंत्री प्रतिभाताई पाटील यांना साकडे घातले. 'मुलाचे नाव सोसायटीत टाका म्हणजे जागा देते,' असे प्रतिभाताई पाटील यांनी सांगूनही गणपतरावांनी ऐकले नाही. सोसायटी झाली गणपतराव बाहेरच. त्यांच्या सडेतोडपणाचे असे कित्येक किस्से सांगता येतील.[७८]

वसंतदादा गरिबांना विसरून धनदांडग्यांचे हितसंबंध सांभाळू लागले आहेत. हे पाहून गणपतराव कोळींनी आयुष्यभर दादांशी पंगा घेतला. दादांना तसे पत्र लिहून कळवले. दादांनीही वैर व्यवस्थित निभावले. महाराष्ट्रातील राजकारणाची जाण, निर्भय वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा पाहून पंतप्रधान इंदिरा गांधींचा विश्वास त्यांना मिळाला. महाराष्ट्रासंबंधी महत्वाचे निर्णय घेताना ज्यांची मते जाणून घ्यावयास इंदिरा गांधी उत्सुक असत, त्यापैकी गणपतराव कोळी हे एक होते.[७९]

राजकारणात राहूनही इतके नि:स्वार्थी, त्यागी जीवन जगणे फारच कमी लोकांना जमते. आजच्या बाजारी, स्वार्थी दुनियेत असे निर्मोही राजकारणी फारच थोडे आहेत. अशा या ध्येयवेढ्या, तत्त्वनिष्ठ, नि:स्वार्थी धगधगत्या जीवन व सदैव देशाकरिता लढणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक भाई गणपतराव कोळी यांच्या कर्तृत्वाने तासगाववासियांचे नाव अजरामर केले.

**१) महात्मा गांधीजींच्यावरील गणपतराव कोळी यांची कविता** [८०]

*सबको संन्मती दे भगवान, कहते कहते गई गांधीजी की जान*

*ईश्वर अल्ला, गॉड तेरे नाम, कैसे गयी गांधीजी की जान ?*

*शांततावादी, मानवतावादी नि:शस्त्र प्रार्थना के लिए*

*जा रहे गांधीजी की ली जान*

*इसको तो कहते है पराक्रम महान*

*तू है सर्वे सर्वा ऐसे कहते है संत महंत*

*कोई सज्जन, कोई दुर्जन दयावान, ते अस दुनिया मे*

*किसने पैदा किया भगवान*

*सबको सदाचारी, दयावान बन दे भगवान*

*सबको सन्मती दे भगवान कहते कहते गई गांधीजी की जान*

*जब कौरवों ने द्रोपदी को छीनी साडी*

*तब कृष्ण ने भेजी साडीयाँ ही साडीयाँ*

*अब बहुत से कौरव इस दुनिया में छीन रहे हैं महिलाओं की साडीयाँ*

*भेज देना कृष्णाजी बडे बडे फॅक्टरीयों से एक तो साडी*

*टे अंगुली के इशारे बिन पेड की पत्ती भी नही हीलती*

*फिर हर दिन होनेवालो बलात्कारों को*

*रोकने के तेरी उँगली उठा दे भगवान*

*यह गत जन्म का कर्म फल हैं ऐसे कहते है संत महंत*

*क्या गत जन्म के समय सन्मती देने के लिए*

*भगवान का अस्तित्व था या नहीं? धर्मशाही, अंधश्रद्धा पैदा किया*

*संपत्ती, लोभी महत्वकांक्षी मुट्ठीभर धनवान नेताओने*

*आपस मे संघर्ष दौरा पैदा किया*

*झुठा और सच्चा, बुरा और अच्छा*

*पुण्य और पाप, अमृत और जहर किसने पैदा किया भगवान*

*गरिबो श्रमिको धनवान और झोपडपट्टीवालो को मकान बना दे भगवान*

*जवानो की बेकारी, महाँगाई, विषमता खतम कर देना भगवान*

*सबको सन्मती दे भगवान कहते कहते गई गांधीजी की जान*

## ७.१३ आर. आर. (आबा) पाटील तथा रावसाहेब रामराव पाटील

आधुनिक महाराष्ट्राच्या विकास पर्वातील कृतीशील नेतृत्व तसेच राजकारण व समाज कारणावर आपल्या कार्याचा सखोल मुद्रा उमटविणारे, मा. रावसाहेब रामराव पाटील उर्फ आर. आर. (आबा) पाटील हे एक बहुपेढी नेतृत्त्व आहे. त्यांना एक लक्षवेधीकार, उत्कृष्ट संसदपटू, महाराष्ट्राचे आधुनिक गाडगेबाबा किंवा अष्टपैलू व्यक्तिमत्व अशा अनेक उपाधी मिळाल्या आहेत.

## ७.१३.१ जन्म, बालपण व शिक्षण

अंजनीसारख्या खेडेगावात (तासगाव) गरीब कुटुंबात आर. आर. पाटील यांचा जन्म १६ ऑगस्ट १९५७ रोजी झाला. त्यांच्या वयाच्या १६ व्या वर्षी वडील स्वर्गवासी झाल्याने त्यांचे पितृछत्रही हरपले. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर व आई भगिरथी यांच्यावर पडली. कोरडवाहू चार एकर जमिनीवर आबा व त्यांची चार भावंडे यांचा उदरनिर्वाह चालत असे. अशा परिस्थितीत या पाच भावंडांचे शिक्षण म्हणजे घरावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. पायात चप्पल नव्हती, अंगावर फाटके कपडे, राहायला छोटेसे घर व घरामध्ये सर्वच उणिवा होत्या. अशा परिस्थितीत आबांच्या आई भगिरथी खंबीर व कर्तबगार होत्या. त्यांनी कष्ट करून मुलांना शिकविले. त्यांच्या चार मुलापैकी थोरला मुलगा (आबा) हुशार होता.[८१]

आबांचे शालेय शिक्षण अंजनी, सावळज, सांगली येथील शांतीनिकेतन महाविद्यालयात ‘कमवा व शिका’ या योजनेतून झाले. आबांना शाळेत असताना एकच ड्रेस होता तोच धुवून घालायचे त्यांच्या

बरोबरची मुले रोज नवीन ड्रेस घालत असत. एकदा आबा घरी आले असता आईला नवीन ड्रेस मागावा तर पैसे कोठून आणायचे! म्हणून आबांची नजर वर तुळीवर बांधलेल्या गाठोड्याकडे गेली. कोणी नसताना वरचे गाठोडे आबांनी खाली काढले व त्यातील उपयोगी पडतील असे कपडे काढून घेतले. टेलरकडून ते शिवून घातला. मृत वडिलांची कपडे 'अल्टर' करून आबांनी घातल्यावर त्यांच्या आई ढसाढसा रडल्या.[८२]

आबांना शांतिनिकेतनमध्ये 'कमवा व शिका' या योजनेत काम करावे लागले. १ रूपये ७५ पैसे मिळण्यासाठी पाच तास काम करावे लागे. चांगले मार्क्स असूनही सायन्सला प्रवेश घेणे परवडणारे नव्हते. म्हणून आर्टसला प्रवेश घेतला. त्यांनी पहिला नंबर कधी सोडला नाही. एकदा सांगली कारखान्यामध्ये आबांनी वॉचमन किंवा क्लार्क पदासाठी अर्ज केला होता. त्यांनी सांगितले की, क्लार्कसाठी जागा नाही आणि वॉचमनसाठी आहे पण लोक तुम्हाला बघितले की उचलून नेतील. कारण ते उंचीने कमी व अंगाने सडपातळ होते.[८३] त्यामुळे त्यांना नोकरी मिळाली नाही. आबा वत्कृत्वामध्ये कुशल होते. त्यांना वत्कृत्व स्पर्धेमध्ये चांगली बक्षिसे मिळत होती. पण वत्कृत्व स्पर्धेच्या ठिकाणी पोहचण्यासाठी पैसे नव्हते. म्हणून त्यांचा प्रवास खर्च कॉलेजमार्फत देण्याचे शांतीनिकेतनच्या प्राचार्यांनी ठरविले. आर. आर. प्रत्येक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवू लागले. त्या निमित्ताने भरपूर वाचन होऊ लागले व आबांचे सर्वत्र वर्तमानपत्रात दूरदर्शन व आकाशवाणीवर नाव गाजू लागले.

## ७.१३.२ काँग्रेसचे प्रचारक व राजकारणात प्रवेश

त्यावेळचे आमदार मंत्री होते पण त्यांना बोलता येत नव्हते त्यामुळे एस काँग्रेसचे लोक, मंत्री, आर. आर. आबांचा उपयोग प्रचार करण्यासाठी करू लागले. आर. आर. आबांच्या भाषणांचे फड गाजू लागले. ज्यांच्या सभा घेतल्या ते लोक उच्च पदापर्यत पोहचतात. राहून-राहून त्यांना वाटू लागले की, आपण ज्यांच्यासाठी सभा घेतो ते लोक जिंकतात त्यांना पदे मिळतात आमदार, मंत्री होतात मग राजकारणासारख्या महत्वपूर्ण क्षेत्रात आपण आपले नशीब का आजमावयाचे नाही? [८४]

सांगली जिल्ह्यामध्ये वसंतरावदादांचा प्रभाव होता, म्हणून आबांनी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागितली. त्यावेळी सर्वजण त्यांना हसले, म्हणाले की, 'तुमच्या पाठीमागे किती ग्रामपंचायती आहेत'? आबा म्हणाले, 'एक ही नाही' किती पैसे खर्च करणार? आबा म्हणाले, 'बिलकुल नाही'. यामुळे आबा अपमानित झाले. शेवटी रागाने म्हणाले की, मला जर उमेदवारी दिली नाही तर मी तुम्हाला पराभूत केल्याशिवाय राहणार नाही. त्यावर जिल्हाध्यक्ष उठून रागाने म्हणाले की, आमच्याच कार्यालयात येऊन आम्हालाच दम देतोस? [८५]

त्यावेळी सावळज मतदार संघात उमेदवार नव्हता. त्यावेळी आबांनी आबाजी शिंदे साहेबांना उमेदवारीचे तिकीट मागितले. त्यांनी ते दिले व आबा सांगली जिल्ह्यामध्ये सर्वाधिक मताधिक्याने निवडून आले. ते ११ वर्षे जिल्हा परिषद सदस्य असताना जिल्हा परिषद आवारात बसून लोकांचे प्रश्न सोडविले. अहोरात्र मेहनत करून आबांनी सर्व विषयांचा सर्वांगीण अभ्यास केला. येथेही त्यांनी त्यांची कामगिरी मोठी केली. ते नावारूपाला आले. नंतर १९९० साली विधानसभेचे आमदार म्हणून प्रचंड मतांनी निवडून आले. त्यावेळी शरद पवारसाहेब मुख्यमंत्री होते. त्यामुळे मतदार संघामध्ये अनेक चांगली कामे केली. नंतर १९९५ मध्ये युतीची सत्ता आली. त्यावेळेस अनेक प्रकरणे खोदून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले व एकवीस लक्षवेधी सूचना मांडल्या. त्यामुळे त्यांना 'लक्षवेधीकार' ही उपाधी मिळाली.[८६]

विधानसभा सदस्य असताना सात वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया भक्कम व मजबूत करण्यामध्ये आबा अग्रेसर किंवा त्यांचा सिंहाचा वाटा होता. सामाजिक जाणीव असल्यामुळे त्यांनी नेहमीच राज्याच्या जनतेच्या भल्यासाठी आपली बाजू मांडली. आबांनी सखोल अभ्यास करून लोकांच्या समस्या पूर्णपणे जाणून घेतल्या. विविध विषयांचे अर्थपूर्ण ज्ञान व सुलभ विश्लेषण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव व समृद्ध होण्यास मदत झाली. विधिमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर त्यांची असलेली उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामाची उत्तम जाण याकरिता महाराष्ट्र शाखेच्या राष्ट्रकूल संसदीय मंडळामार्फत सन १९९५-९६ मध्ये 'उत्कृष्ट संसदपटू' हा पुरस्कार देण्यात आला.[८७]

त्यांचे सर्वोत्कृष्ट काम पाहून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. ही जबाबदारी घेऊन त्यांनी पूर्णवेळ देऊन, पक्षवाढीसाठी त्यांचे मोलाचे योगदान लाभले. महाराष्ट्राच्या सत्तेत अर्धा वाटा राष्ट्रवादी काँग्रेसचा असल्यामुळे आबांना उपमुख्यमंत्री होता आले. आबा व्यवसायाने वकील होते. परंतु समाजाची वकिली जगाच्या न्यायालयात करावयाची म्हणून त्यांनी वकिली करावयाचे हेतूपरस्सरपणे टाळले व चोवीस तासातले बावीस तास हे जनतेकरीता खर्च करावयाचे सामाजिक व राजकीय असे व्रत घेतले.[८८]

### ७.१३.३ डान्सबार बंदी

देशात पैसे मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. 'चारित्र्य' ही फार मोठी दौलत असते. लज्जा रक्षणासाठी कपडा, जगण्यासाठी अन्न व पैसा या गोष्टी अब्रु शाबूत ठेऊनच मिळवाव्या लागतात. मात्र उच्चभ्रू सोसायटीतील तसेच मध्यम वर्गीय तरूण डान्सबार या आग्यामोहाच्या विकृत प्रथेला बळी पडलेले

होते. अनेक आया बहिणींचे संसार उध्वस्त झाले आहेत.[८९] आज तरूण पिढी व्यसनाच्या आहारी जावून बरबाद होत चालली आहे.

या विकृत प्रथेस बंदी घालून आर. आर. पाटील यांनी समाजावर मुख्यत: स्त्रियांच्यावर फार मोठे उपकार केले आहेत आणि सरकारनेही याला मान्यता देऊन समाज व आया-बहिणींचे आशिर्वाद घेतले. डान्सबार बंदी हा मुंबई विधानसभेतील प्रचंड विजयच म्हणावा लागेल. प्रचंड विरोध असतानाही आबांनी आपली शक्ती पणाला लावून हे यश खेचून आणले. साऱ्या महाराष्ट्राला नव्हे तर साऱ्या देशाला अभिमान वाटावा अशी गोष्ट घडवून आणली.[९१] डान्सबार बंदीमुळे या विकृत प्रथेस थोडाफार आळा नक्कीच बसला आहे. महिला वर्गाची तर प्रचंड सहानुभूती मिळविली. त्यांच्या या निर्णयाचे महिलांनी स्वागत केले आहे.

## ७.१३.४ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियाना'चा उपयोग जनसामान्यांच्या कल्याणासाठी केला. ग्रामीण भागातील लोकांच्या मनातील इर्षेचा उपयोग त्यांनी ग्रामस्वच्छता अभियान या योजनेत केला. त्यामुळे हजारो गावेच्या गावे स्वच्छ झालीच पण त्याचबरोबर असंख्य लोकांची मने ही स्वच्छ झाली. लोक आपापली गावे स्वच्छ करण्यात गुंतले. यातून स्पर्धा व बक्षिसे मिळविण्यासाठी लोकांच्या मनात 'एकता' आपुलकीची भावना निर्माण झाली. यातून माझं गाव, माझा देश अशी आपलेपणाची भावना निर्माण झाली.[९२]

'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' राबविण्यासाठी प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली. प्रश्नपत्रिका तयार करताना अत्यंत बारीक सारीक गोष्टींचा विचार केला. त्यामध्ये शौचालय, सांडपाण्याची व्यवस्था, कुटुंबनियोजन, घनकचरा व्यवस्थापन, गटारीच्या सुविधा, स्वच्छ पाणी पुरवठा, रस्ते, दिवाबत्ती इत्यादी प्राथमिक सुविधा गावामध्ये पाहिल्या जातात व त्यावर उपाय सुचविले जातात व गावातील सोयी सुविधानुसार त्या गावाला शासनामार्फत बक्षिसे दिली जातात. आपल्या गावाला बक्षीस मिळाले पाहिजे. म्हणून सर्व भेदभाव, द्वेष विसरून लोक गावे स्वच्छ करण्यात मग्न होतात. ग्रामस्वच्छता अभियानामुळे गावा-गावात माणसा-माणसात स्पर्धा निर्माण केल्यामुळे हजारो गावेच्या गावे हागणदारी मुक्त व स्वच्छ झाली.[९३]

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून आबांनी 'यशवंत ग्राम समृद्धी योजना' आखली. यामध्ये गावानेच ठरवायचे की आपल्या गावमध्ये कोणते काम करावयाचे आहे. त्याचे बजेट गावानेच तयार करावयाचे व त्या कामाच्या १५% रक्कम लोकवर्गणीतून भरावयाची व बाकीची ८५% रक्कम सरकार देणार या योजनेलाही उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला.

ग्रामस्वच्छतेच्या अभियानातून सामाजिक स्वच्छतेचा संस्कार तर रूजविलाच पण त्याच बरोबर सामाजिक ऐक्य, सर्वधर्मसमभाव व सहकार्याची भावना वृद्धिंगत झाली. त्याचे सर्व श्रेय आबांच्या कुशल निर्णय क्षमतेकडे जाते. लोकसहभागातून विकास साधला तर त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी उचलण्यास समाज तयार असतो. या योजना फक्त भारतानेच नव्हे तर जगाने स्विकारल्या आहेत.

## ७.१३.५ तंटामुक्त गाव योजना

'तंटामुक्त गाव योजने'त गावातील भांडण-तंटे गावातीलच तंटामुक्तीच्या अध्यक्षामार्फत सोडविले जात. त्यामुळे वर्षानुवर्षे कोर्टामध्ये खटले प्रलंबित असत व निकाल २० ते ३० वर्षे लागत असत. त्यामुळे गावातील भांडणे गावातच मिटवून तंटामुक्त गाव बक्षीस योजना जाहीर केली. त्यामुळे आपल्या गावाला बक्षीस मिळाले पाहिजे म्हणून लोक आप-आपसातील भांडणे आप-आपसातच मिटवू लागले. त्यामुळे गावांचा विकास होण्यास मदत झाली.[९४]

## ७.१३.६ विकास योजनेत योगदान

सत्ता ही सर्वसामान्य माणसासाठी राबवायची असते, सत्तेचे विकेंद्रीकरण करीत उपेक्षितांना न्याय द्यायचा असतो. शेतकऱ्यांपासून सर्वसामान्य मजुरांपर्यंत मग महिला असो पुरूष असो प्रत्येक घटकांच्या विकासासाठी सत्ता राबवायची असते. नेमके हेच ध्येय उराशी बाळगून आबांनी तालुक्याचा विकास केला.

### १) आरफळ कालवा

सातारा जिल्ह्यातील 'कण्हेर' धरणातून सातारा आणि सांगली जिल्ह्याला पाणी आणणाऱ्या कालव्यालाच 'आरफळ कालवा' असे म्हटले जाते. १९६६ पासून या कालव्याचे काम प्रलंबित होते. या कामाला प्रत्यक्षात गती देण्याचं काम आर. आर. आबांनी केले. १९९७ नंतर कालव्याचे ८५ किलो मीटरपासूनचे पुढचे काम सुरू झाले. १०२ कि. मी. पर्यत पाणी आणण्यासाठी 'शिवणी' येथे बोगदा खणून त्या बोगत्यातून येरळा नदीत कालव्याचे पाणी सोडण्याची सुवर्ण कामगिरी आबांनी केली. त्यानंतर या कालव्याचे काम उत्तर व पूर्व भागात पूर्ण झाले. तब्बल ४०० कोटी रूपये या कामासाठी उपलब्ध करण्याची कठीण जबाबदारी आबांनी पार पाडली. त्यामुळे आज निंबळकपासून ते कुमठे गावापर्यतच्या २५ गावाच्या शिवारात पाणी खेळू लागले आहे. ४० हजार एकर जमीन हिरवीगार होऊ लागली.[९५]

## २) ताकारी म्हैसाळ योजना

सन १९८४ साली सुरू झालेल्या या योजनेचे काम धिम्या गतीने सुरू होते. २,००० साली तर या योजनेची गती पूर्णपणे ठप्प झाली. पण आबांनी या योजनेला गती देऊन टप्पा १ ते ४ या उर्ध्वगामी प्रवाही नलिकेची एक ओळ कार्यान्वित करून कालव्याच्या मदतीने शेतीला पाणी देण्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला पूर्तता आणली. परिणामी २,८५० हेक्टर जमिनीला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ सुरू झाली.[९६]

म्हैसाळ योजनेअंतर्गत १ ते ७ या टप्प्यांना गती दिली. त्यामुळे जून २००८ अखेर १०,३४५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यास मदत झाली. त्याच योजनेअंतर्गत 'गव्हाण उपसासिंचन योजना' केली. गव्हाण येथे अग्रणी नदीत म्हैसाळ योजनेचे पाणी आणून तिथून ते अंजनी, नागेवाडी आणि वडगाव येथील पाझर तलावामध्ये उचलून या तलावातून पूर्व भागात शेतीला ही योजना वरदान ठरली आहे. तसेच मणेराजुरी, योगेवाडी, उपळावी, सावर्डे यासाठी गव्हाण विस्तारित योजना सुरू केली. आतापर्यत १८ कोटी रूपये खर्चाची कामे मार्गी लावण्यात यश आले.[९७]

## ३)टेंभू योजना

कराड येथून कृष्णा नदीतून पाणी उचलून खानापूर मार्गे तासगाव तालुक्याच्या उत्तर आणि पूर्व भागाला कालव्याद्वारे पाणी देण्याची महत्वपूर्ण 'टेंभू योजना' आता पूर्ततेच्या मार्गावर आहे. २,१०० कोटी रूपये खर्च झाले असून पंपगृहे, उर्ध्वगामी नलिका आणि कालव्याची कामे प्रगती पथावर आहेत. उर्ध्वगामी नलिकेच्या दोन रांगा, जोडकालवे अशी एकूण १६५ किलोमीटर अंतराच्या कालव्याच्या कामासाठी २४६ कोटी रूपये खर्च केले जाणार आहेत. यामुळे ३० गावातील २० हजार एकर शेतीला पाणी मिळणार आहे.[९८]

## ४) सुसज्ज प्रशासकीय इमारती, वसतिगृहे व क्रीडा संकुलाची उभारणी

आज पोलिस स्थानक इमारतीचे ४५ लाख रूपये खर्चाचे बांधकाम पूर्ण केले, दीड कोटी रूपये खर्चून पोलिस कर्मचारी व अधिकारी यांच्या निवासस्थानाची सोय झाली. ५ कोटी रूपये खर्चून दत्तमाळावरील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. तर सव्वा तीन कोटी रूपये खर्चून तासगाव येथे मागासवर्गीय मुलींसाठीचे वसतिगृह व आय. टी. आय. मधील मुलांचे ४० लाख रूपये खर्चाचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. २५ लाख रूपये खर्चून ४०० मीटर धावण्याचा ट्रॅक तयार करून घेतला. ३ कोटी रूपये खर्चाचे जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल ही कामे प्रगती पथावर आहेत.[९९]

## ५) पोलिस दल व पोलिस प्रशिक्षण केंद्राची उभारणी

ना. आर. आर (आबा) पाटील यांच्या कारकिर्दीत राज्याचे पोलिसदल सुसज्ज बनविले, त्यांचे पगार वाढविले, त्यांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या व त्यांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावला. अपुऱ्या पोलिस संख्येवर मात करण्यासाठी दरवर्षी पोलिस भरती प्रक्रिया सुरू केली. त्यामुळे आज राज्याचे पोलिस दलातील आबांची कारकीर्द त्यांच्या भल्यासाठी राबविण्यात आलेल्या अनेक उपक्रम व योजनांची मानते. पोलिसांच्या कल्याणासाठी व जे जे उपक्रम राबविले ते निश्चितच कौतुकास्पद आहे.

ना. आर. आर (आबा) पाटील यांच्या प्रयत्नाने नाशिक केंद्रांतर्गत असलेले राज्यातील दुसरे पोलिस उपनिरीक्षक प्रशिक्षण केंद्र तुरची (तासगाव) २०१० मध्ये सुरू केले आहे. ७५ एकर जागेत जगातील पहिले ग्रीन पोलिस प्रशिक्षण विद्यालय साकारले आहे. हे तासगाव पासून १० कि. मी. अंतरावर आहे. या केंद्राअंतर्गत असलेल्या तुरची केंद्रातून २४९ पोलिस उपनिरीक्षक आणि ५ महिला पोलिस उपनिरीक्षक अशी २५४ उपनिरीक्षकांची तुकडी प्रशिक्षण घेते. या प्रकल्पासाठी ४०० कोटीचा निधी मिळाला आहे. एका वर्षात पोलिस दलात नाशिक व तुरची पोलिस प्रशिक्षण केंद्रातून १४०० प्रशिक्षित अधिकारी पोलिस दलात सामील होतात.[१००]

या विद्यालयामध्ये पोलिसांना आधुनिक प्रशिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या भोजनाची, राहण्याची, व्यायामाची, आरोग्याची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्यातील लौकिकात साजेशी अशी प्रशिक्षण केंद्राची भर पडली असून, आबांच्या कारकीर्दीची आठवण करून देणारे हे स्मृती केंद्र आहे.

## ६) वीज वितरण उपकेंद्राची निर्मिती

अपुऱ्या वीजनिर्मिती प्रकल्पामुळे राज्यात भारनियमांचे वाढते संकट लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी आर. आर. आबांनी सातत्याने वीजवितरण विभागाच्या अनेक नवीन योजना मंजुरीसाठी आपल्या उपमुख्यमंत्रीपदाचा वापर केला. त्यातून तासगाव तालुका अपवाद राहणे शक्य नव्हते. तालुक्याच्या पूर्वभागाला पुरेसा आणि भारनियमनमुक्त वीज पुरवठा व्हावा म्हणून आबांनी तेरा कोटी रूपये खर्चाचे १३२/३३ केव्ही सावळज वीज वितरण उपकेंद्र मंजूर करून घेतले. त्यामागचा हेतू असा की, सावळज आणि मणेराजूरी ह्या पूर्वीपासूनच असणाऱ्या उपकेंद्रांना तासगावच्या ११० केव्ही उपकेंद्रातून वीजपुरवठा होतो. पण ही दोन्ही केंद्रे तासगावपासून लांब अंतरावर असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा होतो. त्यावर मात करण्यासाठी १३२/३३ केव्ही क्षमतेचे नवे उपकेंद्र मंजूर झाल्याने आणि त्यांचे प्रत्यक्ष

काम सुरू झाल्याने सावळज, मणेराजुरी, कुंडलापूर आणि वायफळे या परिसरातील शेतकरी, द्राक्षबागायतदार आणि ग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा होण्यास मदत झाली.[१०१] याशिवाय ४०० केव्ही क्षमतेचे ३०८ कोटी रूपये खर्चाचे सबस्टेशन तासगाव कवठेमहांकाळ परिसरात उभारण्याचे नियोजन आर. आर. आबांनी केले असून हे सबस्टेशन सुरू झाल्यावर तासगाव कवठेमहांकाळ तालुके विजेच्या बाबतीत पूर्णपणे स्वयंपूर्ण होईल.

## ७) महिला इंजिनिअरिंग कॉलेज

माणूस पैशापेक्षा चांगल्या ज्ञानाने व चांगल्या संस्काराने श्रीमंत असला पाहिजे, ही आर. आर. आबांची पहिल्यापासून विचारधारा आहे. त्यांनी स्वत:चे शिक्षण 'कमवा व शिका' या योजनेतून केले आहे. शिक्षण घेताना किती अडचणींना संकटाना सामोरे जावे लागते, हे आबांनी अनुभवलेले आहे. हे आपल्या भावी पिढीला वाट्याला येऊ नये म्हणून त्यांनी शाळांचा विकास करून घेण्यावर तर भर दिलाच शिवाय खाजगी महाविद्यालये, शाळांना त्यांनी पुस्तके, संगणक व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात सतत प्रयत्नशील असतात. पण एवढ्यावरच आबा समाधानी राहिले नाहीत. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधा अल्पशा शुल्कामध्ये उपलब्ध झाल्या पाहिजेत, असा त्यांचा सततचा दृष्टिकोन आहे. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम मुलांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. त्यानंतर तालुक्यातील आपल्या भगिनी तंत्रशिक्षणाच्या प्रवाहामध्ये सहभागी झाल्या पाहिजेत या हेतूने तासगावच्या दत्तमाळावर शासकीय महिला इंजिनिअरिंग कॉलेज उभारण्याचा महत्त्वकांक्षी प्रकल्प मार्गी लावला आहे. यासाठी त्यांनी सुमारे २६ कोटी रूपयाचा निधी उपलब्ध करून घेतला आहे.[१०२] त्यामुळे तासगावचा दत्तमाळ परिसर, शासकीय महिला इंजिनिअरिंग कॉलेजची इमारत, कार्यशाळा, वसतिगृहे फुलून गेले आहेत.

## ८) बेदाणा व्यापाराला चालना

तासगावचे नाव द्राक्षामुळे जसे जगभर झाले, त्याच पद्धतीने ते बेदाणा निर्मितीमुळेही झाले. देशात बेदाण्याची विक्री जाहीर लिलाव पद्धतीने करण्याची प्रथा आणि पहिले केंद्र तासगावमध्ये सुरू करण्याची ऐतिहासिक कामगिरी आर. आर. आबांनी केली. बाजारात द्राक्षांना मिळणाऱ्या अल्पशा दरावर मात करण्यासाठी बेदाणे निर्मितीपासून ते बेदाणा साठवणुकीसाठी लागणाऱ्या कोल्ड स्टोअरेज निर्मितीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याला आर. आर. आबांनी मदत केली.[१०३] तासगावच्या बेदाणा मार्केटमध्ये आवश्यक असणाऱ्या सुविधा, अर्थसहाय्य आबांनी उपलब्ध करून तर दिले. पण तासगाव-सांगली मार्गावर पूर्वीच्या

फार्मच्या जागेत भव्य बेदाणा व्यापारी संकुलाच्या निर्मितीला आबांनी मंजुरी दिली. शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळाला पाहिजे या मागणीला खऱ्या अर्थाने साथ दिली.

## ७.१३.७ तासगाव शहराचा विकास

सामाजिक परिवर्तन करण्याचे सामर्थ्य फक्त तत्ववादी विचारवंतामध्ये नसून त्यांच्या विचारांची कृतिशील अंमलबजावणी करणाऱ्या आबांसारख्या नेत्याच्या कृतीकार्यातून दिसून येते. महात्मा गांधी म्हणत, 'राजकारण नीतीचे झाले पाहिजे, प्रामाणिकपणाचे झाले पाहिजे' ज्यांना हे जमले नाही, त्यांनी राजकारणाचे व्यापारीकरण केले. पण आबांनी तासगावचा कायापालट केला आहे.

आर. आर. आबांनी आपल्या गेल्या २५ वर्षाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कारकिर्दीमध्ये तासगाव शहराला केंद्रस्थानी ठेवले आहे. गेली अनेक वर्षे तासगाव नगरपलिकेवर आर. आर. आबांची एकहाती सत्ता आहे.[१०४] त्यामुळे शहराचा 'लूक आऊट' पूर्णपणे बदलला आहे. तासगावला बारामतीचे रूप आणण्याच्या ध्यासापोटी आर. आर. आबांनी कोट्यावधी रूपयाचा निधी राज्य शासनाकडून आणला. त्यामुळेच तासगावमध्ये आज महिला इंजिनिअरिंग कॉलेज, क्रीडा संकुल, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, वसतिगृहे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, बेदाणा व्यापारी संकुल, ग्रामीण रूग्णालय, एस. टी. बस स्थानक अशा सर्व सुविधांची उपलब्धता झाली असून सर्व सुविधांनी परिपूर्ण शहर असे चित्र तासगाव शहरात निर्माण झाले आहे.[१०५]

त्यासाठी शहरात वैंशिष्ट्यपूर्ण योजनेतून औद्योगिक वापराचे गाळे बांधणे, सांगली नाका ते तासगाव कॉलेजपर्यत रस्ता दुभाजकामध्ये स्ट्रीट लाईट बसवणे, सौरपथ दिवे व डिजिटल टायमर बसवणे यासाठी दीड कोटी रूपये, क्रीडा संकुलामध्ये तीन कोटी रूपये खर्चून पोहण्याचा तलाव, जिम्नॅशियम हॉल बांधणे, दोन कोटी रूपये खर्चून एस. टी. बसस्थानकाशेजारी अद्ययावत भाजीमार्केट व शॉपिंग सेंटरची इमारत बांधणे, दोन कोटी रूपये खर्चून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधणे, शाळा क्रमांक १२ च्या परिसरात ५० लाख रूपये खर्चून छोटे शॉपिंग सेंटर बांधणे, सांगली नाक्याजवळ ५० लाख रूपये खर्चून वाचनालय आणि शॉपिंग सेंटर बांधणे, दोन कोटी रूपये खर्चून मॅटर्निटी होम व डिस्पेन्सरी बांधणे, घनकचरा व्यवस्थापनातून ६० लाख रूपयांचा स्वच्छतेचा ठेका देणे, आरोग्य सुविधा देत शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे, साठेनगर येथील वाचनालय बहुद्देशिय हॉल बांधणे, सौरपथ दिवे बसविणे, मोबाईल स्वच्छता गृहाची सुविधा देणे, कापूर नाल्यावर फरशी पूल बांधून कांबळेवाडीस जोडणारा रस्ता करणे, स्मशान शेड बांधणे तसेच शहरातील रस्त्यांचा दर्जा सुधारणे व गटारी बांधणे आदी योजनासाठी आबांनी तासगाव

नगरपालिकेस कोट्यावधी रूपयाचा निधी उपलब्ध करून दिला. ही सर्व कामे सध्या प्रगती पथावर आहेत.[१०६]

याशिवाय शहराला पुरेसा व स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा यासाठी १५ कोटी रूपये खर्चाची सुधारित पाणीपुरवठा टप्पा क्रमांक तीन योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. याशिवाय बेघरांना घरे व तासगाव झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी 'एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम' योजनेतून पाच एकर जागेत ५ कोटी रूपये खर्चाचे ३९३ घरकुले बांधली आहेत. सांगली नाका ते कॉलेज हा रस्ता दुतर्फा करून, कापूर ओढ्यावर नवीन पूल बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे व शहरातील सर्व रस्ते विस्तारित करण्याचे आबांचे स्वप्न साकार झाले आहे. आबा नगरपलिकेच्या निवडणुकीच्या वेळी जो जाहीरनामा देतात तो प्रत्यक्षात आणतात.[१०७]

आर. आर. आबांनी त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा उपयोग समाजकार्यासाठी केला आहे. ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव, पाणीपुरवठा योजना, जल स्वराज्य प्रकल्प, अशा अनेक योजनांतून त्यांचे कृतीशील विचार त्यांनी वैचारिक प्रगल्भता दाखवून दिली. याच जोरावर त्यांनी अल्पावधीतच सर्वात लहान वयात उत्कृष्ट वक्तृत्वाने छाप पाडून उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहचले.[१०८] या सर्व परिस्थितीशी सांगड घालून यश मिळविले आणि मिळालेल्या संधीतून परिस्थिती बदलण्याचे कौशल्य आबांनी आत्मसात करून त्याचे सोन केलेले आपणास दिसून येते.[१०९]

# संदर्भसूची


१. आपटे गो. वि. पटवर्धन घराण्याचा इतिहास, प्रथम आवृत्ती, साईनाथ प्रकाशन सांगली, २००१, पृष्ठ. २१५.

२. चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा दर्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई. १९८९, पृष्ठ. १.

३. मुलाखत, श्री. पाटील गुलाब शंकर माजी नगराध्यक्ष तासगाव नगरपालिका तासगाव, दि. २०/४/२०१०, संध्याकाळी ७ वा.

४. पुरोगामी जीवनसफर! कोळी भाई गणपतराव प्रकाशक, श्री. मधुकर रावकर संपादक 'युगारंभ' मुंबई प्रथम आवृत्ती जून २००८, पृष्ठ. ४३.

५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. ४४.

६. मोरे राजेंद्र आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास खंड-१ के. सागर प्रकाशन २००७, पृष्ठ. २३.

७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३.

८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३.

९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३-२४.

१०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. २३.

११. पुरोगामी जीवनसफर! कोळी भाई गणपतराव प्रकाशक, श्री. मधुकर रावकर संपादक 'युगारंभ' मुंबई, प्रथम आवृत्ती जून २००८, पृष्ठ ३.

१२. राष्ट्रवादी स्वभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार! संपादक सुधीर भोंगळे, मासिक जुलै, २००९ पृ. ३९.

१३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ. ३९-४०.

१४. कोळेकर के. वाय. दैनिक अग्रदूत, सांगली ३ सप्टेंबर तासगावचा यशस्वी स्वातंत्र्यलढा मोर्चा स्वातंत्र्य दिन एक सुवर्णपान दिनांक ३/९/१९९७, पृष्ठ २.

१५. लाड जी. डी. पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वतंत्र्य पुणे भारती विद्यापीठ पृष्ठ २५.

१६. गुरव बाबुराव उजळती प्रकाशरेषा, जनशांती प्रकाशन विटा, १९९९, पृष्ठ. ६१.

१७. पागे वि. स. एक व्रतस्थ लोकशिक्षक पागे, वि. स., स्मृति गौरव व जीवन विकास संस्था तासगाव रौप्यमहोत्सवी गौरव समिती १९९२.

१८. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री आदर्शच्या प्रकाशात विकसित झालेले, (संपा) उत्तम सुर्यवंशी, मराठी मातीचे वैभव, परखड प्रकाशन, नांदेड, १९८९, पृष्ठ क्र. १५.

१९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ६२.

२०. भोसले ए. आर., प्रतिसरकार चळवळीतील नाना पाटलांचे स्थान, एक चिकित्सा जयसिंगराव पवार (संपा) क्रांतीसिंह नाना पाटील गौरवग्रंथ, प्रथम आवृत्ती पृष्ठ. क्र. ५९.

२१. पागे वि. स., छोडो भारत चळवळीतील मोर्चाचे महत्व, क्रांतीसिंह नाना पाटील गौरव ग्रंथ (संपा) जयसिंगराव पवार प्रथम आवृत्ती पृष्ठ. क्र. ३०६.

२२. राष्ट्रवादी स्वभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार! संपादक सुधीर भोंगळे मासिक जुलै २००९, पृष्ठ ३९.

२३. यादव विजय दादा एक सेनानी स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर (चरित्र) स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती २००२ पृष्ठ. क्र. ६२-६३.

२४. पुरोगामी जीवनसफर! भाई गणपतराव कोळी प्रकाशक, श्री. मधुकर रावकर संपादक 'युगारंभ' मुंबई प्रथम आवृत्ती जून २००८, पृष्ठ ३.

२५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ५२.

२६. कोळी, गणपतराव एन. दै. नवसंदेश सांगली, आध्यावादी व ज्ञान कर्मयोगी स्वातंत्र्य सैनिक वि. स. पागे, दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २

२७. गुरव बाबुराव वि. स. पागे. एक व्रतस्थ लोकशिक्षक वि. स. पागे स्मृति गौरव व जीवन विकास संस्था तासगाव रौप्यमहोत्सवी गौरव समिती १९९२.

२८. वि. स. पागे 'छोडो भारत' चळवळीतील महत्त्व (सपा) जयसिंगराव पवार क्रांतिसिंह गौरव ग्रंथ पृष्ठ ३०६.

२९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ५२.

३०. यादव विजय दादा एक सेनानी स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांचे चरित्र उंडाळे स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती २००२ पृष्ठ. ६२, ६३.

३१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ५२.

३२. पागे वि. स., कविता मम नाद नौबती (संपा) वामन देशपांडे, दिपरेखा प्रकाशन मुंबई १९९३, पृष्ठ क्र. १०००.

३३. गुरव बाबुराव उजळती प्रकाशरेषा, जनशांती प्रकाशन विटा ,१९९९, पृष्ठ. ६१.

३४. लाड जी. डी. पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य पुणे भारती विद्यापीठ पृष्ठ २५.

३५. उत्तमराव पाटील, लाड आप्पासाहेब, क्रांतिवीर देशभक्त नाना पाटील औध उषा प्रकाशन १९४७, पृष्ठ ७७.

३६. उपरोक्त कित्ता. पृष्ठ ७८.

३७. गुरव बाबुराव, वि. स. पागे. एक व्रतस्थ लोकशिक्षक, वि. स. पागे स्मृति गौरव व जीवन विकास संस्था तासगाव रौप्यमहोत्सवी गौरव समिती १९९२.

३८. कोळी गणपतराव एन. म. गांधींच्या तत्वज्ञानाचे आग्रही पुरस्कर्ते, दैनिक कृष्णा एक्सप्रेस दि. १८/०३/१९९३, पृष्ठ क्र. ३.

३९. उपरोक्त कित्ता. पृष्ठ ४.

४०. कोळी गणपतराव एन. सच्चे गांधीवादी वि. स. पागे, दै. राष्ट्रशक्ती सांगली. दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

४१. लाड जी. डी., पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती विद्यापीठ पुणे. पृष्ठ ४५.

४२. कोळी गणपतराव एन. दै. नवसंदेश, सांगली, आध्यावादी व ज्ञान कर्मयोगी स्वातंत्र्य सैनिक, वि. स. पागे, दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

४३. पागे वि. स., कविता मम नाद नौबती, (संपा) वामन देशपांडे, दिपरेखा प्रकाशन, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र. १००.

४४. कोळी गणपतराव एन. म. गांधींच्या तत्वज्ञानाचे आग्रही पुरस्कर्ते, दैनिक कृष्णा एक्सप्रेस, दि. १८/०३/१९९३, पृष्ठ क्र. ३.

४५. कोळी गणपतराव एन. सच्चे गांधीवादी वि. स. पागे, दै. राष्ट्रशक्ती, सांगली. दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

४६. कोळी गणपतराव एन. दै. नवसंदेश, सांगली, अध्यात्मवादी व ज्ञानकर्मयोगी स्वातंत्र्यसैनिक, वि. स. पागे, दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

४७. पुरोगामी जीवनसफर! भाई गणपतराव कोळी प्रकाशक, श्री. मधुकर रावकर संपादक 'युगारंभ' मुंबई प्रथम आवृत्ती; जून २००८ पृष्ठ. ३.

४८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ३७.

४९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ३७.

५०. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ३८.

५१. गोखले, बाबुराव 'जागृत सातारा' पृष्ठ १२०-१२१.

५२. कोळेकर के. वाय., दैनिक अग्रदूत सांगली ३ सप्टेंबर तासगावचा यशस्वी स्वातंत्र्यलढा मोर्चा स्वातंत्र्यदिन एक सुवर्णपान दिनांक ३/९/१९९७ पृष्ठ ३.

५३. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ३.

५४. पागे वि. स. 'छोडो भारत' चळवळीतील महत्त्व(सपा)जयसिंगराव पवार क्रांतिसिंह गौरव ग्रंथ पृ. ३०६.

५५. माळी धोंडिराम बापू (जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक) मुलाखत वय ८९, ठिकाण कुपवाड दि. ०१/१२/२०१०.

५६. गुरव बाबुराव, वि. स. पागे. एक व्रतस्थ लोकशिक्षक, वि. स. पागे स्मृति गौरव व जीवन विकास संस्था, तासगाव. रौप्यमहोत्सवी गौरव समिती, १९९२.

५७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ३६.

५८. गोखले बाबुराव, 'जागृत सातारा' पृष्ठ १२०,१२१.

५९. लाड जी. डी., पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती विद्यापीठ पुणे, पृष्ठ २५.

६०. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री आदर्शच्या प्रकाशात विकसित झालेले (संपा) उत्तम सुर्यवंशी, मराठी मातीचे वैभव, परखड प्रकाशन नांदेड,

६१. भोसले ए. आर., हिस्ट्री ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन सातारा डिस्ट्रिक्ट. फ्रॉम १८८५ ते १९४७ ए क्रिटीकल स्टडी, पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर १९७८ पृष्ठ २५०.

६२. शिंदे आबासाहेब सातारचे प्रतिसरकारः प्रसंग आणि व्यक्ती उषा प्रकाशन कोल्हापूर पृष्ठ २२, २३.

६३. यादव विजय, दादा एक सेनानीः स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांचे चरित्र उंडाळे, स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती २००२, पृष्ठ. ६२,६३.

६४. पागे वि. स. 'छोडो भारत' चळवळीतील महत्त्व(सपा)जयसिंगराव पवार क्रांतिसिंह गौरव ग्रंथ पृ. ३०६.

६५. लाड जी. डी., पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती विद्यापीठ पुणे पृष्ठ २५.

६६. उत्तमराव पाटील, लाड आप्पासाहेब, क्रांतिवीर देशभक्त नाना पाटील, उषा प्रकाशन औध १९४७ पृष्ठ ७७.

६७. पागे वि. स., कविता मम नाद नौबती (संपा) वामन देशपांडे, दिपरेखा प्रकाशन मुंबई १९९३ पृष्ठ क्र. १०००.

६८. गुरव बाबुराव वि. स. पागे. एक व्रतस्थ लोकशिक्षक वि. स. पागे स्मृति गौरव व जीवन विकास संस्था तासगाव रौप्य महोत्सवी गौरव समिती १९९२.

६९. कोळेकर के. वाय. दैनिक अग्रदूत सांगली ३ सप्टेंबर तासगावचा यशस्वी स्वातंत्र्यलढा मोर्चा स्वातंत्र्य दिन एक सुवर्णपान दिनांक ३/९/१९९७.

७०. भोसले ए. आर. हिस्ट्री ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन सातारा डिस्ट्रिक्ट फ्रॉम १८८५ ते १९४७ ए क्रिटीकल स्टडी, पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर १९७८, पृष्ठ २५०.

७१. पुरोगामी जीवनसफर! कोळी भाई गणपतराव प्रकाशक श्री. मधुकर रावकर संपादक ‘युगारंभ’ मुंबई प्रथम आवृत्ती जून २०००, पृष्ठ. १०३.

७२. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १०४.

७३. कोळी गणपतराव एन. म. गांधींच्या तत्वज्ञानाचे आग्रही पुरस्कर्ते, दैनिक कृष्णा एक्सप्रेस दि. १८/०३/१९९३, पृष्ठ क्र. ४.

७४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ १२४.

७५. कोळी गणपतराव एन, सच्चे गांधीवादी वि. स. पागे, दै. राष्ट्रशक्ती सांगली, दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

७६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ४.

७७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ ५.

७८. कोळी गणपतराव एन. दै. नवसंदेश सांगली, आध्यात्मवादी व ज्ञान कर्मयोगी स्वातंत्र्य सैनिक वि. स. पागे दि. १६/०३/१९९१, पृष्ठ क्र. २.

७९. पुरोगामी जीवनसफर! कोळी भाई गणपतराव प्रकाशक, श्री. मधुकर रावकर संपादक ‘युगारंभ’ मुंबई प्रथम आवृत्ती जून, २००८ पृष्ठ. २२३.

८०. उपरोक्त कित्ता. पृष्ठ २२५.

८१. मुलाखत, भगिरथी रामराव पाटील(आबांची आई) वय ७६, ठिकाण अंजनी ,दि. ०२/०९/२०१०.

८२. उपरोक्त कित्ता.

८३. भालेराव इंद्रजीत ‘प्रिय आबा’, जनशांती प्रकाशन सातारा २००८ ,पृष्ठ क्र. ४५.

८४. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४५.

८५. ‘मी कसा घडलो’ आर. आर. पाटील आत्मचरित्र क्र. ४५.

८६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ४६.

८७. साप्ताहिक मिरज टाईम्स - आर. आर. पाटील वाढदिवस विशेषांक २००९, पृष्ठ क्र. ४.

८८. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १५.

८९. साप्ताहिक कुलभूषण, संपादक धीरज भिंगारदिवे गौरवांक २००७, पृष्ठ क्र. २५.

९०. श्री. साळुंखे श्रीधर ‘सहृदयी योद्धा’ फडके प्रकाशन कोल्हापूर, २००६, पृष्ठ क्र. १०५.

९१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १०५.

९२. दूरदृष्टीचा जाणता नेता, श्री. रविकिरण माने, स्वामी पब्लिकेशन पुणे, १९९२, पृष्ठ क्र. ५३.

९३. संत गाडगेबाबा स्मारक ग्रंथ, प्राचार्य रा. तु. भागवत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर, १९९८ पृष्ठ क्र. ३३.

९४. 'सहृदयी नेता' उत्तम कांबळे (संपा सकाळ) साई प्रकाशन नाशिक २००७, पृष्ठ क्र. १११.

९५. लक्षवेधविकास योजनांचा जनशक्ती प्रकाशन सांगली २००४, पृष्ठ क्र. ४.

९६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १०.

९७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १०.

९८. मा. आर. आर. पाटील ज्ञान प्रबोधिनी तासगाव ४१६३१२ नोंदनी क्र. महाराष्ट्र/५५६८/ सांगली दि. ०२/०९/१९९६, गौरव विशेषांक/पृ क्र. ५५-५७.

९९. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ३६.

१००. लक्षवेधविकास योजनांचा जनशक्ती प्रकाशन सांगली २००४, पृष्ठ क्र. ६.

१०१. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. ६.

१०२. मुलाखत, प्राचार्य शासकीय महिला तंत्रनिकेतन तासगाव दि. ०१/०३/२०१०.

१०३. मुलाखत, श्री. सूर्यवंशी एस. ए. सभापती, कृषि उपन्न बाजार समिती तासगाव दि. १८/०३/२००९.

१०४. लक्षवेधविकास योजनांचा जनशक्ती प्रकाशन सांगली २००४, पृष्ठ क्र. १०.

१०५. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १४.

१०६. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १६.

१०७. उपरोक्त कित्ता, पृष्ठ क्र. १८.

१०८. मा. आर. आर. पाटील ज्ञान प्रबोधिनी तासगाव ४१६३१२ नोंदनी क्र. महाराष्ट्र/५५६८/ सांगली दि. ०२/०९/१९९६ गौरव विशेषांक पृष्ठ क्र. २५.

१०९. 'रयतेचा राजा' दीनबंधू मा. आर. आर. पाटील गौरवांक २००८ पृ क्र. ५.

**प्रकरण आठवे**

# उपसंहार

स्वातंत्र्योत्तर काळातील तासगाव शहराच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय अभ्यास म्हणून ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करीत असताना, शहराचा भौगोलिक अभ्यासावरून हा भाग पश्चिमेकडील सह्याद्रीच्या पूर्व उताराचा डोंगराळ रांगा व त्यातून निघणाऱ्या भैरवगड डोंगर रांगा यांनी मुख्यतः कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट व सुपीक प्रदेश यामध्ये तासगाव तहसिलचा समावेश होतो. तासगाव शहर समुद्र सपाटीपासून ५७० मीटर उंचीवर समांतर रेषेत आहे. हे उत्तरेकडे १७°-२’ ते १७°-५’ अक्षांश व पुर्वेकडे ७४°-३५’ ते ७४°-३७’ रेखांश यांच्यामध्ये वसले आहे. हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे. तापमान उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात अनुक्रमे ४०° सें व २०° सें. असते. नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून येथे सरासरी वार्षिक पर्जन्यवृष्टी ६२६ मि. मी. इतका पाऊस पडतो.

तासगाव शहराची २००१ जनगणनेनुसार लोकसंख्या ३३,४५७ यामधील स्त्रिया १६,०७० व पुरूष १७,३८७, लोकसंख्येची घनता ७७१ आहे. लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वृद्धीदर १३.८३% इतका आहे. स्त्री-पुरूष प्रमाण दर हजार पुरूषामागे ९५८ स्त्रिया, साक्षरतेचे एकूण प्रमाण ८३,८०% पैकी स्त्रिया ७५,८०% पुरूष ९१,३०% पुरूष प्रधान संस्कृतीमुळे तसेच स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे स्त्री-भ्रूण हत्येचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. तासगाव शहराची घरे ६,५९० प्रभाग १९ नगरपालिका वर्ग **‘क’** आहे. नगरपालिकेचे क्षेत्रफळ ४३.४१ चौ. कि. मी. आहे.

तासगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता प्राचीन कालखंडाविषयीची माहिती उजेडात आली. सातारा जिल्ह्यामध्ये झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनातून येथे पुराश्मयुगीन मानवाचे अस्तित्व दर्शविणारे काही पुरावे उपलब्ध झाले आहेत. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात मानवी विकासाच्या टप्प्यातील काही पाषाणाचे अवशेष मिळतात. या पाषाणावर चित्रे कोरलेली आहेत.

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासात तासगाव संस्थानाचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. १२ व्या शतकात तासगाव संस्थान देवगिरीच्या यादव राजा कृष्णदेवराय यांच्या साम्राज्यात समाविष्ट होते. इ. स. १३४७ मध्ये ‘हसन गंगू बहामनी’ याने कर्नाटकातील ‘गुलबर्गा’ येथे बहामनी राजवट स्थापन केली होती. बहामनी सत्तेचा वजीर महंमद गवानच्या काळात बहामनी सत्तेची तासगाव विभागावर सत्ता होती. या बहामनी राजवटीनेही काही काळ महाराष्ट्रावर सत्ता गाजविली. इ.स. १५२६ मध्ये बहामनी राजवटीचा शेवट होवून त्याची पाच शकले पडली व तेव्हा तासगाव परिसर विजापूरची आदिलशाही राजवटीत होता.

कालांतराने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची इ.स. १६४७ मध्ये स्थापना करून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य पश्चिम महाराष्ट्रामध्ये स्थापन केले. इ.स. १७३० मध्ये कोल्हापूरच्या संभाजीराजांनी सातारच्या शाहू राजांना जी गावे इनाम दिली होती, त्यापैकी एक म्हणजे तासगाव. पुढे पेशवाईत सरदारांची अनेक घराणी उदयाला आली. त्यात तासगावचे पटवर्धन घराणे हे कर्तबगार घराणे होते.

स्वातंत्र्योत्तर काळात १८४८ मध्ये तासगाव संस्थानाचे विलिनीकरण केल्यावर दक्षिण सातारा जिल्ह्यात तासगावचा समावेश होता. सातारा जिल्ह्यात अकरा शासकीय विभाग तर बारा नवीन महालात तासगावचा समावेश होता. सन १८५०च्या स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा पास केला व या कायद्यानुसार १८६५ मध्ये तासगाव नगरपालिका अस्तित्वात आली. सन १९११ मध्ये तासगाव तालुक्यात ४८ खेड्यांचा समावेश केला होता

तासगाव शहराची नगरपालिका ही १४७ वर्षाहून अधिक वयाची आहे. सुमारे ४३.४१ चौ. कि. मी. क्षेत्रफळ असलेली व २००१ च्या जनगणनेनुसार ३३,४५७ लोकसंख्या असलेल्या या नगरपालिकेचा कारभार एका विशिष्ट ध्येयाने सुरू आहे. विकेंद्रीकरणाच्या दृष्टिकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत लोकप्रतिनिधींच्या हस्ते लोकशाहीमार्गाने स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींच्यामार्फत प्रश्न सोडवण्याकरता नगरपालिकेची स्थापना झाली. तासगाव नगरपालिकेचे स्थापनेच्या वेळचे उत्पन्न २२ रूपये होते ते आता जवळजवळ ३१.३९ कोटीपर्यत गेले आहे. वास्तविक हे उत्पन्न खर्चापेक्षा जास्त आहे. यावरून तासगाव नगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम दिसत असली तरी पायाभूत सुविधांचा विचार करता पाणी, घनकचरा, गटारी आणि वीज अत्यंत लोकसंख्याच्या प्रमाणात अपुऱ्या वाटतात. त्यांच्यावर जास्त खर्च होणे अपेक्षित आहे.

सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यासाठी नगरपालिकेने स्वच्छ पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, तासगाव नगरपालिकेने सांडपाण्याची व्यवस्था काही ठिकाणी बंद गटाराद्वारे केली आहे. तर काही ठिकाणी उघड्या गटाराद्वारे केली आहे. मलनिःस्सारणासाठी सेप्टिक टँक असून त्यातून बाहेर पडणारे पाणी हे रस्त्याकडेच्या गटारातून बाहेर टाकले जाते. शहरातील साठेनगर येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प केला तर त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी व इतर कारणासाठी वापरता येईल.

नगराच्या नियोजन नुसार नगरा अंतर्गत रस्तेबांधणी आणि देखभाल दुरूस्ती हे नगरपालिकेच्या अखत्यारित येते. तासगाव नगरपालिकेने आराखड्यानुसार रस्ते आखले गेले असले तरी त्याचे बांधकाम डिझाईन अत्यंत अपुरी आहे. रस्त्ये बांधणी काही निकृष्ट दर्जाची आहे. देखभाल अत्यंत किरकोळ स्वरूपाची आहे. शिवाय मुख्य बाजारपेठेमधील रस्ते अरूंद असल्याने दळणवळणासाठी त्रासदायक बनत

आहेत. तासगावला बसची वाहतूक व्यवस्था असली तरी काही वाहतूक रिक्षा व इतर वाहने होती. त्यामुळे खाजगी वाहणे, दुचाकी व सायकली यांचे प्रमाण जास्त आहे. शहरात काशिपूरा ते साठेनगर ओढ्याच्या उत्तर दिशेच्या काठावरून पूर्व पश्चिम रस्ता केल्यास तासगाव शहराची वाहतुकीची कोंडी सुटण्यास मदत होईल.

तासगाव शहरात वीज पुरवठा जवळ-जवळ सर्व नागरिकांना उपलब्ध आहे. मात्र वीज पुरवठ्याचा तुटवडा असल्याने शहराच्या औद्योगिकीरणावर व इतर व्यवसायावर विपरीत परिणाम होतो आहे. तसेच नागरी प्रशासन असूनही जुन्याच कायद्यावर हाताळले जात आहे. पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्या जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे मुबलक व नियमित पाणीपुरवठा होत नाही. शहराच्या पाणी पुरवठा व वितरण व्यवस्थेची कामे नव्याने होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच लोकांना वीज बचतीसाठी जास्तीत जास्त सौरऊर्जेचा वापर कारण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. तसेच पावसाचे पाणी साठवण करून (रेनवॉटर हार्वेस्टींग) व्यवस्था करणे गरजेचे आहे.

तासगांव नगरपरिषदेचा कारभार महाराष्ट्र नगरपालिका कायद्यानुसार चालतो. त्यानुसार नगरपालिकांना असलेले व्यवस्थापनाचे अधिकार तसेच जबाबदाऱ्या ही मर्यादित आहेत. मालमत्ता कर, पाणीपट्टी, रस्ते आणि शिक्षण कर जमा करण्याचे अधिकार नगरपालिकांना आहेत. जकात कर सन १९९९ सालापासून रद्द झाला असून त्या ऐवजी नगरपालिकांना राज्य शासनाचे अनुदान मिळते. अनेक बाबतीत राज्य सरकारची धोरणे स्थानिक प्रशासनाला राबवावी लागतात. तसेच सत्तेचे विकेंद्रीकरण प्रत्यक्षात झालेले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यात बदल करून त्यांच्यावर अधिक जबाबदारी टाकणारी ७४ वी घटना दुरूस्ती केंद्र शासनाने केली आहे. मात्र त्यानुसार नगरपालिकेचा कारभार होताना दिसत नाही. पारंपारिक कामाच्या पलिकडे असणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव पालिकेमध्ये दिसून येत नाही.

थोडक्यात तासगाव शहराचा मर्यादित आवाका नगरपालिकेचे लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे उत्पन्न औद्योगिक विकासाचा अभाव नगरपालिकेतील सत्ता स्पर्धेचे राजकारण या सर्व गोष्टीचा एकत्रित परिणाम म्हणजे तासगाव शहरात मुलभूत नागरी सोयी व आवश्यक त्या सुधारणा होवू शकल्या नाहीत. तालुक्याच्या ठिकाणचे तासगाव शहराचे स्वरूप मात्र 'एक शहर' म्हणून एवढेच मर्यादित राहिले.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार फार वेगाने झालेला दिसून येतो. तासगावच्या शैक्षणिक विकासात येथील शिक्षणधुरीणांनी केलेल्या शिक्षण प्रसाराच्या कार्यामुळे शिक्षण विश्वात तासगावचे नाव मोठे आहे. आज तासगाव शहरात प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत सोयी सुविधानियुक्त शिक्षण मिळत आहे. तसेच मतिमंद व मुकबधीर यांच्याही शिक्षणाकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. तासगाव शहरात नगरपालिका शिक्षण मंडळाकडून चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचा दर्जा

हा शहरातील इतर संस्थेपेक्षा कमी आहे. विद्यार्थी संख्या लक्षात घेता संगणकाचा फारसा वापर पालिकेच्या शाळेतून दिसून येत नाही व इतर प्राथमिक सुविधांचाही अभाव आहे. त्यामुळे पालकांचा ओढा खाजगी शाळांकडे असल्याचे दिसून येतो.

थोडक्यात तासगाव शिक्षणाची संख्यात्मक वाढ झालेले दिसते. शाळा महाविद्यालयाची संख्या दिवसेदिवस वाढत आहेत. शिक्षण क्षेत्रात नव्या कल्पना नव्या योजना येत आहेत. त्याचबरोबर काही संस्थांचा गुणात्मक विकासही पहायला मिळतो. तसेच शैक्षणिक संस्थानी विविध समस्येवर जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे.

तासगाव शहराचा सामाजिक इतिहास अभ्यासताना समाजाचा इतिहास लिहिणे महत्वाचे असते. शहरामध्ये विविध धर्मिय लोक गुण्या गोविंदाने राहतात. हिंदू धर्माचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून इतर धर्मियांचे प्रमाण अल्प आहे. तसेच सामाजिक घटकावर शिक्षण, समाज व्यवस्था, संस्कृती यांचा परंपरागत प्रभाव दिसून येतो. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना दुय्यम स्थान आहे.

१९६० च्या दशकांत स्त्री साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. लोक आपल्या मुलीला शाळेत पाठवत नव्हते. या काळात बालविवाह प्रतिबंधक कायदा होऊनही बहुतांशी मुलींचे विवाह बालवयात होत होते. त्यामुळे बालमाता, विधवा माता व मातांचे मृत्यूचे प्रमाण अधिक होते. स्त्रिया चूल व मूल, या संकल्पनेत अडकून राहिल्या. शहरात नगराध्यक्ष सौ. पद्मावती गणपतराव कोळी (१९६७) या राजकीय नेत्याच्या घरातील असल्यामुळे त्या वगळता सर्वसामान्य स्त्रियांचा राजकीय क्षेत्रामध्ये सहभाग नव्हता. समाजावर पुरूषांचे वर्चस्व होते. स्त्रियांना धार्मिक कार्यात मात्र महत्त्वाचे स्थान होते.

७३ व्या घटनादुरूस्तीने स्त्रियांना पंचायत राज व्यवस्थेत १/३ जागा ठेवण्यात आल्या. त्यानुसार स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये काम करू लागल्या. तासगाव शहरात ७ महिला नगरसेविका होत्या. त्यामध्ये नगराध्यक्ष सौ. रजनीगंधा धनपाल लंगडे (१९९०) यांनी नगरपालिकेत चांगल्या प्रकारचे काम केल्याचे दिसून येते. तसेच अनेक शासकीय निमशासकीय नोकऱ्यामध्ये महिला जबाबदारपणे काम करीत आहेत. पण काही ठिकाणी महिला ह्या नाममात्र ते पद भूषवितात. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले आहे. पण असे दिसून येते की या साधारणपणे सर्व महिला राजकारण्यांच्या घरातीलच आहेत. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अनेक स्त्रिया आज नोकरी व गृहिणी ह्या दोन्ही भूमिका पार पाडतात. पण अशा स्त्रीला घरच्या मंडळीची योग्य ती सरबराई करावी लागते. शहरात फार पूर्वी पासून हुंड्याची चाल प्रचलित असली तरी अलिकडच्या काळात तिला अनिष्ठ वळण लागले आहे. तासगाव शहरात हुंडा पद्धत अजूनही सर्रास सुरू आहे. अधिक हुंडा

घेणाऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. हुंडा देता येत नसल्यामुळे अनेक मुलींना विवाह प्रसंगी प्रतिकूल स्थळांना मान्यता द्यावी लागते.

प्राचीन काळापासून अर्थव्यवस्था शेती व शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायावर अवलंबून होती. सध्या शहरे ही प्रादेशिक व आर्थिक विकासात महत्वाची भूमिका पार पाडत असतात. तसेच ती प्रादेशिक विकासाला ऊर्जा देणारी इंजिने असतात. तासगाव हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे विविध प्रशासकीय कार्यालयाची स्थापना झाली आहे. तासगावची आर्थिक स्थिती पाहिली असता येथे शेती हा मुख्य व्यवसाय असून शेती बरोबरच शहरातील बहुतांशी लोक शेतमजुरी करतात. द्राक्षबागा, बेदाणे प्रक्रिया उद्योग, पशुपालन, बांधकाम व्यवसाय, लघु व कुटिरोद्योग, घरगुती व्यवसाय, कोल्ड स्टोअरेज व्यवसाय, व्यापार व वाणिज्य इत्यादी लघू उद्योग, कुटीर उद्योग व त्यावर अवलंबून असलेले पुरक व्यवसाय हेच आर्थिक व्यवस्थेचा प्रमुख घटक असल्याचे दिसून येते.

शहरातील सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या प्रमाणामध्ये औद्योगिक वसाहत, शासकीय कार्यालये, शिक्षण, आरोग्य संस्था, व्यापार, कृषि, करमणूक, वाहतूक, बँका, दुकाने व पतसंस्था, फेरीवाले व बाजार यांचा समावेश होतो. शहराच्या आर्थिक आधाराची संकल्पना ही औद्योगिक व वाणिज्य प्रकारच्या कार्यावर अवलंबून आहे. अभ्यासाच्या क्षेत्रामध्ये असे आढळून आले की, शहरात ८०% लोकसंख्या तृतीय क्षेत्रात कार्यरत आहे. ६% लोकसंख्या द्वितीय क्षेत्रात कार्यरत आहे. व १४% लोकसंख्या कृषि क्षेत्रात आहे. एकंदरीत तासगावचा राजकीय व सामाजिक इतिहासाशी आर्थिक इतिहासाचा खूप निकटचा संबंध आहे. पण योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणा अभावी आर्थिक प्रगती झरलेली दिसून येत नाही.

तसेच 'वैज्ञानिक द्राक्षकूल' नावाची संघटना तासगाव भागातील द्राक्ष बागायतदारांनी स्थापन केली. ही संघटना द्राक्षपिकांच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या बहुतेक प्रश्नाबाबत अभ्यास करीत असे आणि त्याबाबत द्राक्षपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत असे. येथील 'तासगाव चमन' या द्राक्षाच्या वाणाने द्राक्षामध्ये मोठी क्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या वेगवेगळ्या भागातून शेतकरी, शास्त्रज्ञ व व्यापारी वर्ग तासगाव भागातील द्राक्षपिकाबाबत केलेल्या नव्या प्रयोगाची माहिती घेऊ लागले आहेत. परिणामी द्राक्ष पीक घेण्याच्या संदर्भात 'तासगाव पद्धत' आदर्श मानली जाते. पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असताना आणि दुष्काळाचे संकट सतत असताना द्राक्ष लागवडीद्वारे तासगाव तालुक्याचा चेहरा मोहरा बदलला आहे. पण योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणा अभावी संघटनेचे स्वरूप मात्र 'द्राक्ष बागायतदार संघ' एवढेच मर्यादित राहिले.

अनेक लहान शेतकरी स्वत: किंवा कंपन्यांमार्फत धाडस करून नेदरलँड, इंग्लंड, बेल्जियम, जर्मनी, नॉर्वे, डेन्मार्क, हंगेरी, इटली, पोलंड, स्वीडन, फिनलँड, ऑस्ट्रीया व रोमानिया देशातील

बाजारपेठेत पोहोचले आहेत. येथील द्राक्ष निर्यातीत वाढ होत आहे. गुणवत्तेची द्राक्षे असल्याने दरही चांगला मिळाला आहे. तासगावमधील द्राक्ष बेदाण्याला मोठी परदेशी बाजार पेठ मिळाल्यामुळे, परदेशी गुंतवणुकीची उलाढाल होते. थोडक्यात जागतिकीकरणाचे सकारात्मक रूप येथे पहावयास मिळते.

१९२०-३० च्या कालखंडामध्ये काँग्रेस चळवळीचे स्वरूप बदलून महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीस अहिंसक मार्गाने दिशा प्राप्त झाली. महात्मा गांधीजीच्या मिठाच्या सत्याग्रहाने आणि दांडी यात्रेच्या ऐतिहासिक पदयात्रेमुळे इंग्रजी राजवटीबद्दलच्या असंतोष निर्माण झाला. सातारा भागात नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारच्या प्रतिसरकारचे कार्य प्रभावीपणे होते. तर तासगाव परिसरात राष्ट्रसेवादलात तरूण वर्ग कार्यरत होता. या वसंतरावदादा पाटील, वि. स. पागे, गणपतराव कोळी, का. दि. पोक्षे, चिंतोपंत काळे, बाबूराव थोरबोले, आबासाहेब जोग, आकाराम थोरबोले, अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी व राष्ट्रसेवादलातील अनेक कार्य स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. श्री. वि. स. पागे यांनी याच काळात सांगली विलिंग्डन कॉलेजवर तिरंगा फडकविला. आबासाहेब जोग यांनी गजानन व्यायामशाळेच्या माध्यमातून राष्ट्रवादी तरूणांचे संघटन केले. जेधे-गाडगीळ यांची प्रचंड सभा तासगावमध्ये झाल्या. राष्ट्रसेवादलातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी तालुकाभर तासगाव, बिसूर, येळावी, भिलवडी, धामणी येथे वैयक्तिक सत्याग्रह केले.

या पार्श्वभूमीवर तासगाव मोर्चा ठरला. अहिंसेच्या मार्गाने निघालेल्या मोर्चाच्यामध्ये जनतेचा उत्स्फूर्त सहभाग होता. या मोर्चात वि. स. पागे यांनी आपले बौद्धिक कौशल्याचा वापर करून इंग्रजी सत्तेला आव्हान दिले होते. त्यांनी तासगावमध्ये शांतता कमिटी स्थापन केली. गांधी हत्येमुळे लोकांच्यात असंतोष पसरला होता. जिल्हाभर जाळपोळ, दंगल चालू होत्या. तेव्हा असे प्रकार थांबावेत यासाठी ते उपोषणाला बसले, तेव्हा गावामध्ये राष्ट्रसेवादलाच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने शांतता पथके तयार करण्यात आली.

शहराच्या राजकीय इतिहासात गणपतराव कोळी सारखे नि:स्वार्थी प्रमाणिक आणि तत्त्वनिष्ठ स्वातंत्र्य सैनिक, स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या योगदानाचे त्यांनी कधीही भांडवल केले नाही. त्याच्या बरोबरचे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. अनेक सहकारी उच्च पदस्त, केंद्रीय मंत्री, खासदार-आमदार झाले. कोळी मात्र शेवटपर्यंत इंदिरा गांधीजीसोबत राष्ट्रीय राजकारणात राहूनही व दोनदा आमदार होऊनही मोडक्या झोपडीतच राहिले! सदैव गरिबांकरिता झटणाऱ्या गणपतराव कोळींना प्रेमाने लोकांनीच वर्गणी जमवून एका खोलीचे घर बांधून दिले. सन १९६५ साली चीनने भारतावर हल्ला केल्यावर पंडीत नेहरूंनी भारतीय जनतेला आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. तासगावात वि. स. पागेजींनी जाहीर सभेत युद्ध

खर्चासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. त्यावेळी सर्व प्रथम सौ. पद्मा गणपतराव कोळी यांनी आपल्या गळ्यातील, कानातील दागिने काढून पार्गेंच्या हातात दिले.

ना. आर. आर. (आबा) पाटील हे एक बहुपेढी नेतृत्त्व आहे. म्हणून अंजनीसारख्या खेडेगावात जन्मलेले 'कमवा व शिका' या योजनेतून शिक्षण घेतलेले, रोजगार हमीच्या कामावर जावून त्यांनी ज्ञान व यश मिळविले. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा उपयोग समाजकार्यासाठी केलेला आपणास दिसून येतो. त्यांच्या कल्पनेतल्या योजना जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत. त्यांची वैचारिक प्रगल्भता व तसेच उत्कृष्ट वक्तृत्वाच्या जोरावर ते अल्पावधीतच गृहमंत्री व उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहचले.

प्रस्तूत संशोधनासाठी उपलब्ध साधनांच्या आधारे संशोधनात्मक इतिहास लिहिताना 'स्थानिक इतिहासावर' प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तासगावचे पटवर्धन संस्थान, नगरपालिकेचा इतिहास, सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, शैक्षणिक, धार्मिक प्रगतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय घडामोडी व समकालीन कर्तृत्त्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यत तासगाव शहराचा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टांना अनुसरून निष्कर्ष

१. ऐतिहासिक पार्श्वभूमी पहात असताना तासगावचा इतिहास उजेडात आला आहे.
२. तासगाव शहर व परिसरातील घडामोडीची माहिती मिळाली आहे.
३. स्वयंसेवी व बहूउद्देशीय संस्थांच्या कार्याची माहिती मिळाली.
४. नगरपालिका विकास, कायदे व नियमांचा आढावा घेतला आहे.
५. स्थानिक कार्यकर्त्यांना स्वातंत्र्य चळवळीतील योगदानामुळे प्रेरणा मिळाली.
६. ऐतिहासिक वास्तूचे सांस्कृतिक व धार्मिक महत्व समजले आहे.
७. समाज-जीवन, चाली-रिती, रूढी-परंपरांची माहिती मिळाली.
८. प्राथमिक ते उच्चमाध्यमिक पर्यंतचा शैक्षणिक आढावा घेतला आहे.
९. तासगावच्या द्राक्ष-बेदाण्यामुळे येथील लोकांना रोजगार मिळाला आहे.
१०. नगरपालिका प्रशासनामुळे सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारली आहे.
११. तासगाव शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास अभ्यासकाना माहिती मिळेल.

## गृहितकाला अनुसरून निष्कर्ष

१) स्वातंत्र्योत्तर काळात तासगावचा ऐतिहासिक मोर्चा अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झालेला होता.

२) सामाजिक व आर्थिक जीवनात बदल झालेला आहे.

३) लोकसंख्येच्या तुलनेत शैक्षणिक संस्थांचा विकास झालेला आहे.

४) लोकांच्या धार्मिक प्रवृत्तीमुळे येथील लोक श्रद्धाळू व समाज हा रूढीप्रिय आहे.

५) तासगाव शहराला मध्ययुगीन काळात परकीय इतिहासकारांनी भेटी दिल्या, त्यावेळी त्यांनी तासगाव शहराविषयी गौरवोद्गार काढले आहे.

६) राजकीय क्षेत्रातील नेतृत्व बदल यामुळे शहराच्या विकासात भर पडलेली आहे.

७) तासगावमधील सामाजिक कार्यकर्त्यांनी  समाज सुधारणेची कामगिरी केलेली आहे.

८) ऐतिहासिक वास्तू व पर्यटन स्थळे यांचे महत्व इतिहासात आहे

९) द्राक्ष बेदाण्याच्या उद्योगामुळे तासगावची आर्थिक प्रगती झाली आहे.

# संदर्भसूची

## प्राथमिक साधने

१. महाराष्ट्र राज्य, इतर मागासवर्गीयांचे वित्त व विकास महामंडळ सांगली जिल्हा, माहिती पुस्तिका.

२. महाराष्ट्र राज्य, अपंग आणि विकास महामंडळ सांगली जिल्हा, लाभार्थी योजना, कार्यालयीन कागदपत्रे.

३. महाराष्ट्र राज्य, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, सांगली जिल्हा, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन २००१.

४. महाराष्ट्र राज्य-कृषी विभाग, सांगली जिल्हा, रजिस्टर महाराष्ट्र शासन, मुंबई २०१०.

५. महाराष्ट्र शासन, जी. आर क्रमांक, १०८९/२१७७ परिषद १ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.

६. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, जी. आर, दि. २० मार्च २००१ जिल्हा परिषद सांगली.

७. महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास, संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, माहिती पुस्तिका पुणे १९८७.

८. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव, माहिती पत्रक - २०११.

९. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, इनाम जमिनी, रजिस्टर फाईल, सन २०१०.

१०. पंचायत समिती तासगाव, रोजकीर्द, खतावणी व आमसभा वृतांत फाईल, १९९२, २००१, २००३-२००४, २०१०-२०११

११. सांगली जिल्हा, समाजकल्याण विभाग, वार्षिक कार्यालयीन टिपण्णी व कागदपत्रे.

१२. सांगली जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, माहिती पुस्तिका.

१३. सांगली जिल्हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग, कार्यालयीन माहिती पुस्तिका.

१४. सांगली जिल्हा परिषद ग्रामीण विकास यंत्रणा, माहिती पुस्तिका.

१५. सांगली शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, साधना शिक्षण संस्था व जीवन विकास संस्थांची कार्यालयीन कागदपत्रे.

१६. सामाजिक न्यायाच्या दिशेने, महासंचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय मुंबई.

१७. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ, माहिती पुस्तिका.

१८. साठे अण्णाभाऊ, (लोकशाहीर) विकास महामंडळ, विभाग फाईल.

१९. तासगाव मजुर सोसायटी, मजूरी दर वार्षिक फाईल.

२०. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती, वार्षिक कार्यालयीन टिपण्णी.

२१. तासगाव नगरपालिका विभागवार कार्यालयीन कागदपत्रे सन १८५० २०११.

२२. तासगाव नगरपालिका अर्थसंकल्प व वार्षिक लेख सन १८७२-२०११.

२३. तासगाव नगरपालिका शिक्षण मंडळ, खतावणी, रोजकिर्द, प्रोसिडिंग व वार्षिक कार्यालयीन टिपण्णी.

२४. तासगाव तहसिल व पंचायत समिती कार्यालयीन कागदपत्रे.

२५. तासगाव तालुका पोलिस रेकॉर्ड वार्षिक फाईल, नागरी हक्क गुन्हा नोंदनी फाईल व नोंद रजिस्टर.

२६. तहसील कार्यालय तासगाव दारिद्रय रेषेखालील जनगणना माहिती पुस्तिका २००१.

२७. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र तासगाव, रजिस्टर फाईल.

२८. विधानसभा समालोचन वृत्तांत विधानसभा ग्रंथालय मुंबई म. शासन १९५२ ते २०१०.

## मुलाखती

१. एडके के. डी. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव.

२. बक्षी मिलिंद, शाखाधिकारी एल.आय.सी ऑफ इंडिया तासगाव.

३. देसाई मनोजकुमार, मुख्याधिकारी नगरपालिका तासगाव.

४. गुरव बाबुराव, जेष्ठ विचारवंत व साहित्यिक तासगाव.

५. गुरव सत्यवती मारूती, मुख्याध्यापक नुतन मराठी विद्यानिकेतन तासगाव.

६. गायकवाड मारूती दत्तात्रय मुख्याध्यापक, चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगाव.

७. हिंगमेरे महादेवराव गोपिनाथ चेअरमन तां. अर्बन बँक तासगाव.

८. जाधव संभाजी, आरोग्य विभाग, नगरपालिका तासगाव.

९. कोळेकर के. वाय., सचिव जीवन विकास संस्था तासगाव.

१०. लंगडे रजनीगंधा धनपाल, माजी नगराध्यक्षा तासगाव.

११. माळी दिपक पत्रकार, तासगाव तालुका प्रतिनिधी.

१२. पाटील भारती सुरेश, साहित्यिक व कवयित्री तासगाव.

१३. पाटील भगिरथी रामराव आर. आर पाटील यांच्या आई.

१४. पाटील पी. डी., माजी अध्यक्ष मजुर सोसायटी तासगाव.

१५. शिणगारे सुनिल आण्णासाहेब डांगे आश्रमशाळा तासगाव.

१६. शेजवळ एस. जी. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव.

१७. उमराणी एस. जी. मुख्याध्यापक, गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा तासगाव.

१८. वाडकर ए. बी. प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ तासगाव.

## वार्षिक अहवाल

१. अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ ऐज्युकेशन तासगाव वार्षिक अहवाल २००६-२००७.
२. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल.
३. जागृती अध्यापिका विद्यालय तासगाव वार्षिक अहवाल सन २०११.
४. सांगली जिल्हा परिषद वार्षिक अहवाल १९९१-९२.
५. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. लि तासगाव ८४ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद सन २०१०-२०११.
६. सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक २७ वा वार्षिक अहवाल सन २००६-२००७,
७. तासगाव कृषि उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल २००९.
८. वसंतदादा दुग्ध व्यवसाय विकास, जिल्हा सहकारी संघ मर्यादित तासगाव २१ वा वार्षिक अहवाल सन २००४-०५.

## स्मरणिका/गौरव अंक

१. आर्य समाज एज्यूकेशनल इन्स्टीटयूट, कोल्हापूर ९१ वा वर्धापन दिन स्मरणिका २००७.
२. दै. पुण्यनगरी ‘सांगलीरत्न’ वर्धापनदिन विशेषांक.
१. पागे वि. स., ‘जीवनदीप’ स्वातंत्र्य संग्राम स्मृति प्रतिष्ठान व स्मृतिभवन, तासगाव स्मरणिका २०१०.
२. पाटील आर. आर. रयतेचा राजा’ दीनबंधू गौरवांक २००८.
३. पाटील आर. आर. ज्ञान प्रबोधिनी तासगाव विशेषांक.
४. पटवर्धन परशुरामभाऊ (तासगावकर) स्मरणिका.
५. प्रेरणा’ कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय वार्षिक अंक.
६. ‘संस्कार’ पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव वार्षिक अंक २०१०-११.
७. तासगाव हायस्कूल तासगाव हीरक महोत्सव स्मरणिका १९८-८१.
८. तासगाव अर्बन को-ऑप बॅक लिमिटेड तासगाव अमृत महोत्सव स्मरणिका २०११.
९. ठाकूर  प्र. श. कृषिभूषण गौरवग्रंथ भूमिपूत्राचा सांगली.

## दुय्यम साधने

१. बाबुराव गुरव, उजळती प्रकाश रेखा, जनशक्ती प्रकाशन विटा. १९९९.

२. चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९८९
३. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृती कोष, डायमंड पब्लिकेशन पुणे, जुलै २००९.
४. कांबळे उत्तम 'सह्यी नेता' (संपा सकाळ) साई प्रकाशन नाशिक २००७
५. कॅपेबल जेम्स एम. कोल्हापूर-मुंबई-कर्नाटक गँझेटियर १८८१.
६. कुलकर्णी एम. जी., भारतीय समाज व्यवस्था परिमल प्रकाशन, औरंगाबाद २००८.
७. कोठेकर शांता : इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, द्वितीय आवृत्ती, साईनाथ प्रकाशन, कोल्हापूर १९९९.
८. लक्षवेधी विकास योजनांचा, जनशक्ती प्रकाशन, सांगली २००४.
९. मेंहदळे गजानन भास्कर, श्री. राजा शिवछत्रपती खंड १, प्रथम आवृत्ती डायमंड प्रकाशन, पुणे २००६.
१०. मोरे दिनेश आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, खंड १ के. सागर प्रकाशन २००७.
११. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा १९९९.
१२. नखाने मीनल भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नित्यपूजन प्रकाशन पुणे.
१३. पवार आप्पासाहेब, खंड १, २, ३ ताराबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
१४. शिरसीकर व. म., आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २००१.
१५. सरदेसाई गो. स. मराठी रियासत, खंड १, २, ३ पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
१६. साळुंखे श्रीधर 'सह्य योद्धा' फडके प्रकाशन कोल्हापूर २००६.
१७. तांबोळी श्यामसुद्दीन, महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, डायमंड पब्लिकेशन पुणे.

**अप्रकाशित प्रबंध**

१. बोधले चंपाताई श्रीरंग, वि. स. पागे यांचे 'जीवन व कार्य' पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसेंबर २००८.
२. पाटील बी. एस., स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहराचे बदलते सामाजिक आर्थिक स्वरूप: पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २००९.
३. पाटील चंद्रकांत गोविंद 'तासगाव तालुक्याचा द्राक्षशेतीचा आर्थिक इतिहास,' पीएच्.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर डिसे २००७.
४. पाटील एस्. ए. 'सांगोला शहराचा इतिहास' पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २०००.
५. पाडळकर विजय विष्णू स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास पीएच्. डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जून २००९.
६. वरेकर एस. ए. स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर एक नगरी ऐतिहासिक अभ्यास पीएच्. डी. प्रबंध शिवजी विद्यापीठ कोल्हापूर २०००.

**वर्तमानपत्रे**

१. दैनिक अग्रदूत, सांगली आवृत्ती १९२० ते २०१२.
२. दैनिक सकाळ, सांगली आवृत्ती १९४७ ते २०१२.
३. दैनिक लोकसत्ता, सांगली आवृत्ती १९४५ ते २०१२.
४. दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती १९८७ ते २०१२.
५. दैनिक महाराष्ट्र, टाईम्स मुंबई १९६६ ते २०१२.
६. दैनिक नवसंदेश, सांगली आवृत्ती १९२० ते २०१२.
७. दैनिक पुढारी, सांगली आवृत्ती १९५० ते २०१२.
८. दैनिक राष्ट्रशक्ती, सांगली आवृत्ती १९२० ते २०१२.
९. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर आवृत्ती १९४० ते २०१२.

**साप्ताहिक**

१. साप्ताहिक कुलभूषण, संपादक धीरज भिंगारदिवे, गौरवांक २००७.
२. साप्ताहिक मिरज टाईम्स - आर. आर. पाटील वाढदिवस विशेषांक २००९.
३. साप्ताहिक 'राष्ट्रभूषण' संपादक - दत्तात्रय पाटील सोमवार २९ ऑगस्ट २०११.

**नियतकालिके**

१. आम्ही उद्योजिका.
२. लोकराज्य.
३. गृहशोभिका.
४. योजना.

**प्रत्यक्ष भेटी**

१. ऐतिहासिक गणपती मंदीर तासगाव.
२. सर्व ग्रंथालय व वाचनालये
३. सर्व संस्थांची कार्यालये.
४. नगरपालिका, पंचायत समिती व तहसिल कार्यालय तासगाव, जिल्हापरिषद सांगली.
५. तासगावमधील ऐतिहासिक राजवाडा


**वेबसाईट :**

१. www. Google. In.

# परिशिष्ट क्रमांक १


## भारत व महाराष्ट्र राज्याचा नकाशा







## सांगली जिल्हा व तासगाव तालुका नकाशा







# परिशिष्ट क्रमांक २

## वि. स. पागे तथा विठ्ठल सखाराम पागे




## ना. आर. आर.(आबा) पाटील



# परिशिष्ट क्रमांक ३

## सैनिकी शाळा तासगाव





## तासगावमधील सार्वजनिक रथोत्सव



# परिशिष्ट क्रमांक ४

## तासगावमधील सुप्रसिद्ध द्राक्षे, हिरवा व पिवळा बेदाणा उत्पादन





## आर. आर. पाटील यांना राष्ट्रकूल संसदीय मंडळामार्फत सन्मानपत्र

## व दै. राष्ट्रशक्ती दि. १३ जुलै १९३५

## जनपद विद्यापीठामार्फत बाबुराव थोरबोले यांना प्रदान



राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा


''उत्कृष्ट संसदपटू'' पुरस्कार सन १९९५-९६

सन्मानपत्र

''श्री. रावसाहेब रामराव पाटील, विधानसभा सदस्य हे गेली ७ वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया मजबूत करण्यामध्ये एक अग्रेसर म्हणून ओळखले जातात. सन १९९० मध्ये त्यांनी जेव्हा विधानमंडळात प्रवेश केला, तेव्हापासून त्यांनी आपली संसदीय प्रणाली अधिक भक्कम होण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. सामाजिक जाणीवेची निसर्गदत्त देणगी आणि उत्कृष्ट धैर्य त्यांना लाभल्याने त्यांनी नेहमीच राज्यातील जनतेच्या भल्यासाठी निक्षून आणि अत्यंत निर्धाराने आपली बाजू मांडली. त्यांनी अभ्यास व तपश्चर्येद्वारा वाटचाल केली आणि अशा तऱ्हेने त्यांनी लोकांच्या समस्यांचा आवाका आणि व्याप्ती पूर्णपणे समजून घेतली. त्यांची उपजत बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता यामुळे त्यांचे विशेष व्यक्तिमत्त्व बनले आहे. विविध विषयांचे अर्थपूर्ण व सुलभ विषदीकरण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव आणि समृद्ध होण्यास मदत झाली आहे. विधीमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर असलेली त्यांची उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामांची उत्तम जाण याकरीता 'उत्कृष्ट संसदपटू' हा पुरस्कार त्यांना देण्यात राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे.''


दत्ताजीराव नलावडे
अध्यक्ष

जयंतराव टिळक
सभापती



श्रीगजाननमित्रांची प्रभावळ

श्री. लाठीवीर थोरबोले.



जनपद विद्यापीठ


॥ गुणगौरव विभाग ॥

प्रशस्तिपत्र


# परिशिष्ट क्रमांक ५

## तासगावमधील परशुराम माळी यांच्या सर्कशीतील काही क्षणचित्रे.










# परिशिष्ट क्रमांक ६




औद्योगिक गाळे



गोडावून



CFL- STREET LIGHT




IDSHP- घरकुले


# परिशिष्ट क्रमांक ७



कापूरनाला – कॉजवे पूल



सर्वधर्मीय स्मशानभूमि



दलित वस्ती स्मशानभूमि

# परिशिष्ट क्रमांक ८



महात्मा गांधी उद्यान – Bird View



आयलॅंड



गारबेट कॉम्पॅक्टर



मैला टॅंकर ( VACCUM EMPTIER )